म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १९३९

साहित्यातील अश्लील आणि ग्राम्य

र. शं. वाळिंबे

REFBK-0017760

Form 24
64362
9C/3167
9E3E
9E3E

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलम
अनुक्रम 64362 दि: 1994
क्रमांक 9E3E नों: दि: 9/3167

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
संपदी योजना
१९७०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

(20)

सूचना :— खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

25 JUN 1975

[कृ. मा. प.]

साहित्यातील अश्लील आणि ग्राम्य

साहित्यातील

अश्लील आणि ग्राम्य

संस्कृत साहित्यशास्त्राची भूमिका, आणि तिच्या अनुरोधाने जुन्या मराठी कवितेचे, आणि शाहीरांच्या लावण्यांचे विवेचन



लेखक

डॉ. रा. शं. वाळिंबे,
एम्. ए., पीएच्. डी.

सुविचार प्रकाशन मंडळ
पुणे – नागपूर

साहित्यातील
अश्लील आणि ग्राम्य

संस्कृत साहित्यशास्त्राची भूमिका, आणि तिच्या अनुरोधाने
जुन्या मराठी कवितेचे, आणि शाहीरांच्या लावण्यांचे विवेचन



लेखक

डॉ. रा. शं. वाळिंबे,
एम्. ए., पीएच्. डी.

सुविचार प्रकाशन मंडळ
पुणे – नागपूर

साहित्यातील अश्लील आणि ग्राम्य
पहिली आवृत्ति : जानेवारी १९७०
मूल्य आठ रुपये

© डॉ. रा. शं. वाळिंबे
'उन्मेष', एरंडवणे, पुणे ४

□

प्रकाशक
श्यामकान्त श्री. बनहट्टी
सुविचार प्रकाशन मंडळ
४६१।४ सदाशिव पेठ, पुणे ३०
धनतोली, नागपूर–१

□

मुद्रक
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
'शिव-पार्वती'
४६१।४ सदाशिव, पुणे ३०

प्रस्तावना

'तत्त्वबोधिनी सभा' या संस्थेच्या वतीने १३ आणि १४ ऑगस्ट १९६६ या दिवशी 'संस्कृत साहित्यशास्त्राची अश्लील आणि ग्राम्य यांच्या विषयीची भूमिका' या विषयावर प्रतिभा मुद्रणालयाच्या प्रतिभा सभागृहात मी दोन व्याख्याने दिली होती. हीच व्याख्याने प्रसिद्ध करावी असा पहिला संकल्प होता. पण नंतर ज्ञानेश्वरांपासून मोरोपंतांपर्यंत झालेल्या जुन्या मराठी कवितेचे, आणि शाहीरांच्या लावण्यांचेही विवेचन करावे असे ठरले.

उपसंहारात गेल्या शतकातील काही प्रहसनांचे थोडेफार विवेचन आले असले तरी अर्वाचीन वाङ्मयाचे समग्र विवेचन मुळीच अभिप्रेत नाही. जुन्या मराठी कवितेचे आणि शाहीरांच्या लावण्यांचे जे विवेचन प्रस्तुत पुस्तकाच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या भागांत आले आहे त्याच्या आधाराने अर्वाचीन वाङ्मयाचे परीक्षण विचारवंतांनी करावे अशी अपेक्षा आहे.

श्री. राजेन्द्र बनहट्टी यांनी सदर पुस्तकाच्या प्रकाशनाची जबाबदारी स्वीकारली आणि कल्पना मुद्रणालयाचे चालक श्री. चिं. स. लाटकर यांनी उत्कृष्ट मुद्रण केले याबद्दल या दोन मित्रांचा मी ऋणी आहे.

गुरुवार,
१ जानेवारी १९७०
'उन्मेष'
६०।१६ एरंडवणे, पुणे ४.

रा. शं. वाळिंबे

डॉ. रा. शं. वाळिंबे
यांचे टीकात्मक ग्रंथ

साहित्याचा ध्रुवतारा (दुसरी आवृत्ति)
वाङ्मयीन टीका : शास्त्र आणि पद्धति (चवथी आवृत्ति)
बालकवि
मुक्तात्म्यापासून प्रमद्वरेपर्यंत
गडकऱ्यांचे अंतरंग
ज्ञानेश्वरीतील विदग्ध रसवृत्ति
साहित्यमीमांसा
नाटककार गडकरी
प्राचीन भारतीय कला, भाग १
महाराष्ट्राची सामाजिक पुनर्घटना, भाग १
साहित्यातील संप्रदाय (दुसरी आवृत्ति)
मराठी नाट्यसमीक्षा
साहित्यातील अश्लील आणि ग्राम्य

संपादित

ज्ञानेश्वरी, सोळावा अध्याय
संगीत सौभद्र
वाग्वैजयंती
केशवसुत, काव्य आणि परामर्श
अभिज्ञानशाकुन्तल (दुसरी आवृत्ति)
मुद्राराक्षस (मराठी)
मुद्राराक्षस (इंग्रजी; दुसरी आवृत्ति)
वेणीसंहार
स्वप्नवासवदत्त
मेघदूत

■

अनुक्रमणिका

भाग पहिला

संस्कृत साहित्यशास्त्राची भूमिका ३ ते ५५

भाग दुसरा

जुनी मराठी कविता ५९ ते १२२

भाग तिसरा

शाहीरांच्या लावण्या १२५ ते १५१

भाग चौथा

उपसंहार १५३ ते १७२
संक्षेपांचे स्पष्टीकरण १७३
संदर्भ ग्रंथ १७४ ते १७६
सूची १७७ ते १८०

संदर्भ ग्रंथ

पुरवणी

ऐतरेय ब्राह्मण
क्षेमेन्द्र – नर्ममाला
विशाखदत्त – मुद्राराक्षस
शूद्रक – मृच्छकटिक

*

अभ्यंकर, रघुनाथशास्त्री – स्वैरसकेशा
कानिटकर, ना. वा. – तरुणीशिक्षणनाटिका
चितळे, म. बा. – मनोरमा
जोशी, माधवराव – म्युनिसिपालिटी
देवल, गो. ब. – मृच्छकटिक
भागवत, ना. ह. – फरडा मुत्सद्दी
भागवत, ना. ह. – मोर एल्एल्. बी.
लोकहितवादी – शतपत्रें
वाळिंबे, रा. शं.–मराठी नाट्यसमीक्षा

*

Dewey, John : *Art as Experience.*

Langer, S. K. : *Feeling and Form.*

MacDonald K. S. : *The Brahmanas of the Vedas*

Maugham, Somerset : *The Summing up.*

Selden, Samuel : *The Stage in Action*

Stern, Gustaf : *Meaning and Change of Meaning.*

■

शुद्धिपत्र

(फक्त शुद्ध रूप दिले आहे. पहिला आकडा पृष्ठाचा, दुसरा आकडा ओळीचा.)

१० – २६ उदाहरणचन्द्रिका
२६ – १९ घृणावत्स्मृतिहेतु...
३५ – २३ स्त्राभाविक
३८ – ८ दोष मात्र
४८ – २९ काव्यानुशासन
७२ – २७ दुष्यन्ताला
७३ – २ सुदुर्धर्ष
७३ – ४ मेऽविघ्नमुत्तमम्
७४ – ११ विश्वामित्र
७४ – २० चंचळापांगी
७५ – १२ विश्वामित्र
७९ – १७ परस्पराशी
८३ – १० ग्राम्यत्वदोष घडणार नाही अशी काळजी घ्यावी
९० – ७ निर्लज्ज
९४ – २९ गौरव
९९ – २९ सभय कां
१०६ – ११ वर्णन
१०९ – २ (मागे पृष्ठ ७० पाहावे.)
१३९ – २३ वाङ्मयात
१३९ – २९ सर्वस्वी
१४४ – १८ स्त्रियांकडून
१४४ – २३ उदाहरणार्थ
१४४ – २४ पणिाम
१५८ – २० (मागे पृष्ठ १२७ पाहा.)
१६९ – १४ पूर्वजांची
१७६ – ५ कृष्णदयार्णव

■

भाग पहिला

संस्कृत साहित्यशास्त्राची भूमिका

मराठी ग्रंथ संग्रहालय, पुणे. स्थापना
क्रमांक ७५३६२ दि: निबंध
क्रमांक ९८३८ वर्ग क्रि. २/३/७



संस्कृत साहित्यशास्त्राची भूमिका

मनातील विचार अगदी स्पष्ट शब्दांत, कोणत्याही पर्यायोक्ताचा आश्रय न करता, जसाच्या तसा प्रकट करणे, ही गोष्ट ऋग्वेदासारख्या प्राचीनतम वाङ्मयात मधून मधून दिसून येते हे खरे आहे. दहाव्या मण्डलात प्रत्यक्ष मैथुनक्रियेचे स्पष्ट उल्लेख काही ठिकाणी आहेत. उदाहरणार्थ, ऋग्वेद, १०·८५·३७, १०·८६·६, १०·८६·१६–१७.

शुक्लयजुर्वेदाच्या तेविसाव्या अध्यायात हाच प्रकार आढळून येईल. येथेही स्पष्टोक्तीचा अतिरेक झालेला आहे. शु. य. २३·२४ वर भाष्य करताना 'इति अश्लीलाभिप्रायं वचनम्' असे उवटाचार्य म्हणतात. आणि 'इति अश्लीलम्' असा महीधरानेही शेरा मारला आहे. 'दधिक्राव्णो अकारिषं जिष्णोरश्वस्य वाजिनः । सुरभि नो मुखा करत् प्र ण आयूंषि तारिषत् ॥' हा तेविसाव्या अध्यायातील ३२ वा मंत्र आहे. यावर भाष्य करीत असता उवटाचार्य व महीधर या दोघांनी 'हे अश्लील भाषण आहे' असे अगदी स्पष्टपणे म्हटले आहे. अश्वाच्या धार्मिक संस्कारासाठी असे अश्लील भाषण करणे भाग पडले असे स्पष्टीकरण जरी या दोघांही भाष्यकारांनी दिले असले तरी ते अश्लील आहे हे कबूल करणे त्यांना भाग पडले आहे. या अश्लील भाषणाने दुर्गन्धी झालेली मुखे पुन्हा 'सुरभि' म्हणजे सुगन्धी होवोत अशी अपेक्षाही त्यांनी मंत्राच्या आधाराने व्यक्त केली आहे. 'यद् दधिक्राव्णः अश्वस्य संस्कारार्थमश्लीलभाषणमकारिषं...कृतवन्तः... । ...अश्लीलभाषणेन

हि दुर्गन्धीनि मुखानि भवन्ति पापहेतुत्वात्...” (उवटभाष्य); “ ...अश्लीलभाषण-मितिशेषः । किमर्थम् ? अश्वस्य संस्कारायेति शेषः । अश्वसंस्काराय अश्लीलभाषणं कृतवन्तः इत्यर्थः ...नः अस्माकं मुखा मुखानि सुरभि सुरभीणि करत् करोतु यज्ञ इति शेषः । अश्लीलभाषणेन दुर्गन्धं प्राप्तानि मुखानि सुरभीणि यज्ञः करोत्वित्यर्थः ।...” (महीधर) शु. य. २३·२४ वर भाष्य करतानाही उवट आणि महीधर या दोघांनीही त्यावर ‘ अश्लील ’ असा शेरा मारला आहे. शुक्लयजुर्वेदाच्या काळात अशा प्रकारची वचने अश्लील मानली गेली नाहीत, परंतु भाष्यकारांच्या काळात ती जाणत्या लोकांना अश्लील वाटली असाच याचा अर्थ आहे. हाच प्रकार ऋग्वेदातील ज्या वचनांचा वर उल्लेख केला आहे त्यांच्या बाबतीतही झाला असला पाहिजे. संस्कृतीच्या आदिम अवस्थेतील माणसे अगदी गोपनीय गोष्टींसंबंधीही अतिशय निर्भेळ स्पष्टवक्तेपणाने बोलत असत. परंतु कालान्तराने हा स्पष्टवक्तेपणा कमी कमी होत गेला, आणि पर्यायोक्ताचा किंवा व्यंजनेचा वापर करण्यात येऊ लागला असाच या प्रकाराचा अर्थ आहे. ‘ मंत्रब्राह्मणा’त विवाह-विधीच्या संदर्भात जे मंत्र आहेत ते ‘ अश्लील ’ (obscene) आहेत असे म्हणता येत नसले तरी ते ‘ असभ्य ’ (indecent) आहेत असे के. एस्. मॅक्डोनल्ड याने म्हटले आहे. अशी वचने विषयवासना चाळविण्यास कारण होत नाहीत असे म्हणून मॅक्डोनल्ड याने जुन्या करारातील (Old Testament) एतत्सदृश वचनांचा उल्लेख केला आहे. असल्या प्रकारच्या (मैथुनक्रियेचा स्पष्ट उल्लेख करणाऱ्या) स्पष्टोक्तींवर काहीतरी बंधन असले पाहिजे हा विचार प्राचीन काळी नव्हता, तो पुष्कळसा उत्तरकालीन (किंवा अर्वाचीन) आहे असेही मॅक्डोनल्ड म्हणतो. ख्रिस्तोत्तर तिसऱ्या किंवा चवथ्या शतकातही प्रमुख ख्रिस्ती उपाध्ये असल्या प्रकारे अगदी मोकळेपणाने बोलत असत असे मॅक्डोनल्ड याने नमूद केले आहे. क्लेमंट ऑफ अलेक्झांड्रिया आणि टायरचा बिशप या संदर्भात ज्या प्रकारची भाषा वापरीत असत तिचा प्रतिष्ठित इंग्रजीमध्ये सरळ अनुवाद करणे अशक्य आहे अशी कबुली मॅक्डोनल्ड याने दिली आहे. असाच प्रकार ब्राह्मणवाङ्मयाच्या बाबतीतही झाला आहे असे म्हणून मॅक्डोनल्डने ‘ मंत्रब्राह्मण ’ या ग्रंथातील तीन व चार या मंत्रांचा उल्लेख केला आहे. इतकेच नव्हे तर ‘ ही वचने उद्धृत करता येणार नाहीत ’ (“ The language cannot be quoted. ”), असेही त्याने म्हटले आहे.[1]

आधुनिक काळात स्त्रीपुरुषांच्या गुह्य इंद्रियांचा उल्लेख स्पष्ट शब्दांनी करणे, अथवा मैथुनक्रियेसंबंधी स्पष्ट शब्दांनी बोलणे, या गोष्टी असभ्य किंवा शिष्टाचाराचा बाध करणाऱ्या ठरल्या. म्हणजे असभ्यातून सभ्याकडे, किंवा अशिष्टत्वातून शिष्टत्वाकडे, अशीच समाजाच्या विकासक्रमाची अवस्था दिसून येते. आजही असंस्कृत समाजातील हीन लोक

1. *The Brahmanas of the Vedas.* (1896) P. 178.

जी असभ्य भाषा अगदी सहज वापरतात, ती सुसंस्कृत नागर समाजातील प्रतिष्ठित लोक वापरणार नाहीत. आणि कारणपरत्वे अशी भाषा वापरणे अगदी नाइलाजाने भागच पडले तर आपले काहीतरी चुकले अशी टोचणी सतत त्यांच्या मनाला लागून राहते. अशी टोचणी त्या दूरच्या प्राचीन काळातील माणसांच्या मनाला कधीही लागत नसे. सुसंस्कृतपणाच्या कल्पनांमध्ये केवढे अंतर पडले हे !

ऋग्वेदाच्या दहाव्या मण्डलात यम आणि यमी या भावाबहिणींचा संवाद आला आहे तो अवश्य पाहावा. भावाविषयी तीव्र कामुक अभिलाषा बाळगणारी व अगदी बेभान झालेली यमी त्याला संभोगाला प्रवृत्त करण्यासाठी जे बोलते ते अगदी स्पष्ट आहे, त्यात कसलाही आडपडदा नाही, भीडमुर्वत नाही. " भावाने बहिणीशी संभोग केल्याची उदाहरणे मागच्या काळात घडली असली तरी आज आपण तसे करणे योग्य नाही, आपले भावाबहिणींचे श्रेष्ठ नाते लक्षात घेऊन असल्या या हीन कल्पनेच्या आहारी जाऊ नकोस, " असे यम तिला परोपरीने सांगतो. पण वासनेने भ्रमिष्ट झालेल्या यमीला ते मुळीच पटत नाही. 'तू कमालीचा दुबळा आहेस' असे ती स्पष्टपणाने बोलते. तिला त्याची कीव येते.

संस्कृतीच्या प्राथमिक अवस्थेत भाऊ बहिणीशी संभोग करीतही असेल. पण संस्कृतीच्या विकासात हा आचार लुप्त झाला, आणि भावाबहिणींचे नाते पवित्र मानले जाऊ लागले असाच या प्रकाराचा अर्थ आहे. ज्या काळात भाऊ बहिणीशी लग्न करीत नाही असा काळ अगदी नजीक आहे असे यम यमीला म्हणतो. (" यत्र येषु कालेषु जामयः भगिन्यः अजामि अभ्रातरं पतिं कृण्वन् करिष्यन्ति ता तानि उत्तरा उत्तराणि युगानि आ गच्छान् आगमिष्यन्ति । " — सायणभाष्य. १०·१०·१०) भावाने बहिणीशी संभोग करणे हा साक्षात् पशुधर्म होय ही कल्पना अतिप्राचीनकाली नव्हती. ती संस्कृतीच्या विकासक्रमात उद्भूत झाली. पुत्राने मातेशी, अथवा भावाने बहिणीशी संभोग करणे या पशुधर्माचा उल्लेख ऐतरेय ब्राह्मणाच्या तेहतिसाव्या अध्यायात हरिश्चन्द्र व रोहित यांच्या कथेत आला आहे.

नापुत्रस्य लोकोऽस्तीति तत्सर्वे पशवो विदुः ।
तस्मात् पुत्रो मातरं स्वसारं चाधिरोहति ॥ ३३·१·९
एष पन्था उरुगायः सुशेवो यं पुत्रिण आक्रमन्ते विशोकाः ।
तं पश्यन्ति पशवो वयांसि च तस्मात्ते मात्राऽपि मिथुनीभवन्ति ॥ ३३·१·१०

आपल्या बहिणीशी संभोग करणे हा पशुधर्मच होय असे ऋग्वेदातील यमाला वाटते आणि तो तिचा निषेध करतो. " पूर्वी असा प्रकार (म्हणजे भावाने बहिणीशी संभोग करण्याचा प्रकार) कोणी तरी केला होता म्हणून आज आपण तसे करणे योग्य होणार

नाही " असे यम यमीला म्हणतो. पूर्वीच्या प्रकाराचा जो उल्लेख यमाने केला आहे तो प्रत्यक्ष प्रजापती आपल्या कन्येशी ज्या हीन प्रकाराने वागला त्याला अनुलक्षून आहे असे सायणाचार्य म्हणतात.

प्रजापती आपल्या कन्येशी रममाण झाला ही कथा ऐतरेय ब्राह्मणाच्या तेराव्या अध्यायाच्या नवव्या खण्डामध्ये आली आहे. प्रजापतीने आपल्या कन्येशी संभोग केला हे देवांच्या ध्यानात आले, आणि 'जे कोणी करू नये असे निंद्य कृत्य याने केले आहे' (अकृतमकः) म्हणून याला ठार मारला पाहिजे असा त्यांनी विचार केला. प्रजापतीला ठार मारण्याचे काम रुद्राने पतकरले आणि तीक्ष्ण बाणाने त्याला मारले. या कथेतील रूपकाचा उलगडा येथे करण्याची आवश्यकता नाही. स्वतःच्या कन्येशी संभोग करण्याचा प्रकार संस्कृतीच्या अतिप्राचीन अवस्थेत केव्हा तरी रूढ असेलही. तथापि ऐतरेय ब्राह्मणाच्या काळात हा आचार पूर्णपणे निषिद्ध मानला गेला असला पाहिजे एवढेच याठिकाणी स्पष्ट करावयाचे आहे. मुलाने आईशी, भावाने बहिणीशी, बापाने मुलीशी संभोग करणे कोण्या एका अज्ञात प्राचीन काळी रूढ असले तरी संस्कृतीच्या विकासक्रमात कालान्तराने हा आचार पूर्णपणे निषिद्ध ठरला, पशुधर्म ठरला, ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे. असभ्य शब्दांतून सभ्य शब्दांकडे, आणि असभ्य व निषिद्ध आचारांतून सभ्याचारांकडे व शिष्टाचारांकडे असा हा विकासाचा क्रम दिसून येत आहे.

महाभारतातील दुष्यन्त शकुन्तलेशी पहिल्याच भेटीत अगदी स्पष्टपणाने बोलतो. 'इच्छामि त्वां वरारोहे' असे म्हणतो. 'सा त्वं मम सकामस्य...भार्या भवितुमर्हसि' असेही तो म्हणतो. पण 'शाकुन्तल' नाटकातील दुष्यन्त पहिल्या भेटीत शकुन्तलेशी असे बोलत नाही, फारच दाक्षिण्याने बोलतो, पर्यायाने बोलतो. बोलण्याच्या धाटणीतील हा फरक ध्यानात ठेवण्यासारखा आहे. महाभारतातील कुन्तीला सूर्य म्हणतो — "संत्यज्य भयमेवेह क्रियतां संगमो मम।' (आदि. ११९·१३) सारा रोखठोक व्यवहार आहे. कसलाही संकोच नाही, आडपडदा नाही. 'माझ्याशी रममाण हो' असे अगदी निर्लज्जपणाने यवक्रीत रैभ्य मुनीच्या सुनेला म्हणतो. (वन. १३६·३) महाभारतातील हा निःसंकोच स्पष्टवक्तेपणा पुढच्या काळातील काव्यांत अथवा नाटकांत आढळणार नाही. प्राचीन काळातील निःसंकोचपणाला, मोकळेपणाला, किंवा स्पष्टवक्तेपणाला पुढच्या काळात असभ्य आणि अशिष्ट मानण्यात येऊ लागले. आणि यामुळेच 'ग्राम्य' आणि 'अश्लील' यांचा स्पष्टपणे निषेध करण्याचा आग्रह साहित्यशास्त्रकारांनी धरला.

भरतमुनींचे नाट्यशास्त्र

कलेतील ग्राम्य आणि 'लज्जाकर' गोष्टींचा अगदी स्पष्ट शब्दांत केलेला निषेध प्रथम

भरतमुनींच्या 'नाट्यशास्त्रा 'त आढळतो. रंगभूमीवर वर्ज्य असलेल्या गोष्टींचा बाविसाव्या अध्यायात उल्लेख आला आहे.

न कार्यं शयनं रङ्गे नाट्यधर्मं विजानता ।
केनचिद्वचनार्थेन अङ्गच्छेदो विधीयते ॥

यद्वा शयीतार्थवशादेकाकी सहितोऽपि वा ।
चुम्बनालिङ्गनं चैव तथा गुह्यं च यद् भवेत् ॥

दन्तच्छेद्यं नखच्छेद्यं नीवीस्रंसनमेव च ।
स्तनान्तरविमर्दं च रङ्गमध्ये न कारयेत् ॥

भोजनं सलिलक्रीडा तथा लज्जाकरं च यत् ।
एवंविधं भवेद्यत्तत्तद्रङ्गे न कारयेत् ॥

(गायकवाड सीरीज, अ. २२·२९५–२९८)

रंगभूमीवर झोपू नये; कथानकाच्या दृष्टीने झोपण्याचा प्रसंग आवश्यक असला तर चुम्बन किंवा आलिंगन इत्यादी गोष्टी दाखवू नयेत; त्याचप्रमाणे इतर ज्या गुह्य (गोपनीय) गोष्टी असतील त्याही कटाक्षाने टाळाव्या; दन्तव्रण, नखव्रण, नीवीविस्रंसन (वस्त्राची गाठ सोडणे, निरीला हात घालणे), कुचमर्दन इत्यादी कृती करू नयेत; भोजन, जलक्रीडा, त्याचप्रमाणे जे जे काही 'लज्जाकर' (लाज उत्पन्न करणारे) असेल ते ते रंगभूमीवर टाळावे.

रंगभूमीवरील वर्जनीय गोष्टींची ही यादी दिल्यानंतर या गोष्टी का व्यर्ज्य मानाव्या याचे कारणही भरतमुनींनी दिले आहे.

पितापुत्रस्नुषाश्वश्रूदृश्यं यस्मात्तु नाटकम् ।
तस्मादेतानि सर्वाणि वर्जनीयानि यत्नतः ॥ २२·२९९

नाटक या कलाप्रकाराचे वैशिष्ट्य असे की त्याचे अवलोकन मिश्र समाजात बसून करावयाचे असते. या समाजात अगदी जवळच्या नात्यांतील माणसे असू शकतील. पिता, पुत्र, स्नुषा, श्वश्रू (सासू) या सर्वांनी एकत्र बसून ज्याचा प्रयोग पाहावयाचा त्यात लाजेने मान खाली घालावयास लावणारी एकही घटना असता कामा नये, एकही दृश्य असता कामा नये, कोणालाही रंगभूमीवरील दृश्य पाहताना आपल्या जवळ बसलेल्या नात्यातल्या माणसांचा संकोच वाटता कामा नये—असे भरतमुनींचे विवेचन आहे. रंगभूमीवरील दृश्य लज्जाकर असेल तर रसभङ्ग होईल असे अभिनवगुप्तांनी म्हटले आहे.

(ततश्च रसो भज्येत, स हि साधारणान्योन्यानुप्रवेशप्राणः...). 'रङ्ग' म्हणजे प्रेक्षागृहातील समाज 'स्त्रीबालमूर्खावकीर्ण' (म्हणजे कमालीचा मिश्र) असतो असे नाट्यशास्त्रात (अ. ३४) म्हटले आहे. उत्तम, मध्यम आणि अधम अशा अनेक प्रकारच्या लोकांनी नाट्यगृहातील समाज 'संकीर्ण' असतो असे विधान आणखी एका ठिकाणी (निर्णय-सागर प्रत, अ. २७·५४; 'संकीर्णानां च पर्षदि' असे शब्द गायकवाड सीरीज प्रतीत आहेत. २७·५५) आले आहे. रंगभूमीवरील दृश्यामुळे प्रेक्षकाच्या मनात जी भावना निर्माण होते ती त्या प्रेक्षकापुरती मर्यादित राहत नाही, तर ती सर्व प्रेक्षकसमाजात तत्क्षणी पसरते. "...an audience is affected by mass suggestion" असे जे समरसेट मॉम् याने म्हटले आहे[1] त्यातील मर्म हेच आहे. "..the audience is a very curious animal" असेही त्याने अन्यत्र म्हटले आहे.[2] अशा संकीर्ण समाजापुढे जे दृश्य उभे करावयाचे ते कोणत्याही प्रकारे 'लज्जाकर' असता कामा नये, विशेषतः जवळच्या नाट्यातील अनेक व्यक्ती एकत्र बसून नाटक पाहत असतील तर त्यांना कसलाही संकोच वाटता कामा नये असे भरतमुनी आग्रहपूर्वक सांगत आहेत. नाट्य काय, किंवा नृत्य काय, 'सौष्ठव' ही त्याची बैठक असल्यामुळे (ना. शा. १०·९४, गायकवाड सीरीज) या सौष्ठवाला जेणेकरून बाध येईल असे काहीही नाटकात (किंवा त्याच्या प्रयोगात) असू नये हाच त्यांचा अभिप्राय आहे. थोडक्यात, रंगभूमीवरील प्रयोगात कलात्मक संयम पाळला पाहिजे, हेच भरतमुनींचे म्हणणे आहे. विटासारख्या रंगेल गुलछबूनेही रंगभूमीवर चुंबनाचा अभिनय कसा करावा याची स्पष्ट सूचना नाट्यशास्त्र ९·११८ या श्लोकात आढळेल. केवळ हास्यरसाची निर्मिती विदूषकासारख्या हीन पात्राच्या द्वारे करावयाची असताना मात्र असंबद्ध भाषण आणि अश्लीलभाषण वर्ज्य नाही.

काव्यहास्यं तु विज्ञेयमसंबद्धप्रभाषणैः ॥ (१२·१४०)
अनर्थकैर्विकारैश्च तथा चाश्लीलभाषणैः । (१२·१४१)

हास्यरसाच्या बाबतीत ही सवलत नाट्यशास्त्राने दिली असली तरी राजासारख्या प्रतिष्ठित व्यक्तीसमोर अश्लील भाषण उचित नाही (म्हणजे ते कटाक्षाने टाळावे) असा अभिनव-गुप्तांनी शेरा मारला आहे. "न च राजनि संनिवृत्तेऽश्लीलभाषणं समुचितम् ।"

भरतमुनींचा प्रकृत्यौचित्यावर फार भर आहे. नाटकातील भूमिकेची जी प्रतिष्ठा असेल तिच्या अनुरोधाने तिच्याकडून घडणाऱ्या कृती असल्या पाहिजेत. म्हणजे प्रतिष्ठित व्यक्तीची

---

1. *The Summing Up.* P. 129. William Heinemann Ltd. 1949.
2. *Ibid.* P. 126.

हालचाल संयमाने झाली पाहिजे, तिच्या प्रत्येक कृतीत संयम दिसून आला पाहिजे. आवेगाचा अभिनय कसा करावा हे स्पष्ट करताना भरतमुनी म्हणतात.

स्थैर्येणोत्तममध्यानां नीचानां चापसर्पणैः ॥ (७·६३)

समाजात वावरणाऱ्या प्रतिष्ठित व्यक्तीने आपल्या प्रत्येक हालचालीवर नियंत्रण ठेवणे आवश्यक असते हाच या वचनाचा अभिप्राय आहे. " Social expediency, ' civilization ' demands control " असे सॅम्युअल सेल्डन याने जे म्हटले आहे त्यातील मर्म हेच आहे.

व्यक्तीचे चालणे, तिची हालचाल, यासारख्या गोष्टींवर प्रतिष्ठित समाजात जर इतके नियंत्रण आवश्यक असते तर तिच्या बोलण्यावर, म्हणजे आपल्या मनातील विचार व भावना व्यक्त करण्यासाठी ती व्यक्ती जी भाषा वापरते त्या भाषेवर, असेच नियंत्रण आले पाहिजे हे ओघानेच आले.

पात्रांच्या हातून रंगभूमीवर ज्या कृती घडतात त्यांच्यापैकी एकही कृती लज्जाकर असू नये एवढ्यापुरतेच नाट्यशास्त्रातील वरील विवेचन मर्यादित आहे हे खरे असले तरी ' तथा लज्जाकरं तु यत् ' या वाक्यांशाने लज्जाकर भाषण सुद्धा रंगभूमीवर वर्ज्य मानले पाहिजे असे सूचित झाले आहे.

चुंबनाचा प्रसंग रंगभूमीवर किती कौशल्याने टाळता येणे शक्य आहे याचे एक अतिशय सुंदर उदाहरण कालिदासाच्या ' शाकुन्तल ' नाटकाच्या तिसऱ्या अंकाच्या शेवटी आहे. लताकुंजामध्ये दुष्यन्त शकुन्तलेचे चुंबन घेण्याच्या बेतात आहे. तोच गौतमी आत्याची हाक ऐकू येते, आणि शकुन्तला कुंजातून झट्कन बाहेर निघून जाते. शकुन्तलेचे चुंबन घेता आले नाही म्हणून हळहळणाऱ्या राजाच्या तोंडी पुढील श्लोक आहे.

मुहुरङ्गुलिसंवृताधरोष्ठं
प्रतिषेधाक्षरविक्लवाभिरामम् ।
मुखमंसविवर्ति पक्ष्मलाक्ष्याः
कथमप्युन्नमितं न चुम्बितं तु ॥ (३·२२)

नाट्यशास्त्राच्या सोळाव्या अध्यायात काव्यदोषांचे विवेचन आले आहे. या दोषांच्या यादीत ' भिन्नार्थ ' नावाचा दोष आहे. याचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे आहे.

भिन्नार्थमभिविज्ञेयमसभ्यं ग्राम्यमेव च ॥ (१६·९०)

यावर टीका करताना 'भद्रे, भजस्व मामिदानीं ते दास्यामि' हे अभिनवगुप्तांनी ग्राम्याचे उदाहरण दिले आहे. 'भजस्व माम्' हे म्हणणे जर ग्राम्य, तर 'क्रियतां संगमो मम' हे सूर्याचे कुन्तीजवळ मागणे, अथवा 'उपातिष्ठस्व माम्' हे यक्षकीताचे रंभेच्या सुनेजवळ मागणे (मागे पृ. ६ पाहा.) ग्राम्य याच सदरात पडणार हे उघड आहे.

भामह

काव्याच्या श्रेष्ठतेची गमके सांगताना 'अग्राम्य' हे एक गमक भामहाने सांगितले आहे. (काव्यालङ्कार, १·३५). श्रुतिदुष्ट, अर्थदुष्ट, कल्पनादुष्ट, आणि श्रुतिकष्ट असे चार प्रकारचे दोष भामहाने सांगितले आहेत. जेव्हा विशिष्ट शब्दांच्या योगाने असभ्य गोष्ट मनात येते तेव्हा 'अर्थदुष्ट' हा दोष घडतो. या दोषाचे भामहाने दिलेले उदाहरण —

हन्तुमेव प्रवृत्तस्य स्तब्धस्य विवरैषिणः।
पतनं जायतेऽत्रस्यं कृच्छ्रेण पुनरुक्षतिः॥

भामहाने दिलेल्या या उदाहरणातील 'हन्तुम्', 'स्तब्ध', 'विवर', 'पतन', आणि 'उक्षति' हे शब्द दुहेरी अर्थाचे (श्लिष्ट) आहेत हे कोणाही जाणत्याच्या तात्रडतोब लक्षात येईल.

अर्थदोषांची चर्चा करीत असता 'काव्यप्रकाश'कारांनी भामहाने दिलेला श्लोक थोड्या फरकाने 'अश्लीला'चे उदाहरण म्हणून दिला आहे. 'यथाऽस्य जायते पातो न तथा पुनरुक्षतिः।' असा 'काव्यप्रकाशा'तील उदाहरणामधील दुसरा चरण आहे. पहिला चरण समान आहे. व्यर्थी शब्दांच्या योजनेमुळे या ठिकाणी पुरुषलिंगाचीही प्रतीती होते अशी 'काव्यप्रकाश'कारांची 'वृत्ति' (विवरण) आहे. वामनाचार्य झळकीकरांनी व्यर्थी शब्दांचे जे स्पष्टीकरण केले आहे तेवढेच देऊन समाधान मानणे भाग आहे. (अश्लील अर्थ मराठीमध्ये देणे बिकट आहे.) हन्तुम् — (१) हिंसां कर्तुम्, (२) सुरतक्रियारूपयोनिताडनं कर्तुम्; स्तब्धः — (१) अनम्रः, (२) निष्क्रियोन्नतः; विवरैषी — (१) परदोषान्वेषी, (२) स्त्रीवराङ्गमध्यान्वेषी; पातः — (१) अपचयः, (२) वीर्यत्यागजनितशैथिल्यम्; उक्षतिः — (१) उपचयः, (२) रागोद्रेकेण दृढता. या अर्थांपैकी पहिला अर्थ दुष्ट माणसाला अनुलक्षून असून दुसरा अर्थ पुरुषलिंगाला अनुलक्षून आहे. 'अत्र च स्पष्टमश्लीलत्वम्' असा या श्लोकावर 'उदाहणचन्द्रिका'कारांचा शेरा आहे. "शब्दान्तरेणाप्युपादीयमानोऽयमर्थः पुंव्यंजनादिसाधारण्येन प्रतीतेर्व्रीडादायी।" असे 'काव्यप्रदीप'कार म्हणतात.

अग्राम्यतेवर (म्हणजे ग्राम्यतेच्या अभावावर) भामहाचा विशेष कटाक्ष आहे. अलंकार-

वदग्राम्यमर्थ्यं न्याय्यमनाकुलम् । ' अलंकारयोजनेच्या बाबतीत औचित्य पाळले नाही म्हणजे तो अलंकार ' ग्राम्य ' होतो. अशा ग्राम्य अनुप्रासाचे उदाहरणही भामहाने दिले आहे. ' स लोलमालानीलालिकुलाकुलगलो बलः । ' हे ते उदाहरण होय. या अनुप्रासात कसलीही सौन्दर्यदृष्टी नसल्यामुळे तो ' ग्राम्य ' होय.

एखाद्या शब्दाच्या अनेक अर्थांपैकी एक अर्थ वाईट असला तरी दुसऱ्या चांगल्या शब्दाच्या जोडीला तो वापरला तर शोभून दिसतो. हागमध्ये गुंफलेल्या सुंदर फुलाच्या मध्ये पाने शोभून दिसतात त्याप्रमाणेच हे आहे असे भामह म्हणतो.

संनिवेशविशेषात्तु दुरुक्तमपि शोभते ।
नीलं पलाशमाबद्धमन्तराले स्रजामिव ॥ १·५४

याचे स्पष्टीकरण करण्यासाठी त्याने ' गण्ड ' शब्दाचे उदाहरण दिले आहे. गण्ड या शब्दाचा गाल हा एक अर्थ आहे, तसाच गळू असाही अर्थ आहे. (उदा. गण्डस्योपरि स्फोटः) पण ' गण्ड ' हा शब्द ' पाण्डु ' या शब्दाच्या सांनिध्यात आला असता ' गाल ' हाच अर्थ मनात येतो. म्हणून ' आपाण्डुगण्डं वदनम् ' ही रचना कोणताही ओंगळ अर्थ मनात निर्माण करीत नाही.

आपाण्डुगण्डमेतत्ते वदनं वनजेक्षणे ।
संगमात् पाण्डुशब्दस्य गण्डः साधु यथोदितम् ॥

(' मृच्छकटिक ' नाटकातील ' उदयति हि शशाङ्कः कामिनीगण्डपाण्डुः ' या प्रसिद्ध श्लोकाची येथे आठवण होईल.)

ग्राम्य शब्दाचा वापर कधीही करू नये यावर भामहाचा कटाक्ष आहे. सहाव्या परिच्छेदाच्या पंचविसाव्या श्लोकात त्याने ' ग्राम्य ' शब्दयोजनेचा पुन्हा निषेध केला आहे. त्याने ' अश्लील ' हा शब्द कोठेही वापरलेला नसला तरी ' अर्थदुष्ट ' नांवाचा दोष त्याने सांगितला आहे. या दोषाचे त्याने केलेले विवरण वामनाने केलेल्या अश्लीलाच्या व्याख्येशी फार जुळते आहे. ' असभ्यवस्तुविषया मतिः ' असे भामहाचे शब्द आहेत. ' असभ्यान्तरमसभ्यस्मृतिहेतुश्चाश्लीलम् ' अशी वामनाने अश्लीलाची व्याख्या केली आहे. ज्या शब्दांमुळे असभ्य गोष्टीची आठवण होते असे शब्द, आणि ग्राम्य शब्द वापरणे निषिद्ध होय असे स्पष्टपणे सांगणारा भामह हाच पहिला साहित्यशास्त्रकार असावा.

दण्डी

काव्यामध्ये अगदी क्षुद्र दोष देखील असता कामा नये; त्या क्षुद्र दोषामुळे इतर बाबतीत सुन्दर असलेले काव्य दूषित होते; शरीर सुन्दर असले तरी पांढऱ्या कोडाच्या एका डागामुळे

ते किळसवाणे बनते, त्याचप्रमाणे क्षुद्र दोषाने सुद्धा काव्य असुन्दर बनते असे दण्डीचे विवेचन आहे. ज्याला अगदी क्षुद्र दोष चालत नाही तो ग्राम्यता कशी सहन करील? काव्यात कसलीही ग्राम्यता नसणे हे त्याच्या सौन्दर्याचे प्रमुख गमक आहे असे दण्डी म्हणतो. कोणताही अलंकार काव्यार्थ सुंदर करावयास कारण होतो हे खरे असले तरी काव्याच्या सौंदर्याचा सारा भार अग्राम्यतेवरच असतो असे त्याचे स्पष्ट विधान आहे.

कामं सर्वोप्यलंकारो रसमर्थे निषिञ्चति ।
तथाप्यग्राम्यतैवैनं भारं वहति भूयसा ॥ (काव्यादर्श, १·६२)

ग्राम्य अर्थामुळे रसभंग होतो, म्हणून तो टाळावयास पाहिजे. ' कन्ये, कामयमानं मां न त्वं कामयसे कथम् ? ' हे बोलणे ग्राम्य असल्यामुळे वैरस्याला कारण होते. त्या ऐवजी ' कामं कन्दर्पचाण्डालो मयि वामाक्षि निर्दयः । त्वयि निर्मत्सरो दिष्ट्या...' असे जर बोलले तर ते ग्राम्य नाही असा दण्डीचा निर्णय आहे. थोडक्यात, स्त्रीवरील प्रेम व्यक्त करताना अगदी सरळ, रोखठोक भाषेत, कसलाही आडपडदा न ठेवता बोलणे, आणि आपल्या मनातील अभिलाषा प्रकट करताना कसलाही संकोच न बाळगणे, या गोष्टी ग्राम्य या सदरात पडतात. पण व्यंजनेने अथवा पर्यायोक्ताचा वापर करून ही भावना आडवळणाने व्यक्त केली तर ग्राम्य होत नाही असा दण्डीचा अभिप्राय आहे.

अर्थ ग्राम्य असतो हे तर झालेच. पण शब्दात देखील ग्राम्यता असते असे दण्डी म्हणतो. उदाहरणार्थ, ' यकारादिपद ' म्हणजे ज्याच्या आरंभी 'य' हा वर्ण आहे असा ' यभन ' हा शब्द मैथुनक्रियेचा वाचक आहे. ' यभन ' शब्द काय, किंवा त्याच अर्थाचा ' याभ ' शब्द काय, ग्राम्य असल्यामुळे काव्यात येता कामा नये. प्रत्यक्ष येता कामा नये हे जितके खरे, तितकेच अप्रत्यक्ष रीतीनेही येता कामा नये हेही खरे. उदाहरणार्थ, दोन स्वतंत्र शब्द जोडून एकत्र केले असता ' याभ ' शब्द तयार होत असेल तर ते आक्षेपार्ह आहे. ' या भवतः प्रिया ' या वाक्यांशात ' या ' (जी) आणि ' भवतः ' (तुझी) हे दोन स्वतंत्र शब्द आहेत. पण त्यांचा एकत्र उच्चार केला असता ' याभवतः प्रिया ' म्हणजे मैथुनक्रीडा करणाराची प्रिया असा ग्राम्य अर्थ मनात येणे अपरिहार्य असल्यामुळे ' या भवतः प्रिया ' ही रचना दुष्ट आहे.

ग्राम्यतेचे दण्डीने दिलेले आणखी एक उदाहरण—

खरं प्रहृत्य विश्रान्तो पुरुषो वीर्यवानिति ।
एवमादि न शंसन्ति मार्गयोरुभयोरपि ॥ (काव्यादर्श, १·६७)

या श्लोकातील ' वीर्यवान् पुरुषः ' या शब्दांमुळे ' कामुक पुरुष ' असा अर्थ मनात

येणे अपरिहार्य आहे. हा अर्थ मनात येताच 'खरं प्रहृत्य' आणि 'विश्रान्त' या शब्दांचाही अर्थ विपरीत घेण्याचा मोह होणे स्वाभाविकच आहे. वास्तविक, या ओळीचा चांगला अर्थही सहज लक्षात येण्यासारखा आहे. 'वीर्यवान् पुरुष' म्हणजे पराक्रमी राम 'खरं प्रहृत्य' म्हणजे खर नावाच्या राक्षसाला ठार मारून 'विश्रान्तः' म्हणजे विसावा घेत आहे. पण 'वीर्यवान्' या शब्दामुळे जी दुसऱ्या अर्थाची प्रतीती होते तिच्या योगे 'खरं (क्रियाविशेषण) प्रहृत्य' म्हणजे 'निर्दयपणे (लिंगाचा) प्रहार करून' असा असभ्य अर्थ मनात येतो, आणि 'विश्रान्तः' म्हणजे खूप थकून गेला असा अर्थ मनात येतो. यामुळे ही रचना ग्राम्य आहे.

पण 'भगिनी' व 'भगवती' या शब्दांवर आक्षेप घेता येत नाही असे दण्डी म्हणतो. 'भग' म्हणजे स्त्रीची योनी. 'भग' जिला आहे ती 'भगिनी', किंवा 'भगवती' हा अर्थ निःसंशय ग्राम्य आहे. पण भगिनी म्हणजे बहीण हाच अर्थ आपल्या मनात येतो, दुसरा अर्थ येत नाही. (याला वामनाने 'लोकसंवीत' असे नाव दिले आहे. पुढे पृ. १४ पाहा.) म्हणून 'भगिनी' व 'भगवती' हे शब्द ग्राम्य नाहीत असे दण्डी म्हणतो. 'भगिनीभगवत्यादि सर्वत्रैवानुमन्यते।' ('भग' शब्दाच्या वरील उपयोगासाठी क्षेमेन्द्राच्या 'नर्ममाला' या काव्यातील पुढील वचने पाहा—'रण्डाभगस्थलीं रात्रौ मृद्नात्युच्छ्वासिनी सदा।'; 'गौरः सुपीवरो धत्ते रण्डाया मुण्डितो भगः।'; 'हस्तं दत्वा भगे वृद्धो निधानमिव रक्षति।')

दण्डीने 'ग्राम्य' हा शब्द वापरला आहे. परंतु भामहाप्रमाणेच त्यानेही 'अश्लील' हा शब्द वापरला नाही. 'खरं प्रहृत्य विश्रान्तः' हे त्याने दिलेले उदाहरण पुढच्या शास्त्रकारांच्या मते 'अश्लील' आहे.

वामन

'ग्राम्य' हा शब्द भरत, भामह, व दण्डी यांनी वापरला असला तरी त्याची व्याख्या प्रथम वामनाने दिली. तसेच 'अश्लील' या शब्दाचीही व्याख्या त्यानेच प्रथम दिली.

'लोकमात्रप्रयुक्तं ग्राम्यम्' (काव्यालंकारसूत्र, २·१·७) ही वामनाची ग्राम्याची व्याख्या आहे. जो शब्द केवळ सामान्यांच्या समाजातच वापरला जातो, शास्त्रात कधीच वापरला जात नाही, तो ग्राम्य, असे त्याचे विवरण आहे. 'कष्टं कथं रोदिति फूत्कृतेयम्' हे त्याने उदाहरण दिले आहे. 'तल्ल', 'गल्ल' या शब्दांचीही त्याने उदाहरणे दिली आहेत. इंग्रजीत ज्याला vulgar म्हणतात त्या प्रकारची ही उदाहरणे आहेत, ज्याला indecent (असभ्य) म्हणतात त्या प्रकारची नाहीत हे स्पष्ट आहे. वामनाने ग्राम्याची पददोषांत गणना केली आहे. अश्लीलाची गणना त्याने पदार्थदोषांत केली आहे.

'असभ्यान्तरमसभ्यस्मृतिहेतुश्चाश्लीलम् ।'

अशी वामनाने अश्लीलाची व्याख्या केली आहे.

अनेक अर्थ असलेल्या शब्दाचा एक अर्थ जर असभ्य असेल तर तो शब्द 'असभ्यान्तर' होय. उदाहरणार्थ, 'वर्चः' या शब्दाचे तेज आणि विष्ठा असे दोन अर्थ आहेत. यांपैकी दुसरा अर्थ असभ्य आहे.

काही शब्द सभ्यार्थवाचक असूनही त्यांच्या एका भागामुळे मनात असभ्य अर्थ येतो. अशा शब्दांना 'असभ्यस्मृतिहेतु' म्हणावे. उदाहरणार्थ, 'कुकाटिका' हा शब्द. कुकाटिका म्हणजे मान. पण यातील 'काटि' (काटी) या अवयवांचा अर्थ 'प्रेतयान', तिरडी, ताटी असा आहे.

याला तीन अपवाद आहेत. 'गुप्त,' 'लक्षित,' आणि 'संवृत' यांची गणना अश्लीलात करावयाची नाही असे वामन म्हणतो. एखाद्या शब्दाचा एक अर्थ सभ्य असतो, पण दुसरा अर्थ असभ्य असतो. परंतु असभ्य अर्थ प्रसिद्ध नसतो (म्हणजे सर्वांना माहीत नसतो.) असा शब्द 'गुप्त' होय. उदाहरणार्थ, 'संबाध' या शब्दाचा 'संकट' हा अर्थ सर्वांच्या माहितीचा आहे, पण 'गुह्य इन्द्रिय' हा अर्थ असा प्रसिद्ध नाही. ('संबाधः संकटे भगे' असे विश्वकोशात पर्याय दिले आहेत. 'संबाध' या शब्दाचा या दोन अर्थांनी केलेला उपयोग पुढील श्लोकात आढळेल. 'करिहस्तेन संबाधे प्रविश्यान्तर्विलोडिते। उपसर्पन् ध्वजः पुंसः साधनान्तर्विराजते॥' — काव्यप्रकाश, ७·३०३).

ज्या शब्दाचा एक अर्थ असभ्य आहे तो जर लाक्षणिक (म्हणजे लक्षणेने प्राप्त होणारा) असेल तर तो अश्लील मानू नये. हा लक्षित असभ्यार्थ होय. उदाहरणार्थ, 'जन्मभूमि'. अभिधाशक्तीने प्राप्त होणारा या शब्दाचा अर्थ 'स्वदेश' हा आहे. पण लक्षणेने स्त्रीच्या गुह्येन्द्रियाचा बोध होतो. म्हणून हा शब्द अश्लील नाही.

ज्या वेळी लोकव्यवहारामुळे असभ्य अर्थ उपेक्षिला जातो त्यावेळी त्या शब्दाला 'संवृत' (आच्छादित, झाकलेला) म्हणतात. 'लोकसंवीतं संवृतम्।' असा 'संवृत' शब्द अश्लील नाही. उदाहरणार्थ, 'सुभगा,' 'भगिनी,' 'उपस्थान,' 'अभिप्रेत,' कुमारी,' 'दोहद' इत्यादी. 'भगिनी' व भगवती' या शब्दांचे विवेचन वर येऊन गेले आहे. (पृ. १३ पाहा.) हाच प्रकार 'सुभगा' या शब्दाचाही आहे. 'उपस्थान' म्हणजे पूजा, स्तवन. हा अर्थ लोकात रूढ आहे. पण 'उपस्थान' या शब्दात 'उपस्थ' आहे. उपस्थ म्हणजे पुरुषलिङ्ग हा असभ्य अर्थ 'उपस्थान' या शब्दाच्या उच्चाराने मनात येत नाही. कारण तो 'संवृत' आहे. 'अभिप्रेत' या संवृत शब्दातही 'प्रेत' हा असभ्यार्थवाचक शब्द आहे. 'कुमारी' या शब्दात 'मारी' हा (महामारीतील) शब्द आहे. पण 'कुमारी' हा शब्द अश्लील होत नाही. तसेच 'दोहद' (डोहाळा) या संवृत शब्दात

'असभ्यान्तरमसभ्यस्मृतिहेतुश्चाश्लीलम् ।'

अशी वामनाने अश्लीलाची व्याख्या केली आहे.

अनेक अर्थ असलेल्या शब्दाचा एक अर्थ जर असभ्य असेल तर तो शब्द 'असभ्यान्तर' होय. उदाहरणार्थ, 'वर्चः' या शब्दाचे तेज आणि विष्ठा असे दोन अर्थ आहेत. यांपैकी दुसरा अर्थ असभ्य आहे.

काही शब्द सभ्यार्थवाचक असूनही त्यांच्या एका भागामुळे मनात असभ्य अर्थ येतो. अशा शब्दांना 'असभ्यस्मृतिहेतु' म्हणावे. उदाहरणार्थ, 'कुकाटिका' हा शब्द. कुकाटिका म्हणजे मान. पण यातील 'काटि' (काटी) या अवयवांचा अर्थ 'प्रेतयान', तिरडी, ताटी असा आहे.

याला तीन अपवाद आहेत. 'गुप्त,' 'लक्षित,' आणि 'संवृत' यांची गणना अश्लीलात करावयाची नाही असे वामन म्हणतो. एखाद्या शब्दाचा एक अर्थ सभ्य असतो, पण दुसरा अर्थ असभ्य असतो. परंतु असभ्य अर्थ प्रसिद्ध नसतो (म्हणजे सर्वांना माहीत नसतो.) असा शब्द 'गुप्त' होय. उदाहरणार्थ, 'संबाध' या शब्दाचा 'संकट' हा अर्थ सर्वांच्या माहितीचा आहे, पण 'गुह्य इन्द्रिय' हा अर्थ असा प्रसिद्ध नाही. ('संबाधः संकटे भगे' असे विश्वकोशात पर्याय दिले आहेत. 'संबाध' या शब्दाचा या दोन अर्थांनी केलेला उपयोग पुढील श्लोकात आढळेल. 'करिहस्तेन संबाधे प्रविश्यान्तर्विलोडिते। उपसर्पन् ध्वजः पुंसः साधनान्तर्विराजते ॥' — काव्यप्रकाश, ७·३०३).

ज्या शब्दाचा एक अर्थ असभ्य आहे तो जर लाक्षणिक (म्हणजे लक्षणेने प्राप्त होणारा) असेल तर तो अश्लील मानू नये. हा लक्षित असभ्यार्थ होय. उदाहरणार्थ, 'जन्मभूमि'. अभिधाशक्तीने प्राप्त होणारा या शब्दाचा अर्थ 'स्वदेश' हा आहे. पण लक्षणेने स्त्रीच्या गुह्येन्द्रियाचा बोध होतो. म्हणून हा शब्द अश्लील नाही.

ज्या वेळी लोकव्यवहारामुळे असभ्य अर्थ उपेक्षिला जातो त्यावेळी त्या शब्दाला 'संवृत' (आच्छादित, झाकलेला) म्हणातात. 'लोकसंवीतं संवृतम्।' असा 'संवृत' शब्द अश्लील नाही. उदाहरणार्थ, 'सुभगा,' 'भगिनी,' 'उपस्थान,' 'अभिप्रेत,' कुमारी,' 'दोहद' इत्यादी. 'भगिनी' व भगवती' या शब्दांचे विवेचन वर येऊन गेले आहे. (पृ. १३ पाहा.) हाच प्रकार 'सुभगा' या शब्दाचाही आहे. 'उपस्थान' म्हणजे पूजा, स्तवन. हा अर्थ लोकात रूढ आहे. पण 'उपस्थान' या शब्दात 'उपस्थ' आहे. उपस्थ म्हणजे पुरुषलिङ्ग हा असभ्य अर्थ 'उपस्थान' या शब्दाच्या उच्चारणे मनात येत नाही. कारण तो 'संवृत' आहे. 'अभिप्रेत' या संवृत शब्दातही 'प्रेत' हा असभ्यार्थवाचक शब्द आहे. 'कुमारी' या शब्दात 'मारी' हा (महामारीतील) शब्द आहे. पण 'कुमारी' हा शब्द अश्लील होत नाही. तसेच 'दोहद' (डोहाळा) या संवृत शब्दात

'हद्' हा जुगुप्सावाचक धातू अंतर्भूत आहे. (हद् म्हणजे शौच करणे.) तात्पर्य, सुभगा, भगिनी, उपस्थान, अभिप्रेत, कुमारी, दोहद हे शब्द अश्लील नाहीत.

आपल्या म्हणण्याच्या समर्थनार्थ वामनाने एक अवतरण घेतले आहे.

संवीतस्य हि लोकेन न दोषान्वेषणं क्षमम् ।
शिवलिङ्गस्य संस्थाने कस्यासभ्यत्वभावना ॥

जे शब्द 'लोकसंवीत,' (संवृत, लोकव्यवहाराने ज्यांचा असभ्य अर्थ दबला गेला आहे असे) असतात त्यांच्यावर आक्षेप घेणे युक्त नाही. शिवलिंगाची स्थापना करून लोक त्याची पूजा करतात, यावरून शिवलिंगाविषयी कसलीही असभ्य भावना कोणाच्याही (म्हणजे कोणत्याही पूजकाच्या) मनात निर्माण होत नाही, हा त्याचा पुरावा आहे.

या अश्लीलाचे तीन भेद वामनाने मानले आहेत.

तत्त्रैविध्यम्, व्रीडाजुगुप्साऽमङ्गलातङ्कदायिभेदात् ॥

(१) व्रीडा म्हणजे लज्जा उत्पन्न करणारे; (२) जुगुप्सा म्हणजे किळस उत्पन्न करणारे; (३) अमंगलाची सूचना करणारे, असे तीन प्रकारचे अश्लील असते.

'वाक्काटवम्' आणि 'हिरण्यरेताः' हे शब्द लज्जाकर आहेत. काटव म्हणजे कटुता, तीक्ष्णता. वाक्काटव म्हणजे तीक्ष्ण किंवा कटु बोलणे. वास्तविक या शब्दात सकृद्दर्शनी काहीच आक्षेपार्ह नाही. परंतु 'काट' या शब्दाचा 'लिंग' असा अर्थ असल्याने वाक्काटव हा शब्द आक्षेपार्ह बनला आहे. (कटु या शब्दापासून कटुता असे भाववाचक बनविण्याची रूढी आहे. पटुपासून पाटव, त्याप्रमाणे कटुपासून काटव असा शब्द बनविला तर तो व्याकरणाच्या नियमाप्रमाणे शुद्ध आहे हे खरे आहे. पण असा शब्द प्रचलित नाही.) 'हिरण्यरेताः' म्हणजे अग्नी, सूर्य, किंवा शिव. पण या शब्दातील 'रेतस्' हा घटक वीर्यवाचक असल्यामुळे हिरण्यरेताः हा शब्द लज्जाकर अथवा व्रीडादायी अश्लील ठरला.

'कपर्दक' हा शब्द जुगुप्सादायी म्हणजे किळस उत्पन्न करणारा आहे. कपर्दक म्हणजे कवडी. पण या शब्दात 'पर्द्' हा धातू स्पष्ट दिसतो. (पर्द् म्हणजे पादणे.) म्हणून हे जुगुप्सादायी अश्लील.

'संस्थितः' शब्द अमंगलसूचक अश्लील आहे. चांगल्या अर्थाने वापरला तर संस्थित म्हणजे सुप्रतिष्ठित, किंवा स्थिर. परंतु 'मृत' असाही या शब्दाचा अर्थ आहे. (उदा. 'प्रमदामनु संस्थितः शुचा नृपतिः सञ्ज्ञिति वाच्यदर्शनात् । ' – रघुवंश, ८·७२).

वाक्यदोषांची चर्चा करताना वामनाने पुन्हा अश्लीलाचा उल्लेख केला आहे. 'अश्लीलत्वम् असभ्यस्मृतिहेतुत्वम्' असेच याही ठिकाणी त्याने स्पष्टीकरण केले आहे.

विरेचकमिदं नृत्तमाचार्याभासयोजितम् ।

हे त्याने अश्लील या वाक्यदोषाचे उदाहरण दिले आहे. 'रेचक' आणि 'अङ्गहार' ह्या नृत्यातील शास्त्रीय संज्ञा आहेत. 'अङ्गहार' बत्तीस आहेत आणि 'रेचक' चार आहेत. पादरेचक, कटिरेचक, करेचक, आणि कण्ठरेचक ही त्यांची नावे होत. पाय, कंबर, हात, आणि मान यांच्या विशिष्ट हालचाली म्हणजे रेचक. रेचकहीन नृत्त ते 'विरेचक' होय. ज्यात रेचकांचा उपयोग केलेला नाही असे, शास्त्राला धरून नसलेले, नृत्त येथे अभिप्रेत आहे. हे अशास्त्रीय नृत्त आहे. म्हणूनच 'आचार्याभासयोजितम्' असा शब्द वापरला आहे. 'आचार्याभास' म्हणजे शास्त्राचे खरे ज्ञान नसलेला अर्धवट शिक्षक. आक्षेप आहे तो 'विरेचक' या शब्दावर. विरेचक या शब्दाचा जुगुप्सादायक अर्थ सर्वपरिचित आहे. (विरेचक म्हणजे रेच ज्याच्यायोगे होतात ते. रेच म्हणजे जुलाब.) या प्रकारच्या अश्लीलाचे वामनाने दिलेले दुसरे उदाहरण—

चकासे पनसप्रायैः पुरी षण्डमहाद्रुमैः ।

या उदाहरणात, 'पुरी' आणि 'षण्ड' या शब्दांचा सांनिध्यामुळे संयोग होऊन 'पुरीष' (विष्ठा) हा जुगुप्साव्यंजक शब्द मनात येतो. म्हणून ही जुगुप्सादायी अश्लीलता.

अमंगलसूचक अश्लीलाचे उदाहरण —

विना शपथदानाभ्यां पदवादसमुत्सुकम् ।

या उदाहरणात 'विना' आणि 'शपथ' या दोन शब्दांच्या सांनिध्यामुळे संयोग होऊन 'विनाशपथ' (विनाश – पथ) असा शब्द तयार होतो. 'विनाशपथ' म्हणजे मरणाचा मार्ग. हा अर्थ अमंगलसूचक असल्यामुळे हे अमङ्गलातङ्कदायी अश्लीलाचे उदाहरण होय.

रुद्रट

ग्राम्याची रुद्रटाने केलेली व्याख्या पुढीलप्रमाणे आहे.

यदनुचितं यत्र पदं तत्तत्रैवोपजायते ग्राम्यम् ।

यावर नमिसाधूची टीका — "यत् पदं यत्र विषये अनुचितमयोग्यं तत् तत्रैव ग्राम्यमुपजायते ।" ज्या विषयाच्यां संदर्भात एखादा शब्द अनुचित म्हणजे अयोग्य असतो तो ग्राम्य होय.

शब्द हा स्वभावतः, म्हणजे मुळात, ग्राम्य नसतो, तर विषयाच्या अनुरोधाने तो ग्राम्य ठरतो असेही नमिसाधूचे विवेचन आहे. "न स्वाभाविकं पुरुषस्य इव शब्दस्य ग्राम्यत्वम्, अपि तु विषयभेदेन।" एखादा माणूस स्वतः आक्षेपार्ह नसेल, पण नीचांच्या संगतीत तो राहू लागला तर तो आक्षेपार्ह ठरला पाहिजे. त्याचप्रमाणे एखादा शब्द स्वतंत्रपणे आक्षेपार्ह नसेलही. पण ज्या दुसऱ्या शब्दांच्या सांनिध्यात तो वापरला जातो त्यांच्या स्वरूपामुळे तो ग्राम्य ठरतो, असा नमिसाधूचा अभिप्राय आहे.

वक्तृविषय ग्राम्य, आणि वस्तुविषय ग्राम्य, असे रुद्रटाने ग्राम्याचे दोन भेद मानले आहेत.

जे एखाद्या विषयाच्या संदर्भात बोलण्यास हरकत नसते, पण विशिष्ट वक्त्याच्या तोंडात शोभत नाही ते वक्तृविषय ग्राम्य होय. आणि जे विशिष्ट वक्त्याच्या तोंडी योग्य असते, पण एखाद्या विषयाच्या बाबतीत अयोग्य अथवा अनुचित असते, ते वस्तुविषय ग्राम्य होय. "यद् वस्तुनि वक्तुमुचितं, वक्तरि त्वनुचितं तद् वक्तृविषयं ग्राम्यम्। विपरीतं तु वस्तुविषयमिति।" (नमिसाधु)

अधम, मध्यम, आणि उत्तम अशा प्रकृतिधर्माला अनुसरून वक्ता तीन प्रकारचा असतो. हीन जातीची माणसे, दास, चेट इत्यादी अधम होत. प्रतीहार (द्वारपाल), पुरोहित, सार्थवाह (व्यापारी) इत्यादी मध्यम होत. आणि मुनि, राजा, इत्यादी उत्तम होत. बाल, तरुण, वृद्ध इत्यादी अवस्थाभेदही विचारात घेण्यासारखे आहेत. उदाहरणार्थ, बालाच्या बाबतीत जी उक्ती अथवा कृती आक्षेपार्ह नसते ती वृद्धाच्या बाबतीत ग्राम्य ठरते हा तर प्रत्यक्ष अनुभव आहे. तसेच विट-चेट किंवा दास यांच्यासारख्या सामान्य माणसांच्या तोंडी जे बोलणे शोभून दिसेल ते पुरोहिताच्या बाबतीत असभ्य व ग्राम्य ठरेल. काही शब्द विशिष्ट माणसांच्या तोंडी शोभत नाहीत. तसेच विशिष्ट व्यक्तींना उद्देशून काही शब्द वापरता येत नाहीत. राजाला उद्देशून 'तत्रभवान्' हा शब्द ऋषींनी किंवा अमात्यांनी वापरू नये. तसेच, राजाने तपोधन मुनीला 'परमेश्वर' इत्यादी शब्दांनी संबोधू नये. काही शब्दांचा वापर विशिष्ट विषयांच्या संदर्भात आणि विशिष्ट परिस्थितीतच करावयाचा असतो (नियतविषयाः हि शब्दाः), थट्टामस्करीव्यतिरिक्त त्यांचा जर इतरत्र उपयोग केला तर ते अनौचित्यामुळे 'ग्राम्य' ठरतात. (...ते अन्यत्र केलिं विना प्रयुज्यमानाः अनौचित्यज्ञतां गमयेयुः इति ग्राम्यत्वं तेषाम्। — नमिसाधु). नीच प्रकृतीच्या माणसाने उत्तमप्रकृति व्यक्तीला (राजाला, ऋषीला) उद्देशून 'तत्रभवान्' म्हणणे हे जसे आक्षेपार्ह (हे वक्तृविषय ग्राम्य होय.) तसेच उत्तमस्वभाव व्यक्तीने (राजाने) सुद्धा मुनीला उद्देशून 'भट्टारक' हे संबोधन वापरू नये. मुनी किंवा अमात्य यांनी राजाला उद्देशून 'तत्रभवान्' हा शब्द वापरला तर ते वस्तुविषय अनौचित्य होय. 'परमेश्वर', 'महाराज'

इत्यादी शब्द राजाच्या बाबतीत वापरावयाचे असतात, 'तत्रभवान्' हा शब्द वापरावयाचा नसतो. तसेच राजानेही मुनींना उद्देशून 'परमेश्वर' म्हणावयाचे नसते.

रुद्रटाने सांगितलेला ग्राम्याचा आणखी एक प्रकार —

पदमिदमनुचितमपरं सभ्यासभ्यार्थवाचि सभ्येऽर्थे ।
तद्धि प्रयुज्यमानं निदधाति मनस्यसभ्यमपि ॥ ६.२१

एखाद्या शब्दाचा एक अर्थ सभ्य असतो, आणि दुसरा अर्थ असभ्य असतो. सभेमध्ये ज्याचा उच्चार करावयास कोणतीही हरकत नाही तो अर्थ सभ्य; आणि ज्याचा सभेमध्ये उच्चार करणे अशक्य असते तो अर्थ असभ्य. (सभायां पर्षदि वक्तुं योग्यः सभ्यः, ततोऽन्योऽसभ्यः । — नमिसाधु) ज्याचा एक अर्थ सभ्य आहे आणि दुसरा अर्थ असभ्य आहे असा शब्द सभ्य अर्थाने वापरला असला तरीही तो असभ्य अर्थाची जाणीव करून देतो. म्हणून असा शब्द अनुचित होय. या बाबतीत नमिसाधूने एक अत्यंत महत्त्वाचा सिद्धान्त सांगितला आहे. अदुष्ट म्हणजे सभ्य अर्थ दुष्ट म्हणजे असभ्य अर्थामुळे भ्रष्ट होतो, असभ्य अर्थ सभ्य अर्थावर मात करून आपले अस्तित्व सिद्ध करतो; पण सभ्य अर्थ मात्र असभ्य अर्थावर मात करू शकत नाही.[४] याचा अर्थ असा की, एकाच शब्दाचे ज्यावेळी सभ्य व असभ्य असे दोन अर्थ असतात त्यावेळी वाचकाच्या मनात सभ्य अर्थ येत नाही, तर असभ्य अर्थाचीच त्याला तीव्रतेने जाणीव होते. आणि म्हणून एक अर्थ असभ्य असूनही असा शब्द जर सभ्य अर्थाने एखाद्याने वापरला तर हा प्रकार त्याने सद्धेतूने केलेला असला तरी सुद्धा वाचकाच्या (किंवा श्रोत्याच्या) मनात तत्क्षणी येतो तो असभ्य अर्थच. " अदुष्टो ह्यर्थो दुष्टेन दूष्यते, न तु दुष्टः साधुना " (नमिसाधु) असभ्य अर्थ सभ्य अर्थावर मात करतो हे स्पष्ट करण्यासाठी रुद्रटाने पुढील उदाहरण दिले आहे.

वारयति सखी तस्या यथा यथा तां तथा तथा सापि ।
रोदितितरां वराकी बाष्पभरक्लिन्नगण्डमुखी ॥ ६·२२

आक्षेप आहे तो 'क्लिन्नगण्ड' या सामासिक शब्दावर. 'आसवांनी भिजलेले गाल' या सभ्य अर्थाने कवीने हा शब्द वापरला आहे हे उघड आहे. पण 'पुवाळलेले गळू' असा किळसवाणा अर्थही क्लिन्नगण्ड या शब्दामुळे मनात येतो. (गण्ड — गळू; क्लिन्न — पुवाने भरलेले) 'गण्ड' शब्द 'गाल' या सभ्य अर्थाने येथे वापरलेला असला तरी 'क्लिन्न'

४. मोरोपंताचे पुढील वचन पाहावे.
अथवा कशास हेंही सुगंध कर्पूरहि नें करी लसुणा । (वनपर्व, १·१५४).

या शब्दाच्या साहचर्याने गण्ड म्हणजे गळू हा असभ्य अर्थ मनात येतो, आणि दोन्ही शब्द असभ्यार्थ ठरतात. आणि त्या दोघांमध्ये विशेषणविशेष्यभाव असल्यामुळे त्यांचा असभ्यपणा अधिक तीव्रतेने जाणवतो. (गण्ड म्हणजे गळू हा एक असभ्यार्थ, आणि क्लिष्ट म्हणजे पुवाळलेला हा दुसरा असभ्य अर्थ, अशी दोन असभ्य अर्थांची विशेषणविशेष्यभावाने येथे सांगड जमली असल्यामुळे त्यांचे तिरस्कार्यत्व वाढले आहे.)

' क्लिष्टगण्ड ' या शब्दाच्या बाबतीत जे विवेचन वर केले आहे तेही अतिव्याप्त होण्याची भीती आहे. (म्हणजे सभ्य अर्थांबरोबर असभ्य अर्थही मनांत येणे अपरिहार्य आहे ही कल्पना मर्यादेबाहेर ताणली जाण्याची शक्यता आहे.) म्हणून रुद्रटाने लगेच आपल्या विवेचनाला थोडी मुरड घातली आहे. जो शब्द ग्राम्य तो ग्राम्यच. पण क्वचित् सभ्य अर्थाच्या संगतीत आपले ग्राम्यत्व तो सोडून देतो हे काही विशेष आशयामुळे (म्हणजे विशिष्ट सभ्यार्थाच्या योजनेमुळे) घडते, किंवा विशिष्ट विभक्तीमुळे घडते. पण हे अगदी क्वचित् घडते हे ध्यानात ठेवणे जरूर आहे.

> अर्थविशेषवशाद्वा सभ्येऽपि तथा क्वचिद् विभक्तेर्वा ।
> अनुचितभावं मुञ्चति तथाविधं तत्पदं सदपि ॥ ६·२३

या अपवादभूत प्रकाराचे रुद्रटाने पुढील उदाहरण दिले आहे.

> कथमिव वैरिगजानां मदसलिलक्लिष्टगण्डभित्तीनाम् ।
> दुर्वारापि घटासौ विशांपते दारिता भवता ॥ ६·२४

याचा अर्थ अगदी सोपा आहे. " हे राजा, मदजलामुळे ज्यांची विशाल गण्डस्थळे आर्द्र झाली आहेत अशा वैरिगजांचा (शत्रूच्या हत्तींचा) दुर्वार समूह तू कसा बरे उधळून लावलास ? " या ठिकाणी हत्ती आणि वीररस हा विशिष्ट अर्थ आहे. येथे ' क्लिष्टगण्डभित्ति ' म्हणजे भिजलेले गण्डस्थळ असा अर्थ आहे. ' क्लिष्ट ' आणि ' गण्ड ' हेच शब्द ' वारयति सखी ' इत्यादी श्लोकात आले आहेत. (पृ. १८) त्या संदर्भात हे शब्द असभ्य ठरले, पण या श्लोकाच्या संदर्भात ते तसे नाहीत असे रुद्रटाला म्हणावयाचे आहे. अर्थविशेषामुळे येथे क्लिष्ट व गण्ड हे शब्द आक्षेपार्ह ठरत नाहीत.

> धृतबिसवलये निधाय पाणौ
> मुखमधिरूषितपाण्डुगण्डलेखम् ।
> नृपसुतमपरा स्मराभितापा-
> दमधुमदालसलोचनं निदध्यौ ॥

हे एका कामिनीचे वर्णन आहे. तिच्या मुखाचे वर्णन करताना ' पाण्डुगण्ड ' असा शब्द

वापरला आहे. पाण्डुगण्ड म्हणजे गोरा गाल. या ठिकाणी सुद्धा कामिनीचे वर्णन हा जर अर्थविशेष असेल (आणि त्यामुळे गण्ड या शब्दाचा असभ्य अर्थ मनात न येता सभ्य अर्थच मनात येतो असे म्हटले) तर मग ' वारयति सखी...वाष्पभरक्लिन्नगण्डमुखी ' या श्लोकातील ' क्लिन्नगण्ड ' या शब्दावर आक्षेप घेण्याचे कारण काय ? अशी शंका कोणी काढण्याचा संभव आहे. ' पाण्डुगण्ड ' या शब्दातील अनुप्रासामुळे त्याला सौंदर्य प्राप्त झाले आहे असे कोणी समर्थन केले तर ते अशा शंकेखोराला पटणार नाही. कारण, ' पाण्डु ' या शब्दाचा उपयोग न करता नुसता ' गण्ड ' शब्द वापरलेला आढळतो. उदाहरणार्थ, ' दैत्यस्त्रीगण्डलेखानां मदरागविलोपिभिः ' इत्यादी. तात्पर्य, ही विचारसरणी पतकरली तर पूर्वकवींच्या अनेक उक्तींवर (असभ्यत्वाचा) आक्षेप येण्याची शक्यता आहे असे वरील शंका घेणाऱ्याचे मत असेल. या प्रकारच्या शंकेला नमिसाधूने पुढीलप्रमाणे उत्तर दिले आहे. " क्लिन्नशब्दसंनिधानादेव गण्डशब्दस्यासभ्यत्वं स्फुरति न त्वन्यदा । " ' गण्ड ' हा शब्द ' क्लिन्न ' शब्दाच्या जोडीने वापरला तरच असभ्य अर्थाची प्रतीती होते, एरवी नाही.

' वाष्पभरक्लिन्नगण्डमुखी ' या विरहिणीवर्णनात आलेल्या ' क्लिन्नगण्ड ' या शब्दावर आक्षेप आहे. येथे ' गण्ड ' शब्द ' क्लिन्न ' शब्दाच्या सांनिध्यात आलेला असल्यामुळेच तो असभ्यार्थवाचक ठरला आहे. ' मदसलिलक्लिन्नगण्डभित्ति ' या हत्तीच्या वर्णनात ' क्लिन्न-गण्ड ' हाच शब्द आला असता तो केवळ अपवाद म्हणून आक्षेपार्ह मानू नये, कारण येथे वीररसाचा प्रकर्ष वर्णावयाचा असून मदोन्मत्त हत्तींच्या समूहाचे ऐश्वर्य मनात ठसवावयाचे आहे, असा रुद्रटाचा अभिप्राय आहे.

' कथमिव वैरिगजानां ' या वर उल्लेखिलेल्या श्लोकाच्या उत्तरार्धात ' विशांपते ' असा संबोधनात्मक शब्द आहे. विशांपति म्हणजे राजा. ' विशाम् ' या षष्ठीच्या बहुवचनी रूपामुळे ' विश् ' शब्दाचा दुसरा असभ्य अर्थ (विश् = विष्ठा) मनात येत नाही. हे विभक्तीमुळे घडले आहे.

विशेष अर्थामुळे अथवा विशिष्ट विभक्तीमुळे एखाद्या शब्दाच्या सभ्य आणि असभ्य अर्थांपैकी असभ्य अर्थ मनात येत नाही हे रुद्रटाने म्हटले असले तरी असा प्रकार अपवादभूतच असतो हे त्याने ' क्वचित् ' या शब्दाने स्पष्ट केले आहे.

*

' काव्यालंकारा 'च्या अकराव्या अध्यायात रुद्रटाने पुन्हा एकदा ग्राम्यत्वाची चर्चा केली आहे. मागे ग्राम्यत्व हा पददोष (शब्दगत दोष) मानून चर्चा केली, आता तो अर्थदोष या दृष्टीने चर्चा करावयाची आहे.

ग्राम्यत्वमनौचित्यं व्यवहाराकारवेषवचनानाम् ।
देशकुलजातिविद्यावित्तवयःस्थानपात्रेषु ॥ ११·९

व्यवहार, आकार, वेष, वचन या चारांच्या बाबतीतील अनौचित्य हे ग्राम्यत्व होय. व्यवहार म्हणजे व्यक्तीच्या हातून घडणारी कृती. आकार म्हणजे नैसर्गिक रूप. वेष आणि वचन म्हणजे पोशाख आणि बोलणे. या चार गोष्टींपैकी प्रत्येक गोष्टीचे देश, कुल, जाति, विद्या, वित्त, वय, स्थान, आणि पात्र या आठ बाबतींत औचित्य पाळले नाही तर ग्राम्यत्वदोष निर्माण होतो. कुल म्हणजे घराणे. जाति म्हणजे स्त्रीपुरुष इत्यादी भेद, किंवा ब्राह्मण, क्षत्रिय इत्यादी भेद. स्थान म्हणजे पद किंवा अधिकार, प्रतिष्ठा. पात्र म्हणजे नाट्यशास्त्रात सांगितलेली उत्तम, मध्यम, नीच इत्यादी प्रकारची माणसे. बाकीच्या गोष्टी स्पष्ट आहेत. आर्य देशांमध्ये निष्ठुर कृती, भयंकर आकार, अतिशय भडक (उद्धतः) वेष, रासवटपणाचे बोलणे या गोष्टी ग्राम्य होत. म्लेच्छ देशांमध्ये या गोष्टी नित्याच्या व स्वाभाविक असतात. म्हणजे म्लेच्छ (अनार्य) देशांमध्ये जे स्वाभाविक, ते आर्य देशांमध्ये अनुचित व ग्राम्य ठरते. तसेच खेडेगावांत जे उचित असेल ते नगरांत ग्राम्य ठरेल. मोठ्या घराण्यातील खानदानी लोकांच्या बाबतीत भेसूर भडक वेष, आणि असत्यभाषण या गोष्टी ग्राम्य होत. ब्राह्मणाचा वेष क्षत्रियाला शोभणार नाही, क्षत्रियाचा ब्राह्मणाला शोभणार नाही. कुसुंबी रंगाचा वेष आणि मण्यांच्या माळा, तसेच लाडीक व कामुक बोलणे, या गोष्टी पुरुषाच्या बाबतीत अनुचित म्हणजे ग्राम्य होत. पण याच गोष्टी स्त्रीला खुलून दिसतात. तरुणाच्या बाबतीत जो वेष, जे बोलणे, आणि ज्या कृती क्षम्य, किंबहुना आकर्षक ठरतील त्या वृद्धाच्या बाबतीत हास्यास्पद व ग्राम्य ठरतील. भीमाला जे शोभून दिसेल ते युधिष्ठिराला मुळीच शोभणार नाही.

नवोढा कुलकन्या स्वैर आचरटपणे वागू लागली तर ते ग्राम्य व आक्षेपार्ह ठरेल. वेश्येच्या ठायी अकृत्रिम मुग्धता असेल तर ते ग्राम्य ठरेल. वेश्या लबाड आणि चहाटळच असली पाहिजे. गावढ्या गावातल्या माणसाच्या ठायी विदग्धता, आणि कुलीन माणसाच्या ठायी ठकबाजी, या गोष्टी ग्राम्य होत. रुद्रटाचे वचन पुढीलप्रमाणे आहे —

प्रागल्भ्यं कन्यानामव्याजो मुग्धता च वेश्यानाम् ।
वैदग्ध्यं ग्राम्याणां कुलजानां धौर्त्यमित्यादि ॥ ११·१०

आपल्या या विवेचनाचा समारोप करताना रुद्रट म्हणतो —

एतद्विज्ञाय बुधैः परिहर्तव्यं महीयसो यत्नात् ।
नहि सम्यग्विज्ञातुं शक्यमुदाहरणमात्रेण ॥ ११·११

ग्राम्यत्वदोष कोणकोणत्या कारणांनी घडतो हे बारकाईने पाहून जाणत्या माणसाने प्रयत्नांची शिकस्त करून (महीयसः यत्नात्) तो दोष टाळावा. या बाबतीत महाकवींचा सुद्धा पाय घसरतो असा अनुभव असल्यामुळे ' महीयसः यत्नात् ' हे शब्द वापरले आहेत असे नमिसाधूचे स्पष्टीकरण आहे. " महाकवयो यत्र मुह्यन्तीत्यतो महीयसो यत्नादित्युक्तम् । " असे जर आहे तर मग हा विचार मनात ठसविण्यासाठी परिणामकारक उदाहरणे का दिली नाहीत ? अशी शंका कोणी घेतल्यास रुद्रटाचे उत्तर असे की, नुसत्या उदाहरणांच्या योगाने याचे पूर्ण आकलन होईलच असे नाही. म्हणून स्वतःची विवेकबुद्धी वापरून ग्राम्यत्व हा दोष घडणार नाही अशी जाणत्याने नित्य खबरदारी घ्यावयास पाहिजे. " यस्मादुदाहरणमात्रेण न यथावद्विज्ञातुं शक्यते । ततः स्वधिया विज्ञाय यथा ग्राम्यत्वं न भवति तथा प्रयोज्यम् । " (नमिसाधु)

नुसती उदाहरणे देऊन आक्षेपार्ह ग्राम्यतेचा विचार मनात ठसणार नाही हे खरे असले तरी नमिसाधूने दोन उदाहरणे दिली आहेतच. ' व्याहृता प्रतिवचो न सन्दधे... ' हे ' कुमारसम्भवा 'तील एक उदाहरण आहे (८·२). दुसरे उदाहरण —

उपचरितापतिमात्रं प्रकटवधूः क्षीणसंपदः पुंसः ।
पातयति दशं व्रजतः स्पृहया परिधानमात्रेऽपि ॥

वेश्याभोगात सर्वस्व गमावून बसलेला दरिद्रकामुक तिच्या घरातून खिन्न होऊन बाहेर पडत असता ती वेश्या मोठ्या आशाळभूतपणाने त्याच्या अंगावर उरलेल्या वस्त्राकडे पाहू लागली.

' कुमारसम्भवा 'तील श्लोकाचे उदाहरण नमिसाधूने दिले आहे ते पाहिले असता त्याच्या पुढचे सतरा श्लोकही ग्राम्यत्वदोषाने कलंकित आहेत असे मानावे लागेल. त्याने दिलेल्या दुसऱ्या उदाहरणात एकही शब्द ग्राम्य नाही. पण अर्थ मात्र ग्राम्य आहे असा त्याचा अभिप्राय आहे. दरिद्रकामुकाच्या अंगावर उरलेले वस्त्रसुद्धा हिरावून घेऊन त्याला दिगंबर करण्याची इच्छा वेश्येच्या मनात प्रबळ झाली ही आशयातील ग्राम्यता मानावी लागेल. स्पष्ट बोलावयाचे झाले तर नमिसाधूने दिलेली दोनही उदाहरणे ग्राम्यतेच्या दृष्टीने अगदीच सौम्य आहेत. यांच्यापेक्षा सवाई उदाहरणे कोणत्याही बहुश्रुत माणसाला हवी तेवढी सापडतील.

भोज

' सरस्वतीकण्ठाभरण ' या ग्रंथात भोजाने ग्राम्यतेची आणि अश्लीलतेची विपुल चर्चा सोदाहरण केली आहे. प्रथम ग्राम्य व अश्लील या पददोषांची चर्चा आहे.

अश्लीलामङ्गलघृणावदर्थं ग्राम्यमुच्यते । १·१४
अत्राश्लीलमसभ्यार्थमसभ्यार्थान्तरं च यत् ।
असभ्यस्मृतिहेतुश्च त्रिविधं परिपठ्यते ॥ १·१५

'लोकमात्रप्रयुक्त' म्हणजे केवळ सामान्य जनांच्या समाजातच वापरला जाणारा शब्द 'ग्राम्य' होय. हा ग्राम्य शब्द तीन प्रकारचा आहे — अश्लील, अमंगल, आणि घृणायुक्त. ज्याच्या ठायी श्री म्हणजे सौंदर्य आहे ते श्लील. जे श्लील नाही ते अश्लील, म्हणजे विद्रूप, ओंगळ. ज्या शब्दाच्या वाचनाने अथवा श्रवणाने वाचणाऱ्याच्या अथवा ऐकणाऱ्याच्या मनात लज्जा (व्रीडा) उत्पन्न होते असा असुंदर (अकान्त) शब्द अश्लील होय. घृणायुक्त, घृणा म्हणजे जुगुप्सा (किळस) उत्पन्न करणारा शब्द, हा ग्राम्याचा दुसरा प्रकार. अमंगल आशय सूचित करून मनाला वेदना देणारा शब्द हा ग्राम्याचा तिसरा प्रकार. ग्राम्य म्हणजे असभ्य. अर्थ जर असभ्य असेल तर शब्द देखील असभ्यच असला पाहिजे हे क्रमप्राप्त आहे.

असभ्यार्थ, असभ्यार्थान्तर, आणि असभ्यस्मृतिहेतु, असे अश्लीलाचे तीन प्रकार भोजाने सांगितले आहेत. वामनाने असभ्यार्थान्तर आणि असभ्यस्मृतिहेतु असे दोन प्रकार सांगितले आहेत. (मागे पृ. १४ पाहा.) भोजाने असभ्यार्थ नावाचा तिसरा प्रकार मानला आहे. असभ्यार्थाचे उदाहरण—

छत्राकारशिराः शिरालसरसस्थूलप्रकाण्डो महान्
मध्येभानुसुताभ्रसिन्धु विपुलाभोगो वटः पातु वः ।
कायैक्ये विकटप्रसारितमहाजंघं महीसुप्तयो-
र्यः खण्डेन्दुकिरीटकैटभजितोः काटश्रियं कर्षति ॥

या पद्यात यमुना आणि गंगा या दोन नद्यांच्या मध्ये असलेल्या प्रचंड वटवृक्षाचे वर्णन आहे. परंतु शेवटच्या चरणातील 'काटश्रियं कर्षति' या वाक्यातील 'काट' हा शब्द असभ्यार्थ आहे. 'काट' म्हणजे पुरुषलिङ्ग असा अर्थ असल्यामुळे वट या शब्दाची जी विशेषणे ('छत्राकारशिराः' — ज्याचा वरचा भाग छत्रीच्या आकाराचा आहे असा; 'शिराल-सरस-स्थूल-प्रकाण्डः'; शिरालः — शिरा असलेला, सरस — भरलेला, स्थूल, जाड. अधिक विवरण अशक्य आहे.) आहेत ती सुद्धा असभ्यच आहेत. तिसऱ्या चरणातील 'कायैक्य' (शरीरांचे मीलन) आणि 'विकटप्रसारितमहाजंघम्' या शब्दांच्या द्वारे सूचित होणारा असभ्यार्थ अगदी स्पष्ट आहे.

असभ्यान्तराचे उदाहरण—

विद्यामभ्यसतो रात्रावेति या भवतः प्रिया।
वनिता गुह्यकेशानां कथं ते पेलवन्धनम्॥

"तू रात्री मंत्रसिद्धी करीत असता जी तुझी प्रिया तुझ्याकडे येते ती यक्षिणी (गुह्यक–यक्ष) आहे. मग तुझे धन (ऐश्वर्य) अल्प (पेलव–अल्प) आहे असे कसे म्हणता येईल?" (यक्ष हे धनाधिपती कुबेराचे सेवक होत. यक्षिणी ज्या अर्थी तुला वश आहे त्या अर्थी तुला धनाचा काय तोटा? असा भावार्थ.)

हा या पद्याचा सरळ आणि सभ्य अर्थ झाला. पण शब्द जोडण्याची किंवा तोडण्याची अगदी किरकोळ हिकमत केली तर हेच पद्य 'असभ्यार्थान्तर' ठरेल. शब्द वापरताना पद्यकाराने कौशल्य दाखविले आहे हे मात्र मान्य केले पाहिजे.

'या भवतः प्रिया' या वाक्यांशातील 'या' आणि 'भवतः' हे दोन शब्द जोडल्याबरोबर अर्थाची उलटापालट होते. 'याभ' म्हणजे मैथुन असा असभ्य अर्थ आहे. याभवतः प्रिया म्हणजे विषयासक्त, मैथुनप्रिय माणसाची प्रिया. हा एक असभ्यार्थ झाला. पण आणखीही तऱ्हा आहेत. 'गुह्यकेशानाम्' या शब्दाची फोड 'गुह्यक–ईशानाम्' (गुह्यक–यक्ष; ईश–स्वामी) अशी वर केली आहे. तिच्या ऐवजी 'गुह्य–केशानाम्' अशी फोड केल्याबरोबर असभ्य अर्थाची प्राप्ती होईल. गुह्य म्हणजे स्त्रीचे गुह्यांग, स्त्रीची योनी. गुह्य-केश म्हणजे स्त्रीच्या गुह्यांगावरील केस. 'पेलवन्धनम्' या शब्दाची फोड 'पेलवं–धनम्' (पेलव म्हणजे अल्प) अशी वर केली. 'वत्वयोः सावर्ण्यम्' या सूत्राप्रमाणे 'पेलवन्धनम्' असा शब्द झाला. आणि 'पेल–वन्धन' अशी फोड केल्याबरोबर असभ्य अर्थ तयार झाला. पेल म्हणजे मुष्क (वृषण). पेल–वन्धन म्हणजे वृषणाच्या टायी बन्धन. 'गुह्य–केशानां पेल-वन्धनम्' या शब्दसमूहापासून कसला विलक्षण असभ्य अर्थ निर्माण झाला आहे हे पाहिल्याबरोबर पद्यकाराच्या बाह्यात् आणि चहाटळ टाळक्याचे कौतुक करावे तितके थोडेच आहे!

अदुष्ट (सभ्य) अर्थ दुष्ट (असभ्य) अर्थाने भ्रष्ट होतो, सभ्य अर्थाचा असभ्य अर्थावर कसलाही प्रभाव पडत नाही हे नमिसाधूचे मागे उद्धृत केलेले वचन (अदुष्टो ह्यर्थो दुष्टेन दूष्यते, न तु दुष्टः साधुना।) या आणि यासारख्या इतर असभ्यार्थवाचक पद्यांच्या बाबतीत नित्य ध्यानात ठेवावयास पाहिजे. सभ्य माणूस मवाली गुंडांसमोर दुबळा असतो, मवाली गुंड प्रतिष्ठित सभ्य माणसावर मात करतात, हा व्यवहारातील अनुभव आहे. हीच गोष्ट असभ्यार्थ शब्दांच्याही बाबतीत खरी आहे. विवादी स्वर रंजक असलेल्या 'स्वरसंदर्भा'च्या सौंदर्याची माती करून टाकतो तसेच हे आहे. मग याला पथ्य कोणते?

मराठा ग्रंथ संग्रहालय, मराठा...
क्रमांक ०५३६२ दिः ...
वर्गांक ...९८३८... वर्ग दिः ९८/३

'या भवतः', 'गुह्यकेश', यासारखे असभ्य अर्थ सूचित करणारे शब्द कटाक्षाने टाळणे हेच पथ्य होय. एवढे पथ्य सभ्य माणसाने संभाळलेच पाहिजे.

'असभ्यस्मृतिहेतु' या अश्लीलाच्या तिसऱ्या प्रकाराचे भोजाने पुढील उदाहरण दिले आहे.

उत्कम्पयसि मां चूत पिकवाक्काटवेन किम्।
कृतः कृकाटिकायां ते पादः प्राणेन यास्यता॥

काटव म्हणजे कटुता. पिक-वाक्काटव म्हणजे कोकिळेचा कर्णकटु आवाज. 'काटव' या शब्दातील 'काट' या एकदेशाने असभ्यार्थ ध्वनित होतो. (काट — शिश्न). तसेच 'कृकाटिका' (मान) या शब्दातही 'काटिका' (प्रेतवाहन) हा असभ्य अर्थ सामावलेला आहे. म्हणून 'वाक्काटव' आणि 'कृकाटिका' हे दोन्ही शब्द आक्षेपार्ह होत. (मागे पृ. १५ पाहा.)

अमङ्गल अर्थांचेही तीन प्रकार भोजाने सांगितले आहेत. (१) अशस्तार्थ, (२) अशस्तार्थान्तर, (३) अशस्तस्मृतिहेतु.

लोकेषु यदशस्तार्थमशस्थार्थान्तरं च यत्।
अशस्तस्मृतिहेतुश्चामङ्गलार्थं त्रिधैव तत्॥

अशस्तार्थ अमङ्गलाचे उदाहरण—

खेटके भक्तसूपस्य वलभ्याः पत्तनस्य च!
अतृप्तोऽहं मरिष्यामि हेहले भाषितस्य च॥

"खेड्यातील वरणभाताने, शहरातील हवेलीने, आणि तरुण स्त्रियांच्या निःसंकोच लाडीक बोलण्याने तृप्ती न झाल्यामुळे मी मरणार आहे." या पद्यातील 'मरिष्यामि' हे पद 'अशस्तार्थ' आहे.

अशस्तार्थान्तराचे उदाहरण—

प्रवासयति या कान्तं वसन्ते गृहसंस्थितम्।
विना शपथदानेन पिशाची सा न चाङ्गना॥

वसन्त ऋतूमध्ये घरी सुखवस्तूपणाने राहिलेल्या पतीला शपथ घातल्यावाचून जी दूर पाठविते ती बायको कसली! — राक्षसिणीचीच ही करणी झाली! हा या पद्याचा अभिप्रेत अर्थ होय.

पण ' प्रवासयति ', ' संस्थित ', ' पिशाची ' हे शब्द अशस्तार्थान्तर आहेत. तसेच उत्तरार्धात ' विना शपथदानेन ' हे दोन स्वतंत्र शब्द जोडून वाचले म्हणजे ' विनाशपथदानेन ' असा शब्द तयार होतो. ' विनाशपथ ' म्हणजे विनाशाचा अथवा मृत्यूचा मार्ग. प्रवासन म्हणजे उच्चाटन असा अर्थ आहे. ' प्रवासयति ' म्हणजे हाकून देते. ' संस्थित ' म्हणजे मृत. आणि ' पिशाची ' म्हणजे मांस खाणारी. अशा प्रकारे या पद्यात चार शब्द अशस्तार्थान्तर आहेत.

अशस्तस्मृतिहेतु अमङ्गलाचे उदाहरण —

मारीचोऽयं मुनिर्यस्य कृत्या कालान्तकालये ।
पत्न्यां संक्रन्दनादीनां सुतानामाप्तयेऽभवन् ॥

या पद्यात ' मारीचकृत्या ', ' कालान्तक ', ' संक्रन्दन ' हे शब्द अशस्तार्थस्मृतिहेतु आहेत. ' कृत्या ' म्हणजे कृती, कृत्य; आणि बळी घेणारी अघोरी देवता. ' कालान्तक ' (महादेव) या शब्दात ' अन्तक ' म्हणजे यम हा अशस्तार्थस्मृति निर्माण करणारा शब्द आहे. ' संक्रन्दन ' म्हणजे इन्द्र, आणि अत्यंत आर्त किंकाळी. दुसरा अर्थ अशस्तस्मृतिहेतु आहे. (' मारीच ' शब्दात ' मारी ' हा अशस्तार्थस्मृतिहेतु शब्द शोधणे शक्य नाही का ? रामसिंह नावाच्या टीकाकाराने हेही केले आहे.)

' घृणावत् ' म्हणजे किळस उत्पन्न करणारा शब्द. हा शब्दही घृणावदर्थ, घृणावदर्थान्तर, आणि घृणावत्स्मृतिहेतु असा तीन प्रकारचा आहे.

पदमर्थं घृणावन्तं यदाहार्थान्तरं च यत् ।
घृणावत्स्मृतिहेतुर्यत्तद्घृणावदिह त्रिधा ॥ १. १७

घृणावदर्थाचे उदाहरण—

पर्दते हदते स्तन्यं वमत्येष स्तनंधयः ।
मुहुरुत्कौति निष्ठीवत्यात्तगर्भा पुनर्वधूः ॥

हे अंगावर पिणारे मूल पादत आहे (पर्दते), हगत आहे (हदते), प्यालेले दूध ओकत आहे. आणि तरी सुद्धा ही बाई पुन्हा गर्भाशी आहे, एकसारखी उचकी देत आहे, आणि थुंकत आहे.

घृणावदर्थान्तराचे उदाहरण—

बाष्पक्लिन्नावनिमौ गण्डौ विपूयापाण्डरौ तव ।
प्रियोऽग्रे विष्ठितः पुत्रि स्मितवर्चोभिरर्चति ॥

या पद्याचा एक अर्थ सरळ आणि ग्राह्य आहे. पण काही शब्द व्यर्थी असल्यामुळे सूचित होणारा दुसरा अर्थ किळसवाणा आहे. बाष्पक्लिष्टौ गण्डौ — आसवांनी भिजलेले गाल; विपूयः — मुञ्ज नावाचे गवत. विपूयापाण्डरौ — मुंज नावाच्या गवताप्रमाणे पाण्डुर; विष्ठितः — ऐटीत उभा राहिलेला (विष्ठितः — विशेषेण स्थितः); स्मितवर्चः — स्मिताची शोभा, कान्ति. (वर्चः — तेज, कान्ति). " तुझ्यासमोर मोठ्या रुबाबात उभा राहिलेला हा तुझा प्रियकर मन्दस्मिताच्या शोभेने तुझ्या गौर कपोलांची पूजा करीत आहे. " हा झाला चांगला अर्थ.

पण दुसरा अर्थ अतिशय किळसवाणा आहे. आणि अर्थ किळसवाणा करण्यासाठी श्लिष्ट शब्दांची सारी कर्तबगारी पद्यकाराने येथे पणाला लावलेली दिसून येईल.

बाष्पक्लिष्टः गण्डः — शेकल्यामुळे त्रिलबिलीत झालेले गळू; पूयः — पू ; विपूयः — थबथबलेला पू (विशिष्टः पूयः); विपूयापाण्डरः — थबथबलेल्या पुवामुळे पांढरे दिसणारे (गळू); विष्ठितः — हगलेला (विष्ठा संजाता अस्य); वर्चः — विष्ठा.

बाष्पक्लिष्ट, गण्ड, विपूय, विष्ठित, वर्चः या व्यर्थी शब्दांच्या योजनेमुळे किती इरसाल किळसवाणा अर्थ निर्माण होण्याची शक्यता आहे हे स्पष्ट करण्यासाठीच केवळ किळसवाणे व ग्राम्य मराठी प्रतिशब्द मुद्दाम वापरले आहेत. असल्या किळसवाण्या शब्दांच्या वाचनाने अथवा श्रवणाने ज्यांच्या चित्तात थोडी सुद्धा घृणा उत्पन्न होणार नाही त्यांच्या ' समधात ' चित्तांची झाडलोट दुसऱ्या एखाद्या रुळलेल्या (प्रभावी) मार्गानेच करणे जरूर आहे, असे तारानाथ तर्कवाचस्पतींच्या वचनाचा अनुवाद करून म्हणावेसे वाटते.

यदि वान्ताशने चित्ते न मनाग् जायते घृणा ।
तदान्यक्षुण्णमार्गेण धावनं परिशोभते ॥

ओकून पडलेले अन्न पशू सुद्धा खात नाहीत. ' वमिलिया अन्ना । लाळ न घोंटी रसना । ' असे ज्ञानेश्वर म्हणतात. पण एखाद्या ' जिन्हालंपट ' जन्तूला ' वान्ताशन ' पाहून देखील थोडी सुद्धा किळस वाटली नाही तर त्याचे मन धुवून काढण्यासाठी काही तरी प्रभावी उपाय योजला पाहिजे असे तारानाथ तर्कवाचस्पतींना सुचवावयाचे आहे.

घृणावत्स्मृतिहेतूचे उदाहरण —

प्रत्यार्द्रयन्तो रूढानि मदनेषुव्रणानि नः ।
हृदयं क्लेदयन्त्येते पुरीषण्डमहाद्रुमाः ॥

" मदनाच्या बाणांनी झालेल्या जखमा पुन्हा ओल्या करणारे नगरीतील वनराजीमधील हे विशाल वृक्ष आमचे हृदय व्यथित करीत आहेत. " हा झाला प्रशस्त अर्थ. पण

'रूढव्रण' (चरत गेलेली जखम), 'क्लेद' (जखमेतून वाहणारे पाणी), 'पुरीषण्ड' या शब्दाचा एकदेश 'पुरीष' (विष्ठा), हे शब्द घृणावत्स्मृति जागृत करणारे असल्यामुळे आक्षेपार्ह आहेत.

'विसन्धि' या वाक्य दोषाची चर्चा करीत असता 'विरूप' सन्धीचा भोजाने उल्लेख केला आहे. ही विरूपता दोन प्रकारची असते असे नमिसाधूचे म्हणणे आहे. (१) 'दुर्वचकत्व' म्हणजे उच्चारण्यास अतिशय विकट रचना, आणि (२) अश्लीलता. अश्लीलता सूचित करणाऱ्या विरूप सन्धीचे नमिसाधूने दिलेले उदाहरण —

उड्डीय गगने दूरं चलण्डामरचेष्टितः।
अयमुत्पतते पत्री ततोऽत्रैव रुचिं कुरु॥

प्रथमार्धात 'चलन् — डामरचेष्टितः' असे दोन स्वतंत्र शब्द आहेत. पण ते सन्धी केल्याने एकत्र येऊन पुरुषलिङ्गाचा वाचक 'लण्ड' हा ग्राम्य शब्द कानांवर आघात करतो. द्वितीयार्धात 'रुचिं कुरु' या दोन शब्दांचा विरूप सन्धि होऊन 'चिंकु' हा स्त्रीयोनीचा वाचक ग्राम्य शब्द बनतो.

*

सोळा वाक्यदोषांची चर्चा केल्यानंतर याच संदर्भात (प्रसाद, ओजस्, माधुर्य इत्यादी दहा) गुणांचा विपर्यय झाल्यामुळे उत्पन्न होणाऱ्या 'अरीतिमत्' या दोषाच्या नऊ प्रकारांची भोजाने चर्चा केली आहे. 'कान्ति' या गुणाचा विपर्यय झाल्यामुळे वाक्य 'ग्राम्य' होते असे भोज म्हणतो.

कान्तेर्विपर्ययाद्वाक्यं ग्राम्यमित्यपदिश्यते। १·३५

कान्तिगुणाचा विपर्यय झाल्यामुळे उत्पन्न होणाऱ्या ग्राम्यतेचे भोजाने दिलेले उदाहरण—

विरहे ते विषीदन्तं निषीदन्तं तवान्तिके।
कन्ये, कामयमानं मां न त्वं कामयसे कथम्॥

या पद्यातील उत्तरार्ध दण्डीने 'काव्यादर्शा'त ग्राम्यतेचे उदाहरण म्हणूनच उद्धृत केला आहे. (मागे पृ. १२ पाहा.) भोजाचे या पद्यावरील विवरण पुढीलप्रमाणे आहे. "इदमुक्तेर्ग्राम्यतया कान्तिहीनमित्यर्थप्रधानोऽयं कान्तिविपर्ययो दोषः।" कान्ति म्हणजे रसाची दीप्ती. यामुळे 'अर्थप्रधानता' अपरिहार्य आहे. वाक्य आणि वाच्य यांचा व्यापार अर्थप्रधानतेत विचारात घेणे आवश्यक असते. विदग्ध वचनच अर्थप्राधान्याच्या दृष्टीने समर्थ असते. जर ते विदग्ध नसेल तर रसनिर्मिती दुर्घट होते असा अनुभव आहे. वरील

'कन्ये, कामयमानं' इ. पद्यातील 'कन्ये!' या संबोधनामुळे रसविरोधी कामुक वृत्ती प्रकट होते. तसेच, 'कामयमानम्' या शब्दांत कसलाही संयम अथवा संकोच दिसून येत नाही. कसलाही आडपडदा न ठेवता आपल्या मनातील कामुक अभिलाषा बोलणाऱ्याने स्पष्ट शब्दांत प्रकट केली आहे. ही गोष्ट रसहानीला कारण झालीच पाहिजे. म्हणून ही दोषाढ्यता आहे.

सोळा वाक्यार्थदोषांची चर्चा करताना भोजाने 'अश्लील' या वाक्यार्थदोषाची चर्चा केली आहे. मागे पददोषाची आणि वाक्यदोषाची चर्चा केली. आता वाक्यार्थदोष अश्लीलाची चर्चा करावयाची आहे.

अश्लीलमिति निर्दिष्टमश्लीलार्थप्रतीतिकृत् ॥ १·५३

'अर्थदुष्ट' या दोषाचे भामहाने जे उदाहरण दिले आहे (मागे पृ. १० पाहा.) त्यात अगदी थोडा फरक करून भोजाने अश्लील या वाक्यार्थदोषाचे उदाहरण दिले आहे.

उद्यतस्य परं हन्तुं स्तब्धस्य विवरैषिणः।
पतनं जायतेऽवश्यं कृच्छ्रेण पुनरुत्थितिः ॥

या पद्याचे विवरण करताना भोज म्हणतो — "अत्रोद्यतस्य परं हन्तुमिति संभोगारम्भविषया, स्तब्धस्य विवरैषिण इति वराङ्गविषया, पतनं जायतेऽवश्यमिति रेतोविसर्गविषया, कृच्छ्रेण पुनरुत्थितिरिति नष्टरागप्रत्यानयनविषया अश्लीलवाक्यार्थविषया प्रतीतिर्भवति।" पद्याचे विस्तृत विवेचन मागे (पृ. १०) केले आहे ते पाहावे.

घृणावत्, अश्लील, आणि अमङ्गल हे ग्राम्याचे प्रकार 'संवीत' 'गुप्त' आणि 'लक्षित' या तीन बाबतींत उपेक्षणीय असतात, किंबहुना ते गुण ठरतात, असे भोजाचे विवेचन आहे. हे त्याचे विवेचन वामनाच्या 'गुप्तलक्षितसंवृतानि' (२. १.१६) या सूत्रावर आधारलेले आहे. 'संवीत,' 'गुप्त,' 'लक्षित' या संज्ञांच्या स्पष्टीकरणासाठी मागे पृ. १४ पाहावे.

ग्राम्यं घृणावदश्लीलममङ्गलार्थं यदीरितम्।
तत्संवीतेषु गुप्तेषु लक्षितेषु न दुष्यति ॥ १· १०५

'संवीता'चे (किंवा 'संवृता'चे) भोजाने दिलेले उदाहरण —

तस्मै हिमाद्रेः प्रयतां तनूजां यतात्मने योजयितुं यतस्व।
योषित्सु तद्वीर्यनिषेकभूमिः सैव क्षमेत्यात्मभुवोपदिष्टम् ॥

हा 'कुमारसंभवा'च्या तिसऱ्या सर्गातील सोळावा श्लोक आहे. उत्तरार्धातील 'तद्वीर्य-

निषेकभूमिः ' याचा सरळ अर्थ (ज्या ठिकाणी वीर्यस्खलन व्हावयाचे ते ठिकाण) सकृद्दर्शनी अश्लील वाटेल. (' तस्य हरस्य वीर्यं रेतस्तस्य निषेकः क्षरणं तस्य भूमिः क्षेत्रं सा पार्वती '–अशी यावर मल्लिनाथाची टीका आहे.) पण ' गुप्तं लक्षितं संवृतं च नाश्लीलम् ' असा वामनाचा निर्णय आहे. या निर्णयानुसार शंकर व पार्वती या देवतांच्या संदर्भात वापरलेला ' तद्वीर्यनिषेकभूमिः ' हा शब्द अश्लील नाही. (वामनाने यासाठी सुभगा, भगिनी, उपस्थान, कुमारी इत्यादी उदाहरणे दिली आहेत. मागे पृ. १४ पाहा.) आपल्या म्हणण्याच्या समर्थनार्थ वामनाने ' संवीतस्य हि लोकेन न दोषान्वेषणं क्षमम् । शिवलिङ्गस्य संस्थाने कस्यासभ्यत्वभावना ॥ हा श्लोक उद्धृत केला आहे. भोजानेही तोच उद्धृत केला आहे. शिवलिङ्गाच्या बाबतीत असभ्य कल्पना मनात येत नाहीत. त्याचप्रमाणे पार्वतीचे वर्णन करताना ' तद्वीर्यनिषेकभूमिः ' असा शब्द वापरला तर मनात असभ्य कल्पना येणे शक्य नाही असा भोजाचा अभिप्राय आहे. भोजाचा टीकाकार म्हणतो– " यथा शिवलिङ्गस्य संस्थान इत्यत्र यद्यपि मुख्यविधेव शिवलिङ्गपदमश्लील एवार्थे, तथाप्यविगानेनादिप्रयोगयोगित्वाच्च व्रीडादानक्षमं तथेहापि तद्वीर्येति । शिवलिङ्गेत्यत्र भगवत्संबन्धः प्रयोजक इति तु तुल्यमत्रापीत्याह... अत्र हि जगदन्तर्यामिणो भगवतस्तद्विरोधितया प्रसिद्धिरुपजीव्या तदुपजीवने व्रीडादायिनी प्रतीतिरनुत्थायिन्येव । " शिवलिंग या शब्दाचा मुख्यार्थ यद्यपि अश्लील असला तरी तो परमेश्वराशी संबद्ध असल्यामुळे लज्जाकर नाही; तद्वत् ' तद्वीर्यनिषेकभूमिः ' हा शब्द जगाचा पिता परमेश्वर आणि जगन्माता पार्वती यांच्या संदर्भात वापरलेला असल्यामुळे लज्जेच्या भावनेची प्रतीती सुतराम् असंभाव्य आहे असा टीकाकाराच्या वरील विवेचनाचा आशय आहे.

' गुप्त ' अश्लीलाचे उदाहरण —

सुदुस्त्यजा यद्यपि जन्मभूमिर्गजैरसंबाधमयांबभूवे ।
स तेऽनुनेयः सुभगोऽभिमानी भगिन्ययं नः प्रथमाभिसंधिः ॥

या पद्यात ' जन्मभूमि ', ' संबाध ', ' सुभग ', ' भगिनी ' या शब्दांचा एक अर्थ अश्लील असला तरी सुद्धा जन्मभूमी म्हणजे मातृभूमी, सुभग म्हणजे भाग्यशाली, भगिनी म्हणजे बहीण (मागे पृ. १४ पाहा.) या मनात तत्क्षणी जागृत होणाऱ्या अर्थांच्या प्रभावामुळे अश्लील अर्थ गुप्त राहतो.

भोजाने या संदर्भात पुढील अवतरण घेतले आहे.

वस्तुमाहात्म्यगुप्तस्य पदार्थस्याविभावनात् ।
भगिनीभगवत्यादि नासभ्यत्वेन भाव्यते ॥

वस्तुमाहात्म्याने (जन्मभूमी म्हणजे मातृभूमी या वस्तुमाहात्म्याने) लज्जाकर अर्थ (उदा. जन्मभूमी म्हणजे स्त्रीची योनी हा लज्जाकर अश्लील अर्थ) झाकला गेल्यामुळे 'भगिनी' 'भगवती' इत्यादी शब्दांच्या श्रवणाने कसलीही असभ्य कल्पना मनात जागृत होत नाही.

'लक्षित' अश्लीलाचे भोजाने दिलेले उदाहरण —

ब्रह्माण्डकारणं योऽप्सु निदधे बीजमात्मनः ।
उपस्थानं करोम्येष तस्मै शेषाहिशायिने ॥

या पद्यातील 'ब्रह्माण्ड' आणि 'उपस्थान' या शब्दांमुळे असभ्य कल्पनांची स्मृती होणे शक्य असले तरी लक्षणेने त्यांचा वेगळा अर्थ होत असल्यामुळे हे शब्द निंद्य नाहीत. 'उपस्थान' म्हणजे पूजा. (या शब्दाचा एकदेश 'उपस्थ'[५] हा शब्द पुरुषलिंगाचा वाचक आहे, म्हणून उपस्थान हा शब्द असभ्यस्मृतिहेतु आहे.)

'अशस्त' म्हणजे अमंगल अर्थही क्वचित् गुण ठरतो. उदाहरणार्थ—

भद्रे मारि, प्रशस्तं वद; सदसि मुदा नृत्य कृत्ये मुहूर्तं;
मृत्यो, रत्नैश्चतुष्कं विरचय; रचयारात्रिकं कालरात्रि ।
चामुण्डे, मुण्डमालामुपनय; विनयस्वायतां भैरवीर्याम्;
एवं देवे भवानीं वदति परिजनव्याहृतिस्वायतां वः ॥

या पद्यात 'मारी', 'कृत्या' इत्यादी शब्द अमंगलवाचक असले तरी जगतातील समस्त मंगलाचे निधान असलेल्या भगवान् शंकराच्या संदर्भात हे म्हटलेले असल्यामुळे वरील अमंगल शब्दांचे अमंगलत्व लयाला गेले आहे. भगवान् शंकर मांगल्याचे निधान असल्यामुळे त्यांच्या संपर्कात येणारी प्रत्येक वस्तू (मंगल नसली तरी) मंगल बनते. म्हणून वरील पद्यातील 'मारी' 'कृत्या', 'मृत्यु', 'कालरात्रि', 'चामुण्डा' यां शब्दांचे अप्रशस्तार्थत्व नष्ट झाले आहे.

.....

५. काही वर्षांपूर्वी पुण्यातील आहिताग्नि राजवाडे मंदिरात शारदीय ज्ञानसत्रात व्याख्यान देत असता एका प्रकाण्डपंडितांनी 'शाकुन्तला'तील 'अनाघ्रातं पुष्पं...' हा दुसऱ्या अंकातील विख्यात श्लोक म्हणून दाखविला. 'न जाने भोक्तारं कमिह समुपस्थास्यति विधिः' हा चवथा चरण म्हटल्यावर 'अत्र उपस्थेन न कोऽपि सम्बन्धः' असा शेरा मिस्कीलपणाने हसून त्यांनी मारला हे मला चांगले आठवते.

अमंगल अर्थाचा आणखी एक गोपनप्रकार आहे.

सत्पक्षा मधुरगिरः प्रसाधिताशा मदोद्धतारम्भाः ।
निपतन्ति धार्तराष्ट्राः कालवशान्मेदिनीपृष्ठे ॥

'धार्तराष्ट्र (धृतराष्ट्राचे पुत्र) कालवशात् धरणीवर पडतील' हा अमंगल अर्थ मनात येत असला तरी, 'हंसा धार्तराष्ट्रा इति व्यपदिश्यन्ते' (हंसांना मी 'धार्तराष्ट्र' म्हणालो.) या सूत्रधाराच्या वचनामुळे 'निपतन्ति धार्तराष्ट्राः कालवशान्मेदिनीपृष्ठे' या उक्तीतील अमंगलत्व झाकले गेले.

वरील पद्य 'वेणीसंहार' नाटकाच्या प्रस्तावनेत सूत्रधाराच्या तोंडी आहे. धार्तराष्ट्र म्हणजे हंस हा अर्थ घेतला असता या पद्याचा अर्थ पुढीलप्रमाणे होईल. "मोहक पंख असलेले (सत्पक्षाः), मधुर आवाज असलेले (मधुरगिरः), दिशा सुशोभित करणारे (प्रसाधिताशाः), हर्षातिरेकामुळे स्वैर संचार करणारे (मदोद्धतारम्भाः), हंस शरदतूचे आगमन झाले असल्यामुळे जमिनीवर उतरत आहेत (निपतन्ति)."

घृणावदर्थ (जुगुप्सा उत्पन्न करणारी उक्ती) काही वेळा गुण कसा बनतो याचे भोजाने दिलेले उदाहरण —

पद्मान्यर्कांशनिष्ठ्यूताः पीत्वा पावकविप्रुषः ।
भूयो वमन्तीव मुखैरुद्गीर्णारुणरेणुभिः ॥

हे पद्य दण्डीच्या 'काव्यादर्श'तील (१·९६) आहे. 'निष्ठ्यूत' (थुंकणे), 'उद्गीर्ण' (ओकणे), 'वान्त' (ओकणे) इत्यादी शब्द जर 'गौणवृत्तिव्यपाश्रय' असले, म्हणजे लक्षणेने वापरले असले, तरच खुलून दिसतात; नाही तर ते ग्राम्य ठरतात, हा सिद्धान्त दण्डीने प्रथम सांगितला आहे.

निष्ठ्यूतोद्गीर्णवान्तादि गौणवृत्तिव्यपाश्रयम् ।
अतिसुन्दरमन्यत्र ग्राम्यकक्षां विगाहते ॥ काव्यादर्श, १·९५

निष्ठ्यूतो...सुन्दरम्; अन्यत्र...विगाहते ॥ असे वाचावे. निष्ठ्यूत इ. शब्द गौणवृत्ति-व्यपाश्रय असले तरच सुन्दर दिसतात; नाही तर (म्हणजे ते वाच्यार्थाने वापरले असता) ते ग्राम्य ठरतात. या सिद्धान्ताचे स्पष्टीकरण करण्यासाठी दण्डीने 'पद्मान्यर्कांशु' इ. पद्य उदाहरण म्हणून दिले आहे. हेच उदाहरण भोजाने दिले आहे. या पद्याचा अर्थ पुढीलप्रमाणे – सूर्याच्या किरणांमधून उफाळलेले (निष्ठ्यूताः) अग्निकण (पावकविप्रुषः) प्राशन करून कमळे लाल परागांच्या द्वारे आपल्या मुखांतून ते पुन्हा बाहेर उधळतात.

'निष्ठ्यूत', 'वमन्ति', 'उद्गीर्ण' या शब्दांचा मुख्यार्थ (वाच्यार्थ) असभ्य असूनही वरील पद्यात ते लाक्षणिक अर्थाने वापरलेले असल्यामुळे ते 'ह्य' झाले आहेत; पण 'वधूः निष्ठीवति' (नवरीमुलगी थुंकली — 'पचकन थुंकली' असे म्हटले तर कसे वाटेल याचा विचार करावा.) हे बोलणे मात्र 'अह्य' (असभ्य, घृणास्पद) आहे असे दण्डीने स्पष्टपणे म्हटले आहे.

इति ह्यमह्यं तु निष्ठीवति वधूरिति। काव्यादर्श, १·९७.

घृणावदर्थान्तर (ज्या शब्दाचा एक अर्थ चांगला, आणि दुसरा अर्थ किळसवाणा असतो असा) शब्द देखील काही वेळा ह्य कसा ठरतो याचे भोजाने दिलेले उदाहरण —

कामिनीगण्डनिस्यन्दबिन्दुस्निग्धमतो मम।
अन्यथा कथमेतस्य जगद्द्योतिनी द्युतिः॥

या पद्यातील 'गण्डनिस्यन्दबिन्दु' या शब्दाचा एक अर्थ किळसवाणा (गळवातून वाहणारे पाणी) असला तरी रमणीचा गाल आणि चंद्र यांच्या सौन्दर्याची तुलना अधिक प्रभावी ठरत असल्यामुळे किळसवाणा अर्थ क्षीणबल ठरतो. 'कामिनीगण्ड' म्हणजे सुंदर स्त्रीचा गाल. या ह्य अर्थामुळे दुसरा किळसवाणा अर्थ 'गुणग्रस्त' ठरला आहे. "तथा च जगन्नयनानन्दभूतस्य निःशेषिताशेषतमसश्चन्द्रमसो यदिदमभिप्रेतकामिनीकपोललावण्यबिन्दुमात्रतया भानं तदुचितमेवेति।" असे भोजाच्या टीकाकाराचे विवरण आहे.

'घृणावत्स्मृतिहेतु' (किळसवाण्या वस्तूची स्मृति जागृत करणारा) शब्द काही वेळा ग्राह्य ठरतो याचे उदाहरण —

विपूयरशनावन्तः पलाशाषाढधारिणः।
ब्रह्मवर्चस्विनो यान्ति द्विजपोगण्डका इमे॥

या पद्यातील 'विपूय', 'पलाश', 'वर्चस्', 'पोगण्ड' हे शब्द 'घृणावत्स्मृतिहेतु' असले तरी लक्षणेने प्रशस्त पदार्थांचा बोध होत असल्यामुळे ते दोषरहित होत. 'विपूय' म्हणजे मुञ्ज नावाचे गवत. (या पवित्र गवताचा संबंध मौञ्जीबंधनाशी आहे.) 'वर्चस्' म्हणजे तेज. 'पोगण्ड' म्हणजे बाल. मुञ्ज नामक गवताची मेखला (कंबरेभोवती) बांधलेले, पळसाचा दण्ड (आषाढः) धारण करणारे, आणि ब्रह्मचर्याच्या तेजाने उजळलेले हे ब्राह्मणपुत्र जात आहेत. — हा या पद्याचा प्रशस्त अर्थ होय. ('विपूय', 'वर्चस्' इत्यादी शब्दांच्या घृणास्पद अर्थांसाठी मागे पृ. २७ पाहा.)

कधी कधी घृणास्पद शब्दांचे गुणात रूपान्तर होते हे स्पष्ट करण्यासाठी भोजाने भामहालंकारातील पुढील अवतरण घेतले आहे.

किञ्चिदाश्रयसौन्दर्याद् धत्ते शोभामसाध्वपि।
कान्ताविलोचनन्यस्तं मलीमसमिवाञ्जनम् ॥ भामहालङ्कार १·५५

(भोजाने 'किञ्चिदाश्रयसम्बन्धात्' असा पाठ स्वीकारला आहे. बाकी काही बदल नाही. भामहाच्या या वचनाच्या स्पष्टीकरणासाठी मागे पृ. ११ पाहा.) याचे उदाहरण म्हणून भोजाने 'अंत्रप्रोतहृत्कपाल' हा श्लोक (महावीरचरित, १·२६) उद्धृत केला आहे. यानंतर भोजाने भामहालंकारातील १·५४ हा श्लोकही उद्धृत केला आहे.

संनिवेशवशात्किंचिद्विरुद्धमपि शोभते।
नीलं पलाशमाबद्धमन्तराले स्रजामिव ॥

भामहालङ्कारातील या श्लोकाच्या स्पष्टीकरणासाठी मागे पृ. ११ पाहावे. याचे उदाहरण म्हणून भोजाने भवभूतीच्या 'मालतीमाधव' या नाटकातील ५·८ हा श्लोक उद्धृत केला आहे.

अंत्रैः कल्पितमङ्गलप्रतिसराः स्त्रीहस्तरक्तोत्पल-
व्यक्तोत्तंसभृतः पिनद्ध सहसा हृत्पुण्डरीकस्रजः।
एताः शोणितपङ्ककुङ्कुमजुषः संभूय कान्तैः पिब-
न्त्यस्थिस्नेहसुराः कपालचषकैः प्रीताः पिशाचाङ्गनाः ॥[६]

वाक्यार्थदोष सुद्धा काही वेळा अदुष्ट ठरतात, म्हणजे ते गुण ठरतात, याची चर्चा करताना भोजाने पुन्हा एकदा अश्लील अर्थाचा उल्लेख केला आहे. एखादा अर्थ अश्लील असूनही कवींनी पुन्हा पुन्हा त्याचा स्वीकार केलेला दिसला तर तो आक्षेपार्ह मानू नये असा भोजाचा अभिप्राय दिसतो.

असभ्यार्थं यदश्लीलं तदर्थान्तरवाचि वा।
तस्येह दृश्यते भूम्ना प्रयोगो नापि दुष्यति ॥ (स. क. १·१५२)

---

६. या श्लोकाचा कृष्णशास्त्री राजवाडे यांनी केलेला अनुवाद —

हत्कमलांच्या घालोनि माला, रक्त कुंकुम लाविती भाळा, आंतड्यांची करोनी गळां, मंगळसूत्रें घालिती ॥ करोनि ऐशी शृंगाररचना, आनंदें करिती पिशाचांगना, पतीसवें मदमद्यपाना, करुनि प्याले करव्यांचे ॥

याचे भोजाने दिलेले उदाहरण —

अद्यापि तत्कनककुण्डलघृष्टगण्ड-
मास्यं स्मरामि विपरीतरताभियोगे।
आन्दोलनश्रमजलस्फुटघर्मबिन्दु -
मुक्ताफलप्रकरविच्छुरितं प्रियायाः ॥

हे 'चौरपंचाशिका' या काव्यातील बारावे पद्य आहे. या पद्यात एकही शब्दाचा वाच्यार्थ असभ्य किंवा अश्लील नाही. पण आशय मात्र अश्लील आहे. हे विपरीतरताचे किंवा 'पुरुषायिता'चे वर्णन आहे. म्हणून हे 'अर्थान्तरवाचि अश्लील' होय. साध्या सरळ रतिक्रीडेपेक्षा विपरीत सुरत शृंगारोद्दीपनाच्या दृष्टीने परिणामकारक असते असे (काम-) शास्त्राला अनुसरून कवींनी मानले असल्यामुळे प्रस्तुत पद्यातील अश्लीलार्थ दोष नसून गुणच आहे असे टीकाकाराचेही भाष्य आहे.

मम्मट

'काव्यप्रकाश'च्या सप्तम उल्लासात पददोषांची चर्चा करीत असता मम्मटाने अश्लील आणि ग्राम्य या पददोषांची सोदाहरण छाननी केली आहे. त्याने तीन प्रकारचे अश्लील मानले आहे. 'त्रिधेति व्रीडाजुगुप्साऽमङ्गलव्यञ्जकत्वात्।' व्रीडा (लज्जा) निर्माण करणारे, जुगुप्सा (किळस) निर्माण करणारे, आणि अमंगल सूचित करणारे असे अश्लीलाचे तीन प्रकार होत. या बाबतीत मम्मटाने वामनाचाच अनुवाद केला आहे. (मागे पृ. ११ पाहा.) लज्जाकर अश्लीलाचे मम्मटाने दिलेले उदाहरण —

साधनं सुमहत्यस्य यन्नान्यस्य विलोक्यते।
तस्य धीशालिनः कोऽन्यः सहेतालिंतां भ्रुवम् ॥

या पद्यातील 'साधन' हा शब्द द्व्यर्थी आहे. एक अर्थ सभ्य आहे, आणि दुसरा असभ्य आहे. (१) सेना (२) पुरुषलिङ्ग. दुसरा असभ्य अर्थ मनात आल्याबरोबर 'सुमहत्', 'यन्नान्यस्य विलोक्यते' या शब्दांचाही असभ्य अर्थ मनात येणे स्वाभाविक आहे. "अत्र सैन्यार्थकस्य साधनशब्दस्य पुरुषलिङ्गव्यंजनमर्थान्तरम्। इदं च प्रकृतेऽर्थेऽन्वयि। एवं चात्र सैन्यार्थकं साधनशब्दं पुंव्यञ्जनरूपार्थान्तरोपस्थापकतया व्रीडादायीत्यश्लीलम्। अश्लीलार्थोपस्थित्या श्रोतुर्वैमुख्यमत्र बीजम्।" (झळकीकर)

येथे वस्तुस्थिती अशी आहे की, केवळ 'साधन' या एकाच स्वतंत्र शब्दामुळे अश्लील अर्थाची उपस्थिती झाली आहे असे नसून त्याच्या जोडीला इतर संदिग्ध शब्द (सुमहत्,

यच्चान्यस्य विलोक्यते, धीशालिनः, अरालितां भ्रुवम्) आल्यामुळेच असे झाले आहे. याचा पडताळा पाहावयाचा असेल तर 'मुद्राराक्षस' नाटकातील 'साध्ये निश्चितमन्वयेन घटितं बिभ्रत् सपक्षे स्थितिं, व्यावृत्तं च विपक्षतो भवति यत्तत्साधनं सिद्धये।' हा प्रसिद्ध श्लोक (५·१०) पाहावा. या ठिकाणी 'साध्य', 'अन्वय', 'सपक्ष', 'विपक्ष', 'सिद्धि' या तर्कशास्त्रातील शब्दांच्या परिवारात 'साधन' शब्द आल्यामुळे पुरुषलिङ्ग असा त्याचा अर्थ चुकूनही मनात न येता सैन्य आणि (तर्कशास्त्रातील) हेतु हेच दोन अर्थ तत्क्षणी मनात येतात. ('पर्वतो वह्निमान्, धूमात्' या विधानातील 'धूम' हा शब्द 'हेतु' आहे). तात्पर्य, चहाटळ अर्थ मनात यावा या हेतूनेच ज्या ठिकाणी कवीने द्व्यर्थी शब्दांची जाणूनबुजून योजना केलेली असते त्याच ठिकाणी अश्लीलार्थाची उपस्थिती होते असे दिसून येईल. ज्या ठिकाणी असभ्यार्थवाचक संदिग्ध व्यर्थी शब्द नसतात त्या ठिकाणी एखाद्या शब्दाचा एकदेश (एक भाग) असभ्यार्थ सूचित करणारा असूनही अश्लीलार्थाची प्रतीती येत नाही. 'शाकुन्तल' नाटकाच्या दुसऱ्या अंकातील 'अनाघ्रातं पुष्पं' इत्यादी दहावे पद यासाठी पाहावे. 'न जाने भोक्तारं कमिह समुपस्थास्यति विधिः।' असा या पद्याचा शेवटचा चरण आहे. 'समुपस्थास्यति' या शब्दात 'उपस्थ' (पुरुषलिङ्ग) हा असभ्यार्थक शब्द अन्तर्भूत आहे हे पुण्यातील एका विख्यात अनेकविषयपारंगत पंडिताने मुद्दाम दाखवून देईपर्यंत माझ्या चुकून देखील मनात आले नव्हते. हाच प्रकार 'सूर्योपस्थाननिवृत्तं पुरूरवसं मामेत्य कथ्यतां कुतो भवत्यः परित्रातव्या इति' या 'विक्रमोर्वशीय' नाटकाच्या पहिल्या अंकातील वाक्याच्या बाबतीतही खरा आहे. 'सूर्योपस्थान' म्हणजे सूर्याची पूजा हाच अर्थ मनात येतो, 'उपस्थ' या शब्दाचा असभ्य अर्थ येत नाही.

जुगुप्साव्यंजक अर्थ मनात निर्माण करणाऱ्या अश्लील शब्दाचे उदाहरण म्हणून मम्मटाने 'अमरुशतक' या प्रसिद्ध काव्यातील ७२ वा श्लोक उदधृत केला आहे. हा श्लोक पुढील प्रमाणे आहे.

लीलाताम्ररसाहतोऽन्यवनितानिःशङ्कदष्टाधरः
कश्चित्केसरदूषितेक्षण इव व्यामील्य नेत्रे स्थितः।
मुग्धा कुड्मलिताननेन्दु ददती वायुं स्थिता तत्र सा
भ्रान्त्या धूर्ततयाथवा नतिमृते तेनातिशं चुम्बिता॥

मुग्ध शृंगाराचे अतिशय हृद्य आविष्करण या श्लोकात झाले आहे. आपल्या पतीच्या अधरावर अन्य स्त्रीचा दन्तव्रण दिसल्यावर हातात क्रीडेसाठी धरलेले कमळ नायिकेने त्याच्या तोंडावर मारले. तो धूर्त कमळाचे पराग डोळ्यांत शिरल्याचे सोंग करून डोळे

मिटून उगाच उभा राहिला. आपला अपराध दडविण्यासाठी हा नाटक करीत आहे हे त्या भावडीच्या ध्यानात आले नाही. आणि खरोखरच त्याच्या डोळ्यांत पराग शिरले या समजुतीने म्हणा, किंवा त्याचे नाटक ध्यानात आले असताना सुद्धा धूर्तपणाने म्हणा, ती त्याच्या डोळ्यांत नाजूक फुंकर घालू लागली. आणि प्रियकराचे चांगलेच साधले. अपराध करून देखील अनुनय करण्याची पाळी न येता ती अशा प्रकारे तावडीत सापडली असता त्याने तिचे पटापट मुके घेतले.

अशा या सुंदर पद्यात मम्मटाला ' ददती वायुम् ' हे शब्द जुगुप्साश्लील आहेत असे वाटले, आणि त्याने त्यांच्यावर आक्षेप घेतला. " अत्र वायुशब्दोऽपानवायुं स्मारयति " असे ' काव्यप्रदीप 'कार गोविन्दटक्कुर म्हणतात. " अत्र वायुशब्दोऽपानवायुस्मारकतया जुगुप्सादायी " असे वामनाचार्य झळकीकर म्हणतात. ' वायु ' म्हणजे ' अपानवायु ' असा अर्थ घेतल्याबरोबर या सुंदर श्लोकाची केवढी भयंकर दुर्दशा झाली आहे पाहा !

' वायु ' या शब्दाचा या श्लोकात ' अपानवायु ' असा अर्थ काढून येथे ' जुगुप्साश्लील ' नावाचा दोष घडला आहे असे जे म्हणतात त्यांच्यावर अर्जुनवर्मदेव या ' अमरुशतका'च्या टीकाकाराने फार कडक टीका केली आहे. ' वायु ' हा शब्द ' कुड्मलितानने्दु ' या शब्दाच्या अगदी निकट सान्निध्यात आलेला असूनही कमलाच्या सुवासाने दरवळलेल्या मुखमारुताची ज्याला काश्मीरात प्रतीती येत नाही, आणि अश्लीलाची प्रतीती येते, त्याच्यापुढे हात जोडल्याशिवाय गत्यंतर नाही असे अर्जुनवर्मदेव कुत्सितपणे म्हणतो. " तद्यदि कीरदेशे कुड्मलितानने्दुपदसंनिधावपि कमलपरिमलोद्गाणिो मुखमारुतस्य प्रतीतिर्न भवति चाश्लीलप्रतीतिस्तदा वाग्देवतादेश इति व्यवसितव्य एवासौ... " विशेषतः ' ल्हादैकमयी ' काव्याधिष्ठातृदेवतेचा वरदहस्त ज्यांच्या मस्तकावर आहे ते काव्यप्रकाशकार बह्वंशी दोषदृष्टी बनतात, सहृदयांच्या चित्ताला खरोखरच उत्कट आनन्द देणाऱ्या अशा प्रकारच्या सरस काव्यामध्ये त्यांना केवळ दोषच आढळतो, या घटनेचा अर्जुनवर्मदेवाला फार खेद झालेला आहे. " किन्तु ल्हादैकमयीवरलब्धप्रसादो काव्यप्रकाशकारो प्रायेण दोषदृष्टी येनैवंविधेष्वपि परमार्थसहृदयानन्दप्रदेषु सरसकविसंदर्भेषु दोषमेव साक्षादकुरुताम् । " माणसाने दोषैकदृष्टी बनू नये, कारण केवळ दोषच शोधून काढण्याची चटक माणसाला लागली म्हणजे मुळात नसलेला दोषही त्याला दिसू लागतो, अशा आशयाचे ' भट्टवार्तिका'तील पुढील वचनही अर्जुनवर्मदेवाने उद्धृत केले आहे.

न चाप्यतीव कर्तव्यं दोषदृष्टिपरं मनः ।
दोषो ह्यविद्यमानोऽपि तच्चित्तानां प्रकाशते ।।

इतक्या सुंदर पद्यात दोष काढल्याखेरीज काव्यप्रकाशकारांना चैन पडत नाही हा अर्जुन-

वर्मदेवाचा आक्षेप अतिरेकी स्वरूपाचा आहे. इतके अप्रतिम पद्य आहे म्हणूनच त्याच्या सौंदर्याला थोडासुद्धा बाध येता कामा नये असे वाटल्यामुळेच काव्यप्रकाशकारांनी 'ददती वायुम्' या शब्दांवर आक्षेप घेतला असला पाहिजे हे म्हणणेच अधिक सयुक्तिक आहे. "तदल्पमपि नोपेक्ष्यं काव्ये दुष्टं कथंचन। स्याद्वपुः सुन्दरमपि श्वित्रेणैकेन दुर्भगम्।" ही पूर्वाचार्यांची भूमिकाच काव्यप्रकाशकारांच्या मनात असली पाहिजे हे उघड आहे. आशयाच्या दृष्टीने सुंदर असलेल्या पद्यात प्रक्रमभंग, अविमृष्टविधेयांश, यासारखे दोष खपवून घेण्याचे सौजन्य शास्त्रकार नित्य दाखवतात हे 'न्यक्कारो ह्ययमेव मे' यासारख्या पद्यांवरून दिसून येईल. पण त्यांना ग्राम्य आणि अश्लील हे दोषमात्र मुळीच खपत नाहीत. अश्लीलाची मोघम सूचनाही खपत नाही, याचाच सर्वत्र प्रत्यय येईल. विशेषतः शृंगाराच्या मोहक छटा आविष्कृत करणाऱ्या हळुवार कवनात तर या दोषांचा अल्प लेशही त्यांना तिरस्करणीय वाटतो. एखाद्या मधुर स्वरालापात चुकून कर्णकटू विवादी स्वर शिरला असताना रसिकाच्या मनाची जी केविलवाणी अवस्था होते तशीच अवस्था नर्मशृंगारचे अथवा विप्रलंभशृंगाराचे हळुवार आविष्करण करणाऱ्या कवनांत अगदी चुकून एखादी असभ्यार्थाची छटा आली असता सहृदय शास्त्रकाराची होत असते हे अनेक उदाहरणांनी स्पष्ट करता येईल. म्हणून अर्जुनवर्मदेवांनी काव्यप्रकाशकारांवर जी आग पाखडली आहे ती अस्थानी आहे.

सामान्यतः अभिजात संस्कृत कवी संदर्भ मधुर आणि हळुवार असेल (उदाहरणार्थ, शृंगार, विप्रलंभशृंगार, करुण) तर 'वायु' शब्द न वापरता गन्धवाह, मरुत्, वात, पवन, अनिल यांच्यासारखा एखादा पर्याय वापरतात. क्वचित् कालिदासासारखे सत्कवीसुद्धा अशा मनोज्ञ संदर्भात 'वायु' हा शब्द वापरतात. म्हणूनच वर 'सामान्यतः' असे म्हटले आहे. उदा० 'स्वाभाविकं परगुणेन विभातवायुः' (रघु. ५·६९). 'इत्थंभूता वायवो वान्तीति हेतुत्वेन...' असा प्रयोग भोजाने एका ठिकाणी केला आहे. 'कोकिलालापसुभगाः सुगन्धिवनवायवः।' असा प्रयोग दण्डीने केला आहे. पण ब्रह्मशी सुकुमारसंदर्भात 'वायु' हा शब्द टाळण्याकडेच अभिजात संस्कृत कवींचा कटाक्ष असतो. 'सुगन्धिवनवायु' असे न म्हणता 'सुगन्धिवनवात' असे ते म्हणतात. उदा० 'पाटलसंसर्गिसुरभिवनवातः' (शाकुन्तल, १·३), 'प्रविरलविलोलजलदः कुटजार्जुननीपसुरभिवनवातः।', 'गमिआ कलम्बवाआ' (गमिताः कदम्बवाताः — सेतुबन्ध, १·१५), 'कोकिलालापवाचालो मामेति मलयानिलः।' (काव्यादर्श, १·४८), 'वहन्ति च समं तेषामश्रुभिर्मलयानिलाः।', 'सिप्रातरङ्गानिलकम्पितासु विहर्तुमुद्यानपरंपरासु।' (रघु. ६·३५), 'आलिंग्यन्ते गुणवति मया ते तुषाराद्रिवाताः।' (मेघदूत, ११०), 'किमुत मलयवातोन्मूलितापाण्डुपत्रैः' (विक्रमोर्वशीय, २·६). आणखी कितीतरी उदाहरणे कोणीही बहुश्रुत सहज देऊ शकेल.

सुभाषितरत्नभाण्डागारात 'प्रभातवायुवर्णनम्' या सदराखाली एकूण ४१ श्लोक

आहेत. यापैकी फक्त दोनच श्लोकांमध्ये ललितमधुर आशय असताना 'वायु' हा शब्द वापरलेला आढळला. 'फुल्लारविन्दघनबन्धुरुपैति वायुः' (११), 'क्वचिदयमनवस्थः स्थास्नुतामेति वायुर्वनकुसुमविमर्दोद्गन्धिवेश्मान्तरेषु।' (२०). यावरून अभिजात संस्कृत कवींची या बाबतीतील वृत्ती ध्यानात येण्यास हरकत नाही.

मुखाच्या संदर्भात वायु हा शब्द वापरलेला 'अमरुशतका'तील वर उल्लेखिलेल्या पद्याव्यतिरिक्त मला आढळला नाही. 'मुखमारुत' असा शब्द अनेक ठिकाणी आढळला. 'सौरभ्यमीप्सुरिव ते मुखमारुतस्य।' (रघु. ५-६९), 'मुहमारुअं पिअन्तो' (मुखमारुतं पिबन्तो — गाथासप्तशती, ९८), 'हत्थं मुहमारुणं एण वीअंतो' (हस्तं मुखमारुतेन बीजयन् — गाथा० ८६).

विशिष्ट शब्दाचा विशिष्ट अर्थ रूढीने अनेक वेळा निश्चित केलेला असतो. त्या शब्दाचा पर्याय वापरला तर अर्थाच्या छटेत लगेच विलक्षण फरक पडतो, आणि सभ्य अर्थाचे असभ्य अर्थात रूपान्तर होते असा नित्याचा अनुभव आहे. एक उदाहरण देतो, म्हणजे हा प्रकार स्पष्ट होईल. 'तं चेद् वायौ सरति सरलस्कन्धसंघट्टजन्मा बाधेतोल्काक्षपितचमरीबालभारो दवाग्निः।' हा 'मेघदूत' काव्यातील ५५ व्या श्लोकाचा पूर्वार्ध आहे 'वायौ सरति (सति)' म्हणजे 'वारा सुटला असताना.' या ठिकाणी 'वारा सुटला' या शब्दांऐवजी 'वारा सरला' असे म्हटले तर चालेल काय? वास्तविक मुळात 'सरति' (सति) असा जो शब्द आहे त्याचा मराठी अनुवाद 'सरला' हा शब्द वापरला तरच मुळाला अधिक धरून होईल. पण वाऱ्याच्या संदर्भात 'सरला' आणि 'सुटला' या दोन शब्दांचा अर्थ मराठीमध्ये रूढीने निश्चित केला आहे. मराठीत 'वारा सरला' म्हणजे 'अपानवायु सरला' असाच अर्थ आहे. 'सुटला' या क्रियापदाच्या ऐवजी 'सरला' हे क्रियापद वापरले म्हणून काय झाले? असे 'वैश्विक जाणिवा' प्राप्त झालेल्या ज्या उदार माणसाला वाटत असेल त्याने प्रतिष्ठितांच्या सभेत 'वारा सरला' असे म्हणून पाहावे. म्हणून पर्यायशब्दाचा वापर करताना फार सावधगिरी बाळगावी लागते.

अमंगलव्यंजक अश्लीलाचे मम्मटाने दिलेले उदाहरण —

मृदुपवनविभिन्नो मल्लिकायाता विनाशाद्
घनरुचिरकलापो निःसपत्नोऽद्य जातः।
रतिविगलितबन्धे केशपाशे सुकेश्याः
सति कुसुमसनाथे कं हरेदेष बर्हीं॥

हा कालिदासाच्या 'विक्रमोर्वशीय' नाटकाच्या चवथ्या अंकातील बाविसावा श्लोक

आहे. या श्लोकाचे सौन्दर्य निर्विवाद आहे. मात्र काव्यप्रकाशकारांनी पहिल्या चरणातील 'विनाश' या शब्दावर आक्षेप घेतला आहे. 'प्रियायाः विनाशात्' या शब्दांनी 'प्रिया दिसेनाशी झाल्यामुळे' असे कालिदासाला म्हणावयाचे आहे हे उघड आहे. (विनाशः–अदर्शनम्). पण विनाश म्हणजे मरण हा प्राथमिक अर्थ असल्यामुळे येथे अमंगलव्यंजक अश्लील हा दोष घडला आहे असे काव्यप्रकाशकारांचे म्हणणे आहे. "अत्र च विनाशशब्दोऽमङ्गलव्यंजकत्वादश्लील इति प्रकाशकृदप्रकाशयदिदं पद्यं पददोषेषु।" असे 'विक्रमोर्वशीया'च्या रङ्गनाथ या टीकाकाराने म्हटले आहे. विनाश म्हणजे मरण हा अमंगल अर्थ येथे सूचित झाला आहे असे कमलाकरभट्ट म्हणतात. विनाश शब्दाचा विवक्षित अर्थच अमंगल आहे असे काव्यप्रदीपकार गोविन्दठक्कुर म्हणतात. "अत्र विनाशशब्दस्य विवक्षित एवार्थोऽमङ्गलः।" 'विनाश' म्हणजे मरण असा अमंगल अर्थ घेऊन काव्यप्रकाशकारांनी या शब्दावर आक्षेप घेतला हे बरोबरच झाले. कारण, विनाश या शब्दाचा मुख्यार्थ मरण असाच आहे, 'अदर्शन' (दृष्टीआड होणे) हा अर्थ नाही. पुरूरवा ऊर्वशीचा रानात सर्वत्र शोध करीत असता भ्रमिष्टपणाने सचेतन आणि अचेतन सृष्टीला तिची माहिती विचारीत आहे हा येथे संदर्भ आहे. 'मृदुपवनविभिन्नो' इ. श्लोक मयूराला उद्देशून आहे. मयूर त्याला उत्तर देत नाही म्हणून तो लगेच कोकिळेला प्रियेची माहिती विचारतो.

परभृते मधुरप्रलापिनि कान्ते
नन्दनवने स्वच्छन्दं भ्रमन्ती।
यदि परं प्रियतमा सा मम दृष्टा
तत्क्षिप्रमेव मम पुरःपुष्टे॥ (४·२४, संस्कृत छाया)

अशा स्थितीत 'अदर्शन' या अर्थासाठी 'विनाश' हा शब्द कालिदासाने वापरला हे युक्त झाले नाही हाच निर्णय करावा लागतो. तथापि रङ्गनाथाने मात्र या शब्दाचे समर्थन करून येथे अमंगलाश्लील हा दोष घडलेला नाही असे विवेचन केले आहे. "तत्र पूर्वश्लोके दृष्टिक्षमेत्यत्र जीवितसन्देहस्योक्तत्वात् कथमदस्त्वेव प्रतिवचनमित्यत्र प्रतिवचनादानपुरःसरं नर्तनारम्भाज्जीवितसन्देहस्य तावदवस्थानादेतस्मिन्नेव च पद्ये 'निःसपत्नोऽस्य जातः' इति सिद्धवदुक्तत्वाद्राज्ञश्चोन्मादातिशयरूपप्रकृष्टतरकारणवशाद्विप्रलम्भपोषकृदेवैतत्पदद्वयमिति न कश्चिदुक्तदोषलेशावकाश इति।" रङ्गनाथाने राजाच्या अतिरेकाला पोचलेल्या उन्मादाचे कारण दिले आहे. उन्मादाच्या भरात राजाने 'विनाश' हा शब्द वापरला असून त्यामुळे विप्रलम्भाचा परिपोषच झाला आहे असे रङ्गनाथाने विवेचन केले आहे. पण पूर्वापरसंदर्भ काळजीपूर्वक पाहिला असता रङ्गनाथाचे हे समर्थन टिकण्यासारखे नाही हाच माझा निर्णय आहे.

पददोषांचे विवेचन केल्यावर मम्मटाने अर्थदोषांचे विवेचन करीत असता पुन्हा एकदा अश्लीलार्थाची चर्चा केली आहे, आणि व्रीडाव्यंजक अश्लीलाचे उदाहरण म्हणून पुढील पद्य उद्धृत केले आहे.

हन्तुमेव प्रवृत्तस्य स्तब्धस्य विवरैषिणः ।
यथाऽस्य जायते पातः न तथा पुनरुन्नतिः ॥

या पद्याचे तपशीलवार विवरण मागे पृ. १० वर केले आहे ते पाहावे.

अश्लीलार्थ नेहमीच दूषणास्पद असतो असे नसून काही वेळा तो गुण ठरतो हे भोजाप्रमाणेच (मागे पृ. ३३ पाहा.) मम्मटानेही मान्य केले आहे. सुरतक्रीडेच्या समयी एकान्तात कामुक आणि कामिनी यांचे जे स्वैर बोलणे चालते त्यात अश्लील असले तरी तेथे तो दोष नसून गुणच आहे. तसेच शान्तरसाचा उत्कट प्रकर्ष साधणे हाच जर बोलणाराचा हेतू असेल तर अश्लील हा दोष नसून गुण ठरतो. मम्मटाचे वचन पुढीलप्रमाणे आहे — "अश्लीलं क्वचिद् गुणः । यथा सुरतारम्भगोष्ठ्याम्,...शमकथासु... ।"

वात्स्यायनकामसूत्रात (अधि० २, अ० १०, सूत्र ३) या बाबतीत पुढील सूत्र आहे. "पूर्वप्रकरणसंबद्धैः परिहासानुरागैर्वचोभिरनुवृत्तिः । गूढाश्लीलानां च वस्तूनां समस्यया परिभाषणम् ॥" यशोधराच्या 'जयमङ्गला' टीकेत याचे विवरण पुढीलप्रमाणे केले आहे. "यद् गूढं दुर्बोधमश्लीलं ग्राम्यं लोकप्रतीतं वस्तु गाथास्कन्धकादिषु बद्धं तस्योभयस्यापि बुभुत्सायां समस्यया संक्षेपेण परिभाषणम् । परिकथनमित्यर्थः ।"

सुरतक्रीडेच्या प्रारंभी स्त्रीच्या कामोद्दीपनासाठी व्यर्थी शब्दांनी अश्लील अर्थ सूचित करण्यात काही दोष नाही हे सांगताना मम्मटाने पुढील व्यर्थी पद्य उद्धृत केले आहे.

करिहस्तेन संबाधे प्रविश्यान्तर्विलोडिते ।
उपसर्पन् ध्वजः पुंसः साधनान्तर्विराजिते ॥

या पद्यातील 'करिहस्त', 'संबाध', 'विलोडित', 'उपसर्पन्', 'ध्वज', 'साधन' हे सहा शब्द व्यर्थी आहेत. त्यांचा एक अर्थ अगदी सभ्य आहे, आणि दुसरा अश्लील आहे. एक अर्थ घनघोर लढाई करणाऱ्या राजाशी संबद्ध असून दुसरा अर्थ सुरत-क्रीडेशी संबद्ध आहे. कामोद्दीपनासाठी करावयाच्या उपायांमध्ये 'करिकर' (करिहस्त) नावाचा एक प्रभावी उपाय वात्स्यायनाने सांगितला आहे. (२·८·१९) कामसूत्रातील विवेचनानुसार 'करिहस्तेन संबाधे' इ. पद्यातील व्यर्थी शब्दांची योजना पद्यकाराने मोठ्या खुबीने केली. या पद्याच्या तपशीलवार स्पष्टीकरणासाठी जिज्ञासूंनी वात्स्यायनकामसूत्र, आणि झळकीकरांचे 'काव्यप्रकाश'तील विवेचन पाहावे. इत्यलम्.

शान्तरसाचा प्रकर्ष साधण्याच्या उद्देशानेच केलेली अश्लीलार्थाची योजना दूषण नसून गुण होय, या विधानाच्या स्पष्टीकरणासाठी मम्मटाने दिलेले उदाहरण—

उत्तानोच्छूनमण्डूकपाटितोदरसन्निभे ।
क्लेदिनि स्त्रीव्रणे सक्तिरकृमेः कस्य जायते ॥

मनात वैराग्य तीव्रतेने बाणावे यासाठी ऐन्द्रिय भोग्य विषयांच्या बाबतीत घृणा किंवा जुगुप्सा (किळस) माणसाच्या मनात उत्पन्न होणे आवश्यक असल्यामुळे प्रस्तुत पद्यात स्त्रीच्या गुह्यांगाचे अतिशय घृणास्पद वर्णन जाणूनबुजून केले आहे, असे शास्त्रकारांचे समर्थन आहे. हे वर्णन किळसवाणे आहे हे खरे आहे. तथापि विरक्तीची भावना प्रबळ करून शेवटी शान्तरसाचा परिपोष करणे हा हेतू असल्यामुळे या पद्यातील अश्लीलार्थ दोषास्पद नाही असे ते म्हणतात.

वरील पद्यात टरटरून फुगलेल्या उताण्या बेडकाच्या फाटलेल्या पोटाशी स्त्रीच्या गुह्यांगाची तुलना केली आहे. सतत पाझरणाऱ्या असल्या ठिकाणी फक्त कृमीलाच आसक्ती वाटेल, असा पद्याचा आशय आहे. स्त्रीदेहाविषयी आत्यन्तिक घृणा निर्माण करणारी अशी कितीतरी पद्ये संस्कृत काव्याच्या क्षेत्रात इतस्ततः विखुरलेली आहेत. ' स्तनौ मांसग्रन्थी ' हा भर्तृहरीच्या वैराग्यशतकातील सोळावा श्लोक (विशेषतः त्यातील तिसरा चरण) यासाठी पाहावा. महाराष्ट्रातील अनेक संतकवींनी एकंदरीत नरदेहाची, आणि विशेषतः स्त्रीदेहाची, जी अतिरेकी निन्दा केली आहे तीही पाहावी. वैराग्याची भावना अत्यन्त तीव्र करून मानवी जीवनाची परिणती शान्तरसात घडवून आणावी हाच त्यांचा हेतू आहे असे मानले तर ' अश्लीलं क्वचिद् गुणः । ...यथा शमकथासु ' या काव्यप्रकाशकारांच्या वचनानुसार अशी घृणा निर्माण करणारी वर्णने आक्षेपार्ह मानू नयेत असे ठरेल. आणि एकंदरीत संस्कृत साहित्यशास्त्राचा निर्णय असाच आहे.

अमङ्गलसूचक अर्थ शास्त्रकारांच्या मते अश्लील असला तरी काही वेळा भावी (पुढे घडून येणारे) अमंगल सूचित करणारा अर्थ आक्षेपार्ह ठरत नाही असे मम्मटाचे मत आहे. यासाठी त्याने भट्टनारायणाच्या ' वेणीसंहार ' नाटकाच्या प्रस्तावनेतील सूत्रधाराच्या तोंडी असलेले पद्य उदाहरण म्हणून दिले आहे.

निर्वाणवैरदहनाः प्रशमादरीणां
नन्दन्तु पाण्डुतनयाः सह माधवेन ।
रक्तप्रसाधितभुवः क्षतविग्रहाश्च
स्वस्था भवन्तु कुरुराजसुताः सभृत्याः ॥ (वेणी. १·७)

या पद्याचा प्रशस्त अर्थ — शत्रूंचा विनाश झाल्यामुळे ज्यांचा वैराग्नी शांत झाला आहे असे पांडव कृष्णासमवेत संतुष्ट होवोत; आणि (तह झाल्यामुळे) अनुरक्त असलेल्या पांडवांना त्यांची भूमी ज्यांनी परत दिली आहे व संग्राम थांबविला आहे, असे कौरव आपल्या सेवकांसमवेत सुखी होवोत !

पण उत्तरार्धातील ' रक्तप्रसाधितभुवः ', ' क्षतविग्रहाः ' आणि ' स्वस्थाः ' हे शब्द दोन अर्थांनी घेण्यासारखे आहेत. रक्तप्रसाधितभुवः–ज्यांच्या रक्ताने पृथ्वी माखलेली आहे असे (प्रसाधिता – अलंकृता); क्षतविग्रहाः — ज्यांची शरीरे जखमांनी छिन्नविच्छिन्न झाली आहेत असे (विग्रह – शरीर); स्वस्थाः भवन्तु – स्वर्गात जावोत, विनाश पावोत, मरोत. ' स्वस्थाः स्वः स्वर्गे तिष्ठन्ति तथा भूताः मृताः इत्यर्थः ' असे स्पष्टीकरण अप्पाशास्त्री राशिवडेकर यांनी केले आहे. हा दुसरा अर्थ घेतला असता सूत्रधाराचा अभिप्राय पुढील-प्रमाणे होईल —शत्रूंचा विनाश झाल्यामुळे ज्यांचा वैराग्नी शांत झाला आहे असे पांडव श्रीकृष्णासह आनंदित होवोत; आणि ज्यांच्या रक्ताने भूमी माखलेली आहे व ज्यांची शरीरे जखमांनी विदीर्ण झाली आहेत अशा कौरवांचे निर्दालन होवो !

या श्लोकावर ' काव्यप्रदीप 'कारांचे भाष्य पुढीलप्रमाणे आहे — " अत्र प्रशमादिति स्वस्था इति मरणार्थकत्वादश्लीले अपि भाव्यमङ्गलसूचनाद् गुणः । " " इदं चामङ्गलाश्लीलत्वं भाव्यर्थसूचकतया गुणः " असे वामनाचार्य झळकीकर म्हणतात. " दुर्योधनामङ्गलस्य नायकमङ्गलत्वेन गुणत्वं बोध्यम् " (दुर्योधनाचे अमंगल झाले म्हणजे नायक जो युधिष्ठिर, त्याचे मंगल झाले हे क्रमप्राप्त आहे.) असेही ते पुढे म्हणतात.

*

वाग्भट (वाग्भटालङ्कार), हेमचन्द्र (काव्यानुशासन), विश्वनाथ (साहित्यदर्पण), केशवमिश्र (अलंकारशेखर), विद्यानाथ (प्रतापरुद्रीय) या उत्तरकालीन शास्त्रकारांनी प्रायः पूर्वाचार्यांच्या विवेचनाचाच अनुवाद केलेला असल्यामुळे येथे त्याची चर्चा केली नाही तरी चालेल. काही विशेष गोष्टींचा तेवढाच उल्लेख करतो. जे ज्या ठिकाणी उचित नसते ते ' ग्राम्य ' होय अशी वाग्भटाने ग्राम्याची व्याख्या केली आहे. ' यद्यत्रानुचितं तद्धि तत्र ग्राम्यं स्मृतम् ' (वाग्भटालंकार, २.१५). ' छादयित्वा सुरान् पुष्पैः पुरो धान्यं क्षिपाम्यहम् । ' हे या प्रकाराचे त्याने उदाहरण दिले आहे. ' पुष्पांनी देवांची पूजा करून त्यांना नैवेद्य अर्पण केला ' असे म्हणणे आवश्यक असता ' फुलांनी देवांना झाकून टाकले आणि त्यांच्यापुढे धान्य टाकले ' असे ' ग्रामीणलोकतुल्यवचन ' (गांवढ्या गावातील रांगड्या माणसाचे रांगडे बोलणे) ग्राम्य होय असे वाग्भटाचे विवेचन आहे. ' पामर-व्यवहारिकप्रसिद्धं ग्राम्यमुच्यते ' अशी विद्यानाथांनी ग्राम्याची व्याख्या केली आहे. पामर-

व्यवहार म्हणजे अत्यंत क्षुद्र, सामान्य माणसांची बोलण्याची धाटणी. 'औज्ज्वल्याभाववत्' हे केशवमिश्रांनी अश्लीलाचे गमक सांगितले आहे. अवाचक अश्लीलामध्येच ग्राम्याचाही अन्तर्भाव होतो असेही केशवमिश्रांनी म्हटले आहे. ग्राम्यता ही 'जघन्यार्थप्रतिपत्ति' असते असे अग्निपुराणाचे विवेचन आहे. (अग्नि० ३४७·११) जघन्यार्थप्रतिपत्ति म्हणजे हीन, असभ्य, अर्थाची प्रतीती. अग्निपुराणातील काव्यशास्त्राचे विवेचन करणारा भाग दहाव्या शतकात रचला गेला असावा.

'विष्णुधर्मोत्तरपुराण' च्या तिसऱ्या खण्डात साहित्यशास्त्राचे विवेचन आले आहे. इसवी सन ५७५ ते ६५० या काळात हा भाग तयार झाला असला पाहिजे असे डॉ. काणे यांचे मत आहे. 'अश्लीलवचनान्वित' काव्यबन्ध करू नये असा या पुराणाचा आदेश आहे. "...अश्लीलवचनान्वितम् ॥...काव्यबन्धं न कर्तव्यं...॥" (वि० ध० पु० ३·१६·९–१०). 'प्रहेलिकां' मध्ये देखील अश्लील असता कामा नये असा या पुराणाचा दण्डक आहे. 'प्रहेलिका' हा कोड्यासारखा किंवा उखाण्यासारखा प्रकार आहे. प्रहेलिका गूढार्थाने युक्त असते. वि० ध० पुराणातील वचन पुढीलप्रमाणे आहे —

अश्लीलमेतास्वपि नैव कार्यं तद्वर्ज्यमाहुः कवयो नरेन्द्र ।
उद्वेजनीयं तु सतां तदुक्तमश्लीलबन्धं मुखदं न काव्यम् ॥ (३·१६·१५)

*

निष्कर्ष

ग्राम्य आणि अश्लील यांच्या बाबतीत वर साहित्यशास्त्रातील जे विवेचन तपशीलवार दिले आहे त्याचा निष्कर्ष सांगणे उपयुक्त होईल. जो शब्द ज्या संदर्भात अनुचित असेल तो ग्राम्य मानावा असे रुद्रट म्हणतो. (यदनुचितं यत्र पदं तत्तत्रैवोपजायते ग्राम्यम् ।). असाच निर्णय वाग्भटाचा आहे. (यद्यत्रानुचितं तद्धि तत्र ग्राम्यं स्मृतम्). प्रतिष्ठितपणाचा अभाव, म्हणजेच रासवटपणा, हे ग्राम्यत्व होय असे हेमचंद्र म्हणतो. (अवैदग्ध्यं ग्राम्यत्वम्) अतिशय सामान्य, असंस्कृत, लोकांच्या समूहातच जे बोलले जाते ते ग्राम्य होय असे विद्यानाथ म्हणतो. (पामरव्यवहारैकप्रसिद्धं ग्राम्यमुच्यते ।)

नागर, उपनागर, आणि ग्राम्य अशी तीन प्रकारची प्रसिद्धि (त्रिधा प्रसिद्धिः) भोजाने सांगितली आहे. नागर प्रसिद्धि 'पण्डितजनगामिनी' (केवळ पंडितांच्या, विदग्धांच्या, समाजात असलेली) असते. उपनागरप्रसिद्धि ही पंडितांच्या निकट सहवासात असलेल्या, अगदी थोड्या जाणत्या, परंतु तुलनेने सामान्य लोकांपुरती मर्यादित असते. आणि ग्राम्य

प्रसिद्धि 'सार्वलौकिकी' (सर्वसामान्य लोकांमध्ये असलेली) असते. 'सर्वलोकप्रसिद्धं ग्राम्यम्।' असे भोज म्हणतो.

गोपनीय शारीर धर्मांचे वाचक असे जे शब्द असंस्कृत ग्रामीण वापरतात ते सभ्य सुसंस्कृत नागरकांच्या बाबतीत वर्ज्य असतात. ग्राम्य शब्दांऐवजी इतर सभ्य पर्याय शब्द वापरून तोच आशय व्यक्त करण्याची प्रतिष्ठितांची रीत असते. (उदा. शौचास जाणे, लघ्वी करणे, वारा सरणे असे शब्द न वापरता हगणे, मुतणे, पादणे असे शब्द वापरले तर ते ग्राम्य ठरतील.) इतकेच नव्हे तर जे शारीर धर्म वरच्याप्रमाणे गोपनीय नसतात, परंतु किळसवाणे असतात, ते व्यक्त करतानासुद्धा शब्द अगदी बेतशीर वापरावे लागतात हे सुसंस्कृतांना चांगले माहीत असते. हे शारीर धर्म किळसवाणे नसले तरी सुद्धा भोजाने सांगितलेल्या 'नागरप्रसिद्धी'च्या दृष्टीने शब्दांच्या वापरावर बंधन पडते. (उदा. नायिका भडभडा ओकली, भोकाड पसरून रडली, पचकन् थुंकली, नायिकेने शेंबूड शिंकरला, बेडका टाकला, यासारखे बोलणे ग्राम्य आहे, किळस उत्पन्न करणारे आहे.)

स्त्रीच्या आणि पुरुषाच्या गुह्य इंद्रियांचे निदर्शन करताना असंस्कृत व रासवट खेडवळ माणसे जे शब्द सहज वापरतात ते सुसंस्कृत व प्रतिष्ठित लोक (एकान्ताशिवाय अन्यत्र, समाजात,) वापरणार नाहीत. हा अभिरुचीचा प्रश्न आहे. पूर्वी शिमग्याच्या सणात गुह्यांगाचे वाचक असे जे शब्द होळीचे होळकर वापरीत असत त्यांना सभ्य व सुसंस्कृत समाजात बंदी आहे. पूर्वी देखील ते शब्द होळीतच फेकून देत असत. या शब्दांपैकी त्याज्य, ग्राम्य, व असभ्य शब्द कोणते, आणि त्यांचे ग्राह्य पर्याय शब्द कोणते, हे प्रत्येक समजूतदार माणसाला चांगले ठाऊक असते. बोलणारा सभ्य आहे, आणि ऐकणाराही सभ्य आहे, अशी परिस्थिती असता, गुह्य इंद्रियांचे वाचक असलेले ग्राम्य शब्द वापरले जाणार नाहीत. बोलणारा सभ्य पुरुष आहे, आणि ऐकणारी सभ्य स्त्री आहे, ही परिस्थिती तर अधिकच निकट आहे. या परिस्थितीत ग्राम्य शब्दाचा वापर ही गोष्ट सर्वथा असंभाव्य आहे.

प्राचीन संस्कृत साहित्य निर्माण करणारे कवी बहुशी राजाश्रयाने राहत असत. राजाश्रय नसला तर एखाद्या मातबर सुसंस्कृत प्रतिष्ठित पुरुषाचा कवीला आश्रय असे. प्राचीन काळचा इतिहास पाहिला तर अनेक राजे बहुश्रुत व रसिक असत असे दिसून येईल. सर्वच ललितकलांच्या जोपासनेसाठी ते नित्य प्रयत्न करीत असत. कवित्वशक्ती अंगी असलेल्या राजांची नावेही मधून मधून आढळतात. राजे स्वतः सुसंस्कृत असल्यामुळे त्यांच्या आश्रयाने काव्याची उपासना करणाऱ्या कवींनाही सुसंस्कृतपणाची सारी बंधने कटाक्षाने पाळावी लागत असली तर त्यात काही नवल नाही. आपल्या दरबारात विद्वत्सभा

भरविणारे राजे कवींकडून सुसंस्कृतपणाचे आणि औचित्याचे पालन व्हावे अशी अपेक्षा करीत असले तर ते सर्वथैव स्वाभाविक असेच आहे. आणि यामुळेच संस्कृत साहित्यशास्त्राने कवीच्या सुसंस्कृतपणावर विशेष भर दिलेला आहे. स्वास्थ्य, प्रतिभा, अभ्यास, भक्ती, विद्वत्कथा, बहुश्रुतता, तद्दख स्मरणशक्ती, आणि सतत परिश्रम या कवित्वाच्या आठ 'माता' होत असे सांगितल्यावर राजशेखराने शुचित्वाचे अपार महत्त्व वर्णिले आहे. वाणीचे पवित्र्य, मनाचे पावित्र्य, आणि शरीराची शुद्धता असे तीन प्रकारचे पावित्र्य राजशेखराने सांगितले आहे. 'वाक्शौच' म्हणजे वाणीचे पावित्र्य ज्या समाजात इतके महत्त्वाचे मानले जात असे त्या समाजातील कवी नुसताच 'भावरसानुरक्त' असून भागावयाचे नाही, विद्वानांच्या सभेत मोठ्या दिमाखाने वावरताना त्याला कसलाही संकोच वाटता कामा नये, यावर राजशेखराचा कटाक्ष आहे.

अशा या सुसंस्कृत अभिजात समाजातील कवी सौन्दर्य आणि औचित्य या तत्त्वांवर सारे चित्त केंद्रित करूनच काव्यनिर्मिती करीत असे. काव्य अगदी निर्दोष व परिपूर्ण व्हावे हीच त्याची भूमिका असे. काव्यात कोणताही शब्द निंद्य असता कामा नये असा नियम साहित्यशास्त्रकारांनी का घालून दिला यातील मर्म हेच आहे. त्यांचा भर सौशब्द्यावर (शब्दांच्या उचित योजनेवर) होता. शरीर मुळात सुंदर असले तरी श्वेतकुष्ठाच्या लहानशा डागामुळे-देखील ते 'दुर्भग' म्हणजे असुंदर बनते असे दण्डीने जे म्हटले आहे ते याच भूमिकेतून.

संस्कृत कवींची आणि साहित्यशास्त्रकारांची ही भूमिका नीट समजावून घेतली असता त्यांना 'ग्राम्य' शब्दांचा इतका विलक्षण तिरस्कार का वाटत असे याचा उलगडा होईल. काही शब्द स्वभावतः म्हणजे मुळात ग्राम्य नसतात; पण विषयभेदामुळे म्हणजे संदर्भामुळे ग्राम्य ठरतात हे आधुनिक विचारसरणीतील महत्त्वाचे सूत्र प्राचीन संस्कृत साहित्यशास्त्रकारांना चांगले माहीत होते. तथापि भाषेत काही शब्द मुळातच ग्राम्य असतात, आणि अशा ग्राम्य शब्दांना सुसंस्कृत व प्रतिष्ठित कवीच्या काव्यात चुकूनदेखील जागा मिळता कामा नये हे त्यांनी आग्रहपूर्वक सांगितले आहे. ग्राम्य शब्दांवर आणि ग्राम्य अर्थावर जसा बहिष्कार घालावयाचा तसाच बहिष्कार अश्लीलाच्या तीनहां प्रकारांवर घालावयाचा हा आग्रहही क्रमप्राप्तच आहे. अश्लील हे ग्राम्यतेप्रमाणेच आक्षेपार्ह आणि त्याज्य असाच संस्कृत साहित्यशास्त्रकारांचा एकमुखी निर्णय आहे. प्रहेलिकांमध्ये, म्हणजे उखाण्यांमध्ये, देखील अश्लीलाचा उपयोग करू नये असा 'विष्णुधर्मोत्तरा'चा निर्णय आहे.

शृंगारवर्णनात ग्राम्यता कटाक्षाने टाळली पाहिजे. नाटकांत व काव्यांत ग्राम्य संभोग-वर्णन करू नये, विशेषतः श्रेष्ठ प्रतीच्या व्यक्तींच्या बाबतीत तर ग्राम्यतेचा लेशही येता कामा नये, यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली पाहिजे असे साहित्यशास्त्राचे स्पष्ट मत आहे. एखाद्या महाकवीने या संदर्भात जर प्रमाद केला असेल तर त्या प्रमादावर कडक टीका

करणे जरूर आहे अशीच शास्त्रकारांची भूमिका आहे. कवी जर अलौकिक प्रतिभेची उपजत देणगी घेऊन आला असेल तर त्याच्या त्या प्रतिभेच्या झळाळीमुळे अशा दोषाकडे दुर्लक्ष होत असले तरी दोष तो दोषच — त्याचा निषेधच करावयास पाहिजे, हीच संस्कृत साहित्यशास्त्राची भूमिका आहे. उदाहरणार्थ, आनन्दवर्धनाचार्य म्हणतात —

" तस्मादभिनेयार्थेऽनभिनेयार्थे वा काव्ये यदुत्तमप्रकृते राजादेरुत्तमप्रकृतिभिर्नायिकाभिः सह ग्राम्यसंभोगवर्णनं तत्पित्रोः सम्भोगवर्णनमिव सुतरामसभ्यम्... । "

" यत्त्वेवंविधे विषये महाकवीनामप्यसमीक्ष्यकारिता लक्ष्ये दृश्यते स दोष एव । स तु शक्तिरस्कृतत्वात्तेषां न लक्ष्यते... । "

अशा बाबतींत कालिदासासारख्या लोकोत्तर प्रतिभेच्या महाकवींच्या काव्यातील दोष प्रथम आवर्जून दाखविले पाहिजेत, ज्यांच्या ठायी खरी कवित्वशक्ती नाही अशा सुमार प्रतिभेच्या कवींचे दोष दाखविण्यापासून काहीच लाभ नाही, असे ' वक्रोक्तिजीवित 'कार राजानक कुन्तकाने म्हटले आहे.

" यथा च कुमारसम्भवे त्रैलोक्याक्रान्तिप्रवणपराक्रमस्य तारकाख्यस्य रिपोर्जिगीषावसरे सुरपतिर्मन्मथेनाभिधीयते —

कामेकपत्नीं व्रतदुःखशीलां
लोलं मनश्चारुतया प्रविष्टाम् ।
नितम्बिनीमिच्छसि मुक्तलज्जां
कण्ठे स्वयंग्राहनिषक्तबाहुम् ॥

इत्यविनयानुष्ठाननिष्ठं त्रिविष्टपाधिपत्यप्रतिष्ठितस्यापि तथाविधाभिप्रायानुवर्तनपरत्वेनाभिधीयमानमनौचित्यमावहति । एतच्चैतस्यैव कवेः सहजसौकुमार्यसुद्रितसूक्तिपरिस्पन्दसौन्दर्यस्य पर्यालोच्यते, न पुनरन्येषामाहार्यमात्रकाव्यकरणकौशलश्लाघिनाम् । "

(वक्रोक्तिजीवित, प्रथमोन्मेष)

नाटकात सामान्य क्षुद्र व्यक्तींचे चित्र रंगविले तर त्यांच्या तोंडी आक्षेपार्ह ग्राम्य शब्दांची योजना करावी लागेल, आणि असे झाले तर रंगभूमीवर त्याज्य गोष्टींचे थैमान सुरू होईल अशी भीती असते. या आपत्तीतून सुटका करून घेण्यासाठी ' नाटका 'सारख्या भारदस्त नाट्यप्रकारात विषय आणि व्यक्ती यांच्या निवडीवर नाट्यशास्त्राने भर दिला आहे. ' प्रख्यातवस्तुविषय ' आणि ' प्रख्यातोदात्तनायक ' या गोष्टी नाटकात आवश्यक आहेत. कारण यायोगे औचित्यहानी घडत नाही. राजे इत्यादि ' उत्तमप्रकृति ' व्यक्तींच्या बाबतीत ग्राम्यशृंगाराचे वर्णन त्याज्य, तसेच ते देवांच्या बाबतीतही त्याज्य, — असाच शास्त्रकारांचा

निर्णय आहे. केवळ अभिनेय नाटकातच संभोगशृंगाराचे वर्णन त्याज्य असते असे नसून अनभिनेय काव्यातही ते त्याज्य असते. संभोगाचा 'सुरत' हा एकच प्रकार नाही — शृंगारात अनेक प्रकारच्या छटा असतात. म्हणून केवळ सुरताचे वर्णन करण्यात कवींनी दंग होण्याचे कारण नाही, सर्वत्र 'प्रकृत्यौचित्य' (म्हणजे नाटकांतील भूमिकांचे (औचित्य) पाळावे; आणि या बाबतीत गुन्हा करणारा कवी जरी प्रतिभाशाली महाकवी असला तरी त्याच्या गुन्ह्यावर पांघरूण न घालता त्याला जाब विचारावा असेच आनन्दवर्धनाचार्यांच्या एतद्विषयक विवेचनाचे तात्पर्य आहे.

'काव्यानुशासन'कर्ता हेमचन्द्र यानेही आनन्दवर्धनाचार्यांच्या विचारसरणीचा अनुवाद केला आहे.

"...किन्तु रतिः संभोगशृंगारूपा उत्तमदेवताविषया न वर्णनीया। तद्वर्णनं हि पित्रोः संभोगवर्णनमिवात्यन्तमनुचितम्।"

यावर भाष्य करताना हेमचन्द्र म्हणतो —

"न च राजादिषु प्रसिद्धग्राम्यसंभोगोपवर्णनं प्रसिद्धं नाटकादौ तथैव दिव्येषु तत्परिहर्तव्यम्। नाटकादेरभिनेयत्वादभिनयस्य संभोगशृंगारविषयस्य सभ्यत्वात्तत्र परिहार इति चेत्। ननु यद्यभिनयस्यैवंविषयस्य सा केन वार्यते? तस्मादभिनेयार्थेऽनभिनेयार्थे च काव्ये यदुत्तमप्रकृते राजादेरुत्तमस्त्रीभिः सह ग्राम्यसंभोगवर्णनं तदसभ्यं तथैव दिव्यादिविषयम्। न च संभोगस्य सुरतलक्षण एवैकः प्रकारो यावत् अन्येऽपि परस्परप्रेमदर्शनादयः प्रभेदाः सम्भवन्ति। त एव चोत्तमप्रकृतिविषये वर्णयितुमुचिताः।"

'नाटका'त (दशरूपकांपैकी 'नाटक' हे एक रूपक आहे. 'नाटक' ही संज्ञा इंग्रजीतील 'High Comedy' या प्रकाराशी सदृश आहे.) 'अधमप्रकृति' माणूस नाटकाचा नायक होऊ शकत नाही. 'प्रहसन' किंवा 'भाण' या प्रकारांत मात्र 'अधमप्रकृति' मनुष्यच नायक असतो. (अधमः एव नायकः). 'नाटका'तील नायक अशा प्रकारे 'प्रख्यातोदात्तचरित' असला पाहिजे असा नाट्यशास्त्राचा आग्रह असल्यामुळे ज्या योगे वैरस्य उत्पन्न होईल असे काहीही 'नाटका'त असता कामा नये हे ओघानेच आले. (प्रतीतिविघातस्य वैरस्यदायिनः संभवः यत्र यत्र तन्नाटके नोपनिबद्धव्यम्।)

हेच हेमचन्द्राने पुढीलप्रमाणे स्पष्ट केले आहे —

"आस्वादयितृणां हि यत्र चमत्काराविघातः (म्हणजे काव्यानंदाची निर्विघ्नपणे होणारी प्राप्ति) तदेव रससर्वस्वम्। आस्वादयितृत्वात् उत्तमदेवतासंभोगपरामर्शे च पितृसंभोग इव लज्जातन्द्रादिना कश्चमत्कारावकाश इत्यर्थः।" (काव्यनुशासन, अध्याय ३)

काव्याच्या वाचनाने अथवा नाटकाच्या प्रयोगाच्या दर्शनाने रसिकाला आनंदाची प्राप्ति होणे हेच रससर्वस्व असते; पण आदरणीय श्रेष्ठ देवतांचा (किंवा श्रेष्ठ व्यक्तींचा) उत्तान शृंगार जर कवीने वर्णिला तर आईबापांच्या संभोगशृंगाराच्या वर्णनाच्या श्रवणाने चित्ताला जशी लाज वाटेल तशीच लाज येथेही वाटणे अपरिहार्य असल्यामुळे आनंदाची प्राप्ति कशी होणार आणि रसनिर्मिति कशी होणार? असा हेमचंद्राच्या वरील विवेचनाचा आशय आहे.

कालिदासाच्या 'कुमारसंभव' नामक महाकाव्याच्या आठव्या सर्गातील ८७ अनुक्रमांकाचा श्लोक पुढीलप्रमाणे आहे.—

ऊरुमूलनखमार्गराजिभि -
स्तत्क्षणं हृतविलोचनो हरः ।
वाससः प्रशिथिलस्य संयमं
कुर्वतीं प्रियतमामवारयत् ।।

या श्लोकात उत्तान शृंगार अगदी ओतप्रोत भरलेला आहे; आणि तो वाच्यार्थाने प्रकट झाला आहे. शिव आणि पार्वती यांच्या संदर्भात हे शृंगारवर्णन वाच्यार्थाने आले असल्यामुळे औचित्याची फार मोठी हानी झाली आहे असा 'औचित्यविचारचर्चा'कार क्षेमेन्द्र याने महाकवी कालिदासावर स्पष्ट आरोप केला आहे. क्षेमेन्द्र म्हणतो—

"अत्राम्बिकासंभोगवर्णने पामरनारीसमुचितनिर्लज्जसज्जनखराजिविराजितोरुमूलहृत-विलोचनत्वं त्रिलोचनस्य भगवतस्त्रिजगद्गुरोर्यदुक्तं तेन अनौचित्यमेव परं प्रबन्धार्थः पुष्णाति ।"

कालिदासासारखे महाकवीदेखील प्रसंगी औचित्यहानी करतात. या बाबतीतील मोह आवरून धरणे भल्याभल्यांनाही अशक्य होते हाच या प्रकाराचा अर्थ आहे. पण महाकवी झाले म्हणून काय झाले? प्रमाद तो प्रमादच! आणि तो आवर्जून दाखविलाच पाहिजे—इतकेच नाही तर असा प्रमाद करणाऱ्या कवीवर कठोरपणे स्पष्ट शब्दांत टीका केलीच पाहिजे, हेच प्राचीन साहित्यशास्त्रकारांचे धोरण आहे. ज्यांनी कालिदासाच्या अलौकिक प्रतिभेचे अगदी मुक्तकंठाने अतिरेकी स्तवन केले त्यांनीच शृंगारवर्णनातील औचित्य-हानीच्या प्रमादाबद्दल त्याला धारेवर धरण्यास मागेपुढे पाहिले नाही. या गोष्टीमुळे संस्कृत साहित्यशास्त्राची कर्तबगारी उजळून निघाली आहे. काव्याच्या कोणत्याही भागात औचित्याची थोडीशी जरी हानी झाली तरी त्या काव्याच्या थोरवीत निःसंशय उणेपणा येतो. एखाद्या उंची रेशमी वस्त्राच्या पदराला निरांजनाची वात लागून तो जळला म्हणजे त्या वस्त्राची जी

दशा होते तीच दशा प्रबन्धाच्या एका भागात झालेल्या औचित्यहानीमुळे त्या प्रबन्धाची होते असे राजानक कुन्तकाने स्पष्टपणे म्हटले आहे.

"प्रबन्धस्यापि क्वचित् प्रकरणैकदेशे ऽप्यौचित्यविरहादेकदेशदाहदूषितदग्धपटप्रायता प्रसज्यते।"

महाकवींच्या हातूनही अशा प्रकारचे प्रमाद मधून मधून होत असल्यामुळे रुद्रटाला पुढीलप्रमाणे इषारा देणे भाग पडले.

एतद्विज्ञाय बुधैः परिहर्तव्यं महीयसो यत्नात्।
न हि सम्यग्विज्ञातुं शक्यमुदाहरणमात्रेण॥

(काव्यालंकार, ११।११)

उत्तान शृंगाराचे वर्णन वाच्यार्थाने केले असता सुसंस्कृत रसिकाच्या मनाला खेद होतो. परंतु तेच वर्णन व्यंग्यार्थाने केले तर ह्य होते याची उदाहरणे संस्कृत साहित्याच्या बहुश्रुत वाचकाच्या परिचयाची असली पाहिजेत. रंगभूमीवर चुंबनाचे दृश्य मोठ्या कौशल्याने कसे टाळता येते याचे एक रमणीय उदाहरण मागे शाकुन्तलातून उद्धृत केले होते. (पृष्ठ ९ पाहावे.) उत्तान शृंगाराचा प्रसंग सूचकनेने कसा टाळता येतो याचे एक बहारदार उदाहरण मंखाच्या 'श्रीकण्ठचरित' या काव्यातून देतो.

सख्योऽथ पक्ष्मलदृशां तदवेक्ष्य तन्त्रं
स्मेराननार्पितकरं शनकैर्निरीयुः।
तत्कर्षताञ्चलसमीरविधूयमानो
दीपोऽपि निर्जिगमिषुत्वमिवालालम्बे॥ (१५।१५)

त्या तरुण दांपत्याचे ते 'तंत्र' (स्वैर शृंगारचेष्टा) पाहून तिच्या मैत्रिणी गालांतल्या गालांत हसल्या, आणि त्यांनी हळूच काढता पाय घेतला, आणि त्यांच्या पदराच्या वाऱ्यामुळे (अचेतन) दिवा देखील तेथून जाण्याची धडपड करू लागला. किती ह्य व्यंजना या श्लोकात सामावलेली आहे हे सहृदयांनीच जाणून घ्यावे. केवळ मैत्रिणीच निघून गेल्या असे नव्हे, तर शृंगाराचे उद्दीपन करणारा रत्नदीपसुद्धा निघून जाण्यास उत्सुक झाला असे 'दीपोऽपि' या शब्दसमूहातील 'अपि' या शब्दाने सूचित झाले आहे.

वरील श्लोकात वर्णिलेल्या प्रसंगापेक्षा कितीतरी अधिक उत्कट प्रसंग आणखी एका श्लोकात रंगविलेला आहे. कर्णोत्पल नावाच्या कवीचा हा श्लोक असून तो 'सदुक्तिकर्णामृता'त उद्धृत केला आहे. या श्लोकातील शृंगाराची चढती पायरी आहे. ज्या पद्धतीने उत्तानपणाच्या निरनिराळ्या पायऱ्या कवी ओलांडून चालला आहे ती पद्धती

वरोडा ग्रंथ संग्रहालय, जोग. स्थळग्रं
अनुक्रम ५४३६२ दिः ...
अंक ... वर्ग दिः ...

पाहता हा शेवटच्या पायरीवर गेल्याशिवाय राहणार नाही अशी वाचकाची खात्री होऊ लागलेली असतानाच कवीने मोठ्या कुशलतेने त्या शृंगारमंदिरातील दिव्याचा उजेडच नाहीसा करून टाकला आणि पुढचा प्रसंग अंधाराच्या पडद्याआड झाकून टाकला. मूळ श्लोक असा आहे —

अंसाकृष्टदुकूलया सरभसं गूढौ भुजाभ्यां स्तना-
वाकृष्टे जघनांशुके कृतमधःसंसक्तमूरुद्वयम् ।
नाभीमूलनिबद्धचक्षुषि तया व्रीडानतांग्या प्रिये
दीपः फूत्कृतिवातवेपितशिखः कर्णोत्पलेनाहतः ॥

प्रियकर मर्यादा ओलांडून स्वैर अतिरेक करू लागला तेव्हा लाजेने चूर झालेल्या त्या कामिनीने प्रथम दिव्याच्या वातीवर फुंकर घातली; पण तेवढ्याने दिवा गेला नाही म्हणून कानावरचे कमळ काढून तिने त्याचा फटकारा दिव्याचा वातीवर मारला आणि अंधार करून टाकला.

वस्तुतः वरील पद्याच्या पहिल्या तीन चरणांत उत्तान शृंगाराच्या अगदी भडक छटा कवीने रंगविल्या आहेत. यावरून त्याचा 'मूड' कोणता आहे ते कळून येईल. याच 'मूड'मध्ये रतिक्रीडेचा कलशाध्यायदेखील त्याला वर्णिता आला असता. पण तेवढा संयम त्याने निश्चितपणे पाळला, आणि व्यंजनेच्या मोहक सौंदर्याने त्याने पहिल्या तीन चरणांतील उत्तानपणावर मोठ्या कौशल्याने पडदा टाकला.

शृंगाराच्या उत्तान छटांचे कामुकतेने ओसंडून वाहणारे वर्णन करण्यात सुख मानणे हा मानवी मनाचा स्वाभाविक धर्म आहे. अनेक प्राचीन कवींना असा मोह मधूनमधून होतो असे स्पष्ट दिसते. आपण मर्यादेचे उल्लंघन करीत आहोत याची जाणीव होताच काही कवी मनात दचकतात, आणि आपल्या प्रतिभाविलासाला बंधन घालतात. काहींना हे जमत नाही. ज्यांना हे जमत नाही असे कवी 'सत्कवी' म्हणजे मोठे कवि असले, आणि त्यांच्या हातून औचित्यभंग होत असला, तर आपले कर्तव्य ओळखणारे थोर शास्त्रकार अगदी स्पष्ट शब्दांत त्याच्या वृत्तीची निर्भर्त्सना करताना कसलाही संकोच बाळगीत नाहीत, याची उदाहरणे संस्कृत साहित्यशास्त्रात किती तरी आढळतील. ती काळजीपूर्वक पाहिली मात्र पाहिजेत. कवी घसरले तर त्यांना ठिकाणावर आणणे हे खऱ्या टीकाकाराचे कर्तव्य असते. ते त्यांनी पार पाडले नाही तर कवींबरोबर टीकाकारदेखील दोषास्पद ठरतात. सामान्य कवींच्या प्रमादांकडे संस्कृत साहित्यशास्त्रकार दुर्लक्ष करतात; पण थोर कवींनी केलेल्या प्रमादांच्या बाबतीत ते फार कठोर बनतात. "कैरपि महाकविभिरेव, न सामान्यैः' अशासारखे उद्‌गार साहित्यशास्त्रात पुन्हा पुन्हा आढळतात, यातील मर्म हेच होय.

शृंगारवर्णनावर प्राचीन शास्त्रकारांचा आक्षेप नाही — औचित्यहानीवर त्यांचा खरा आक्षेप आहे; त्यांना सौन्दर्यहानी खपत नाही, आणि म्हणूनच काव्यात जे जे लज्जाकर असेल, ते ते त्यांच्या दृष्टीने त्याज्य आहे. 'जुगुप्सितगोपनेच्छा लज्जा' (जे किळसवाणे असेल ते झाकून ठेवावयाची इच्छा ती लज्जा) अशी लज्जेची व्याख्याच शास्त्रकारांनी केली आहे. (चरकसंहिता, सूत्रस्थान, अध्याय ७, श्लोक २७ वरील टीका पाहावी.) जे जे असुन्दर, ते ते अश्लील, असा त्यांचा आग्रह आहे. 'लज्जादिसंपादक वाक्य', 'ग्राम्य-भाषा', 'निन्दाव्यंजक वाक्य' या साऱ्यांचा गणना अश्लीलातच होते. 'अश्लीला निन्दारूपा वाक्.' अश्लील म्हणजे 'अश्रीकर' (सौन्दर्यहानी करणारे, श्री-शोभा, सौन्दर्य) हे समीकरण प्राचीन साहित्यशास्त्रकारांच्या मनात नित्य असल्यामुळेच काव्यातील सौन्दर्याची हानी करणाऱ्या प्रत्येक गोष्टीवर त्यांनी आक्षेप घेतला. काव्यनाटकांमधील औचित्यहानीवर त्यांनी जसा आक्षेप घेतला तसाच आक्षेप काव्यादिकांतील सौन्दर्याची हानी करणाऱ्या ग्राम्य शब्दांवर, आणि किळस (जुगुप्सा) उत्पन्न करणाऱ्या शब्दांवरही घेतला. माणसांच्या गुह्य इंद्रियांचे वाचक असणारे शब्द त्यांनी काव्यातून बहिष्कृत केले यामागची भूमिका हीच आहे. 'न गुह्यं विवृणुयात्' (गोपनीय गोष्ट उघडी करून दाखवू नये) हे चरकसंहितेतील वचन (सूत्रस्थान, अध्याय ८।२५) याच भूमिकेचे स्पष्टीकरण करणारे आहे. 'संवृतान्येव शोभन्ते शरीराणि कुलानि च' (शरीरावर वस्त्र-प्रावरण असले म्हणजेच ते शोभते, तसेच कुळाची अब्रू चव्हाट्यावर उघडी करून दाखवावयाची नसते) असे क्षेमेन्द्राने म्हटले आहे. लज्जाकर शब्दांमुळे — किंवा त्यांचा नुसता भास झाला तरी सुद्धा — काव्यातील सौदर्न्याला बट्टा लागतो हा विचार संस्कृत साहित्यशास्त्रकारांच्या चित्तात अगदी दृढमूल झालेला आहे. त्यांना शृंगारिक वर्णने चालतात — अगदी उत्कट शृंगाराची वर्णने देखील चालतात (त्यांच्यामुळे औचित्याची हानी होता कामा नये एवढाच त्यांचा आग्रह आहे, हे मात्र ध्यानात ठेवावयास पाहिजे) पण सौन्दर्यपूर्ण काव्यात एकही लज्जाकर किंवा ग्राम्य शब्द येता कामा नये यावर त्यांचा कटाक्ष आहे. याचा एक नमुना शाकुन्तलावरील राघवभट्टांच्या विख्यात टीकेतून दाखवितो. शाकुन्तलाच्या तिसऱ्या अंकातील एकोणिसावा श्लोक पुढीलप्रमाणे आहे.

उत्सृज्य कुसुमशयनं नलिनीदलकल्पितस्तनावरणम् ।
कथमातपे गमिष्यसि परिबाधापेलवैरङ्गैः ॥

उत्तरार्धात 'पेलव' म्हणजे सुकुमार हा शब्द आला आहे. पण त्याच्यावर आक्षेप घेऊन राघवभट्ट म्हणतात — "अत्र पेलवैरित्यत्र पर्यायं पठित्वा व्रीडाश्लीलदोषः परिहर्तव्यः ।" ('पेलवैः' याच्या ऐवजी 'कोमलैः' असा पर्याय वापरला तर वृत्तभंग होत नाही,

आणि 'पेलव' या शब्दाच्या एकदेशात सामावलेले लज्जाकरत्व दूर करता येते, असे टीकाकाराला सुचवावयाचे आहे. मागे पृष्ठ २४ पाहावे.)

अभिजात संस्कृत साहित्य बहुतांशी राजदरबाराच्या परिसरात निर्माण झाले, सुसंस्कृत समाजातील सुसंस्कृत रसिक हेच त्याचे आस्वादक होते, आणि ते साहित्य निर्माण करणारे कवीदेखील सुसंस्कृत आणि प्रतिष्ठित होते. याचा अर्थ असा की, हे प्राचीन साहित्य मुळात मर्यादित समाजालाच उपलब्ध होते, पुढे ते राजदरबारापुरते आणखी मर्यादित झाले. स्वाभाविकच हे साहित्य दरबारी साहित्य झाले. जॉन डयूईने 'ऑफिशियल आर्ट्स' आणि 'पॉप्युलर आर्ट्स' असा जो भेद प्राचीन साहित्याच्या संदर्भात केला आहे त्याचे मूळ हेच आहे. सामाजिक प्रतिष्ठा ज्यांना प्राप्त झालेली आहे अशा सुसंस्कृत माणसांनी ज्यांना मान्यता दिली आहे त्या 'ऑफिशियल आर्ट्स.' ज्या काळात असे उच्च प्रतीचे खानदानी प्रतिष्ठित साहित्य निर्माण होत होते त्याच काळात सामान्य लोकही आपल्या परीने खास आपले स्वतःचे वाङ्मय निर्माण करीतच असले पाहिजेत; पण अशा वाङ्मयाला साहित्यशास्त्रात किंवा प्रतिष्ठित रसिकांच्या समाजात केव्हाही स्थान मिळू शकले नाही. किंबहुना अशा वाङ्मयाला कलेची पदवीच कधी मिळाली नसावी अशा आशयाचे विवेचन जॉन डयूई याने केले आहे.

"Philosophic theory concerned itself only with those arts that had the stamp and seal of recognition by the class having social standing and authority. Popular arts must have flourished but they obtained no literary attention. They were not worthy of mention in theoretical discussion. Probably they were not even thought of as arts."

—*Art as Experience* (Capricorn, 1958), p. 187.

प्राचीन संस्कृत साहित्य हे डयूईने ज्यांना 'ऑफिशियल आर्ट्स' म्हटले आहे अशाच कलांच्या सदरात पडेल. ते प्रज्ञावंत रसिकासाठीच निर्माण झाले होते. प्राचीन ग्रीसमध्येही असेच घडले. शृंगारिक काव्यात वाच्यार्थाने शृंगाराचे प्रकटीकरण करण्यापेक्षा ते ध्वन्यर्थाने करणे अधिक रसिकपणाचे द्योतक मानले जात असे, याची असंख्य उदाहरणे संस्कृत साहित्यात कोणालाही आढळतील. वल्लभदेवाच्या सुभाषितावलीतील पुढील पद्य पाहावे.

शिखरिणि क्व नु नाम कियच्चिरं
किमभिधानमसावकरोत्तपः।

तरुणि येन तवाधरपाटलं
दशति बिम्बफलं शुकशावकः ॥

विज्जिका नामक कवयित्रीचे एक मनोहर पद्य 'शार्ङ्गधरपद्धति' या ग्रंथात उद्धृत केले आहे.

धन्याऽसि या कथयसि प्रियसंगमेऽपि
विस्रब्धचाटुकशतानि रतान्तरेषु ।
नीवीं प्रति प्रणिहिते तु करे प्रियेण
सख्यः शपामि यदि किंचिदपि स्मरामि ॥

"शयनमंदिराच्या एकान्तात प्रियकराच्या आणि तुझ्या ज्या मनमोकळ्या गुजगोष्टी झाल्या त्या साऱ्या आठवून आठवून तू सांगत आहेस तेव्हा तुझी धन्य आहे बाई खरोखर ! मी शपथेवर सांगते, प्रियकराच्या हाताचा स्पर्श झाल्याबरोबर पुढे काय काय झालं ते मला जरा सुद्धा आठवत नाही."

व्यंजनेचे असले हे अपार सामर्थ्य प्राचीन कवींना चांगले माहीत होते, आणि त्या सामर्थ्याचा त्यांनी अगदी रसिकपणाने भरपूर वापर केला. एखाद्या वेळी वाच्यार्थाच्या उपयोगामुळे शृंगारवर्णनात उत्तानपणा येत असे, नाही असे नाही. पण तो उत्तानपणा प्रौढ प्रज्ञावंतांच्या समाजात खपून जात असे. या प्राचीन कवींवर एकच कलात्मक बंधन असे. ते बंधन औचित्याचे होय. औचित्यहानी हे कलात्मक सौंदर्याच्या दृष्टीने घोर पातक मानले जात असे. आनंदवर्धनाचार्य म्हणतात—

अनौचित्याद्ऋते नान्यद्रसभङ्गस्य कारणम् ।
प्रसिद्धौचित्यबन्धस्तु रसस्योपनिषत्परा ॥

या औचित्याच्या बंधनामुळे कलात्मकतेला बाध येत नाही, रसहानी होत नाही. येथे नीतीचा कसलाही संबंध नाही. औचित्याची हानी झाली हे स्पष्टपणे सांगण्याचे कर्तव्य प्रज्ञावंत विवेकी टीकाकाराचे आहे, आणि ते त्याने बजावलेच पाहिजे. थोडक्यात सांगावयाचे झाले तर कलात्मक सौंदर्यात ज्यामुळे अगदी थोडा का होईना विघाड होईल ते सारे त्याज्य, ज्यामध्ये कान्तीचा अभाव असेल ते सारे त्याज्य, जे जे म्हणून 'कान्त्यभाववत्' असेल ते सारे 'अश्लील', असा संस्कृत साहित्यशास्त्राचा अंतिम निर्णय आहे.

साहित्याच्या आकर्षक सौन्दर्याला जेणेकरून कलंक लागेल असे काहीही कवीने करता कामा नये हा साहित्यशास्त्रकारांचा आग्रह असल्यामुळेच त्यांनी ग्राम्य शब्दांची काव्याच्या

क्षेत्रातून हकालपट्टी केली, आणि जुगुप्सा (किळस), व्रीडा (लज्जा), व अमंगल कल्पना सूचित करणाऱ्या शब्दांची व कल्पनांचीही हकालपट्टी केली. साहित्याचे सौन्दर्य नितळ राहावे हाच त्यांचा हेतू होता.

आणि ग्राम्य शब्दांचा व अश्लील कल्पनांचा वापर करण्यास चटावलेल्या कवींचा गुन्हा त्यांच्या पदरात घालून तसा गुन्हा इतर कवींनी करू नये हे बजावून सांगण्याचे काम साहित्यशास्त्रकारांचेच आहे. संस्कृत साहित्यशास्त्रकारांनी हे कार्य चोखपणे केले आहे हे मान्य केलेच पाहिजे. शास्त्रकारांनी स्पष्ट शब्दांत निषेध केला तरी त्याला धूप न घालता ग्राम्य शब्दांचा स्वैर वापर करणारे काही कवी मधूनमधून दिसणारच. त्याला इलाज नाही. वैद्यकशास्त्राचे निर्बंध असले तरी सर्वच माणसे पथ्यकर आहाराचे सेवन करतात असे नाही—पण पथ्य काय आणि अपथ्य काय हे सांगणे वैद्यकशास्त्राचे प्राथमिक कर्तव्य होय. ' न हि चिकित्साद्यर्थेषु शास्त्रेषु सर्वे तद्विदः पथ्याहारादिकं सेवन्ते ' असे वात्स्यायनाने ' कामसूत्रा ' त म्हटले आहे. तथापि काही तरी निर्बंध पाहिजेच. ' अस्ति राजेति दूरस्था अपि जनपदाः न मर्यादामतिवर्तन्ते ' (वात्स्यायन, ' कामसूत्र ') — राजाचे नुसते नाव कानांवर पडताच माणसे मर्यादेत राहतात. याच न्यायाने साहित्यशास्त्रकारांच्या निर्णयाच्या नैतिक भयाने कवीदेखील मर्यादेत राहतात; आणि म्हणूनच या बाबतीत आपले कर्तव्य करताना साहित्यशास्त्रकारांनी चुकारपणा करता कामा नये असाच संस्कृत साहित्यशास्त्राचा इषारा आहे.

भाग दुसरा

जुनी मराठी कविता

जुनी मराठी कविता

अश्लील आणि ग्राम्य यांच्या बाबतीतील संस्कृत साहित्यशास्त्रकारांची भूमिका पहिल्या भागात विस्ताराने स्पष्ट केली. या भागात तेराव्या शतकापासून अठराव्या शतकाच्या अखेरी-पर्यंत होऊन गेलेल्या मराठी वाङ्मयाचा विचार करावयाचा आहे.

या काळात लिहिले गेलेले वाङ्मय ज्या समाजासाठी मुख्यतः होते त्या समाजातील बहुतेक सारे लोक अशिक्षित होते. लिहिणे आणि वाचणे या गोष्टी त्यांच्या कक्षेच्या बाहेरच्या होत्या. कर्णोपकर्णी जे ज्ञान मिळेल तेवढेच त्यांच्या गाठी असे. संस्कृत साहित्य सुसंस्कृत प्रज्ञावंतांच्या समाजासाठी होते; आणि हे मराठी वाङ्मय अशिक्षित सामान्य माणसांसाठीच होते. संस्कृत भाषेतील अपार ज्ञानभांडाराचा, तत्त्वज्ञानाचा, आणि साहित्याचा मुळातून परिचय करून घेणे ज्यांना कोणत्याही उपायाने शक्य नव्हते अशा सामान्य अज्ञ जनांच्या अपेक्षा लक्षात घेऊन ज्ञानेश्वरादि थोर संतांनी मराठी भाषेचा आश्रय केला.

तंरिं संस्कृताचीं गहनें । तोडोनिया मन्हाठिया शब्दसोपानें ।
रचिलीं धर्मनिधानें । श्रीनिवृत्तिदेवें ॥ (ज्ञानेश्वरी, ११/९)
आजि आवडतयाही सुकाळु जाहला । एथ अर्जुनचि काय म्हणों पातला ।
जे गीतार्थु हा आला । मन्हाठिये ॥ (ज्ञा. १८।१४)

तेणें आबालसुबोधें । वोविंयेचेनि प्रबंधे ।
ब्रह्मरससुस्वादें । अक्षरें गुंथिलीं ।। (ज्ञा. १८।१७४२)

एकनाथांची हीच भूमिका आहे. 'बाळेभोळे जन' तरून जावेत यासाठी त्यांना 'सुगमसाधन' उपलब्ध करून देणे जरूर होते. म्हणून देशभाषेच्या द्वारे 'परमार्थाची खाणी' एकनाथांनी उघडली, सामान्य जनांना त्यांनी 'सुगम सोपारी पायवाट' करून दिली.

सन्तांचे हे कार्य समाजाच्या उद्धाराच्या दृष्टीने फार मोठे झाले यात कसलाही संदेह नाही. पण सामान्य लोकांना समजेल अशा नित्याच्या सवयीच्या भाषेत बोलून भागवत-धर्माचा प्रचार करण्याच्या उत्साहाच्या भरात एक गोष्ट अभावितपणे घडून आली. प्रतिष्ठित सुसंस्कृत नागर समाजाला उद्देशून जे बोलावयाचे ते तसेच सुसंस्कृत आणि नागर असले पाहिजे हे उघड आहे. परंतु ज्यांची बुद्धीची आणि संस्कृतीची उंची बेताचीच आहे अशा सामान्य लोकांच्या मिश्र समाजात बोलणाऱ्या वक्त्याच्या भाषेवर नकळत त्या समाजाच्या भाषेतील शिष्टसंमत नसलेल्या अनेक शब्दांचा आणि तन्हेवाईक लकबींचा परिणाम होणे अपरिहार्य असते. वक्ता सुसंस्कृत प्रज्ञावंत असला तरीही हे टाळणे त्याला अशक्य नसले तरी अवघड होऊन बसते. हा सारा संसर्गाचा परिणाम होय. 'लसनाचिये संगती। कापुरा दोष लागती।' असे दासोपंतांनी 'गीतार्णवा'त म्हटले आहे. मग ज्या ठिकाणी वक्ताही असंस्कृत, आणि श्रोत्यांचा समाजही तसाच असंस्कृत, त्या ठिकाणी एकनाथ-महाराजांनी म्हटल्याप्रमाणे 'कां भांडाचे तोंडीं भंडपुराण। त्यावरी आला शिमग्याचा सण। मग करितां वाग्विटंबन। आवरी कोण तयासी?' असा प्रकार झाला तर त्यात नवल काय? असा प्रकार शाहीरांच्या काही लावण्यांत झालेला आहे.

प्राचीन मराठी कवींपैकी पुष्कळ कवी अध्यात्मविद्येच्या उच्च कक्षेत वास्तव्य करणारे असल्यामुळे मानवी जीवनाविषयी आत्यंतिक औदासीन्य व विरक्तता धारण करणारे होते. एकंदर मानवी जीवनाविषयी तिरस्काराची भावना सर्वांच्या चित्तात उपजावी या हेतूने मानवी जीवनाशी संबद्ध असलेल्या सर्वच गोष्टींची त्यांनी स्वैर निंदा केली आहे. नरदेहाची निंदा, स्त्रीची निंदा, विषयसुखाची निंदा हे त्यांच्या आवडीचे विषय होत. अशी निंदा करीत असता या गोष्टींविषयी जुगुप्सेची (जुगुप्सा—किळस) भावना श्रोत्यांच्या मनात निर्माण व्हावी हाच त्यांचा उद्देश होता. संस्कृत साहित्यशास्त्रात ज्याला 'जुगुप्साश्लील' म्हणतात त्याच सदरात हे पडेल. पण मानवी जीवनाच्या नश्वरतेची जाणीव प्रबळ होऊन अंती शान्तरसाचा परिपोष व्हावा हा हेतु अशा वर्णनाच्या मागे असेल तर संस्कृत साहित्य-शास्त्रही त्याला सबलत देण्यास तयार आहे. (मागे पृष्ठ ४२ पाहावे.) तथापि विवेचनाच्या

ओवात आलेले असे संयत वर्णन शान्तरसाच्या निर्मितीला कारण होते असे मानले तरी भरपूर विस्तार करून केलेले तपशिलवार वर्णन शान्तरसाची निर्मिती करीत नसून श्रोत्याच्या किंवा वाचकाच्या मनात घृणाच निर्माण करते असे प्राचीन संतकवींच्या वाङ्मयात पुन्हा पुन्हा दिसून येईल. शैलीचे सारे सौन्दर्य ज्याने पूर्णपणे आत्मसात् केले आहे असा ज्ञानेश्वरांसारखा अलौकिक प्रतिभेचा सत्कवि असे वर्णन सुसह्य करू शकतो हे खरे आहे. पण प्रत्येक कवी काही ज्ञानेश्वर असू शकत नाही. ज्ञानेश्वर ते ज्ञानेश्वर ! यामुळे अनेक संतकवींच्या वाङ्मयातील नरदेहनिंदा, स्त्रीनिंदा इत्यादी प्रकरणांच्या वाचनाने शान्तरसाचा प्रादुर्भाव होण्याऐवजी 'खेद' मात्र होतो अशीच सहृदयांची प्रतीती आहे. ज्ञानेश्वरीच्या तेराव्या अध्यायातील काही ओव्या या संदर्भात उद्धृत करतो.

वोढाळितां लाविलें । तें तैसेंचि कान पुंस बोलें ।
कीं पुढती ओढाळूं आलें । सुणें जैसें ॥ ७३० ॥
वेहूक सापाचिया तोंडीं । जातसे सवुडवुडीं ।
तो मक्षिकांचिया कोडी । स्मरेना कांहीं ॥ ७३१ ॥
तैसीं नवही द्वारें स्रवती । आंगीं देहाची लुती जिती ।
तेणें जाली तें चित्तीं । सलेना जया ॥ ७३२ ॥
मातेच्या उदरकुहरीं । पचूनि विष्ठेच्या दाथरीं ।
जठरीं नवमासवरी । उकडला जो ॥ ७३३ ॥
ते गर्भाची व्यथा । कां जें जालें उपजतां ।
तें कांहींचि सर्वथा । नाठवी जो ॥ ७३४ ॥
मलमूत्रपंकीं । जें लोळतें बाळ अंकीं ।
तें देखोनि जो न थुंकी । त्रासु नेघे ॥ ७३५ ॥

याच्या पुढच्या काही ओव्यांत इतक्या सुंदर उपमा आल्या आहेत की त्यांच्यामुळे वरील वर्णनातील जुगुप्सेचा भाग कितीतरी सुसह्य झाला आहे.

परंतु अन्य कवींच्या ठायी हे शैलीचे सामर्थ्य नसल्याने ही जुगुप्सेची भावना, गडकऱ्यांच्या भाषेत बोलावयाचे झालें तर, 'नागर मनाला त्रासदायक' होते. उदाहरणार्थ, एकनाथी भागवतातील पुढील ओव्या (८।४२८–४३४) पाहाव्या.

मातेच्या जठरकुहरीं । विष्ठामूत्रांच्या दाथरीं ।
अधोमुख नवमासवरी । उकडी भारी जठराग्नि ॥
विष्ठालेप चहूंचडे । नाकीं तोंडीं कृमी किडे ।
गर्भवासीचे कष्ट गाढे । कोणापुढे सांगेल ॥

कट्वम्ललवणमेळे । गर्भवतीचे पुरती डोहळे ।
त्वचेवीण गर्भांग पोळे । तेणें दुःखें लोळे अति दुःखी ॥
ते गर्भोदरींची व्यथा । नेणती माता आणि पिता ।
तेथ नाहीं कोणी सोडविता । जीवींची व्यथा जीव जाणे ॥
ज्या ठायाची करूं नये गोठी । प्रगट दाऊं नये दिठी ।
ते योनिद्वारें अतिसंकटीं । जन्म शेवटीं जीवासी ॥
जे नित्य मूत्राची नाहाणी । कीं नविया नरकांची खाणी ।
जे रजस्वलारुधिराची श्रेणी । जन्म तेथोनि पावती ॥
अपवित्र विटाळशींचें रुधिर । तें गोठोनि झालें जी शरीर ।
निंद्यद्वारें जन्मोनि नर । आम्ही पवित्र म्हणविती ॥

गर्भवासातील जीवाच्या यातनांचे वर्णन करीत असता आपल्या जुन्या मराठी कवींच्या वाणीला काही विचित्र आवेश चढतो, आणि गर्भवासाविषयी घृणा उत्पन्न व्हावी एतदर्थ परिणामकारक शब्दयोजना करण्याची विलक्षण ईर्ष्या त्यांच्या ठायी निर्माण होते. या ईर्ष्येच्या पोटीच गर्भवासातल्या यातनांचा व जीवाच्या अवस्थेचा सारा सूक्ष्म तपशील ते देत बसतात. रामदासी संप्रदायातील दिनकर गोसावी यांनी सन १६९४ मध्ये पूर्ण केलेल्या 'स्वानुभवदिनकर' या ग्रंथातील एक उतारा देतो.

जालया मातृपितरांचा संभोग । जठरीं रेतरक्ताचा होय संयोग ।
दिवसमासें गर्भांग । वृद्धि पावे शनैः शनैः ॥
दिवसेंदिवस गर्भ वाढे । फुटती हातपायांचे आगरडे ।
आपादमस्तकपर्यंत निवाडे । गर्भांग निफजे ॥
तवं मातेसी डोहळयांचा आकांत । तेणें कटवाम्लतिक्षणें आंग पोळत ।
भोंवतीं आंतडीं लवथवित । विष्टामूत्रीं पचतसे ॥
गर्भासि बांधलें सेवरेंत । नाकीं तोंडीं रिघती जंत ।
तेणें कासावीस बहुत होत । घाबिरेंपणें निर्बुजे ॥ (२।३।३–६)

याच दिनकर गोसाव्याने नरदेहाची निंदा करीत असता 'देह यमाची जाचणी । देह निरयांची खाणी । नाना मळमूत्रपोहाणी । तें हें देह ।' असा उद्गार काढला आहे. (३।४।३६).

एकनाथदेखील प्रसंग सापडताच गर्भवासाची निंदा करण्याचे सुख भरपूर लुटतात.

मातेच्या उदरकुहरीं । रजस्वलेच्या रुधिरामाझारीं ।
पित्याचेनि रेतद्वारीं । गर्भसंचारीं संचरण ॥

ते मातेच्या उदरीं । जंतु नाकीं तोंडीं उरीं शिरीं ।
विष्ठामूत्राचे दाथरीं । नवमासवरी उकडिजेति ।।
जठराग्नीच्या तोंडीं । घालूनि गर्भाची उंडी ।
उकडउकडूनि पिंडीं । गर्भे कांडीं घडिजेती ।

(एकनाथी भागवत, ७।१४६–१४८)

एकनाथांचे एवढ्याने समाधान झाले नाही. गर्भवासाची निंदा करण्यासाठी अनुकूल संधी मिळावी म्हणून भावार्थरामायणात बालकाण्डामध्ये त्यांनी एक प्रसंग मुद्दाम निर्माण केला आहे. यज्ञाचे रक्षण करण्यासाठी रामलक्ष्मणांची याचना करण्यासाठी विश्वामित्र दशरथाकडे आला आहे. विश्वामित्राचे हे मागणे दशरथ प्रथम मान्य करीत नाही. पण विश्वामित्राचा क्रोध पाहून आणि वसिष्ठाच्या सूचनेवरून दशरथाने ते मान्य केले. रामाला घेऊन विश्वामित्र आपल्या आश्रमाकडे जावयास निघाला असता एकनाथांचा (मूळ रामायणातील नव्हे !) राम विश्वामित्रास नरदेहाच्या दोषपूर्णतेविषयी सुमारे नव्वद ओव्यांचे भले लांबलचक व्याख्यान देत आहे. वाल्मीकीच्या रामायणात याला कसलाही आधार नाही. विश्वामित्राच्या यज्ञाचे रक्षण करण्यासाठी निघालेला तेजस्वी कुमार खुद्द विश्वामित्राला हे व्याख्यान देत आहे हे लक्षात घेतले असता औचित्यहानीचे यापेक्षा भयानक उदाहरण अन्यत्र शोधण्याचे परिश्रम घेण्याचे मुळीच कारण उरणार नाही. रामाने विवाहापूर्वीच कुमारवयात केलेल्या देहनिंदापुराणातून थोडे गाळीव शेलके नमुने येथे देतो.

देह नित्य मूत्राची न्हाणी । देह तंव नरकाची खाणी ।
देह तंव पोहणघाणी । रोगांची श्रेणी तो देह ॥ ९।१०
रजस्वलेचा लागतां पालव । सचैल स्नानाचा उद्भव ।
त्या अशुद्धाचा ओतीव देह । अपवित्र पहाहो समूळीं ॥ ९।२२
विटाळें देहाची संभूती । विटाळें देहाची उत्पत्ती ।
विटाळें देहाची शांती । देहभस्मांतीं सूतक राहे ॥ ९।२४
जननीजठरीं अग्निमाझारीं । विष्ठेच्या दाथरावरी ।
मूत्राच्या आधणाभीतरीं । नवमासवरी उकाडिजे ॥ ९।२८
विष्ठालेप चहूंकडे । नाकीं तोंडीं जंतूकिडे ।
तें दुःख भोगतां जीव रडे । अति चरफडे तळमळी ॥ ९।३०
ज्या ठायाचें घेऊं नये नांव । जो दाखवूं नये स्वयमेव ।
त्या योनिद्वारें संभव । कोण गौरव जन्माचा ॥ ९।४५
लाळ थुंका विष्ठा मूत्र । त्यांमाजी सदा असे पचत ।
तोचि श्लेष्म भक्षित । बाळपणीं येथे सुख कोण ॥ ९।४६

भावार्थरामायणात युद्धकाण्डाच्या चोविसाव्या अध्यायात गर्भवासाचे असेच विलक्षण वर्णन एकनाथांनी सनत्कुमाराच्या तोंडून केले आहे. रावणाने प्रश्न केल्यावर सनत्कुमार उत्तर करतात--

केवळ रजस्वलेचें रुधिर । माजी पित्याचें रेत मात्र ।
तें हें विटाळाचें शरीर । अपवित्र निंद्यत्वें ॥ २४।३४
मातेचिया उदरकुहरीं । विष्ठामूत्रांचे दाथरावरी ।
जठराग्नीमाझारी । नवमासवरी उकाडा ॥ २४।३५
गर्भवासाचे दुःख गाढें । विष्ठालेप चहूंकडे ।
नाकीं तोंडीं रिघती किडे । कोणापुढे सांगेल ॥ २४।३६ ॥

कृष्णदयार्णवांचा 'हरिवरदा' हा विख्यात ग्रंथ पाहिला तर त्यातही गर्भवासाचे असलेच घृणास्पद वर्णन आणि नरदेहाची अशाच शब्दांत केलेली निंदा या गोष्टी आढळून येतील. 'प्रत्यक्ष देहाची उत्पत्ती' सांगताना कृष्णदयार्णव म्हणतात—

पिता भक्षी अन्नरस । विष्ठा तयाचा बाकस ।
मध्य होय रक्तमांस । रेत सारांश तयाचें ॥ १४।५९९ ॥
मातृदेहीं तारुण्यभर । तेणें प्रकटे रजोरुधिर ।
ते रजश्चलेचा लागता पदर । वल्ली तरुवर करपती ॥ १४।६०० ॥
ऐसें सदोष रज प्रसिद्ध । नामें म्हणती ज्या अशुद्ध ।
तेथ पिता कामें क्षुब्ध । रतिसंबंध संपादी ॥ १४।६०२ ॥
शिश्नद्वारें रेत खवळे । ते त्या अशुद्धामाजी मिळे ।
देह अमेध्य जठर खोळे । निपजे मळें दोहींच्या ॥ १४।६०३ ॥
भिंती चिखलेंचि लिंपिजे । वस्त्रें सुतें शिविजे तुणिजे ।
तेवीं मळाचे मळीं देह निपजे । भुंजे रंजे मळयोगें ॥ १४।६० : ॥
अन्नपानाचें मलमूत्र । तेणें डबडबी जननीजठर ।
तेथ पचोनि परिणमे गात्र । उपजे अपवित्र भगमार्गें ॥ १४।६०९ ॥

भागवताच्या दशमस्कंधाच्या चौदाव्या अध्यायातील २८ व्या श्लोकावरील विवरणातून वरील ओव्या उतरून घेतल्या आहेत. मूळ श्लोक येथे मुद्दाम देतो.

अन्तर्भवेऽनन्त भवन्तमेव ह्यतर्त्यजन्तो मृगयन्ति सन्तः ।
असन्तमप्यंत्यहिमन्तरेण सन्तं गुणं तं किमु यन्ति सन्तः ॥

या श्लोकातील अन्तर्गत आशयाचे विवरण दहाबारा ओव्यांत पूर्ण झाल्यानंतर मग मुद्दाम विषयान्तर करून कृष्णदयार्णवांनी गर्भवासाची आणि नरदेहाची निन्दा करण्यासाठी

पंधरा ओव्यांचा पसारा मांडला आहे. एकनाथांनी देखील अनेक ठिकाणी असे केले आहे. मूळ श्लोकातील एखाद्या शब्दाचा आधार घेऊन गर्भवासातील यातनांचे आणि नरदेहाच्या अमंगळपणाचे विस्तृत वर्णन करण्याची हौस त्यांनीही भागवून घेतली आहे.

दासोपंतांच्या गीतार्णवात गीता २।४२ या श्लोकाचे विवरण चालू असता देहनिंदेचा प्रसंग एका पुराणिकाच्या पुराणाच्या निमित्ताने आला आहे.

मळमूत्र आपुले शरीरीं । पोट्यांचे घे तयावरि ।
पडलेति नरकसागरीं । दुरात्मेहो ! ॥ २।३५६०
मळमूत्रांचें भांडार । येथें वातपित्तकफ पाझर ।
अस्थि, रक्त, मांस समग्र । येकवाटले असे ॥ २।३५६१

दासोपंतांच्या काही पदांतही देहनिंदेची हीच धाटणी आढळते. पुढील ओळ पद ६०९ मधील आहे.

मळमूत्रांचा देह पेटारा. क्रीम कीटक खाती घरघरा.

पद ६१० मध्ये हाच प्रकार आहे.

मळमूत्र आयुलां शरीरीं. स्त्रीसंगु तयाचि परी.

क्रमांक ७६७ व ७६८ या दोन पदांत यापेक्षाही उत्कट देहनिंदा आढळेल.

अस्थिमांसत्वचानाडीरोमादीक शरीरीं धातु सप्तक.
विटाळाची मूस, मळपंकमांदुस; अंतरीं क्रीम कीटक.....
विचारितां देह परमकुश्चिळु; ज्ञेय, मळमूत्रआमय जेथें असती.

गर्भवासाची आणि एकंदरीत नरदेहाची निंदा करिताना भाषेतील किळस उत्पन्न करणारे सारे शब्द गोळा करून आणून अनेक जुन्या कवींनी बीभत्सरसाची परमावधी केली आहे. नरजन्माविषयीच किळस उत्पन्न व्हावी यासाठी या साऱ्या जुगुप्सादायक शब्दसंभाराची आवश्यकता आहे असे कोणी म्हटल्यास त्याला 'म्हणोनि खुंटलें लेखन । लेखनी सर्वथा न चाले जाण । वर्णाक्षर उच्चारण । निश्चयें पूर्ण नाठवे ॥' या एकनाथांच्या शब्दांतच उत्तर देण्यापलीकडे आपल्यासारख्या पामरांना दुसरे काय करता येणे शक्य आहे ?

गर्भवासाची आणि नरदेहाची निंदा करीत असता जुगुप्साशीलाचे कर्तृत्व या कवींनी जसे मनसोक्त दाखविले आहे तसेच कर्तृत्व स्त्रीनिंदा म्हणजेच स्त्रीदेहाची निंदा करतानाही दाखविले आहे. असंख्य उदाहरणांमधून काही वेचक उदाहरणे देऊन या कवींची मनोवृत्ती कशी आहे ते स्पष्ट करण्याचा प्रयत्न करतो.

एकनाथांच्या भावार्थरामायणातील स्त्रीदेहाचे पुढील वर्णन पाहा.

स्त्री अस्थिमांस कोथळा । स्त्री केवळ विष्ठेचा गोळा ।
स्त्री वसतिस्थान विटाळा । नरकसोहळा विषयसंगे ॥ (बालकांड, ९।५९)

एकनाथी भागवतातून काही निवडक नमुने देतो.

दृष्टी देखतां कामिनी । कामासक्ता ते अतिरमणी ।
विवेकियां पोहणघाणी । नरकमाथणी ते कांता ॥ २६।२००
जेवीं सूकरा विष्ठेची प्रीती । तेवीं सकामा कामिनीची रती ।
विवेकी देखोनी थुंकिती ।.....॥२६।२०१
जे नीच नवी विटाळाची खाणी । जे रजस्वलेची प्रवाहन्हाणी ।
जे का दुर्गंधाची पोहणी । जे उतली चिडाणी विष्ठेची ॥ २६।२०३
मृगजळीं कमळ मनोहर । तैसें अंगनावदन सुंदर ।
सुस्मित, चारु, सुकुमार । सकाम नर वानिती ॥ २६।२०९
अंगनावदनाची निजस्थिती । निखळ शेंबुडाची वस्ती ।
तें मुख चंद्रेसि उपमिती । जेवीं अमृत म्हणती विखातें ॥ २६।२१०
वनिता अधरीं झरे लाळ । ते म्हणती अधरामृत केवळ ।
बाप अविद्येचें बळ । भुलले सकळ सुरासुर ॥ २६।२११
देहो तितुका अशुचिकर । त्यांत स्त्रीदेह अति अपवित्र ।
केवळ विटाळाचे पात्र । निरंतर द्रवरूपें ॥ २६।२२५
स्त्रीदेहाचे विवंचनें । विवंचितां वोकारा ये मनें ।
जळो स्त्रियेचें निंद्य जिणें । मूर्खी रमणें ते ठायीं ॥ २६।२२९
स्त्रीदेहाचा उभारा । केवळ अस्थींचा पांजरा ।
त्याचें आवरण तें स्नायुशिरा । बांधोनि खरा दृढ केला ॥ २६।२३०
तेथ रुधिरमांसाचें कालवण । करूनि पांजरा लिंपिला पूर्ण ।
अस्थीवरील जें वेष्ठण । मज्जा जाण ती नांव ॥ २६।२३१
त्या देहामाजीं सांठवण । विष्ठामूत्र परिपूर्ण ।
ते स्त्रीदेहीं ज्यांचें रमण । ते कृमि जाण नररूपें ॥ २६ । २३३
विष्ठेमाजी कृमीची रती । तैशी स्त्रीदेही ज्यांची आसक्ती ।
तेही कृमिप्राय निश्चितीं । संदेह ये अर्थी असेना ॥ २६ । २३४

स्त्रीदेहाची निंदा एकदाच करून या कवींचे कधीच समाधान होत नाही. पुन्हा पुन्हा या विषयाची त्यांना आठवण होते, आणि प्रत्येक वेळेला निंदेचा काही वेगळा नमुना

त्यांच्या चित्तात स्फुरतो. स्त्रीदेहाची जास्तीत जास्त किळस यावी हाच त्यांचा स्पष्ट हेतू यामागे आहे.

अस्थि मांस विष्ठा मूत । तेणें कामिनी पूर्ण भरित ।
ते कुश्चळीं जन कामासक्त । जाणोनि होत का देवा ॥
(एकनाथी भागवत, १३ । २२४)

अस्थिमांसांचा घडिला । विष्ठामूत्रांचा कोथळा ।
स्त्री विचारितां कांटाळा । नरकजिव्हाळा तो भोगू ॥
(ए० भा० १३ । २५०)

स्त्रीदेहाची इरसाल निंदा मुक्तेश्वराच्या 'शुकरंभासंवाद' या आख्यानात आढळेल. शुकाचे मन मोहून घेण्यासाठी रंभा आली असता तिजप्रत शुक म्हणतो—

बरळे ! ऐक निर्धारे । देह खोंचिजे जेंवि शस्त्रास्त्रें ।
तेथें वर्षाव कीजे रुधिरें । घाव पडे बीभत्स ॥ २५५ ॥
तो प्रतिदिनीं प्रक्षाळिजे । नूतन औषधीपिंड दीजे ।
तन्हीच निके, येरवीं माजे । पूय, दुर्गंधी, कृमिजाळ ॥ २५६
त्या घायाचे सुरंग वदन । चुंबावया कांक्षीत मन ।
त्याहून कश्मल तें आन । सांग कोणतें संसारीं ॥ २५७
तेंवि हीं मुखादि रंध्रें । स्रवती लाळरक्तमूत्रें ।
ते क्षाळूनि दुर्गंधि हरे । तांबूलगंधादि लेपितां ॥ २५८
विचारितां स्त्रियेचा देहो । नरकपंक मूत्रडोहो ।
फुटेल म्हणोनि बळें पाहा हो । चर्मत्वचेनें बांधला ॥ २५९

एवढ्याने स्त्रीच्या देहाची निंदा जणू पुरी झाली नाही असे वाटून मुक्तेश्वराने शुकाच्या तोंडी पुढील मुक्ताफळे घातली आहेत.

स्त्रीदेह चर्माची कोथळी । भरली नरकपूयकृमिजाळीं ।
अधोद्वारीं सदाकाळीं । अधोवातें उघडिलें ॥ ३५९
जैसी पायखोल घाणीची मोरी । भरणाश्रय अभेद्यनीरीं ।
तैसा द्रव योनिद्वारीं । म्हणोनि सदा अशौच ॥ ३६०
चर्मपात्र द्विधा भिन्न । अपानोद्गारें जडलें जाण ।
त्यालागीं वेंचिती धन । ते मूढ जन संसारीं ॥ ३६१
विष्ठामूत्रांचें भाजन । जाणोनि रमेना ज्याचें मन ।
ते पंडित विचक्षण । मोक्षसदनीं ठाकती ॥ ३६२

मुक्तेश्वराने निर्मिलेल्या शुकाचार्यांनी केलेल्या या इरसाल स्त्रीनिंदेचे मूळ पुढील संस्कृत पद्यांमध्ये आढळेल.

उत्तानोच्छूनमण्डूकपाटितोदरसंनिभे ।
क्लेदिनि स्त्रीव्रणे सक्तिरकृमेः कस्य जायते ?
त्वङ्मांसरुधिरस्नायुमेदोमज्जास्थिसंहतौ ।
विण्मूत्रपूये रमतां कृमीणां कियदन्तरम् ?
चर्मखण्डं द्विधा भिन्नमपानोद्गारधूपितम् ।
ये रमन्ति नरास्तत्र कृमितुल्याः कथं न ते ?

वरील तीन श्लोकांपैकी पहिला श्लोक 'काव्यप्रकाशा'च्या सातव्या उल्लासात (७।३०४) आला असून तिसरा श्लोक भर्तृहरीच्या वैराग्यशतकातील (क्रमांक १७) आहे. दुसऱ्या श्लोकाचा कर्ता शोधूनही सापडला नाही.

स्वर्गांगनांचे रूप मनोहर दिसले, आणि त्यांनी केलेल्या साजशिणगारामुळे त्या रूपाची मोहकता वाढली, तरी ही सारी वरवरची शोभा आहे; स्त्रीदेह अत्यंत अमंगळ असतो हे तत्त्व रंभेला पटवून देत असता मुक्तेश्वराचे शुकाचार्य काय म्हणतात पाहाः—

मुक्ताहार मिरवे गळां । दिव्याभरणें शोभती ॥ ४१०
ऐसें वरी वरी देखतां डोळां । अधोद्वारीं सुटती लाळा ।
तृष्णासर्पिणी गुह्यबिळा । तोंड घाली लवलाहे ॥ ४११
परि विचारें सारोनि चीर । अंतर न पाहतीच पामर ।
घायमुखासम छिद्र । रक्त स्रवे सर्वदा ॥ ४१२
दुर्गंधीचें जन्मस्थान.....॥ ४१३

मुक्तेश्वराचा शुक स्त्रीनिंदेत इतका प्रवीण असला तर वामनपंडिताचा शुक देखील काही कमी नाही. रंभेच्या तोंडावर तो म्हणतो—

विष्ठा मूत्र विशेष जाण हृदयीं श्लेष्मा मुखीं फारसा
ऐकें कश्मल कामिनी म्हणतसे साक्षात तूं आरसा ।

*

औचित्यहानीमुळे उत्पन्न होणाऱ्या ग्राम्यतेची उदाहरणे आपल्या जुन्या मराठी कवींच्या वाङ्मयात अक्षरशः असंख्य आहेत. कोणी, कोणास, कोणत्या प्रसंगी, आणि कोणत्या स्थळी काय बोलावे, कोणते शब्द वापरावेत, या बाबतीत कसलाही धरबंद नाही. शिष्ट आणि

सुसंस्कृत माणसे जे शब्द उघडपणे कधीही वापरणार नाहीत ते स्त्रियांच्या आणि प्रतिष्ठित पुरुषांच्या तोंडी घालताना या कवींना थोडासुद्धा संकोच वाटत नाही. शुकासारख्या आत्यंतिक नैष्ठिक विरागी पुरुषाने सकल स्त्रीजातीचाच मनात राग धरावा हे त्याच्या ध्येयासक्तीच्या दृष्टीने बरोबर आहे. पण रंभेसारख्या अलौकिक लावण्यवती स्त्रीची किळस उत्पन्न करणारी गलिच्छ निंदा शरीरान्तर्गत मळाच्या आणि इतर जुगुप्सित गोष्टींच्या तपशीलवार उल्लेखांची नोंद करून प्रत्यक्ष तिच्या तोंडावर करणे, आणि ते सुद्धा व्यंजनेने किंवा पर्यायोक्ताने नव्हे, तर अगदी वाच्यार्थाने ग्राम्य शब्दांची पखरण करून—हा साराच प्रकार ओंगळ आहे हे स्पष्टपणे सांगणे भाग आहे. बीस बीस ओव्या असले ओंगळ वर्णन करताना या कवींना कसलीही खंत वाटत नाही, इतकी त्यांची वृत्ती सरळ आहे! 'जुगुप्सितगोपनेच्छा' अशी लज्जेची व्याख्या प्राचीन शास्त्रकारांनी केली आहे. पण काही जुन्या मराठी कवींच्या कोशात 'लज्जा' हा शब्दच नसावा असे वाटते. 'कटिस्ते हरते मनः,' आणि 'कन्ये, कामयमानं मां न त्वं कामयसे कथम्?' या उद्गारांत ग्राम्यता आहे म्हणून ते त्याज्य मानणाऱ्या आमच्या प्राचीन संस्कृत साहित्यशास्त्रकारांच्या पुढे मराठी कवींच्या वाङ्मयातील ग्राम्यता आणि औचित्यहानी यांचे काही इरसाल नमुने ठेवण्याचे धाडस करतो.

मुक्तेश्वराच्या 'शुकरंभासंवाद' या प्रकरणातील रंभा शुकासमोर स्त्रीसौंदर्याच्या विलक्षण मोहनीचे वर्णन करीत आहे असा संदर्भ आहे. आता तिच्या हावभावांचे हे वर्णन पाहा—

कटिमंडित रत्नमेखळा । तें तेज दावी नाभीतळा ।
तया अंतरीं गुह्यस्थळा । दैवा आगळा तो देखे ॥ ३०२

पण हे काहीच नाही. स्त्रीसौंदर्याची उपेक्षा करणाऱ्या अरसिक विरक्त पुरुषांची निंदा रंभेने पुढीलप्रमाणे केली आहे. आणि हे सारे शुकासमोर चालले आहे.

अधरें न चुंबिती अधरा । करें न शिवती पयोधरा ।
गुप्त नलिनीमदनमंदिरा । रेतपात्रा न लाविती ॥ ३०३
स्त्रीमुख न चुंबिती जे वोष्ठ । ते भग्न भाजनाचे कांठ ।
कुच न मर्दिती ते कर थोटे । मोडियेले येरवीच ॥ ३०४
लेपाहाती दिधलें शस्त्र । काय पुरुषार्थ करील थोर ।
तैसें त्यांचें कामागार । निर्व्यापार लडबडी ॥ ३०५

एखादी घाणेरडी कसबीण देखील जे शब्द उच्चारण्यास लाजेल ते शब्द रंभा नामक देवांगना शुकासमोर अगदी सहज उच्चारते. केवढा हा मनमोकळेपणा! 'गुप्त नलिनी-

मदनमंदिरा । रेतपाटा न लाविती । ', आणि ' तैसें त्यांचें कामागार । निर्व्यापार लडबडी ।। वाहवा ! किती वास्तववादी सूक्ष्म वर्णन आहे हे ! धन्य त्या रंभेची, धन्य त्या विरक्त योगीन्द्र शुकाची, आणि धन्य त्या मुक्तेश्वराची !

निर्लज्ज कामी पुरुषाच्या स्त्रीविषयक आसक्तीचे मुक्तेश्वराने केलेले एक वर्णन त्याच्या भारताच्या आदिपर्वातून उतरून घेतो.

कुचपयःपात्र देखतां नयनें । पुरुषमार्जार मियों म्हणे ।
हृदयीं हाणितल्या चरणें । बळें संघटे पदसंधीं ।। ९।५१
वर्मीं ताडितां कठिणवचनीं । लिंगसुख दाटी भगभाजनीं ।
वोठ चाटित रोमस्थानीं । पुच्छ उभारी पुढारें ।। ९।५२
की विषयविष्ठेलागीं टोंकती । मूत्रमोरिये नित्य रमती ।
नग्नस्त्रियांभोंवते भोंवती । ते शूकरव्यक्ति नरदेहीं ।। ९।५३
कीं रेतपतनार्थ मजुरिया । उभयस्कंदीं द्वयदांडिया ।
वाहक होऊनि नरकालया । जीव नेती सकामें ।। ९।५४
हस्तदंड टेंकूनि स्तनीं । श्रमल्या विसावा मानिती मनीं ।
तृषानिवृत्ति मृगजळपानीं । तेंवि चुंबनीं परितोष ।। ९।५५

संभोगसुखाला लालचावलेला पशुवृत्तीचा चहाटळ पुरुष एखाद्या वेळी लैंगिक व्यवहाराचा उल्लेख स्त्रीसमोर स्पष्ट शब्दांत करील असे क्षणभर मानले तरी जरत्कारूसारख्या वृद्ध तापसाला मुक्तेश्वराने आपल्या पत्नीच्या समोर या रीतीने बोलावयास लावले हे सर्वथा आक्षेपार्ह आहे. बरे, मूळ महाभारतातच अशा प्रकारचा मजकूर आला असल्यामुळे मुक्तेश्वराचा नाइलाज झाला असेही म्हणता येणार नाही. महाभारतातील मूळ प्रसंगच येथे देतो.

एवमुक्तः स भगवान् जरत्कारुर्महातपाः ।। आदिपर्व, ४७।२३
भार्यां प्रस्फुरमाणौष्ठ इदं वचनमब्रवीत् ।
अवमानः प्रयुक्तोऽयं त्वया मम भुजंगमे ।। ४७।२४
समीपे ते न वत्स्यामि गमिष्यामि यथागतम् ।
शक्तिरस्ति न वामोरु मयि सुप्ते विभावसोः ।। ४७।२५
अस्तं गन्तुं यथाकालमिति मे हृदि वर्तते ।
म चाप्यवमतस्येह वासो रोचेत कस्यचित् ।। ४७।२६
किं पुनर्धर्मशीलस्य मम वा मद्विधस्य वा । ४७।२७

मुक्तेश्वराच्या जरत्कारूने जे तारे तोडले आहेत त्यांची पुसट देखील छटा मूळ महाभारतात आहे काय? 'माझी अवहेलना झालेली असल्यामुळे मी येथे राहू इच्छीत नाही' एवढेच महाभारतातील जरत्कारू बोलतो आणि निघून जातो; आणि मुक्तेश्वराचा जरत्कारू नऊ ओव्या खर्च करून, स्त्रियांपुढे गोंडा घोळणाऱ्या विषयलंपट निलाजऱ्या पुरुषाच्या ग्राम्य व्यवहाराचे तपशीलवार वर्णन करीत बसतो, हा चमत्कार कशाचा द्योतक आहे? वास्तविक पाहता मूळ महाभारतात आक्षेपार्ह ग्राम्य वचन आले असते तरी मुक्तेश्वराने तिकडे दुर्लक्ष करावयास पाहिजे होते. पण येथे तर अगदी विपरीत प्रकार झाला आहे. अनौचित्य आणि ग्राम्यता हे दुर्गुण काही जुन्या मराठी कवींच्या रक्तातच भिनले आहेत असाच खरा प्रकार आहे.

हाच प्रसंग श्रीधराने कसा संयमाने वर्णिला आहे ते पाहण्यासारखे आहे. श्रीधराचा जरत्कारु म्हणतो—

मी वृद्ध देखतां नयनीं । हेलना करिसी तूं सर्पिणी ।
आतां नांदे बंधुसदनीं । नष्टकर्मे यथार्थ ॥
(पांडवप्रताप, २।२६७)

आणि मोरोपंतांचा जरत्कारु देखील अशाच संयमाने बोलतो.

जातों न साहवे मज ऐसा अवमान पळहि हा कांहीं ।
गृहसुख पुरें कळविलें शूळचि उठले शिरांत हाकांहीं ॥
अस्तासि चालला रवि संध्याविधि अंतरेल या भावें ।
म्हणसी जागविलें तरि माझें सामर्थ्य तुज नसे ठावें ॥
(आदि. ५।१०२–१०३)

मुक्तेश्वराने जरत्कारूच्या तोंडी जे उद्‌गार घातले आहेत ते अस्थानी आणि अनुचित आहेत हे कळावे यासाठी दोन प्राकृत कवींची अवतरणे मुद्दाम दिली आहेत.

महाभारत, आदिपर्व, ६३ व्या अध्यायात सत्यवती व पराशर यांचे आख्यान आले आहे. सत्यवतीच्या रूपावर लुब्ध झालेला महाभारतातील पराशर

संगमं मम कल्याणि कुरुष्व.....

एवढेच म्हणतो. आता मुक्तेश्वराचा पराशर काय म्हणतो ते पाहा.

म्हणे अभुक्त अबले देणें । भोगभिक्षा येकाळीं ॥ १३।१०३

आजिचा पुण्यकाळ उदित । याचक महापात्र मी येथ ।
यमुनाद्वीपक्षेत्रांत । देहदान त्वां कीजे ॥ १३ ।१०४
वन्हीनें दग्धलें निववावें । सर्पें दंशिलें जीववावें ।
क्षुधेनें पीडिलें तोषवावें । इच्छापानें भोजनें ॥ १३ ।१०५
तयाचि ऐसें हेंही जाण । आतीं द्यावें अवश्य दान ।
येणें कोटी महायज्ञ । केले होती निश्चयें ॥ १३ ।१०६

पण ही झाली केवळ प्रस्तावना. एवढा लाळघोटेपणा पुरेसा झाला नाही अशी खात्री झाल्यामुळे मुक्तेश्वराचा पराशर सत्यवतीस म्हणतो—

स्मरें विस्मरणाचे डोहीं । मातें बुडविलें इये समईं ।
अंकारूढ करूनि नेई । रेतपातांत परपारा ॥

श्रीधराचा पराशर सत्यवतीला म्हणतो—

म्हणे पद्मनेत्रे सुंदरी । मजशीं सुरतानंदें क्रीडा करी ।
(पांडवप्रताप, ३।१३७)

श्रीधराच्या या उक्तीतील 'सुरतानंद' हा शब्द आक्षेपार्ह वाटला तरी त्याचा पराशर या कल्पनेचा थोडा देखील विस्तार करीत नाही हे ध्यानात ठेवण्यासारखे आहे.

मोरोपंतांचा पराशर म्हणतो—

दिव्यज्ञान मुनि म्हणे सुंदरि मज अंगसंग दे, हरितें ।
त्वद्रूप मन्मनातें, कामज्वर नुरवि तिळहि देह रितें ॥
(आदि० ८।३१)

मुक्तेश्वराच्या पराशराच्या स्पष्टोक्तीच्या मानाने हे कितीतरी सौम्य आहे.
व्यासांच्या महाभारतात कण्वाच्या आश्रमात गेलेला दुष्यन्त शकुन्तलेला विचारतो—

ऊर्ध्वरेता महाभागो भगवाँल्लोकपूजितः ।
चलेद्धि वृत्ताद्धर्मोऽपि न चलेत्संशितव्रतः ॥ आदि० ७१।१६
कथं त्वं तस्य दुहिता संभूता वरवर्णिनी ।
संशयो मे महानत्र तन्मे छेत्तुमिहार्हसि ॥ ७१।१७

यावर महाभारतातील शकुन्तला कण्वाकडून ऐकलेली विश्वामित्र-मेनकेची कथा दुष्यन्ताला सांगते. इंद्र मेनकेला म्हणतो—

मेनके तव भारोऽयं विश्वामित्रः सुमध्यमे ।
शंसितात्मा सुदुर्धर्ष उग्रे तपसि वर्तते ॥ आदि० ७१।२४
स मां न च्यावयेत्स्थानात्तं वै गत्वा प्रलोभय ।
चर तस्य तपोविघ्नं कुरु मेऽविघ्नमुत्तमम् ॥ ७१।२५
रूपयौवनमाधुर्यचेष्टितस्मितभाषणैः ।
लोभयित्वा वरारोहे तपसस्तं निवारय ॥ ७१।२६

अतिप्राचीन कालातील माणसे मनातील विचार अगदी स्पष्टपणे, कसलाही संकोच न करता, बोलून दाखवीत असत हे खरे आहे. पण इंद्राच्या या वचनात कोणताही शब्द ग्राम्य नाही, आक्षेपार्ह नाही. मेनकेशी बोलताना व्यासांच्या इंद्राने शिष्टाचाराचा जरा देखील भंग केला नाही. पण मुक्तेश्वराचा इंद्र मेनकेला कोणत्या शब्दांत आदेश देतो पाहा—

अधरपान अंबवणें । गाढालिंगन मेळवणें ।
आसक्तिवाहला गोऊनि मनें । वश्य कीजे द्विजधेनु ॥
तळीं भगपात्र वोडवून । नेमें त्राहाटी लिंगस्तन ।
वीर्यदोहनें करूनि क्षीण । तपश्चर्या नागवीं ॥
पयोधरपेंडिचिया आशा । विश्वामित्र करूनि म्हैसा ।
पाठीं धांवे रेके ऐसा । विनोद दावीं आमुतें ॥
(आदि० १५।११८–१२०)

मेनका ही देवांची वेश्या असली म्हणून काय झाले? ती वेश्या असली तरी देवांची वेश्या होती. झोपडपट्टीतली कंजारीण नव्हती. झोपडपट्टीतला इरसाल गावगुंडदेखील 'तळीं भगपात्र वोडवून । नेमें त्राहाटी लिंगस्तन । वीर्यदोहनें करूनि क्षीण ।...' यासारखे शब्द आपल्याच जातीच्या बाईलाही उद्देशून बोलणार नाही. पण मुक्तेश्वराचा इंद्र मात्र अगदी सहज हे शब्द मेनकेसमोर उच्चारतो. आणि गंमत ही की, कण्वासारखा नैष्ठिक ब्रह्मचारी तपस्वी शकुन्तलेला हा सारा प्रकार सांगतो, आणि कण्वाकडून ऐकलेला वृत्तान्त शकुन्तला जसाच्या तसा दुष्यन्ताला सांगत आहे. शकुन्तलेसारख्या कोवळ्या वयाच्या अल्लड मुलीला विश्वामित्र-मेनकेचा प्रसंग सांगताना महाभारतातील कण्व एकही अनुचित शब्द उच्चारीत नाही, अतिशय संयमाने बोलतो. आपण कोणाला हा वृत्तान्त सांगत आहोत याची त्याला सतत जाणीव आहे. मुलीसमोर बोलताना सभ्य व सुसंस्कृत पिता जो संयम पाळील तोच संयम व्यासांच्या कण्वाने पाळलेला आहे.

मुक्तेश्वराने वर्णिलेली घटना वर्णीत असता मोरोपंतांनी कितीतरी संयम दाखविला आहे. मोरोपंतांचा इंद्र मेनकेला म्हणतो—

भ्रूधनु वोढुनि कज्जलविषदिग्ध कटाक्ष-शर वरारोहे ।
सोडुनि लुटी तपोधन सौभाग्यश्री तुझी भरारो हे ॥ आदि० १२।२०

मोरोपंतांनी इंद्राच्या तोंडी जो उद्गार घातला आहे त्याने मेनकेकडून जे कार्य अभिप्रेत आहे त्याची स्पष्ट कल्पना कोणाही रसिकाला सहज येईल. मग मुक्तेश्वराचा इंद्र मेनकेसमोर इतक्या बेतालपणे कशासाठी बोलतो ?

आणि श्रीधरानेही याच प्रकारचा संयम पाळून अतिरेक कुशलतेने टाळला आहे.

पुरंदर चित्तीं चिंताक्रांत । मग प्रेरित मेनिकेतें ।।
म्हणे जाऊन तूं सुंदरी । कौशिकतपासी क्षय करी ।
मी पुढीन सामग्री । जें जें इच्छिसी मानसीं ।।
(पांडवप्रताप, ३।१८९–१९०)

मुक्तेश्वराची शकुंतला कण्वाकडून कळलेला विश्वमित्र-मेनकावृत्तान्त कोणत्या शब्दांत दुष्यन्ताला सांगते त्याचा थोडासा नमुना दाखवितो. वाऱ्याने मेनकेच्या अंगावरील वस्त्र उडाले आणि ती लाजली, एवढेच वर्णन महाभारतात आहे. पण मुक्तेश्वराची शकुन्तला मोकळ्या मनाची असल्यामुळे तिने कण्वाकडून ऐकलेला वृत्तांत पुढीलप्रमाणे खुलवून दुष्यंताला सांगितला आहे.

रातोत्पळें इंदीवर । आच्छादिजे तेविं सुकुमार ।
वामकरे कामागार । कवळूनि धांवे नशांगी ॥ आदि० १५।१३६
यागतपाच्या पुण्यकोटी- । मोलें घ्यात्रया लागले पाठीं ।
अमोल्य नेदी स्वप्नासाठीं । म्हणोनि मुष्टीं स्ववस्तु– ॥ १५।१३७
धरूनि धांवे चंचलापांगीं ।..... ॥ १५।१३८

पण याच्यावरही कडी करणारे पुढील वर्णन पाहा—

सुवर्ण गोकर्ण शुभ सुतेज । वरी सांडिलें शाक्निीबीज ।
तैसें रोमांकुरीत सहज । दाऊनि लोपी लगबगा ॥ १५।१४०

मुक्तेश्वराच्या कण्वाकडून ऐकलेला हा वृत्तांत त्याची शकुन्तला दुष्यंताला सांगत आहे हे ध्यानात ठेवावे. मूळ महाभारतात या वर्णनाला कशलाही आधार नाही.

मुक्तेश्वराने केलेले वर्णन संयमाने करता येणे कसे शक्य आहे हे दाखविण्यासाठी श्रीधराने या संदर्भात केलेले वर्णन उतरून घेतो.

तों मलयाचलींचा सुगंध वात । वस्त्र तिचें उडवून नेत ।
येरी नग्नचि चमकत । धांवे वस्त्र धरावया ॥
वामहस्त कामसदनीं । झांकून धांवे लावण्यखाणी ।
मृगेंद्रकटी कुरंगनयनी । विलोकिली कौशिकें ॥ (पांडवप्रताप, ३।१९५-६)

मोरोपंतांनी याच प्रसंगाचे केलेले वर्णन तुलनेसाठी विचारात घ्यावे.

होती करीत कंदुककेलि मधुर गान मोहिनी, तीतें ।
स्पर्शे प्रथम वसनहर पवन, मग त्यजुनि तोहि नीतीतें ॥
सुरतरसांत बुडाला.....
(आदि० १२।३०-३१)

श्रीधर आणि मोरोपंत यांनी केलेली वर्णने वाचली म्हणजे मुक्तेश्वराने केलेला अतिरेक आक्षेपार्ह का आहे ते कळून येईल.

विश्वामित्र आणि मेनका यांच्या समागमाचे वर्णन व्यासांनी दोनच ओळीत केले आहे, आणि ते देखील अगदी संयमाने आणि मोघम शब्दांत केले आहे.

तौ तत्र सुचिरं कालमुभौ व्यहरतां तदा ॥ आदि० ७२।८
रममाणौ यथाकामं यथैकदिवसं तथा । ७२।९

मुक्तेश्वराने या दोन ओळींतील वृत्तान्त पुढीलप्रमाणे भडक करून टाकला आहे.

भंगला नियमांचा तडाग । नकळत उडाला कौपिनकाग ।
मेनिकाचंदनतरूचें आंग । भुजाभुजंगीं वेष्टिलें ॥ आदि० १५।१४२
धांवोनि प्रमदेचिये कंठीं । बाहुपंजरें घातली मिठी ।
सुरतसंगीं पडली गांठी । जें वैराग्यें सुटेना ॥ १५।१४४
चुंबन आलिंगन मैथुन । ग्रंथित्रयीं गुंतलें मन । १५।१४५

खुद्द मुक्तेश्वर हे बोलत असता तर हा काही निराळाच रंगेल माणूस आहे असे म्हणून आपण तिकडे दुर्लक्ष केले असते. पण हे सारे कण्व शकुन्तलेजवळ बोलला, आणि शकुन्तला ते दुष्यन्ताला सांगत आहे अशी भूमिका असल्यामुळे ही आत्यन्तिक औचित्यहानी झाली आहे हा माझा स्पष्ट आक्षेप आहे. रसिकता केव्हाही प्रशंसनीय असते. पण ही रसिकता नाही, शुद्ध आचरटपणा आहे, किंबहुना रसभंग आहे. हे शकुन्तला दुष्यन्तासमोर बोलत आहे याला खासा पुरावा मुक्तेश्वरानेच दिला आहे.

पुसिल्या प्रश्नाचें उत्तर । तुजप्रती सांगितलें साचार । आदि० १५।१५५

'गुणग्राहीक' चतुर श्रोत्यांनी आपल्या या अजब रसिकतेचे मान डोलावून कौतुक करावे अशी मुक्तेश्वराची वर अपेक्षा आहेच! ही रसिकता नाही, 'भंडपुराण' आहे— 'वाग्विटंबन' आहे.

मुक्तेश्वराच्या वदनाने 'भक्तीनें' सांगितलेले हे शकुन्तलाजन्माचे 'विमळाख्यान' (अवतरणचिन्हांतील शब्द खुद्द मुक्तेश्वराचे आहेत!) ऐकल्यावर कालिदासाच्या 'शाकुन्तला'तील पुढील हृद्य आणि रमणीय प्रसंगाचे सौन्दर्य रसिकांनी चित्तात साठवावे.

राजा—वयमपि तावद् भवत्योः सखीगतं किमपि पृच्छामः।

सख्यौ—अज्ज, अनुग्गहो विअ इअं अब्भत्थणा।

राजा—भगवान्काश्यपः शाश्वते ब्रह्मणि स्थित इति प्रकाशः। इयं च वः सखी तदात्मजेति कथमेतत्?

अनसूया—सुणादु अज्जो। अत्थि को वि कोसिओत्ति गोत्तणामहेओ महाप्पहाओ राएसी।

राजा—अस्ति। श्रूयते।

अनसूया—तां णो पिअसहीए पहवं अवगच्छ। उज्झिआए सरीरसंवड्ढणादिहिं तादकस्सवो से पिता।

राजा—उज्झितशब्देन जनितं मे कौतूहलम्। आमूलाच्छ्रोतुमिच्छामि।

अनसूया—सुणादु अज्जो। गोदमीतीरे पुरा किल तस्स राएसिणो उग्गे तवसि वट्टमाणस्स किंत्रि जादसङ्केहि देवेहिं मेणआ णाम अच्छरा पेसिद णिअमविग्घकालिणी।

राजा—अस्येतदन्यसमाधिभीरुत्वं देवानाम्।

अनसूया—तदो वसन्तोदारसमए से उम्मादइत्तइं रूवं पेक्खिअ—(इत्यर्धोक्ते लज्जया विरमति।)

राजा—परस्ताज्ज्ञायत एव।सर्वथाप्सरःसंभवैषा।

सूचकतेची ज्यात परमावधी झालेली आहे अशा या रमणीय प्रसंगाचा मी केलेला मराठी अनुवाद पुढे देत आहे.

राजा—तुम्हा दोघींना तुमच्या मैत्रिणीविषयी आम्हांलासुद्धा काही विचारायचं आहे.

दोघी मैत्रिणी—महाराज, आपलं मागणं म्हणजे अनुग्रहच आहे आमच्यावर!

राजा—भगवान् काश्यपांनी नैष्ठिक ब्रह्मचर्याचा स्वीकार केला आहे हे सर्वांना माहीत आहे. मग ही तुमची मैत्रीण त्यांची कन्या—हें कसं काय?

अनसूया—ऐकावं महाराज. 'कौशिक' हे गोत्रनाम असलेला मोठा प्रभावी असा एक राजार्षि आहे.

राजा—हो, माहीत आहे.

अनसूया—तो आमच्या मैत्रिणीचा जन्मदाता पिता आहे असं समजा. पण हिला टाकून दिल्यानंतर काश्यपबाबांनी हिचं पालनपोषण केल्यामुळे तेच खरं म्हणजे हिचे वडील होत.

राजा—'टाकून दिल्यानंतर' या शब्दांमुळे माझ्या मनात कुतूहल निर्माण झालं आहे. पहिल्यापासून ऐकायची इच्छा आहे माझी.

अनसूया—ऐकावं महाराज. गौतमी नदीच्या काठावर पूर्वी म्हणे तो राजर्षी घोर तपश्चर्या करीत असता, देवांना कसली शंका आली कुणास ठाऊक, त्यांनी तपश्चर्येत विघ्न उत्पन्न करण्यासाठी मेनका नावाची अप्सरा पाठविली.

राजा—दुसऱ्यांच्या तपश्चर्येमुळे देव घाबरून जातात हे अगदी खरं आहे!

अनसूया—नंतर उन्मादक वसंत ऋतूमध्ये तिचं धुंद करणारं रूप पाहून—(अर्धवट बोलून लाजेमुळे थबकते.)

राजा—आलं लक्षात पुढं काय झालं ते. म्हणजे ही अप्सरेची कन्या आहे हे नक्की!

कलात्मक सौन्दर्याचा हा अद्वितीय प्रकर्ष पाहिल्यावर मुक्तेश्वराच्या ग्राम्य उक्तीकडे वळणे हा नागर रसिक मनाचा उपमर्दच नव्हे तर काय!

महाभारतातील दुष्यन्त शकुन्तलाजन्माचा वृत्तान्त समजल्यावर आपली तिच्याविषयीची आसक्ती पुढीलप्रमाणे व्यक्त करतो.

भार्या मे भव सुश्रोणि ब्रूहि किं करवाणि ते? आदि० ७३।१
सुवर्णमालां वासांसि कुण्डले परिहाटके।
नानापत्तनजे शुभ्रे मणिरत्ने च शोभने॥ ७३।२
आहरामि तवाद्याहं निष्कादीन्यजिनानि च।
सर्वं राज्यं तवाद्यास्तु भार्या मे भव शोभने॥ ७३।३

दुष्यन्ताच्या या उद्गारांत मनमोकळेपणा असला तरी एकही शब्द अशिष्ट, अनुचित, किंवा ग्राम्य नाही.

क्षेमेन्द्राच्या 'भारतमञ्जरी'तील दुष्यन्ताने शकुन्तलेला घातलेली मागणी याहीपेक्षा ललितमधुर आहे.

अयि बालकुरङ्गाक्षि जनोऽयं वशगस्तव ।
सापत्न्ये वसुधावध्वा योग्या राज्ञः सुता ह्यसि ॥ १।२४९
त्वदाननशशिद्योतधौताः सन्तु गृहे मम ।
विलासहाससुभगा दिवापि कुमुदाकराः ॥ १।२५०

प्राकृत कवि मोरोपंतांनी दुष्यन्ताची भागणी पुढीलप्रमाणे वर्णिली आहे.

नृपति म्हणे तरि सुंदरि सुदति मुदतिशय तुला मलाहि घडो ।
सत्कृतिशीं रसिकांची तुजशीं माझी तशीच गाठि पडो ॥ आदि० १२।३७
कुलशीलगुणांहीं तूं योग्या नृपकन्यका महोदारा ।
घे राज्य सर्व, नाहीं त्वदधिक मज अन्य काम, हो दारा ॥ १२।३८

आता मुक्तेश्वराचा दुष्यन्त आपले मनोगत शकुन्तलेजवळ कोणत्या शब्दांत व्यक्त करतो ते नागर रसिकांनी पाहावे, आणि आपला निर्णय द्यावा. मुक्तेश्वराचा दुष्यन्त 'कर्पूरगंधभागभंजघने !' या शब्दाने शकुन्तलेला संबोधतो, आणि तिला म्हणतो—

सप्त निगूढें रक्तवर्णें । उत्सेध नेटकीं साही स्थानें ।
लक्षितां तुझीं शुभलक्षणें । मन वेधलें परतेना ॥ आदि० १६।१८
कक्षा कुक्षी वक्ष घ्राण । स्कंध ललाट साहावें जाण ।
उन्नत ते सुलक्षण । स्त्रीमंडळीं जाणावी ॥ १६।१९
पाणि पादतळ नेत्र । नखें तालू जिव्हा अधर ।
आरक्तवर्ण ते साकार । स्त्रीप्रतिमा जाणावी ॥ १६।२०

येणेप्रमाणे लावण्यवती स्त्रीची लक्षणे शास्त्रोक्त पद्धतीने खुद्द शकुन्तलेला सांगून झाल्यावर दुष्यन्त 'मनिंचे हितगुज' पुढीलप्रमाणे शकुन्तलेसमोर कथन करीत आहे.

पंचबाणें हृदयभेद । केला, त्या व्रणा दिव्यौषध ।
बिंबाधरामृत सुस्वाद । कुचांग लेप वरौता ॥ आदि० १६।२१
यापरि प्रबळ विरहज्वरु । हरूनि करीं सुखोपचारु ।
जानु उल्हासती रंभोरु । स्पर्शावया आवडी ॥ १६।२२
मद्रेतस्वाल्योदकाची वृष्टी । धरीं शुद्धांगशुक्तिसंपुटीं ।
रत्न निपजेल जें कां श्रेष्ठी । मोलागळें त्रिलोकीं ॥ १६।२३
तेणें गंधर्वविधिनें त्वरित । पुरवीं आर्तीचे मनोरथ ।
मज समर्थालागीं उचित । दे अष्टांग आपुलें ॥ १६।३१
फेडीं लज्जेची कंचुकी । हृदय वोपीं मज हस्तकीं ।
कल्पनावृत्तीच्या अनेकीं । निरिया करीं पुरोत्या ॥ १६।३२

दुष्यन्ताच्या या वृत्तीचे यथातथ्य वर्णन करावयाचे झाले तर चरकसंहितेत वापरलेला 'नैर्लज्ज्य' हाच शब्द वापरावा लागेल. औचित्याच्या कल्पनेचा यासारखा सत्यानाश शोधून काढण्याचा प्रयत्न सफळ होण्याची सुतराम् आशा नाही. 'अंकारूढ करूनि नेई। रेतपातांत परपारा।' असे मुक्तेश्वराचा पाशर सत्यवतीला म्हणतो, तेही नैर्लज्ज्यच! पण शकुन्तलेसारख्या आश्रमवासिनी निरागस मुग्ध कन्यकेला दुष्यन्तासारख्या सुसंस्कृत प्रतिष्ठित सम्राटाने पहिल्याच भेटीत 'मद्रेतस्त्वाल्योदकाची वृष्टी। धरीं गुह्यांगशुक्तिसंपुटीं' असें बोलणें हा नैर्लज्ज्याचा काही विशेषच अवतार आहे!

श्रीधराने या प्रसंगाचे वर्णन करताना दुष्यन्ताच्या तोंडी पुढील शब्द घातले आहेत.

दुष्यंत म्हणे नितंबिनी। तूं लावण्य रत्नखाणी।
तुज वास या काननीं। योग्य नव्हे तत्त्वतां॥
तरी लाज सांडून सकळी। जरी मज वरिसी ये काळीं।
कीर्ति वाढेल या भूमंडळीं। पट्टराणी तूं साच।
देवां दुर्लभ पदार्थ। ते ते मत्सदनीं आहेत यथार्थ।
पृथ्वीची स्वामिणी सत्य। होशील आजपासूनी॥
(पांडवप्रताप, ३।२०५-७)

श्रीधर आणि मोरोपंत यांनी वापरलेली भाषा किती तरी सभ्य आणि दाक्षिण्याने भरलेली आहे हे दिसून येईल. पण मुक्तेश्वराचे स्त्रीपुरुष स्पास्पराशी बोलताना संकोचाचा कसलाही आडपडदा न ठाकता अगदी अत्याधुनिक नवकवींप्रमाणे किंवा 'वासूनाक्या-' वरील 'भ्रमाच्या वेताळा'प्रमाणे भारीच 'उदार' वृत्ती दाखवतात असे दिसते. रेतोदक, रेतोदकाचा पाट, रेतपात, रेतपाट यांसारखे इरसाल 'नंबरी' शब्द कुलपुरुष स्त्रीसमोर सहज उच्चारतो, इतकेच नाही तर कुलस्त्री देखील पुरुषासमोर उच्चारते, हे वाचून मन 'वैश्विक जाणिवां'नी कसे भरून येते! मुक्तेश्वरकृत आणखी काही चमत्कार दाखवतो.

कामासक्त शर्मिष्ठेच्या चिंतनातील हे एक स्वैर व 'मुक्त' चिंतन पाहा—

भाग्यें भेटे जरी भूपाळ। तरी प्रार्थूनि करुणासीळ।
वीर्योदकें कामानळ। शांत करणें सर्वथा॥ आदि० १९।५

शर्मिष्ठा ययातीची प्रार्थना पुढील शब्दांत करते—

म्हणोनि कृपेच्या समान डोळां। मातें अवलोकी भूपाळा।
क्षुधिता भुकेचियां वेळां। तृप्त करिती धर्मात्मे॥ १९।१३

शर्मिष्ठेच्या या प्रार्थनेवर ययाति तिला म्हणतो—

माझिया रेतोदकाचा पाट । आपुल्या वाक्यहस्तकें नीट ।
वाहता केला असे प्रकट । मार्गवीउदरवाफया ॥ १९।१७
तो फोडूनि आणिकेकडे । लावितां अरिष्टमय रोकडें ॥ १९।१८

आपल्या रेतोदकाचा पाट देवयानीचे उदर हाच कोणी वाफा, त्या वाफ्यात नेऊन सोडला असल्यामुळे आता शर्मिष्ठेला त्या पाटातील काहीही अंश मिळावयाचा नाही असे ययाति स्पष्टपणे म्हणतो, तरी सुद्धा शर्मिष्ठा त्याची विनवणी करीत राहते; आणि पाच ओव्यांमध्ये त्याची मनधरणी करून शेवटी त्याला ती म्हणते—

आतां अंगमिळणीं । उदार होईं तूं रुतुप्रदानीं ।
विमुख होतां सुकृतहानी । पावसील सुपवित्रा ॥ १९।२४

'रेतोदकाचा पाट' इत्यादी अकटोविकट कल्पनांचा वापर न करताही मनातील आशय परिणामकारक रीतीने कसा प्रकट करता येतो हे मोरोपंतांसारख्या मराठी कवीलाही चांगले माहीत आहे. मोरोपंतांच्या शर्मिष्ठाख्यानातून पुढील पद्ये उतरून घेतो.

होय ऋतुमती जेव्हां शर्मिष्ठा व्याकुळा वराधीनें ।
चित्तीं म्हणे सहावें किति दुःख कलेवरें पराधीनें ॥
प्रियतम सहाय नसतां यौवनहननें करोनि जो शीण ।
तद्गणनीं कुंठितमति होईल सरस्वतीहि जोशीण ॥
शिशु पाळण्यांत घालुनि हालवितां निजवितां सुखें जो जो ।
धात्री म्हणति, सखीला अमृतरसचि तो निघे मुखें जोजो ॥
(आदि० ११।१-३)

श्रीधराने वर्णिलेल्या याच प्रसंगात असाच हृद्य संयम पाळलेला आढळून येईल.

म्हणे कर्माची गति गहन । न सुटे कदा भोगिल्याविण ।
मी दास्य पावलें पूर्ण । पतिसंग नेणेंचि ॥
पतिवीण भोग शृंगार । वाटती जैसे विखार ।
निद्रा न लागे अणुमात्र । विकल शरीर पडतसे ॥
जीवनावीण कासार । दीपावीण व्यर्थ मंदिर ।
फलावीण तरुवर । तेवीं शरीर व्यर्थ माझें ॥
(पांडवप्रताप, ५।१-३)

शर्मिष्ठा ययातीची मधुर शब्दांत प्रार्थना करते—'विनवी मंजु स्वयें ययातीतें' (मोरोपंत). शर्मिष्ठेने विनवणी केल्यावर ययाति (मोरोपंतांचा ययाति) तिला उत्तर करतो—

नृपति म्हणे, "जें वदसी जाणतसें मी यथार्थ सुंदरि तें।
सरस असोचि मधुप बहु मनिं जरिहि रसें करूनि कुंद रितें॥ आदि० ११।९
तुज शयनीं न बहावें वदला कवि मज अलंघ्य आज्ञा ती।
माझे तुझेहि न पुन्हा मुनिंच्या क्षोभें म्हणोत हा ज्ञाती॥" ११।१०

बोलणारा ययातीसारखा सुसंस्कृत कुलशीलवान राजा आहे, आणि ऐकणारी वृषपर्वा या दानवेन्द्राची कन्या आहे. या दृष्टीने त्या दोघांच्या संभाषणात जे दाक्षिण्य व औचित्य पाळावयास पाहिजे ते मोरोपंतांनी चोखपणे पाळले आहे.

श्रीधराचा ययाति तर याहीपेक्षा संयमाने बोलत आहे.

ऐसा स्वगुणें करून। मोहिला नहुषनंदन।
राजा म्हणे माझें मन। तुझा संग इच्छीतसे॥
परी कोपेल देवयानी। मी काय करूं सांग ये क्षणीं।
(पांडवप्रताप, ५।२१०–१)

महाभारतातील ययाति शर्मिष्ठेला जे उत्तर करतो ते अतिशय दाक्षिण्ययुक्त आणि संयत आहे.

वेद्मि त्वां शीलसंपन्नां दैत्यकन्यामनिन्दिताम्।
रूपं च ते न पश्यामि सूच्यग्रमपि निन्दितम्॥ (आदि० ८२।१४)
अब्रवीदुशना काव्यो देवयानीं यदाऽन्वहम्।
नेयमाद्रियितव्या ते शयने वार्षपर्वणि॥ ८२।१५

क्षेमेन्द्राचा ययाति शर्मिष्ठेला जे उत्तर देतो ते तर याच्याहीपेक्षा मधुर आहे.

तच्छ्रुत्वा भूपतिः प्राह, 'दत्त्वा शुक्रः सुतां पुरा।
सेव्या त्वया न शर्मिष्ठे 'त्यकरोन्मम संविदम्॥
त्वद्वचो बहुभीतिर्मे विघ्नस्तत्संगमाद्दते।
पूर्णेन्दुवदनां सुभ्रु कस्त्वां न बहु मन्यते? (भारतमञ्जरी, १।३३६–७)

वर उद्धृत लेलेल्या वचनांतील दाक्षिण्य आणि संयम यांची प्रतीति आल्यानंतर मुक्तेश्वराच्या भाषेतील रासवटपणाचा आणि औचित्यहानीचा उबग ज्याला येणार नाही

ह्याला मानसोपचाराचीच गरज आहे असे म्हटल्यावाचून गत्यंतर नाही. 'रेतोदक' हा शब्द म्हणजे मुक्तेश्वराचे बलस्थान आहे. या किंवा याच अर्थाच्या इतर शब्दांचा मुक्तेश्वराने किती वेळा वापर केला आहे याची गणती करावयास एखादा 'सांख्य'च (Statistician) पाहिजे. अष्टवसु गंगेशी बोलताना न संकोचता या शब्दाचा उपयोग करतात ही घटना मोठी लोभनीय आहे यात शंका नाही.

तुझिया गर्भशुक्तिके विमळें । शांतनुरेतस्वातीजळें ।
जन्मती अष्टै मुक्ताफळें । परी मानवा अयोग्य ॥ आदि० २२।२४

आता हाच प्रसंग मोरोपंतांच्या शब्दांत देतो.

तूं देवि मानुषी हो आम्हां त्वत्कुक्षिमाजि जन्म हित ।
अन्योदरवास नसो भगवति भवदुदरवास सन्महित ॥ (आदि० १३।११)

मुक्तेश्वराने वापरलेल्या 'गर्भशुक्ति' 'रेतस्वातीजळ' इत्यादी रूपकांचा उपयोग न करताही श्रीधराने हा प्रसंग मोरोपंतांइतकाच परिणामकारक केला आहे.

वसु म्हणती भागीरथि । वसिष्ठें शाप दिला आम्हांप्रति ।
मानव होऊनि अधोगति । मृत्युलोकीं उपजाल ॥
वसिष्ठाची गाय चोरूनी । आम्हीं आश्रमीं बांधिली नेऊनी ।
म्हणोन शाप वदला मुनी । तुझे उदरीं जन्मूं आतां ॥
तरी उपजतांच नेऊन । गंगेत देई टाकून ।
सोडवीं मनुष्यदेहापासून । शापमोचन होईल ॥
(पांडवप्रताप, ६।३०–३२)

यदनुचितं यत्र पदं तत्तत्रैवोपजायते ग्राम्यम् ।

ही रुद्रटाने केलेली ग्राम्याची व्यापक व्याख्या मनात ठेवून आपल्या प्राचीन मराठी कवितेची तपासणी केली असता अशा ग्राम्यतेची अक्षरशः असंख्य उदाहरणे पाहावयास सापडतील. या बाबतीत केवळ मुक्तेश्वरच दोषी आहे असे नसून त्याच्या जोडीला कमी अधिक प्रमाणात इतर अनेक कवी देखील दोषी आहेत. ग्राम्यता आणि औचित्यहानि हे त्यांच्या मते दोषच नसावेत असेही वाटू लागावे इतके या दोषांचे त्यांच्या वाङ्मयात बेपुल्य आढळते. क्षेमेन्द्राने अलंकाराचे अनौचित्य, रसविषयक अनौचित्य, बीभत्साचे अनौचित्य, देशविषयक अनौचित्य, तत्त्वविरहित विपरीत गोष्टीचा उपन्यास केल्यामुळे झालेले अनौचित्य, आशीर्वचनाचे अनौचित्य इत्यादि अनेक प्रकारच्या अनौचित्याचे विस्तृत विवेचन केले आहे. औचित्याच्या पालनाने वस्तूचे जे मूळचे सौंदर्य असते ते वृद्धिंगत होत असते (औचित्यं

वस्तुनः स्वभावोत्कर्षः) हे राजानक कुन्तकाचे मत आपल्या जुन्या मराठी कवींच्या कानांवरून कधीही गेले नसावे असे वाटते. औचित्याने सौन्दर्यवृद्धि होते हे कुन्तकाचे मत आधुनिक विचाराशीही अगदी जुळते आहे. " 'Decoration' is cognate with the word 'decorum' " असे सुसन लँगरचे वचन आहे.

या ग्राम्यतेची आणि औचित्यहानीची उदाहरणे जुन्या मराठी वाङ्मयातून किती देत बसावे? पण या कवींची ही वृत्ती कोणत्या थराला गेली होती हे कळावे, आणि ग्राम्यता कोणकोणत्या प्रकारांनी घडते, व औचित्यहानी कशी होत असते हे कळावे, यासाठीच इतस्ततः स्वैर पसरलेल्य असंख्य उदाहरणांमधून काही उदाहरणे देणे भागच आहे. तुसत्या उदाहरणांच्या योगे ग्राम्यतेचे आणि औचित्यहानींचे पूर्ण आकलन होईलच असे नाही; प्रत्येकाने स्वतःची विवेकबुद्धी वापरून ग्राम्यत्वदोष घडणार नाही हा नमिसाधूचा विचार (मागे पृष्ठ २२ पाहावे.) मला मान्य आहे. पण नमिसाधूला देखील काही उदाहरणे देणे अपरिहार्य झाले. 'स्वानुभवदिनकर' या रामदासी संप्रदायातील ग्रंथाचे लेखक दिनकर गोसावी म्हणतात —

> तरी याचें आयकावयाचे प्रयोजन। जे कोण्हीयेकें त्यागावे अवगुण।
> हा अति अनर्थकारी असे म्हणौन। सांगणें पडलें अगत्य ॥
> अवगुण आइकिलियावांचून। सहसा न कळती किंलक्षण।
> म्हणौनि अवश्यमेव आयकोन। अवगुण त्यागावे ॥ "
>
> (स्वानुभवदिनकर, १४।४।७८–७९)

आणि याच विचाराने जुन्या मराठी कवींच्या वाङ्मयातील अशा अवगुणांचे सोदाहरण निरूपण 'चिळसलेनि चित्तें' करावयास नाइलाजाने प्रवृत्त झालो आहे.

या कवींपैकी काही कवींच्या वाङ्मयात अनेक गुण आहेत हे मला मान्य आहे. पण अवगुणांमुळे त्या गुणांना मालिन्य येत नाही काय? एकनाथी भागवतासारखे अथवा एकनाथांच्याच 'भावार्थरामायणा'सारखे प्रचंड ग्रंथ वाङ्मयाची भूषणे ठरण्याच्या योग्यतेचे असताना ग्राम्यता आणि औचित्यहानी यांसारख्या दोषांच्या योगाने त्यांच्या योग्यतेत उणेपणा येतो असे मला निश्चान्तपणे वाटते. एकनाथांविषयी प्रत्येक जाणत्या माणसाच्या मनात नितान्त आदराचीच भावना सदैव जागृत असते. अशा या थोर साधुपुरुषाच्या श्रेष्ठ वाङ्मयात ग्राम्यता चुकूनही येऊ नये असे मला वाटते. आणि ती दिसली की स्वाभाविकच मनाला फार खेद होतो, आणि

> तदल्पमपि नोपेक्ष्यं काव्ये दुष्टं कथाचन।
> स्याद्व्रणः सुन्दरमपि श्वित्रेणैकेन दुर्भगम् ॥

या दण्डीच्या प्रसिद्ध उक्तीची आठवण होऊन तिच्यातील मर्म हृदयाला भिडते. आणि प्रत्यक्ष एकनाथांनी देखील याच मताचा अनुवाद केला आहे.

सुंदर सुकुमार साजिरी । वोठीं कुष्ठता तिळभरी ।
झाल्या तीतें कोण वरी । वरी वरी दिसतांही ॥ ए० भा० ३।३९२

एकनाथांसारख्या महान् साधुपुरुषाच्या लेखनाला ग्राम्यतेचा थोडाही कलंक लागता कामा नये हीच माझी भावना असल्यामुळे ग्राम्यता आणि औचित्यहानि हे दोष आटळले म्हणजे अपेक्षाभंगाच्या तीव्र यातना होतात, हे कबूल करणे भाग आहे.

एकनाथांच्या वाङ्मयातून ग्राम्यतेचे आणि औचित्यहानीचे काही शेलके नमुने सुसंस्कृत वाचकांच्या निर्णयासाठी उद्धृत करतो.

भावार्थरामायणाच्या अरण्यकांडात चौथ्या अध्यायात मांडकर्णी ऋषीच्या उग्र तपश्चर्येत विघ्न आणण्यासाठी अप्सरा कशा प्रयत्न करतात याचे वर्णन आले आहे.

वाल्मीकिरामायणात अरण्यकांडाच्या अकराव्या सर्गात ११ ते १९ या श्लोकांत माण्डकर्णी नामक ऋषीचा वृत्तान्त आला आहे. त्याच्याच आधाराने एकनाथांनी मंदकर्णी ऋषीच्या तपोभंगाचे वर्णन केले असल्यामुळे रामायणातील मूळ कथाभाग उद्धृत करतो.

इदं पञ्चाप्सरो नाम तटाकं सार्वकालिकम् ।
निर्मितं तपसा राम मुनिना माण्डकर्णिना ॥ ११।११
स हि तेपे तपस्तीव्रं माण्डकर्णिर्महामुनिः ।
दशवर्षसहस्राणि वायुभक्षो जलाशये ॥ ११।१२
ततः प्रव्यथिताः सर्वे देवाः साग्निपुरोगमाः ।
अब्रुवन्वचनं सर्वे परस्परसमागताः ॥ ११।१३
अस्माकं कस्यचित्स्थानमेष प्रार्थयते मुनिः ।
इति संविग्नमनसः सर्वे तत्र दिवौकसः ॥ ११।१४
ततः कर्तुं तपोविघ्नं सर्वदेवैर्नियोजिताः ।
प्रधानाप्सरसः पञ्च विद्युच्चलितवर्चसः ॥ ११।१५
अप्सरोभिस्ततस्ताभिर्मुनिर्दृष्टपरावरः ।
नीतो मदनवश्यत्वं देवानां कार्यसिद्धये ॥ ११।१६
ताश्चैवाप्सरसः पञ्च मुनेः पत्नीत्वमागताः ।
तटाके निर्मितं तासां तस्मिन्नन्तर्हितं गृहम् ॥ ११।१७

तत्रैवाप्सरसः पञ्च निवसन्त्यो यथासुखम् ।
रमयन्ति तपोयोगान्मुनिं यौवनमास्थितम् ॥ ११।१८
तासां संक्रीडमानानामेष वादित्रनिःस्वनः ।
श्रूयते भूषणोन्मिश्रो गीतशब्दो मनोहरः ॥ ११।१९

'अप्सरोभिस्ततस्ताभिर्मुनिर्दृष्टपरावरः । नीतो मदनवश्यत्वं...' या साध्या शब्दांत वाल्मीकीने त्या ऋषीच्या मनोविकाराचे वर्णन केले आहे. या नऊ श्लोकांत एकही शब्द अनुचित नाही, एकही शब्द ग्राम्य नाही, किंवा भडक नाही. आणि तरी देखील सारा प्रसंग हृद्य झाला आहे. आता या वर्णनाचा काडीपुरताच आधार घेऊन एकनाथांनी कसली विलक्षण मखलाशी केली आहे ती खरोखर पाहण्यासारखी आहे.

त्याच्या देखोनि तीव्र तपासी । स्वर्गीं हाहाकार सुरवरांसी ।
इंद्रें विघ्न मांडिलें त्यासीं । पंचाप्सरांसी धाडिलें ॥ ४।५८
रूप यौवन मनोहर । गीत नृत्य सालंकार ।
तें देखोनियां ऋषीश्वर । कामतप्त पैं जाला ॥ ४।५९
त्याची देखोनि कामासक्ती । अप्सरा नागव्या नाचती ।
तोही लिंग धरोनिया हातीं । निजकामार्थी नाचत ॥ ४।६०
त्यांसी झोंबोनि मागतां रति । त्या निघाल्या ऊर्ध्वगती ।
त्यांसी ऋषि येत काकुळती । "कृपेनें रती मज द्यावी ॥ ४।६१
मज रत्यर्थी अतीतासी । विमुख होतां नये तुम्हांसी ।
मी लागतों तुमच्या पायांसी । कृपेनें रतीसी मज द्यावें ॥ ४।६२
मी तुमचा धर्मसांगाती । परमार्थी मज द्यावी रती ।"
त्यांचें अंगुष्ठ धरी दांतीं । तंव त्या जाती उपेक्षोनि ॥ ४।६३

एकनाथांच्या मांडकर्णी ऋषीने केलेले हे आचरट विदूषकी चाळे पाहिल्यावर मूळ वाल्मीकिरामायणात असेच काही तरी वर्णन आले असले पाहिजे असा निव्वळ मराठी जाणणाऱ्या वाचकांचा गैरसमज होण्याची फार शक्यता आहे. म्हणूनच वाल्मीकिरामायणातील अवतरण दिले आहे.

श्रीधराने तर या प्रसंगाचा कमालीचा संक्षेप करून टाकला आहे.

रघूत्तमाते सांगती तापसी । येथें मंदकर्ण महाऋषी ।
परमतपिया तेजोराशी । जैसा आकाशीं भास्कर ॥
क्षय करावया तपातें । पांच अप्सरा अमरनाथें ।
पाठविता ऋषि त्यांतें । देखोनियां भाळला ॥

(रामविजय, १३।१२४–५)

सीतेचा शोध करण्यासाठी निघालेला हनूमान तिला कोणत्या खुणांनी ओळखावे ? असा रामाला प्रश्न करतो. यावर राम हनुमंताजवळ सीतेचे तपशीलवार वर्णन करतो. हा प्रसंग एकनाथांचे भावार्थ रामायण, किष्किंधाकांड, अध्याय १३ मध्ये आला आहे. एकनाथांचा राम सीतेचे वर्णन करण्याच्या नादात विचित्र अतिरेक करतो. राम आणि सीता या दोन व्यक्ती नसून त्यांचे परिपूर्ण तादात्म्य आहे हे स्पष्ट करीत असता एकनाथांचा राम म्हणतो

सीतेसीं मज वेगळेपण । अनुप्रमाण असेना ॥ १३।३०
दोही भागांचा व्यापार । जेंवी चालवी नटेश्वर ।
तेंवी सीता श्रीरामचंद्र । धरिती अवतार देवकार्या ॥ १३।३९

यानंतर सीतेच्या विविध अवयवांचे राम वर्णन करतो.

फडा पुच्छा वांकुडा नाग । तो नाग म्हणती सोनेंचि सांग ।
तेंवी गुल्फा जानू विभाग । सीतेची चांग चिन्मात्र ॥ १३।४४

आता या वर्णनाचा कळस पाहा —

सीतागुह्येंद्रियविचार । तिचें निजगुह्य श्रीरामचंद्र ।
तेथील रतिसुखाचें सार । असारसार श्रीराम ॥ १३।४५

वाल्मीकिरामायणात हनुमंत सीतेचा शोध करण्यासाठी निघाला असता राम त्याला आपले नाव कोरलेली अंगठी खुणेसाठी देतो एवढाच उल्लेख आहे.

तं समीक्ष्य महातेजा व्यवसायोत्तरं हरिम् ।
कृतार्थ इव संहृष्टः प्रहृष्टेन्द्रियमानसः ॥ ४४।११
ददौ तस्य ततः प्रीतः स्वनामाङ्कोपशोभितम् ।
अंगुलीयमभिज्ञानं राजपुत्र्याः परंतपः ॥ ४४।१२

हनुमंताला सीता ओळखता यावी म्हणून श्रीधराच्या रामाने पुढीलप्रमाणे सीतेची 'रूपरेखा' दिली आहे.

तुवा पुसिलें सीतास्वरूप। तरी तें जाण माझेंचि रूप ।
जैशी प्रभा आणि दीप । एकरूप दोहींचें ॥
जैशी कनक आणि कांती । की रत्न आणि त्याची दीप्ती ।
तैशी जाण सीतासती । स्वरूप माझें अभेद ॥
स्वूण ऐकावी मारुती । मुखीं कर्पूराची वसे दीप्ती ।
माझें स्मरण अहोरात्रि । सीता सती करीतसे ॥

यानंतर रामाने 'अंतर्खूण' सांगितली आहे. तिने काव्याच्या हळुवारपणाचा प्रकर्ष निर्माण केला आहे.

अंतर्खूण सांग सीतेतें । कैकेयीगृहीं म्यां स्वहस्तें ।
वल्कलें नेसविलीं तियेतें । वनवासासि निघतां पै ॥
(रामविजय, १८।१३४—१३९)

एकनाथांनी हनुमंताला औचित्यहानि करावयास लावले याचे एक उदाहरण भावार्थ रामायणाच्या सुंदरकांडामधून देतो. लंकेमध्ये सीता किती दीनवाणी झाली आहे व तिला किती यातना सोसाव्या लागत आहेत याचे वर्णन करताना वाल्मीकिरामायणार्ताल हनुमंत रामाला म्हणतो—

त्वयि संन्यस्य जीवन्ती रामा राम मनोरथम् ।
दृष्टा मे राक्षसीमध्ये तर्ज्यमाना मुहुर्मुहुः ॥ सुन्दरकाण्ड ६५।१२
राक्षसीभिर्विरूपाभी रक्षिता प्रमदावने ।
दुःखमापद्यते देवी त्वया वीर सुखोचिता ॥ ६५।१३
अधःशय्या विवर्णांगी पद्मिनीव हिमागमे ।
रावणाद्विनिवृत्तार्था मर्तव्यकृतनिश्चया ॥ ६५।१५

आता एकनाथांचा हनुमंत रामासमोर हाच वृत्तान्त सांगताना काय बोलतो पाहा—

रामवियोगाचें अन्न । तें श्वानविष्ठेसमान ।
रजस्वलेचें रुधिरपान । तत्समान रसभोग ॥ भा० रा० २५।२१

हनुमंतासारखा रामाविषयी नितान्त भक्ति बाळगणारा एकनिष्ठ सेवक आपली पायरी सोडून रामासमोर 'रजस्वलेचें रुधिरपान' इत्यादि किळसवाण्या कल्पना सहज बोलून जातो हे काय त्याच्या मनाच्या मोकळेपणाचे लक्षण मानावे? की विचारशून्यचेचे द्योतक मानावे? की शिष्टाचारशून्यतेचे व असभ्यपणाचे द्योतक मानावे?

आता हाच प्रसंग श्रीधराने किती संयमाने व सदभिरुचीने रंगविला आहे पाहा.

जगद्वंद्या अयोध्यापती । सुखरूप आहे सीता सती ।
मणि खूण दिधला माझे हातीं । परम सद्गद होऊनियां ॥
मग अंतरखूण सांगितली । कीं मनशीळ लाविला माझे भाळीं ।
रघूत्तम ऐकून हृदयकमळीं । तये काळीं गहिंवरला ॥
(रामविजय, २१।२०७-८)

रसोत्पत्तीसाठी श्रीधर वाल्मीकिरामायणात नसलेल्या कल्पना किती परिणामकारक रीतीने वापरतो हे राम व सीता यांनी परस्परांविषयी सांगितलेल्या 'अंतरखुणां' वरून रसिकांनी समजावून घ्यावे.

सकाम याज्ञिकांच्या स्वर्गाभिलाषेची निंदा करण्याच्या नादात एकनाथांनी 'भागवता'-मध्ये असाच संयम सोडून मर्यादातिक्रम केला आहे. सोमप दीक्षितांच्या लाजिरवाण्या जिण्याचे वर्णन करीत असता ज्ञानेश्वरांनीही एका ठिकाणी जरा रागाने त्यांची वेश्याभोगात सर्वस्व गमावलेल्या कामातुर माणसांशी तुलना केली आहे.

जैसा वेश्यामोगीं कवडा वेंचे । मग दारही चेपूं नये तियेचें ।
तैसें लाजिरवाणें दीक्षितांचे । काय सांगों ॥ ज्ञा० ९।३२९

तसेच विषयसेवनाच्या अतिरेकी लालसेने भ्रमिष्ट झालेल्या पुरुषाचे वर्णन करताना ज्ञानेश्वरांनी पुढील विलक्षण दृष्टान्त दिला आहे.

खरी टेंको नेदी उडे । लातौनि फोडीं नाकाडें ।
तन्ही जेविं न काढे । माघौता खरु ॥ ज्ञा० १३।७०६

'वेश्यामोगीं कवडा' वेचणाऱ्या माणसाची उपमा स्वर्गकाम दीक्षिताला देणे हा प्रकार खरे म्हणजे आक्षेपार्ह नाही. पण विषयासक्त पुरुषाच्या भ्रमिष्ट लालसेचे वर्णन करीत असता दिलेला गर्दभाचा दृष्टांत मात्र निश्चितपणे आक्षेपार्ह आहे असे माझे स्पष्ट मत आहे. विशेषतः गर्दभाच्या मैथुनक्रियेचे जे यथातथ्य चित्र या दृष्टांताने निर्माण केले आहे त्यामुळे त्याची आक्षेपार्हता वाढली आहे. हा दृष्टान्त ज्ञानेश्वरीत आला नसता तर बरे झाले असते, असेच मला नेहमी वाटत आले आहे. ज्ञानेश्वरांचे भाषाप्रभुत्व आणि कल्पनावैभव या दोन्ही गोष्टी इतक्या लोकोत्तर आहेत की त्यांना प्रतिपाद्य विषयाचे विवरण अन्य रीतीने याहीपेक्षा परिणामकारक रीतीने करता आले असते यात कसलाही संशय नाही. ज्ञानेश्वरीच्या नितळ सौन्दर्याला हा एक लहानसा का होईना पण डागच लागला आहे. पांढऱ्या शुभ्र उंची रेशमी वस्त्रावर पडलेला काजळाचा अगदी लहानसा डाग देखील पाहणाऱ्याच्या डोळ्यांत सलतो, त्याप्रमाणे थोरामोठ्यांच्या कृतीवर घेतला जाणारा एखादा लहानसा आक्षेपही मनाला व्यथा देतो, अशा आशयाचे एक वचन महाभारतात आहे.

उद्भासते ह्यञ्जनबिन्दुवत्त-
च्छुभ्रे वस्त्रे यद् भवेत् किल्बिषं वः ॥ उद्योग० २५।६

परंतु ज्ञानेश्वरांनी दिलेला रासभदृष्टान्त म्हणजे कोण्या झाडाचा पाला ठरावा अशी विलक्षण करामत एकनाथांनी स्वर्गासाठी तळमणाऱ्या याज्ञिकांच्या वर्णनात करून दाखविली आहे. थोडा नमुना दाखवतो.

स्वर्ग एक याज्ञिक बहुत । यालागीं देव विघ्नें करित ।
मुख्य इंद्रचि विघ्ना प्रवर्तत । स्वर्ग राखत निजभोगा ॥
एक वेश्या एकी राती । तेथ सकाम बहुत येती ।
ते जैसे कलहो करिती । तैशी गती याज्ञिकां ॥
(एकनाथी भागवत, १०।५२०–१)

स्वर्गात जाण्यासाठी रांगेत उभ्या राहिलेल्या याज्ञिकांना येथे वेश्येच्या दाराशी आपली पाळी केव्हा येते याची वाट पाहत ताटकळत बसलेल्या 'सकाम' पुरुषांची उपमा दिली आहे. वास्तविक ही उपमा अगदी प्रभावी असून कार्यसिद्धि करण्यास सर्वथा समर्थ आहे. पण आपल्या श्रोत्यांना याज्ञिकांचे लाजिरवाणे जिणे कसे असते याची नेमकी कल्पना या एका उपमेने येणे कठिण आहे अशी शंका मनात येऊन एकनाथांनी 'ऋतुस्नात शुनी'ची आणखी एक सर्वांगपरिपूर्ण उपमा देऊन वाचकांच्या डोळ्यांसमोर एक विलक्षण कल्पना-चित्र उभे केले आहे.

कां शुनी जैशी ऋतुस्नात । तिसी भोगूं येती श्वान बहुत ।
परस्परें गुरगुरित । तैसा स्वर्ग भोगित सकाम ॥
तेथ ज्यासि भोग घडे । भोगूं जातां अडकोनि पडे ।
भंडिमा होय जगापुढें । सज्ञान तोंडें थुंकिती ॥
जिचें भोगूं जाय सुख । अडकल्या ते होय विमुख ।
मैथुनद्वारें गुंतल्या देख । थुंकिती लोक मुखामुखीं ॥
तैशी याज्ञिकां स्वर्गप्राप्ती । भोगें होय तपच्युती ।
स्वर्गभोगीं गुंतली आसक्ती । विमुख पडती इहलोकीं ॥
(ए० भा० १०।५२२–५)

शेतकऱ्याच्या हातात पीक पडेपर्यंत अनेक प्रकारच्या अडचणी त्याच्या वाटेत नित्य उभ्या राहतात. त्याप्रमाणे याज्ञिकांनी स्वर्गाच्या आशेने जिवाचा कितीही आटापिटा केला तरी स्वर्गप्राप्तीच्या मार्गात अनेक विघ्ने उभी राहतात, आणि केलेले कष्ट वाया जातात— हा निरूपणाचा विषय आहे. वास्तविक कृषीवलाच्या म्हणजे शेतकऱ्याच्या दृष्टान्ताने सारा विषय श्रोत्यांना अगोदरच समजलेला आहे. न समजण्यासारखे या विषयात गहन आहे तरी काय? पण प्रस्तुत विषय भारीच गहन आहे अशी कल्पना होऊन श्रोत्यांना तो

सुलभ व्हावा या हेतूने एकनाथांनी प्रथम वेश्येच्या दाराशी उभ्या राहिलेल्या लंपट पुरुषांचा दाखला दिला. पण तेवढ्यानेही विषयाचे विवेचन पुरे झाले नाही असे वाटून त्यांनी लगेच श्वानमैथुनाची साङ्गोपाङ्ग उपमा दिली. या असल्या उपमेची काही तरी जरूर होती काय? आणि त्या उपमेचा इतका बारीकसारीक तपशील तरी कशासाठी?

पण हा प्रकार चुकून एखाद्या वेळी झाला असेही नाही. याच प्रकाराचा जीर्णोद्धार एकनाथांनी भागवतातच आणखी एकदा केला आहे. जीर्णोद्धार म्हणण्याचे कारण असे की ग्राम्य वर्णनाची चढती पायरी येथे आहे. विषयसुखाला लालचावलेल्या निर्लज्ज लंपट लोकांची तुलना 'भागवत' पुराणात कुत्रा, गाढव, आणि बोकड या चतुष्पादांशी केली आहे.

विदन्ति मर्त्याः प्रायेण विषयान्पदमापदाम् ।
तथाऽपि भुंजते कृष्ण तत्कथं श्वखराजवत् ॥

(भागवत, १३।८)

एकनाथांनी प्रस्तुत विषयाचा उपन्यास पुढीलप्रमाणे केला आहे.

जो झाला विषयाधीन । तो सर्वी सर्वत्र सदा दीन ।
ऐसें जाणत जाणतां जन । आसक्ति गहन विषयांची ॥
जेसे का श्वान, आणि खर, अज । तैसे विषयांसि लोक निर्लज्ज ।
सांडूनि स्वहिताचें काज । कां विषयांचे भोज नाचती ॥

(एकनाथी भागवत, १३।२०३-४)

श्वान, गर्दभ, आणि बोकड या रोज दिसणाऱ्या चिरपरिचित प्राण्यांच्या वर्तनक्रमाची यथासांग माहिती प्रत्येकाला असते. यामुळे विषयासक्त माणसे या प्राण्यांप्रमाणे वागतात, एवढे म्हटले असता प्रस्तुत विषयाचे प्रतिपादन कोणालाही सहज समजेल. आणि भागवतातील मूळ श्लोकात एवढेच केले आहे. पण श्वानाप्रमाणे माणसे वागतात म्हणजे कशा प्रकारे वागतात? अशी जिज्ञासु श्रोत्यांच्या चित्तांत शंका उद्भवण्याची शक्यता आहे असे वाटून एकनाथांनी अशा आर्त जिज्ञासू श्रोत्याचे कुतूहल अखेरपर्यंत पुरे करण्याचे धोरण पतकरलेले दिसते. आणि म्हणूनच 'तथापि भुंजते कृष्ण तत्कथं श्वखराजवत्' या श्लोकार्धावर चौदा ओव्यांचे विस्तृत विवरण करून सदर प्राण्यांच्या मैथुनक्रियेचे इत्थंभूत वर्णन केले आहे.

शुनी बसवसोनि पाठीं लागे । श्वान सवेंच लागे मागें ।
पुच्छ हालवूनि हुंगे । लाज नेघे जनाची ॥

काणा, कुंटा, व्याधिव्याप्त । चिंता काठफरा गळां वाहत ।
तोही शुनीमागे धांवत । कामासक्त अविचारी ॥
शुनी सक्रोधें वसवसी । ते गोड लागे श्वानासी ।
जीवित्व बांधिले तिच्या पुच्छीं । तीमागमागेंसी हिंडत ॥
अंगीं अंगा होतां भेटी । सक्रोध शुनी लागे पाठीं ।
तरी न सोडी पुसाटी । कुंकांत उठी कामासी ॥
ऐशा संकटीं जैं भोग चढे । तैं भोगासवेंचि आडकोनि पडे ।
हडहड करिती चहूंकडे । जगापुढें फजीती ।
निंदेचे सैंघ वाजती धोंडे । मूर्ख तेही थुंकिती तोंडें ।
ऐसेंचि पुरुषासीही घडे । तरीही आवडे अतिकामू ॥
श्वानाचें हेंड तत्काळ सुटे । मनुष्याचें आकल्प न सुटे ।
स्त्रीलोभाळू अतिलोभिष्टें । तीलागीं संकटे नाना सोशी ॥

(ए० भा० १३।२०५-२११)

विषयलंपट पुरुष एखाद्या श्वानाप्रमाणे वागतो येवढे म्हटले असता अतिरेकी विषयासक्तीची निंदा यथायोग्य झाली नसती का ? मग कुत्र्याचे हे 'हेंड' इतक्या तपशीलवारपणे वर्णून नाथांनी काय साधले ?

पण 'कुतरओढ' वर्णून एकनाथांचे समाधान झाले नाही. त्यांनी गर्दभप्रीतीचेही असेच सूक्ष्म वर्णन केले आहे.

ना तरी गाढवाच्यापरी । दूरीं देखोनियां खरी ।
भुंकत धांवे तीवरी । लाज न धरी सर्वथा ॥
खरी पळे पुढें पुढें । खरू धांवे वाडेंकोंडें ।
लाता हाणोनि फोडी जाभाडें । तरी पुढें पुढें धसों लागे ॥
लाता हाणी उरावरी । तरी तिची प्रीति धरी ।

(ए० भा० १३।२१२-२१४)

खरमैथुनाचे अगदी असेच वर्णन पुन्हा सव्वीसाव्या अध्यायात आले आहे.

*

एकनाथांसारखे आदर्शभूत साधुपुरुष वेदान्ताचे अथवा नीतितत्त्वांचे गंभीर भारदस्त विवेचन चालू असता वरीलसारखे ग्राम्य विषय इतक्या तपशिलाने का मांडतात याचा मी बहुत विचार केला. आणि पुष्कळ प्रयत्न केल्यावर माझ्या मनाचे तरी जेणेकरून समाधान होईल असे उत्तर मला सापडले. एकनाथ कोणासाठी लिहीत आहेत ? कोणत्या

प्रकारच्या श्रोत्यांसमोर ते विषयाचे प्रतिपादन करीत आहेत? एकनाथांच्या काळात भारदस्त विवेचन वाचण्याची व त्याचे आकलन करण्याची पात्रता ज्यांच्या अंगी होती असे लोक समाजात फारच थोडे होते. सारा समाज अक्षरहीन आशिक्षितांनीच भरलेला होता ही वस्तुस्थिती आहे. पण लिहिण्यावाचण्याचे ज्ञान अंगी नसलेले लोक श्रोते होऊ शकतात. अशा निरक्षर श्रोत्यांच्या समाजापुढे बोलणारा वक्ता अगदी स्वाभाविकच त्या श्रोत्यांच्या पातळीवर उतरतो. अशा रीतीने वक्ता श्रोत्यांच्या बुद्धीच्या व संस्कृतीच्या पातळीवर उतरला नाही तर त्यांना वक्ता मांडीत असलेल्या विषयाचे यथासांग आकलन होत नाही. पण त्यांना चटकन समजेल आणि रुचेल अशा भाषेत तो बोलला; त्यांच्याच खास परिसरातील त्यांच्या नित्य परिचयाचे व्यावहारिक दाखले त्याने दिले; सुसंस्कृत प्रज्ञावन्तांच्या समाजात जे शब्द बहिष्कृत मानले जातात, पण या निरक्षर 'बाळ्याभोळ्या' लोकांच्या घोळक्यात जे सर्रास वापरले जातात, अशा शब्दांचा त्या वक्त्याने उपयोग केला तर त्याचे विवेचन त्यांना जवळचे वाटू लागले तर ते स्वाभाविक आहे. ज्या जनसमूहापुढे हे जुने कवी बोलत होते त्याचे अंतःस्वरूप असे असल्यामुळेच एकनाथासारखा सौम्य, सोज्वळ, शान्त, आणि समतोल वृत्तीचा तत्त्वचिन्तक पारमार्थिक साधुपुरुष ग्राम्य शब्दांची पेरणी करतो, ग्राम्य व अनुचित वर्णने करतो, आणि तसेच ग्राम्य व अनुचित दृष्टान्त देतो. असे जर त्याने केले नसते तर हे विवेचन खास आपल्यासाठी आहे असे त्याच्या श्रोत्यांना पटले नसते, आणि वक्ता व श्रोते यांच्यामध्ये संवाद निर्माण न होता दूरभाव निर्माण झाला असता. वाङ्मय कोणी लिहिले हा प्रश्न महत्त्वाचा आहे हे खरे. तथापि ते कोणासाठी लिहिले हा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे. प्राचीन संस्कृत काव्ये व नाटके सुसंस्कृत, बहुश्रुत, प्रज्ञावंत, आणि मर्मज्ञ रसिकांसाठीच होती. त्यामुळे ग्राम्यता व अनौचित्य या दोषांचा प्रवेश आपल्या साहित्यात चुकून देखील होऊ नये यासाठी कवी प्रयत्नांची शिकस्त करीत असत. तसेच सर्व तात्त्विक स्वरूपाची भारदस्त शास्त्रीय चर्चा ज्ञानी पंडितांसाठीच असे. मराठी कवींनी केलेले वेदान्ताचे निरूपण या पंडितांसाठी नसून सामान्य निरक्षर लोकांसाठी होते. स्वाभाविकच श्रोत्यांच्या संस्कृतीचा, त्यांच्या बुद्धीच्या पातळीचा, आणि त्यांच्या वृत्तींचा प्रभाव विवेचन करणाऱ्या व्याख्यात्यावर झाला असला तर ते आकलनीय आहे. अशाही स्थितीत ज्ञानेश्वरांनी अभिजात वृत्तीची, नागर संस्कृतीची, आणि औचित्याची व रसिकतेची बंधने बहुतांशी पाळली, आणि नागर पदबंधांची योजना करण्यासाठी प्रतिभेची सारी कर्तृत्वशक्ति वापरली, ही घटना मोठी हृद्य आणि विलोभनीय आहे हे मान्य केलेच पाहिजे. पण ज्ञानेश्वरांनी जी बंधने कसोशीने पाळली ती पुढील कवींनी पाळली नाहीत, असे स्पष्टपणे म्हटले पाहिजे. काव्यामध्ये एकवेळ जो अतिरेक खपून जाईल तो भारदस्त तात्त्विक वेदांती चर्चेमध्ये खपून जाणार

नाही एवढा विवेक पुढच्या कवींनी पाळला असता तरी तेही प्रशंसनीय ठरले असते. पण ते व्हावयाचे नव्हते !

मी केलेले हे विवेचन एकनाथांसारख्या शुचिष्मन्त, प्रज्ञावन्त, आणि विवेकी साधुपुरुषाच्या बाबतीत केले आहे. शिवाय, एकनाथांच्या वाङ्मयात काही ठिकाणी ग्राम्यता आणि औचित्यहानि या गोष्टी दिसून येतात या घटनेची संभाव्य कारणे शोधून काढण्याचा मी प्रयत्न केला आहे. ही कारणमीमांसा आहे, घटनेच्या मागे असू शकणाऱ्या भूमिकेचे स्पष्टीकरण आहे. पण स्पष्टीकरण म्हणजे समर्थन नाही, हेही आवर्जून स्पष्ट केले पाहिजे. एकनाथांच्या वाङ्मयातील ग्राम्यतेचे अथवा औचित्यहानीचे समर्थन मी चुकून देखील करणार नाही. प्रमाद तो प्रमादच ! तो एकनाथांनी केला असला तरीही प्रमादच !

एकनाथांच्या भूमिकेचे स्पष्टीकरण करण्याची तरी मला जरूर वाटली. पण काही कवींची वृत्तीच हीन असते, आणि यामुळे त्यांची अभिरुची देखील तशीच हीन बनते. कोणतेही कारण नसताना ते ग्राम्य शब्द वापरतात, ग्राम्य शृंगाराचे उत्तान वर्णन करतात, स्वैरपणे औचित्यहानि करतात, पाविच्यविडंबन देखील करतात. मुक्तेश्वर हा या सदरातील कवी आहे. वामनपंडित आणि नागेश यांचीही गणना याच सदरात करावी लागेल. एकनाथांच्या वाङ्मयात ग्राम्य शब्द आढळले, आणि औचित्यहानि झालेली दिसली, म्हणजे या थोर साधुपुरुषाविषयीच्या भक्तीने भारावलेल्या मनाला खेद होतो. पण मुक्तेश्वर, वामनपंडित, आणि नागेश यांच्यासारख्या कवींच्या हीन अभिरुचीमुळे मनाचा संताप होतो, व त्यांच्याविषयी तिरस्कार वाटू लागतो.

मनाला वाईट वाटण्याचे आणखी एक कारण आहे. एकनाथ सामान्य जनांच्या पातळीवर उतरतात, वरच्या भूमिकेवरून खालच्या भूमिकेवर येतात—पण खालच्या भूमिकेवरील लोकांना आपल्याप्रमाणे वरच्या भूमिकेवर घेऊन जाण्याचा मात्र आग्रह धरीत नाहीत. सामान्य जनांना ज्ञानी करण्याच्या प्रयत्नात थोर पुरुषाला आपली भूमिका सोडून खाली उतरावे लागणे भाग पडावे हा दैवदुर्विलास आहे. शब्दाचा असभ्य अर्थ त्याच्या सभ्य अर्थावर मात करतो (मागे पृष्ठ १८ पाहावे.) हे शब्दाच्या बाबतीत जसे खरे आहे तसेच अभिरुचीच्या बाबतीतही खरे आहे. हीन अभिरुचि सुसंस्कृत अभिरुचीवर मात करते, उच्च अभिरुचि हीन अभिरुचीवर मात करू शकत नाही, हेच खरे. आणि खुद्द एकनाथांनीच हा अभिप्राय एका ठिकाणी व्यक्त केला आहे.

लसुणाचे संगतीं जाण । कस्तूरीचें आच्छादे सुवासपण ।
दुर्गंधीचें बळ दारुण । सुवास जाण गिळोनि जाय ॥
(भावार्थरामायण, युद्धकांड, ८५।९१)

दासोपंताच्या 'गीतार्णवा'च्या दुसऱ्या अध्यायात संस्कृत आणि प्राकृत यांमधील कलहाची एक मोठी उद्बोधक कथा विस्ताराने आली आहे. दोन भावांपैकी कनिष्ठ भाऊ संस्कृत भाषेचा विलक्षण अभिमानी असून प्राकृतावर त्याचा संपूर्ण बहिष्कार आहे. संस्कृत भाषेचा अभिमान, आणि प्राकृत भाषेचा त्याग, यांच्या मागील आपली भूमिका कनिष्ठ भावाने पुढीलप्रमाणे स्पष्ट केली आहे.

संस्कृत वाणी देवांची । वेदरूपें ईश्वराची ।
आणि सकळां ऋषेश्वरांची । स्वर्गवासियां ॥२।२५९९
तेचि आपण बोलतां । तयांची पाविजे समानता ।
देवमनुष्य तत्त्वतां । होईजे कीं ॥ २।२६००
प्राकृता वाणी बोलणें । मानवीं, मूर्खीं, मूर्खपणें ।
वेद, शास्त्र, नेणणें । वैय्याकरण जेंही ॥ २।२६०१
आपण तयांसी अनुवादतां । अथवा शब्दें तेणें बोलतां ।
तया पामरांची समानता । आंगीं वाजे ॥ २।२६०२
देखोनि वायसांचिये समे । हंसे न राहिजे तेथ उमे ।
समानता आंगीं झोंबे । तया मूर्खांची ॥ २।२६०३
कंबळपटेसीं जोडिलें । तें पट्टकूळ मोला तुटलें ।
पायांतळीं पडिलें । जनांचिया ॥ २।२६०४
लसनाचिये संगती । कापुरा दोष लागती ।
म्हणोनि हीनाची संगती । सांडिली आम्ही ॥ २।२६०५

या विचारसरणीचा खुद्द दासोपंतांनी अगदी सडेतोड भाषेत निषेध केला असला, आणि 'संस्कृत प्राकृत समग्र । समान वाखो' (२।२६२३) हा सिद्धान्त प्रभावीपणे प्रस्थापित केला असला, तरी ज्यांची भाषा आपण बोलतो त्यांची 'समानता' आपल्याला प्राप्त होते, म्हणजे त्यांच्या अभिरुचीसारखी आपली अभिरुचि बनते, हे जे सत्य वरील कथेतील कनिष्ठ भावाच्या तोंडून बाहेर पडले आहे ते चिन्तनीय आहे. प्रतिष्ठित सुसंस्कृतांनी असंस्कृत सामान्य जनांची भाषा का बोलावयाची नसते याचे स्पष्टीकरण येथे मिळेल. आणि मुक्तेश्वरालाही याची जाणीव आहे हे स्पष्ट दिसते. 'जेविं कां शास्त्रज्ञाच्या वदनीं । संचरों न सके गोवळवाणी' असे तो म्हणतो. (आदि० २५।६६)

संस्कृत आणि प्राकृत यांच्या कलहात मराठीच्या अभिमानी कवींनी मराठीचा अपार गौरव केला, आणि परब्रह्माचे ज्ञान म्हणजे अध्यात्मविद्या मराठीच्याच द्वारे समाजाला देण्याची महत्त्वाकांक्षा बाळगली, हे अगदी बरोबर झाले. संस्कृत भाषेत निंदा केली तर ती

पवित्र ठरत नाही; आणि मराठी भाषेत हरिकथा केली ती अपवित्र ठरत नाही हे एकनाथांचे वचन (ए. भा. २९।१०३९) यथार्थ आहे. 'माझी मराठी भाषा चोखडी' या त्यांच्या वचनातील (ए. भा. २९।१०४१) अभिमानही आकलनीय आहे. पण या चोख भाषेच्या द्वारे हरिकथा करीत असता ती भाषा संस्कारयुक्त असली पाहिजे एवढी अपेक्षा आपण केली तर त्यात काय चुकले? ज्ञानाच्या प्रसारासाठी किंवा कथांच्या निरूपणासाठी आपल्या जुन्या कवींनी मराठीचा उपयोग केला यात काहीच बिघडले नाही. पण त्या मराठीवर संस्कार करून मगच तिचा उपयोग त्यांनी करावयास हवा होता एवढेच माझे म्हणणे आहे. 'गोवळवाणी', म्हणजे सामान्य माणसाच्या तोंडात रोजच्या व्यवहारात जी भाषा नित्य असते ती भाषा, शास्त्रज्ञांच्या तोंडी येता कामा नये असे वर उल्लेखिलेल्या मुक्तेश्वराच्या वचनात जे सूचित झाले आहे ते अगदी यथार्थ आहे. अशी 'गोवळवाणी' शास्त्रीय विवेचनात, तत्त्वज्ञानाच्या विवेचनात, अध्यात्माच्या विवेचनात जशी येता कामा नये तशीच ती प्रतिष्ठित आणि सुसंस्कृत व्यक्तींच्या जीवनावर आधारलेल्या कथाकाव्यातही येता कामा नये, असा आग्रह धरला तर त्यात काय चुकले? "संस्कृतें बोलिलें सेवणें। तेंचि सांडावें प्राकृत वचनें। ऐसियां मूर्खां मुंडणें। किती आतां?" असे दासोपंतांनी कितीही म्हटले (गीतार्णव, १।२२६) तरी जोपर्यंत प्राकृत भाषेवर संस्कार झाले नाहीत, आणि जोपर्यंत तिच्यावरील ग्राम्यतेचे वर्चस्व कमी झाले नाही, तोपर्यंत तात्त्विक विवेचनाच्या दृष्टीने, तसेच अभिरुचिसंपन्न प्रतिष्ठित नागर-काव्याच्या दृष्टीने, प्राकृत भाषेमध्ये वैगुण्य राहणारच. प्राकृत भाषेवर हे उच्च संस्कार झाले म्हणजे ती ज्ञानाची भाषा होण्यास, तसेच अभिजात काव्याची भाषा होण्यास, सर्वथैव पात्र झाली पाहिजे असा या साऱ्या प्रकारातील विवेक आहे. प्राकृत भाषा 'संस्कारवंत' झाल्या म्हणजे त्या 'संस्कृत' भाषाच होतात, संस्कृत आणि प्राकृत असा भेद नष्ट होतो, असा अभिप्राय कृष्णदयार्णवांनीही एका ठिकाणी व्यक्त केला आहे.

देशभाषा संस्कारवंत। तेव्हां त्याही म्हणाव्या संस्कृत।
एवं संस्कृत प्राकृत भेदरहित। हा संकेत समस्तां॥
देशभाषा आणि गीर्वाणी। इहीं नामें भिन्न दोन्ही।
संस्कृत प्राकृत सर्व वाणी। अभिन्नपणीं अभिधानें॥

(हरिवरदा, २।२७६–७)

तात्पर्य, महाराष्ट्रीय कवींनी अध्यात्माचे किंवा नीतितत्त्वांचे प्रतिपादन करण्यासाठी, अथवा परमेश्वराचे स्तवन करण्यासाठी, अथवा 'सुललित रसाळवाणी'ने प्रख्यात व उदात्त अशी प्राचीन आख्याने सांगण्यासाठी, मराठीचा आश्रय केला यात त्यांची कोणतीही चूक

झाली नाही. पण या मराठी भाषेवर जे योग्य संस्कार करणे जरूर होते ते न करताच असंस्कृत अवस्थेत त्यांनी तिचा ज्ञानाचे बोलणे करण्याकरिता, उदात्त व गहन विषयांचे निरूपण करण्याकरिता, आणि गतकालीन थोर महात्म्यांची चरित्रे सांगण्याकरिता अनिर्बंध वापर केला हे मात्र त्यांचे चुकले यात संशय नाही.

या जुन्या महाराष्ट्रीय कवींमध्ये एक फार मोठा अपवाद आहे हे ध्यानात ठेवणे जरूर आहे. ज्ञानेश्वर हा तो अपवाद होय. नागर पदबंधांचा हव्यास धरून 'मितले' आणि 'रसाळ' शब्द वापरण्याची त्यांनी पराकाष्ठा केली, 'अमृतातेंही पैजा जिंके। ऐसीं अक्षरें रसिकें मेळवीन' ही प्रतिज्ञा खरी करून दाखविली. साहित्याची उजरी जेणेकरून होईल असे 'नागर' (म्हणजेच सुसंस्कृत, संस्कारवंत) शब्द वापरण्याच्या त्यांच्या तीव्र आसक्तीच्या मागची भूमिका ध्यानात घेतली पाहिजे. 'नागर' आणि 'नागरपणा' या शब्दांची त्यांनी जी सतत पुनरुक्ति केली आहे तिच्यातील मर्म समजावून घेतले पाहिजे. ज्ञानेश्वरांना 'ज्ञानाची दिवाळी' करण्याची लालसा आहे, पण हे कार्य त्यांना 'विदग्ध' विन्यासाच्या द्वारे करावयाचे आहे. त्यांना 'शब्दश्री सच्छास्त्रिक' व्हावी असे वाटत आहे, आपल्या प्रबन्धातील अक्षरे 'ब्रह्मरसमुस्वादें' असावीत असे वाटत आहे. आणि यामुळेच ग्राम्य शब्दांचा वापर त्यांनी विशेष कटाक्षाने टाळला आहे. क्वचित् एखादा अपवाद आढळला तरी तो अपवादच! 'ग्रामणीं बोलिजे तें ग्राम्यगीत' अशी एकनाथांनी ग्राम्यगीताची व्याख्या केली आहे (ए. भा. ८।१६९). ग्राम्यगीत म्हणजे खेड्यातील रासवट लोकांचे गाणे. त्यात ग्राम्य शब्दांचा भरणा असणे स्वाभाविक आहे. अशा ग्राम्यगीताचे, आणि ग्राम्यस्त्रियांच्या गीतनृत्यांचे वर्णन करण्याचा प्रसंग आला असता ज्ञानेश्वरांनी 'ग्राम्यजनवार्ते'तील एकही शब्द न वापरता ते वर्णन अतिशय परिणामकारक केले आहे (ज्ञा. १७।२९४-८). शब्द वापरताना ज्ञानेश्वर फार सावधगिरी बाळगतात. ग्राम्यतेची सूचना ज्यांत आहे असे शब्द टाळण्याची ते शिकस्त करतात. देहधर्मांचे निदर्शक ग्राम्य शब्द, अथवा स्त्रीपुरुषांच्या गुह्यांगांचे निदर्शक ग्राम्य शब्द, येऊ नयेत याची विलक्षण दक्षता ते घेतात. वेश्या हा शब्द ज्ञानेश्वरीत फक्त एकदा आला आहे. याच अर्थाचा 'सामान्या' हा पर्याय शब्द देखील सबंध ज्ञानेश्वरीत फक्त तीन वेळा आला आहे. एका ठिकाणी 'गावद्वारीं अहेव' (बाजारसवाण) असा त्यांनी वेश्येचा पर्यायाने उल्लेख केला आहे; आणि अन्यत्र 'हाटभेटीचें कलत्र' असा उल्लेख केला आहे. 'स्वैरिणी' व 'जारिणी' हे शब्द दोनतीन ठिकाणी आले आहेत. पण 'रांड' हा ग्राम्य शब्द मात्र त्यांनी चुकून देखील वापरला नाही. 'विष्ठा' हा शब्द तीन ठिकाणी आला आहे. पण त्याचा ग्राम्य पर्याय चुकूनही आला नाही. 'विण्मूत्र', 'मलमूत्र', 'मूत्रशंख' हे शब्द दोन तीन ठिकाणी आढळतात. पण 'मुतणे' हा ग्राम्य शब्द मुळीच नाही. 'शिश्न' शब्द

फक्त एकदाच आला आहे. आणि तोही तामस ज्ञानाच्या संदर्भात आला आहे. 'वोकणें' आणि 'वांत' हे शब्द पाचसहापेक्षा जास्त ठिकाणी नाहीत. 'शुक्रशोणित' हा शब्द फक्त एकदा आला जाहे. 'थान' शब्द फक्त दोन ठिकाणी आला आहे. पण स्त्री-पुरुषांच्या गुह्यांगाचा वाचक ग्राम्य शब्द कोठेही आढळणार नाही. 'भग' अथवा 'योनि' हेही शब्द जेथे नाहीत तेथे ग्राम्य शब्दांच्या अभावाचा उल्लेख करण्याचेही कारण नाही.

ग्राम्य शब्दांवर ज्ञानेश्वरांचा असा कडकडीत बहिष्कार असल्यामुळे ग्राम्य अर्थाचा उद्भव होणे अशक्य झाले आहे. नाही म्हणावयास संबंध ज्ञानेश्वरीत ग्राम्य अर्थाचे चुकून एक उदाहरण आले आहे (१३।७०६). याचे विवेचन मागे (पृष्ठ ८७ पाहा.) केलेले असल्यामुळे येथे नुसता उल्लेख करीत आहे. ही ओवी ज्ञानेश्वरीत यावयास नको होती असेच मला वाटत आहे.

श्वानमैथुनाचा उल्लेख करण्याचा प्रसंग येताच ज्ञानेश्वर 'मिळणी' हा शब्द वापरतात (१३।६८१) आणि ग्राम्य शब्दाचा उल्लेख कटाक्षाने टाळतात.

ग्राम्य शब्द आणि ग्राम्य अर्थ कटाक्षाने टाळून आणि 'सनागर' म्हणजे सुसंस्कृत शब्दांची योजना करून ज्ञानेश्वरांनी ज्याप्रमाणे मराठी भाषेला 'संस्कारवंत' केली आणि तिला संस्कृत भाषेची योग्यता प्राप्त करून दिली त्याप्रमाणेच एकनाथ इत्यादी पुढच्या कवींनी केले असते तर त्यांच्या वाङ्मयात ग्राम्यतेने आणि औचित्यहानीने असले विचित्र थैमान घातले नसते, आणि सुसंस्कृत नागर मनाला खेद होण्याचा प्रसंग टळला असता.

वास्तविक पाहता मराठीसारखी प्राकृत भाषा 'संस्कारवंत' झाल्याबरोबर नागर संस्कृत भाषेच्या योग्यतेची कशी होते याचा उत्कृष्ट आदर्श ज्ञानेश्वरांनी मराठी साहित्याच्या प्राथमिक अवस्थेतच घालून दिला होता. या आदर्शाचे अनुकरण करणे एवढेच काम पुढच्या कवींना करावयाचे होते. परंतु या बाबतीत असंस्कृततेकडून सुसंस्कृततेकडे प्रवास न होता उलटा — म्हणजे सुसंस्कृततेकडून असंस्कृततेकडे—प्रवास झाला. किंबहुना ग्राम्यता हा मराठीचा जणू स्थायीभाव बनला. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात ग्राम्यतेच्या क्षेत्रात ज्यांनी विशेष कर्तबगारी गाजविली असे अलीकडचे 'निसुर्ग' मराठी नवकवी व नवकथाकार या जुन्या मराठी कवींचा आधार घेऊन स्वतःचे समर्थन करू लागले तर त्यांना कोण आवरू शकणार ?

*

वक्ता, श्रोता, परिस्थिती, आणि प्रतिपाद्य विषय यांचा कसलाही विचार न करता एकनाथासारखा शांत, सोज्वळ, विवेकी साधुपुरुष देखील आपल्या भाषेत ग्राम्य शब्दांची

आणि ग्राम्य अर्थाची कशी स्वैर पखरण करतो याची काही निवडक उदाहरणे येथे देणार आहे.

दशरथाच्या मृत्यूनंतर सहगमन करावयास उद्युक्त झालेली कौसल्या म्हणते—

पति जळतां धडधडां । आगीं न रिघती त्याच्या रांडमुंडा ।
तोडावी गळसरी फोडावा चुडा । सुखभोग पुढां तो ऐका ॥
(भा० रा० अयोध्या० २०।६६)

रामाला वनात घालवून कैकेयी दशरथाच्या मृत्यूला कारण झाली या विचाराने संतप्त झालेले अयोध्यावासी नागरिक पुढीलप्रमाणे कैकेयीचा धिक्कार करीत आहेत—

कैकेयीचें काळें तोंड । तिणें वाढविलें वरदबंड ।
तीस मंथरा मिळोनि लंड । दुःख वितंड वाढविलें ॥
(भा० रा० अयोध्या० १०।८०)

दशरथमृत्यूमुळे कौसल्येला झालेल्या अपार दुःखाचे श्रीधराने केलेले वर्णन तुलनेसाठी येथे देतो.

आक्रीशें कौसल्या सुमित्रा रडत । रामवियोगे दुःख बहुत ।
त्यांत मृत्यु पावला दशरथ । नाहीं अंत शोकातें ॥
जैसें पायास डंखिजे महाव्याळें । तों मस्तकीं वृश्चिकें ताडिलें ।
कीं वणव्यांत प्राणी सांपडले । त्यावरी तोडिलें तस्करांनीं ॥
(रामविजय, ११।१०५-६)

कैकेयीने रामाला वनात पाठविले या विचाराने संतप्त झालेल्या अयोध्यावासी जनांचा मनःक्षोभ वर्णिताना श्रीधर म्हणतो—

कैकेयी चांडाळीण खरी । सीतेची वस्त्रभूषणें हरी ।
तिजखालीं दुराचारी । कोण येथे नांदेल ॥
दशरथ आतां देईल प्राण । ओस पडलें अयोध्यापत्तन ।
कैकेयीचें शिरोवपन करून । छत्र धरोत कोणीही ॥
(रामविजय, १०।१९६-७)

एकनाथांनी खुद्द कौसल्येच्या तोंडी पुढील उद्‌गार घातला आहे. या उद्‌गारातील शब्दांची योजना मुद्दाम पाहावी.

राज्यलोभें परम दुःख । त्याचा कैकयीस हरिख ।
क्षुरें अभिषेका समस्तक । राज्यसुख भोगावया ॥
पतिअंतकाळीं काळें वक्त्र । त्यावरी मस्तकीं धरा छत्र ।
शीस बोडोनि साचार । युग्मचामरें ढाळावीं ॥
पतीस आगीं घालोनि आधीं । कैकेयी बसवावी गजस्कंधीं ।
हाका बोंबांचिये पैं नादीं । राज्यपदीं अभिषेका ॥
पुत्र बोडोनिया दोन्ही । कैकेयी बसवावी सिंहासनीं ।
(भा० रा० १०।५८-६१)

कौसल्येसारख्या सम्राज्ञीच्या तोंडी शोकाकुल अवस्थेत देखील 'शीस बोडोनि', 'पतीस आगीं घालोनि,' 'बोंबा', 'पुत्र बोडोनिया' यांसारखे शब्द येणे तिच्या कुलाचाराच्या, संस्कृतीच्या, आणि प्रतिष्ठेच्या दृष्टीने निःसंशय अनुचित आहे. या दृष्टीने श्रीधराने दाखविलेला संयम फार स्पृहणीय आहे.

भरताने राज्याभिषेक करून घ्यावा असे वसिष्ठाने सुचविले असता एकनाथांचा भरत संतापून वसिष्ठाला म्हणतो—

रामचंद्र गेलिया वना । जरी मी घेईन अभिषिंचना ।
तरी शूद्र भोगी द्विजविधवांगना । त्या गर्भस्थाना मी जाय ॥
सकळ रजस्वलेचें रुधिर । तेणें अभिषेका माझें शरीर ।
परी राज्याभिषेकाचें नीर । तें मी अणुमात्र स्पर्शेना ॥
(भा० रा० अयोध्या० ११।१०४-५)

रामावर आवेगाने धावून आलेल्या सुबाहु नामक घोर राक्षसाचा अवतार पाहून आश्रमातील ब्राह्मणांची भयाने जी दुर्दशा झाली तिचे हे वर्णन पाहा—

ऐकतां राक्षस आरोळी । भयें द्विज पडिले भूतळीं ।
एकांच्या बैसल्या दांतखिळी । एक ते चळचळीं कांपत ॥
एकांचीं धोत्रें गळती । एक ते धोत्रांत मुतती ।
एकां अधोवात सरती । एक करिती महाशब्द ॥
(भा० रा० बाल० १३।९५-६)

सुंदर स्त्रीचे रूप धारण करून आलेली शूर्पणखा लक्ष्मणाची विनवणी करताना म्हणते—

मजसारिखी सुंदर कांता । वनीं मिनलिया एकांता ।
नपुंसकही न सरे मायुता । तुझी पुरुषता सभयका ॥

मी तंव तुझी केवळ चरणदासी । सेवा करीन अहर्निशीं ।
शयन करूं पर्णशेजेसीं । शंका मानसीं न धरावीं ॥
माझा भोगिल्या गुह्यार्थ । कळेल सर्वही भावार्थ ।
माझेनि संगें पुरुषार्थ । जगीं विख्यात पावाल ॥

(भा० रा० अरण्य० ८।११४-६)

थोर श्रमलेति वनांतीं । चरण तळहातीन हातीं ।
दोघे शयन करूं एकांतीं । तेणें विश्रांति पावाल ।

(भा० रा० अरण्य० ८।१५५)

यावर चिडलेला लक्ष्मण शूर्पणखेला म्हणतो—

...तूं तंव लंड । बोलाची बडबड उदंड ।
घाय हाणोनि फोडी तोंड । तूं वेश्या रांड व्यभिचारिणी ॥

(भा० रा० अरण्य० ८।१५६)

शूर्पणखेने लक्ष्मणाची जी विनवणी केली तिचे श्रीधराने केलेले वर्णन तुलनेसाठी देतो.

तों शूर्पणखा ते वेळीं । सवेग पातली सौमित्रीजवळी ।
कामचेष्टा करी वेळोवेळीं । वचनमाधुर्यें बोलोनियां ॥
म्हणे वो अवधारा सुंदरा । बहुत हिंडल्यें वसुंधरा ॥
परि मज योग्य न मिळे नोवरा । कुशल तुर प्रतापी ॥
तरी आजि माझें धन्य भाग्य । पावल्यें स्वामीचें अर्धांग ।
आजि तप फळलें सांग । आली सवेग पुढेंचि ॥

(रामविजय, १४।५२-५४)

शूर्पणखेने येणेप्रमाणे प्रेमयाचना केली असता श्रीधराचा लक्ष्मण तिला पुढीलप्रमाणे उत्तर देतो.

सौमित्रि म्हणे वो सुंदरि राहें । आम्हां सीताराम वडील आहे ।
पैल वसती पंचवटिये । उमामहेश्वर ज्यापरी ॥
माय बाप गुरु बंधू । रघुवीर माझा कृपासिंधू ।
त्याचे आज्ञेविण हा संबंधू । कालत्रयीं घडेना ॥
शेष सांडील भूभार । पूर्वेस मावळेल दिनकर ।
तरी रामाज्ञेविण साचार । तुज न वरी निर्धारें ॥

(रामविजय, १४।६४-६६)

मराठी ग्रंथ संग्रहालय, दादर, मुंबई
अनुक्रम 104362 दि: 16.6.81
वर्गांक 891.2 बॉ दि 24/3/

राम दिसताच घाबरलेल्या राक्षसांच्या अवस्थेचे एकनाथांनी केलेले पुढील वर्णन पाहा.

श्रीराम देखतांचि दृष्टी । थरकाप सुटला पोटीं ।
मूत्रप्रवाह तळवटीं । शस्त्रें मुष्टीहूनि गळती ॥
(भा० रा० अरण्य० ९।१२४)

वीर कुंथती अपार । तेंचि कोकिळापंचमस्वर ।
(भा० रा० अरण्य० १०।५८)

सीतेच्या प्रेमाची याचना करणाऱ्या रावणाचा ती धिक्कार करते, आणि त्याच्या तोंडावर रामाशी त्याची तुलना करून म्हणते—

श्रीराम केवळ क्षीरसमुद्र । रावण मुताचें थिल्लर ।
(भा० रा० अरण्य० १६।१३२)

एवढ्याने समाधान न होऊन सीता पुढे म्हणते—

सांडोनिया अमृतपान । करावें कागविष्ठाभोजन ।
तेंवि त्यजोनि श्रीरघुनंदन । तुच्छ रावण भोगावा ॥
सांडोनियां सत्संगती । बैसावें सूकराचे पंक्ती ।
तेंवी त्यजोनियां श्रीरघुपती । रावण दुर्मती भोगावा ॥
कागाधरी श्राद्धविधान । तेथें विष्ठेने पितृतर्पण ।
तें न स्वीकारिती ऋषिजन । तें सेवण कागांचे ॥
(भा० रा० अरण्य० १८।६१७–६१९)

'रामविजया'त संतापलेल्या सीतेने रावणाची तीव्र निर्भर्त्सना केली आहे. पण 'मुताचे थिल्लर', 'कागविष्ठाभोजन', 'रावण भोगावा', 'विष्ठेने पितृतर्पण' यांसारखा एकही शब्द सीतेच्या तोंडी येणार नाही अशी श्रीधराने दक्षता घेतली आहे. श्रीधराच्या सीतेचे बोलणे अधिक प्रभावी आहे.

जानकी म्हणे दशमुखा । महातस्करा मलिना मूर्खा ।
पतंग आलिंगितां दीपका । कैसा मग वांचेल पै ॥
सौंदणी आणि समुद्र । दोन्ही एकराशी साचार ।
वायस आणि वैनतेय पक्षींद्र । एकराशी होतसे ॥
मदनें सर्वांसि जिंकिलें । परी शिवापुढे न चाले ।
अग्नीनें सर्वांसि जाळिलें । परी मेघापुढे काय तो ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय दादर
दि. क्र. 7660

सर्वांसि गांजिसी तूं परम । परी मज स्पर्शतां होती भस्म ।
आतां तुज वधावया रघूत्तम । पूर्णकाम येईल ॥
(रामविजय, १५।२०६-२१४ पाहा.)

या सीतेच्या भाषणात एक तरी शब्द असभ्य किंवा ग्राम्य आहे काय ? पण परिणामाच्या दृष्टीने ते थोडे तरी उणे आहे काय ? आणि ग्राम्य शब्द घालायचे तरी कुणाच्या तोंडी ? सीतेच्या ?

वालीने रावणाचा अगदी सहज पराभव केला आणि खेळणे म्हणून त्याला अंगदाच्या पाळण्यावर बांधले. या प्रकाराचे एकनाथाने केलेले वर्णन देतो.

दहा मुकुटमुखें शिरीं । त्यासी धरोनि वानरीं ।
अंगदाच्या पाळण्यावरी । खेळण्यावारी बांधिलें ॥
अंगदाचें धारोष्ण मूत । रिचवे रावणाच्या मुखाआंत ।
मुखावरी हाणी लात । मुलें चिमटीत सर्वांगें ॥
(भा० रा० किष्किंधा० ३।११०-१)

'धारोष्ण मूत' रावणाच्या तोंडात रिचविण्याची ही एकनाथकृत कल्पना मोठी बहारीची आहे यात शंका नाही. पाळण्यात निजलेल्या अंगदबाळाचे 'रूपडें' वाचकांनी मनश्चक्षूंसमोर उभे करण्याचा प्रयत्न करून पाहावा.

श्रीधराने याच प्रसंगाचे वर्णन 'रामविजया'च्या दुसऱ्या अध्यायात केले आहे.

तैसा वाळीपुढें उभा रावण । सावध होतां शक्रनंदन ।
ग्रीवेशीं दशग्रीव धरोन । कक्षेमाजीं दाटिला ॥
चतुःसमुद्रीं करोनि स्नान । किष्किंधेसि आला परतोन ।
अंगदाच्या पाळण्यावरी नेऊन । उफराटा रावण बांधिला ॥
क्षणाक्षणा धरोनि दाढी । अंगदबाळ भावें उपडी ।
(रामविजय, २।१५७-८)

पाळण्यावर उफराट्या बांधलेल्या रावणाची दाढी ओढणे पाळण्यात निजलेल्या अंगदबाळाला सहज शक्य आहे. पण त्याची मूत्रधारा रावणाच्या तोंडात कशी जाणार ? प्रश्न आहे खरा. कसले हे तऱ्हेवाईक कल्पनाचित्र !

वास्तविक एकदा या प्रसंगाचे अगदी रसपूर्ण प्रभावी वर्णन केल्यानंतर पुन्हा तसेच वर्णन करण्यात कोणताही मतलब नाही. पण सामान्य श्रोत्यांच्या असंस्कृत अभिरुचीला

बळी पडून एकनाथांनी युद्धकांडात ते वर्णन पुन्हा एकदा तपशीलवारपणाने केले आहे. शब्द थोडे वेगळे आहेत इतकेच काय ते.

ऐसा देखतां वानरीं । अंगदाच्या पाळण्यावरी ।
रावण बांधला खेळण्यावारी । हेममूत्री शृंखला ॥
बाळलीलापदसंचारी । लाथा हाणी मुखावरी ।
अंगदमूत्राची धार थोरी । रिघे मुखांतरीं रावणाच्या ॥
चिमटितां वानरवानरीं । दांत विचकी नानाविकारीं ।
टोले देतां शिरावरी । डोळे त्यावरी मिचकावी ॥
लाता हाणितां संमुखा । क्षतें पडलीं दहाही मुखां ।
अंगद पारखी निका । तेणें दशमुखा ओळखिलें ॥
अंगद म्हणे " त्यांतील तूं कोण । हें पुसावें न लगे जाण ।
माझे लातांचे वण । तुझे मुखीं संपूर्ण दिसती ॥
माझ्या मुताची बाळधार । तुझे मुखीं पडतां निरंतर ।
तेही चिन्हें उभय अधर । घासली कोर दिसतले ॥ "

(भा० रा० युद्ध० ८।३९-४४)

पाळण्यातील अंगदबाळ जर येणेप्रमाणे रावणाला बोलू शकते, तर पुढे प्रौढप्रतापी अंगदवीर

हनुम्यानें जाळिलें तुझ्या तोंडा । समेसि बैसलासि काळतोंडा ।
वृथा बोलसी बळबंडा । ऐक लंडा निजहिता ॥

(भा० रा० युद्ध० ८।९८)

असे आवेशाने बोलला तर ते अगदी स्वाभाविक असेच आहे.

' रामविजया 'च्या २५ व्या अध्यायात शिष्टाईसाठी गेलेल्या अंगदाने पाळण्यावरील खेळण्याच्या प्रकाराचा उल्लेख केला आहे. पण तो अगदी संयत असून ' मुताची बाळधार ' असला काही एक प्रकार त्यात नाही.

माझा पिता त्याहे कोण । तो तूं नेणसी दुर्जना अद्यून ।
जेणें कक्षेंत तुज दाटून । केलें स्नान चतुःसमुद्रीं ॥
मग माझे पालखावरी देख । तुज बांधिला जैसा मशक ।
तुझ्या दाढ्यामिशा सकळिक । म्यांच उपडिल्या बाळपणीं ॥

(रामविजय, २५।४३-४)

क्रौंचा नामक राक्षसीचे काळीज मारुती ओढून बाहेर काढतो व तिच्या पोटात शेपूट घालतो.

पुच्छ वाढवोनि वानरें । कंठीं सूदलीं पुच्छाग्रें ।
तेणें ते खोकोनि गजरें । मग ओकारी सूटली ॥
पुढें देतां ओकारें । मागें अधोवात सरे ।
गांजूं आदरिलें वानरें । हागी ओकारें लागलें ॥
अधोवाताचे गजरीं । उडविल्या निशाचरी ।
त्या परिश्रमोनि अंबरीं । पडोनि सागरीं बुडाल्या ॥
(भा० रा० किष्किंधा० १८।७८–८०)

आता रावणाची एक कथा ऐका. शिवलिंग घेऊन रावण लंकेकडे निघाला असता त्याला जबर लघुशंका लागली. शिवलिंगाच्या पावित्र्यामुळे ते जमिनीवर ठेवता येईना. एवढ्यात गाई राखीत असलेला गणेश त्याला दिसला. गणेशाजवळ त्याने शिवलिंग दिले. 'तू लवकर परत आला नाहीस तर शिवलिंग मी जमिनीवर ठेवीन' अशी गणेशाने त्याला अट घातली. पुढचा कथाभाग अत्यद्‌भुत असल्यामुळे मुळातून देतो.

त्रिवार गर्जनेसीं । प्रतिज्ञा नेमूं जाण ऐसी ।
तुज न येतां त्वरेंसीं । लिंग भूमीसी ठेवीन ॥
ऐसी निगुती करोनि देखा । करूं गेला लघुशंका ।
मुतीं गुंतविलें दशमुखा । कांहीं आवांका चालेना ॥
कष्टीं मूत मोकळें होत । तंव तें झालें अत्यद्‌भुत ।
धारावर्तीं प्रवाहत । मूतीं लंकानाथ गुंतला ॥
गणेश करी गर्जनेसी । रावण गुंतला मुतापासीं ।
लिंग ठेवोनि भूमीसीं । घेवोनि गाईंसी तो गेला ॥
(भा० रा० सुंदर० ६।११६–११९)

मारुतीच्या जळत्या शेपटाने लंकेमध्ये जो अनर्थ केला त्याचेही वर्णन असेच अद्‌भुत आहे.

एकाच्या वस्त्रा लाविली आगी । तेणेंचि जळती सर्वांगीं ।
पुच्छ घाली एकाचे ढुंगीं । नेसण्या आगी लावी एका ॥
एकाचीं मुंडासीं जळत फेडूं जातां पोळले हात ।
एकाचे झगे जळत । एकाचे जळत कटिबंध ॥

आगी लागली धोत्रासी । द्विज पोळले लिंगप्रदेशीं ।
नागवे नाचती रावणापासीं । दाविती त्यासी निजलिंग ॥
रावणा तेथें लावी हात । कांहीं तरी व्यथा होईल शांत ।
वेदविभागी तू पुण्यवंत । पद्महस्त पैं तुझा ॥
कन्यासंक्रांतीं दुष्कर्म । करूं नये श्मश्रुकर्म ।
शब्दें वाढलीं पैं परम । कोपानुक्रम न करावा ॥

(भा० रा० सुंदर० १९।४९–५३)

या उताऱ्यात ग्राम्य शब्दांची, ग्राम्य उद्‌गारांची, आणि ग्राम्य कृतींची झालेली रेलचेल पाहून मराठी भाषेच्या सामर्थ्याचे कोण कौतुक करणार नाही? वानरांनी वनरक्षकांना यथेच्छ बडवले आणि त्यांना हाकून देऊन ते मधपान करू लागले असा एक प्रसंग सुंदरकांडात आहे. वाल्मीकिरामायणातील उल्लेख पुढीलप्रमाणे आहे.

उत्पत्य च ततः सर्वे वनपालान्समागतान् ।
ते ताडयन्तः शतशः सक्ता मधुवने तदा ॥
मधूनि द्रोणमात्राणि बाहुभिः परिगृह्य ते ।
पिबन्ति कपयः केचित्संघशस्तत्र हृष्टवत् ॥

(सुन्दरकाण्ड, ६२।८–९)

'ते ताडयन्तः शतशः' एवढ्या सुताचा आधार मिळताच एकनाथांनी आपल्या (ग्रामीण) श्रोत्यांसाठी केवढा प्रपंच केला आहे ते पाहण्यासारखे आहे.

लाहोनि अंगदआज्ञापन । वनीं रिघोनि वानरगण ।
केलें वनकरांसि ताडण । जानुअपानमहामारू ॥

(भा० रा० सुंदर० २४।६२)

'जानुअपानमहामारू' या संस्कृतसदृश शब्दाने प्राकृत श्रोत्यांचे चित्त रिझणार नाही अशी शंका येऊन एकनाथांनी त्याचे प्राकृतात विवरण केले आहे.

नाही घेतले तोंडावरी । नाहीं मारिले बुक्क्यावरी ।
गांडगुडघ्याचे महामारीं । वनकर बाहेरी घातले ॥

(भा० रा० सुंदर० २४।६३)

भरपूर मार खाल्लेले बागेचे ते राखणदार दधिमुख नावाच्या मुख्य रखवालदाराजवळ झालेल्या प्रकाराबद्दल कागाळी नेतात.

लाता बुक्क्या सुबद्ध घाये । त्या घायांचें भय काये ।
शिळा शाळ ताळ येतां पाहे । झेलिलें जाय तळपोनी ॥

हाणितां नेटें जानु अपान । गुदें आली गा सुजोन ।
जळो तुझें मधुवन । गुदकंदन कोण सोसी ॥
गांडगुडघ्याचा आघात । पुच्छें रिघालीं ढुंगांत ।
दधिमुखासी दुःख सांगत । सुजलीं दावित निजगुदें ॥
गांडी सुजल्या गांडगुडघ्यासो । तो राग वनकरांचे मानसीं ।
(भा० रा० सुंदर० २४।७८-८०, ८८)

लंकेमध्ये मारुतीने केलेल्या घोर अनर्थाचे वर्णन एकनाथांना करावयाचे आहे हे मान्य आहे. या वर्णनात अतिशयोक्ति येणे स्वाभाविक आहे हेही मान्य आहे. परंतु यासाठी ग्राम्य शब्दांचा व ग्राम्य कृतींच्या वर्णनाचा वापर अपरिहार्यच आहे का ? मला तसे मुळीच वाटत नाही. हेच वर्णन मूळ वाल्मीकि रामायणातून वाचावे म्हणजे मी काय म्हणतो ते कळेल. आपले वर्णण परिणामकारक व्हावे यासाठी वाल्मीकीचा सतत प्रयत्न चाललेला आहे, परंतु रसप्रकर्षासाठी ग्राम्य आणि अनुचित वर्णनाचा मोह वाल्मीकीला कधीही पडत नाही. व्यक्तीचा स्वभावधर्म व तिची परिस्थिती या गोष्टींच्या अनुरोधाने क्वचित् एखाद्या ग्राम्योक्तीने रसप्रकर्षाला बाध येणार नाही हे खरे असले तरी अशा ग्राम्योक्तींची एकसारखी पुनरुक्ति करीत राहणे हे काही चांगले लक्षण नाही. ' मज अंगीकारी भोगार्थी ' असे रावण सीतेसमोर बोलला (भा० रा० अरण्य० १८।६१५) किंवा ' एकैक थान गावें बारा ' (भा० रा० अरण्य० १९।८) असे राक्षसणीच्या विक्राळ रूपाचे वर्णन केले, किंवा ' तुझे सर्वांगाचिया शिरीं । करूं शेवयांची खिरी । काळीज काढोनि बाहेरी । कोशिंबिरी करू आम्ही ॥ ' अशी त्या विकट, विक्राळ राक्षसींनी सीतेला भीति घातली (भा० रा० अरण्य० १९।३०), किंवा ' यमाची मी नळी निमटी । कळिकाळाची फोडीन कवटी । ' असे रावणवधाची घोर प्रतिज्ञा करताना राम म्हणाला तर ते संदर्भाच्या अनुरोधाने क्षम्य मानावे लागेल. पण हनुमंताजवळ सीतेचे वर्णन करीत असता रामासारख्या धीरोदात्त पुरुषाने

अंगींच्या अंगीं वाढोनि दोनी । जीवशिव कुच दोन्ही स्थानीं ।
जग जीववी स्तनपानीं । कुचकामिनी स्तनभारें ॥
जीवशिवकुचांचे मर्दन । करिता एक श्रीरघुनंदन ।
येर बापुडें मशक कोण । मरेल रावण अभिलाषी ॥
(भा. रा. किष्किंधा० १३।४८, ५०)

असे म्हणणे अनुचित आहे, हे मान्य करण्यास कोणीही खळखळ करणार नाही. कारण हा सदभिरुचीचा आणि औचित्याचा प्रश्न आहे. जे वाल्मीकीने चुकून सुद्धा केले नाही ते एकनाथांना करण्याचे—आणि इतक्या विस्ताराने करण्याचे कारण काय ? मागे मी

सुचविल्याप्रमाणे (पृष्ठ ९१ पाहावे.) श्रोत्यांच्या बौद्धिक आणि सांस्कृतिक पातळीवर उतरण्याचा, आणि त्यांच्या वृत्तीला रुचेल व समजेल अशाच भाषेचा आणि प्रतिमानांचा वापर करण्याचा, हव्यास याच्या मुळाशी असला पाहिजे. सामान्य लोकांना समजावे म्हणून त्यांच्या प्राकृत भाषेत बोलणे ही गोष्ट अगदी बरोबर आहे. पण ही प्राकृत भाषा 'संस्कारवंत' करून त्या सामान्य लोकांच्या संस्कृतीचा दर्जा वाढविण्याऐवजी आपले थोर मराठी कवी सामान्यांच्या पातळीवर उतरतात ही घटना अतिशय खेदकारक आहे. आपण सामान्य लोकांसाठीच वाङ्मय लिहीत आहोत, म्हणून त्यांच्या नित्याच्या भाषेतील आडदांड, रासवट, ग्राम्य, आणि जुगुप्सा उत्पन्न करणारे शब्द आणि वाक्प्रचार, आपण जसेच्या तसे वापरले पाहिजेत, त्याखेरीज ते खरे प्राकृत वाङ्मय होणार नाही, या कल्पनेच्या आहारी एकनाथासारख्यांनी जावे हे शल्य मनात सारखे सलत राहते.

आणि या वृत्तीमुळेच, हनुमंताने लंकेत केलेल्या उत्पाताचे वर्णन करीत असता राक्षसांच्या लिंगच्छेदनाच्या प्रकाराचे एकनाथांनी विस्तृत वर्णन केले आहे. एका ओवीत जो कार्यभाग झाला असता त्यासाठी अनेक ओव्या खर्ची पडल्या आहेत. जिकडे तिकडे अंधार झाल्यामुळे घाबरलेल्या राक्षसांचे वर्णन 'एक फळफळा मुतत। एका सुटला अधोवात।' या शब्दांनी केले आहे. एका पोथीतील जो पाठ तळटीपेमध्ये घेतला आहे त्यातील लिंग-वर्णन तर कमालीचे किळसवाणे आहे. (भा० रा० सुंदर० पृ. १७०. ज. रा. घारपुरे यांनी संपादित केलेली आवृत्ति, १९५८) मारुतीने रावणाच्या नाकाला शेपूट लावताच रावणाची जी दशा झाली तिचेही वर्णन असेच किळसवाणे आहे. 'पुढें शिंकेचे पडतां नेट। बृहती वाजे परपराट' (भा० रा० सुंदर० ३२। ११०) यासारखी 'सुभाषिते' इतस्ततः पसरली आहेत. असेच किळसवाणे वर्णन पुन्हा एकदा कुंभकर्णाच्या वर्णनात आले आहे.

शेंबुडाच्या बेडक्यांत। राक्षस दडपती असंख्यात।
रावणाचे सभेआंत। शेंबूडपर्वत वीरांवरी॥
कुंभकर्णाच्या शेंबुडांत। सभा जाहली सचैल स्नात।
(भा० रा० युद्ध० २०।११८–११९)

बळीच्या राज्यात रावणाची फटफजिती कशी झाली याचे वर्णन युद्धकांडात एका कथेत आले आहे. बळीच्या सेवकांनी रावणाची जी विटंबना केली तिचे हे वर्णन पाहा.

येवोनि बळीचे सेवक। अलंकार एक एक।
वस्त्रें शस्त्रें हिरोनि देख। नेला दशमुख अतिदूरीं॥
अति बळेंसीं कुंथत। युद्धा आला लंकानाथ।
त्याचा निवडला पुरुषार्थ। विटंबनार्थ तो ऐका॥

आगे लंड पिछे गांड । सेवकीं केलें भंडोभंड ।
रावणाचें काळें तोंड । लज्जावितंड तेणें त्यासी ॥
रावण राजा अतिसमर्थ । न्हावी न मिळेचि तेथ ।
केश लांब दहा हात । असे दावीत जगासी ॥
(भा० रा० युद्ध० ७।१११-११४)

बळीच्या राज्यात रावणाची जी अक्टोविकट विटंबना झाली तिचे वर्णन श्रीधरानेही केले आहे. पण श्रीधराने यत्किंचित् ग्राम्यता आणली नाही हे ध्यानात ठेवण्यासारखे आहे.

जाहला परम अपमान । माघारा चालिला दशवदन ।
तों मार्गीं बळीचे सेवकजन । त्यांणीं रावण नागविला ॥
घेतलीं वस्त्रेंशस्त्रें हिरून । मुखासी तेलमसी लावून ।
बीसही हस्त बांधोन । नगरामाजीं हिंडविती ॥
एक अंगावरी धुळी टाकिती । एक दाढी धरोनि ओढिती ।
एक बळेंचि बैसविती । एक उठविती सवेंचि ॥
एक करिती शेणमार । काकूळती येत दशकंधर ।
पळों पाहे जंव बाहेर । तंव द्वारपाळ जाऊं नेदी ॥
(रामविजय, २।१४१-१४४)

भावार्थरामायणासारख्या कथाकाव्यात वर दिलेल्या उदाहरणांतील ग्राम्यतेचा अतिरेक खपवून घेण्याइतपत मनाचा उदारपणा दाखविण्यास आपण तयार झालो तरी भागवतासारख्या वेदान्ताचे प्रतिपादन करणाऱ्या प्रौढ ग्रंथाला तरी ग्राम्यतेचा व अनौचित्याचा विटाळ होऊ नये असे सुसंस्कृत नागर मनाला वाटले तर मराठी भाषेच्या प्रतिष्ठितपणाची व सुसंस्कृतपणाची जपणूक करण्याच्या लालसेतूनच ही भावना निर्माण झाली आहे असे प्रज्ञावन्त मार्मिकांनी समजावे.

*

मराठी वाङ्मयावर, मराठी भाषेवर, आणि महाराष्ट्राच्या सामाजिक व आध्यात्मिक जीवनावर अपार उपकार ज्यांनी करून ठेवले आहेत अशा एकनाथमहाराजांविषयी माझ्या मनात नित्य आदराची किंबहुना भक्तीचीच भावना जागृत असल्यामुळे त्यांच्या वाङ्मयात आलेल्या ग्राम्यतेमुळे आणि अनौचित्यामुळे माझ्या मनाला खेद झाला. पण मुक्तेश्वराने या बाबतीत जी वृत्ति दाखविली आहे ती निःसंशय तिरस्करणीय आहे. ग्राम्य शब्द वापरावयास, अनुचित वर्णने करावयास, आणि अश्लीलार्थ बळेच आणण्यास मुक्तेश्वर सरावलेला

आहे—किंबहुना चटावलेला आहे. याची काही शेलकी उदाहरणे मागे मुक्तेश्वरी वाङ्मयातून दिलेली आहेत. (मागे पृष्ठ पाहावे.) लज्जा नावाची काही वस्तु असते याची मुक्तेश्वराला जाणीव असल्याची खूण दिसत नाही. त्याचे 'शुकरंभासंवाद' हे सारेच प्रकरण या दृष्टीने वाचनीय आहे. 'जन्मस्वभावें शुक मुक्त । विवेक वैराग्यपूर्णभरित' असे एकनाथांनी शुकाचे वर्णन केले आहे. (भा० रा० बाल० १०।११). त्याने स्त्री पाहिली नाही, स्त्रीची कधी भेट घेतली नाही. 'शुकें स्त्रिया नाहीं देखिल्या दृष्टी । नाहीं स्त्रियांची घेतली भेटी ।' असे त्याचे कडकडीत वैराग्य होते. (भा० रा० बाल० १०।१९). नेहमी दिगंबर अवस्थेत वावणाऱ्या शुकाने जनकाच्या नगरीत प्रवेश करताना जनात हसे होईल म्हणून लोकलज्जेसाठी वल्कलाची कौपीन (लंगोटी) धारण केली. पण मुक्तेश्वराने जनलज्जेची आणि मनलज्जेची 'कौपीन' झुगारून दिली आहे हे विदेही अवस्थेत निर्द्वंद्व वृत्तीने राहणाऱ्या व 'ज्ञात्यामाजी ज्ञानवरिष्ठ' असलेल्या शुकाच्या तोंडी मुक्तेश्वराने 'शुकरंभासंवादा'त जे उद्गार घातले आहेत त्यावरून दिसून येईल. मुक्तेश्वराच्या शुकाने स्त्रीदेहाची निंदा करताना जे 'वाग्विटंबन' केले आहे त्याचे काही नमुने मागे (पृष्ठ ६६–६७ वर) दाखविले आहेत. पण याहीपेक्षा किती तरी चमत्कार त्याने केले आहेत ते पाहिल्यावर—

एकाहुनि अधिक करिति चमत्कार बा नवनवा हे ॥

या मोरोपंतांच्या उक्तीची आठवण होते. मुक्तेश्वराचे शुकाचार्य म्हणतात—

कीं तृणाचे अग्रीं जळबिंदु । पडतां न लगे क्षणपाडु ।
तैसा स्त्रीसंगाचा आनंदु । रेतपातीं लवमात्र ॥ ३६६
दर्पण धरोनि कानवडा । त्यावरि ठेवूनि निसरडा ।
पडतां वेळ लागेल केव्हडा । वीर्यस्खलन त्या वेगें ॥ ३६७
कळे न कळे ऐसा संतोष । होवोनि, नासतां न लगे निमिष ।
शेखीं दुःख उरे अशेष । महापुण्यक्षय करी ॥ ३६८
स्त्रीरमणीं होय सुख । तें मिथ्या नेणती मूर्ख ।
स्त्रीचा संगमात्र देख । होतां, तोष तेथे नाहीं ॥ ३७२
शिवणीभाजी योनिस्थान । तेथें बिंदूचे आगमन ।
होतां, कंद्रू उद्भवे गहन । 'मैथुनानंद' ज्या म्हणती ॥ ३७३
योनीबिंदूची भेटी । सरतां देहीं आल्हाद उठी ।
तें दोन्ही स्थानें पुरुषानिकटीं । बुजती पोटीं कळाविद ॥ ३७४
म्हणसी मानविनी कनिष्ठ । आपुलें देह वरिष्ठ ।
हें बहुतांचे उच्छिष्ट ताट । घोंगावलें विकारीं ॥ ४१४

देवळीं मांडिली भेरी । बडवितीया कोण निवारी ?
तैशीं वक्षःस्थळाची परी । आवडे तेणें मर्दीवें ॥ ४१६
कीं वाकळ पडे वाटेवरी । ते काठीनें उचलिजे वाटसरीं ।
तैसी नितंबवस्त्राची परी । उघडिल्या नाहीं निषेध ॥ ४१७
उखळ रोंविलें धर्मशाळे । भलती कांडी भलत्या वेळे ।
तैसें कामालय मोकळें । स्वर्गकामें यजिती त्या ॥ ४१९
कीं ग्रामद्वारीं मांडिले खोडे । अन्यायी पायीं सुदती देवडे ।
तरी तृप्ती न मानुनी तोंडें । उघडें असिजे सर्वदा ॥ ४२०
तैसें बहुतीं बहुत काळ । सेवसेवूनि केले सैल ।
तरी भोगित्यापुढे उतावेळ । सन्मुख सदा पसरलें ॥ ४२१

' योगियांचा परम ईश ', ' यतींमाजी परमहंस ', ' जितेंद्रिय सत्त्वमूर्ति ', आणि जो ' तपोवैराग्यें थोरावला, ' अशा शुकाला मुक्तेश्वराने रंभेसमोर जे बोलावयास लाविलें आहे ते पाहून—

लाज पळाली मागुतीं । ठावी न पडे कैं गेली ॥

ही मुक्तेश्वराची उक्ति खुद्द त्याच्याच बाबतीत वापरावयाचा मोह होतो.

*

मुक्तेश्वराची एक तऱ्हा तर वामनपंडिताची आणखीच न्यारी तऱ्हा. कृष्ण आणि गोपी, कृष्ण आणि राधा यांचा आधार घेऊन वामनाने आपल्या साऱ्या विपर्यस्त मनोवृत्तींना स्वैर अवसर प्राप्त करून दिला आहे. गोपींच्या भक्तीची परीक्षा पाहण्याची कृष्णाची रीत कोणती ? तर त्या नग्न होतील अशी व्यवस्था करणे. त्यांच्या नग्नावस्थेचे वर्णन करण्यात वामनाला मोठी गोडी वाटते. ' जलक्रीडा ' नामक प्रकरणात कृष्णासमवेत गोपी नौकेत बसून यमुनेत जलक्रीडा करावयास निघाल्या आहेत. नावेला भोके पडली होती. त्यांमधून पाणी आत येऊ लागले. तशात जोराचा वारा सुटला. पाणी आत येऊ लागलेले पाहतांच गोपी घाबरल्या. यावर कृष्णाने त्यांना खाशी युक्ती सांगितली.

लावा कंचुकि, नावरे तरि चिरें फेडूनि छिद्रें भरा.

चोळ्या काढून नावेच्या छिद्रात कोंबा, आणि तरी सुद्धा पाणी आवरले नाही तर लुगडी फेडून छिद्रे बंद करा, असा सल्ला कृष्णाने दिल्याबरोबर त्याच्या चहाटळपणाची त्यांना कल्पना आली.

तों त्या हांसति लाजती म्हणति ' गे हा जार पूरा खरा. '

पण त्याचे बोलणे खरे मानून पदर आड करून त्यांनी आपल्या चोळ्या काढल्या आणि नावेच्या छिद्रात बोळे घालू लागल्या. पण पाणी काही आवरेना. तेव्हा घाबरलेल्या त्या गोपींना कृष्णाने लुगडी फेडून आत येणारे पाणी थांबविण्याचा सल्ला दिला.

वस्त्रेंहि सोडा म्हणतो मुरारी.

आणि कृष्णाच्या म्हणण्याप्रमाणे 'राहिल्या वधु निरांत दिगंबरा.' परीक्षा उतरणे म्हणतात ते हेच !

गोपींना दिगंबर करण्याचा हा प्रकार पुन्हा 'नौकाचरित्र' याही प्रकरणात आला आहे. साऱ्या घटना त्याच.

तों बोले व्रजपाळ गोकुळपती आहे तसा यत्न कीं
छिद्रें हीं बुझणें तुम्हीं सकळिकीं फेडूनिया कंचुकी ॥

गोपींनी तसे केले. पण पाणी आत येण्याचे थांबेना. त्या विलाप करू लागल्या. 'तों काय बोले हरी ?'

चीरें फेडुनि सर्वही तुम्हि बुझा छिद्रें बहु सत्वरीं ।

आणि मग सारी लाजलज्जा सोडून देऊन त्या गोपींनी कृष्णाच्या सांगण्याप्रमाणे आपली लुगडी फेडली.

लज्जा त्या त्यजुनी विलासगमनीं वस्त्रें करीं फेडिलीं ।

आणि असे ही 'गीत' जे गातील किंवा ऐकतील ते मोक्षपद पावतील असा निर्वाळा द्यावयास वामन विसरला नाही !

गाती ऐकती हें प्रतीकरुनियां मोक्षास ते पावती ।

'कात्यायनी व्रत' या प्रकरणात वामनाने गोपींची लुगडी फेडण्याचा हा प्रकार अधिक विस्ताराने आणि साक्षेपाने केला आहे. आणि हे सारे अध्यात्माच्या नावाखाली केले आहे, हा त्यातील सर्वात तिरस्करणीय भाग आहे. गोपींना दिगंबर करणे हा भक्तिमार्गातील एक टप्पा आहे असेच वाचकांना व श्रोत्यांना वाटावे अशीच वामनाने तरतूद केली जाहे.

अशा दिव्य अध्यात्मरूपें हरी तो
करूनी कथा जो अविद्या हरी तो ।
करी त्यामधें भक्तिची सूचनाही
विनाभक्ति विज्ञान कांहींच नाहीं ॥

काठावर लुगडी ठेवून व दिगंबर होऊन गोपी पाण्यात शिरल्या असता कृष्ण त्यांची लुगडी पळवतो आणि कदंबाच्या झाडाच्या फांदीवर ती ठेवून तेथे बसून त्यांची शोभा पाहत बसतो अशी कलात्मक प्रस्तावना करून वामनाने पुढे पाण्यातून बाहेर पडताना झालेली त्या गोपींची तारांबळ तपशीलवार वर्णिली आहे. आणि त्यांची ती त्रेधा पाहून कृष्णाच्या मनावर झालेल्या परिणामाचे वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे.

त्रपाऱ्यागें प्रीत प्रभु बहुत झाला हरि परी
स्थळें जीं कामाचीं कयुगुळ देखे तदुपरी ।
क्रिया कामस्थानीं भजनविषयीं काम दवडी
जसा कामी भक्त प्रभुवर तसे त्यास निवडी ॥

पण गोपींनी गुह्यांगावर हात ठेवून ते दडविले हे देखील कृष्णाला सहन झाले नाही.

तों आड कामसदनावरि दोनि पाणी
ते काढिल्याविण न दे वर चक्रपाणी ॥

हा सारा अद्‌भुत प्रकार भक्तीच्या नावाखाली चालला आहे ही खरोखरच शरमेची गोष्ट आहे. पण या मराठी कवींच्या कोशात शरम इत्यादी शब्द कधीच नसावेत असे दिसते. गोपींनी सारी लज्जा सोडून द्यावी, आणि दोन्ही हातांनी दिगंबर अवस्थेत आपल्याला नमस्कार करावा, अशी कृष्णाने अट घातली. एका हाताने गुह्य अवयव लपवावा आणि दुसऱ्या हाताने वंदन करावे हा गोपींचा प्रकार कृष्णाला सहन झाला नाही. आणि दोन्ही हातांनी नमस्कार केल्याखेरीज लुगडी परत मिळत नाहीत अशी खात्री झाल्यामुळे अखेर नाइलाज होऊन गोपींनी दोन्ही हातांनी त्याला नमस्कार केला. असे हे दिव्य कात्यायनीव्रत आहे ! गोपींना संपूर्ण नग्न अवस्थेत पाहावयास मिळावे म्हणून कृष्ण ज्या विचित्र लीला करतो त्या पाहिल्यावर हे मराठी कवी आपल्या विकृत मनोवृत्तीच्या जोपासनेसाठी विश्ववंद्य अवतारी पुरुषोत्तमाला देखील राबविताना कसलीही लाज बाळगीत नाहीत असे स्पष्ट म्हणावेसे वाटते. त्यांची ही मनोवृत्ती नुसतीच आक्षेपार्ह नसून तिरस्करणीय आणि घातक आहे. घातक म्हणण्याचे कारण असे की या असल्या दुष्ट प्रवृत्तीमुळे कृष्णासारख्या महान् विभूतीच्या आड दडून पुढच्या अनेक कवींनी अनुचित आणि ग्राम्य शृंगाराची आपली हौस भागवून घेतली.

वर उल्लेखिलेल्या तीन प्रकरणांमध्ये गोपींना नग्न अवस्थेत पाहण्यात वामनाने समाधान मानून घेतले आहे. पण इतर काही प्रकरणात त्याने अनौचित्याचा आणि ग्राम्यतेचा कळस केला आहे—आणि विशेष म्हणजे कृष्णाला नायक करून ही सारी नाटके त्याने रंगविली आहेत.

'बालक्रीडा' या प्रकरणातील दोन सवाया येथे देतो.

कृष्ण म्हणे प्रमदा मज नेउनि आवळिती हृदयीं मदमंदा ।
तीक्ष्ण कुचाग्र मला रुतती परि त्यांसि नसे मजवाचुनि धंदा ॥
शून्यगृहीं मज नेउनि कोंडिति खेळणि मांडिति त्या व्रजनारी ।
फेडुनि लूगडि घालिति फूगडि ऊघडिं.....अतिगोरीं ।
दाखविती म्हणऊनि करीं भयें लोचन झांकुनि दृष्टि मि चोरी ।
गूदगुल्या करिती मग त्या अतिदुष्ट अशा मज गोवळपोरी ॥

'राधाविलास' हे वामनाचे सारेच प्रकरण अथपासून इतिपर्यंत कमालीचे ग्राम्य आहे. 'कोटी चतुर्दशहि जो भुवनें धरीतो, हा जन्मला यदुकुलाग्रमणी हरी तो' असे स्वतः वामनाने ज्याचे वर्णन केले आहे त्या श्रीकृष्णाने राधेचा पति घरात नाही असे पाहून तिच्याशी जी उत्तान रतिक्रीडा केली तिचे वर्णन वामनाने मोठ्या चवीने केले आहे. हे 'नानाविधी रतिविलास' कृष्णाने 'निजजनतारणा'साठी म्हणजे सकल जगाच्या उद्धारासाठी केले अशी सरतेशेवटी मखलाशी करून वामनाने अनौचित्यावर परमेश्वरी कृपाप्रसादाचे शिक्कामोर्तब करण्याचा निर्लज्जपणा करावयासही कमी केले नाही ! नुसत्या सांप्रदायिक रतिविलासाने समाधान न झाल्यामुळे वामनाने राधिकेला 'विपरीत रति' करावयास लाविले आहे. 'ते वैपरीत्यरतिसंगरिं मग्न राधा.' या विपरीत रतीचे अगदी तपशीलवार वर्णन करून वामनाने एक वस्तुपाठच दिला आहे. हा सारा तपशील मुळातून पाहावा.

'राधाभुजंग' या प्रकरणात याच नाटकाचा प्रयोग आहे. 'राधाविलास' ही रंगीत तालीम, आणि 'राधाभुजंग' हा खरा साग्रसंगीत प्रयोग, असे म्हटले तरी चालेल.

कृष्णाचे चिंतन करीत त्याची एकान्तात वाट पाहत बसलेल्या राधेच्या मनोगताचे हे वर्णन पाहा.

त्वरें आज भेटेल मांडीस मांडी
म्हणोनी स्फुरे भाव उल्हास मांडी ॥ २८

कृष्ण दुरून दिसल्याबरोबर राधेच्या कामवासनेचा जो अनावर क्षोभ झाला त्याचे वामनाने पुढीलप्रमाणे चित्र रेखाटले आहे.

भुजीं कंचुकी फाटताहे तडाडां
करी कंकणें फूटतीही कडाडां ॥ ३३

ज्या नाटकाचे मंगलाचरण इतके प्रक्षोभक आहे त्या नाटकाचा विकास आणि उत्कर्ष कोण्या रीतीने होणार याची वाचकांना सहज कल्पना येईल. वामनाने रतीचा सारा

'समारंभआरंभ' चित्तवृत्ती तन्मय करून वर्णिला आहे. आणि ही रतिक्रीडा तरी काय सामान्य माणसाची आहे काय? 'शिरीं वंदिती वेद पादांबु ज्याचें' असा स्वतः वामनानेच ज्याचा महिमा गायिला आहे (३५) अशा 'दीनोद्धारक' द्वारकानाथाने राधेसारख्या विवाहित स्त्रीबरोबर तिच्या पतीला फसवून केलेली ही रतिक्रीडा आहे! आणि या 'दिव्य' रतिक्रीडेचे यथातथ्य वर्णन करण्याचे सामर्थ्य तरी वामनासारख्या 'कामशास्त्रीं निबंधीं' पारंगत असलेल्या महाकवीवाचून अन्य कोणात असणार! तात्पर्य, हा मणिकांचनयोग आहे. कामशास्त्रात सांगितल्याप्रमाणे विपरीत रतीचा 'समारंभ भारी' सुरू झाल्यावर वामनाला एक अद्भुत काव्यालंकार करण्याची तीव्र ऊर्मी आली आहे.

स्थिरब्रह्म येथे चल स्वैरमाया. (४७)

विपरीत रतीमध्ये स्थिरब्रह्माचे आणि चल स्वैरमायेचे रूप पाहणाऱ्या या वेदान्ती कवीचे तर्पण करण्यात तरी फायदा कोणता? आणखी एक दिव्य चमत्कार असा की हा विपरीत सुरतोत्सव पाहून

बहू हर्षले देव देखोनि दृष्टीं,
पडे ब्रह्मलोकींहुनी पुष्पवृष्टी ॥ (४९)

या व्यभिचारी 'उफराट्या विलासा'चे अगदी तपशीलवार वर्णन वीसपंचवीस पद्यांत केल्यानंतर पुन्हा देवांच्या संतोषाचे व ब्रह्मलोकातून झालेल्या पुष्पवृष्टीचे 'पसायदान' देताना कोणत्याही प्रकारे संकोचल्याचे थोडे सुद्धा चिह्न ज्याच्या ठायी आढळत नाही त्या कवीच्या काव्यकर्तृत्वाने मराठी भाषेची व मराठी साहित्याची उजरी झाली नाही असे कोण म्हणेल?

'त्रिभुवनगुरु' हे ज्याचे बिरुद, त्या कृष्णासारख्या लोकोत्तर विभूतीचा आधार घेऊन असल्या ग्राम्य शृंगाराचे वास्तववादी वर्णन करणाऱ्या वामनासारख्या कवीने ज्ञानेश्वरांनी 'संस्कारवंत' केलेल्या मराठी भाषेच्या वैभवाला आणि सौंदर्याला घाणेरडा कलंक लावला, इतकेच नव्हे तर पुढच्या विचारशून्य कवींना भलताच धडा घालून दिला. वामनाने दाक्षिण्याची, पाविद्याच्या कल्पनेची, सदभिरुचीची आणि औचित्याची ही जी हत्या केली आहे तिच्याबदल त्याची तीव्र निर्भर्त्सना करताना स्थिरबुद्धि विवेकी माणसांनी थोडासुद्धा संकोच बाळण्याचे कारण नाही.

'ऊरुमूलनखमार्गपंक्तिभिः' या 'कुमारसंभवा'तील श्लोकामध्ये कालिदासाच्या हातून जो औचित्यभंग झाला आहे त्यावर टीका करताना क्षेमेन्द्राने व्यक्त केलेला अभिप्राय मागे (पृष्ठ ४९ पाहावे.) उद्धृत केला होता. तो येथे मुद्दाम पुन्हा उद्धृत करतो.

"अत्र अम्बिकासम्भोगवर्णने पामरनारीसमुचितनिर्लज्जसज्जनखराजिविराजितोरुमूल-हृतविलोचनत्वं त्रिलोचनस्य भगवतः त्रिजगद्गुरोर्यदुक्तं तेनानौचित्यमेव परं प्रबन्धार्थः पुष्णाति ।"

*

कृष्णासारख्या लोकोत्तर विभूतीच्या आड दडून वामनाने अनुचित ग्राम्य शृंगाराचे उत्तान भाषेत वर्णन केले, तर नागेश नामक कवीने 'सीतास्वयंवरा 'त जुगुप्सित म्हणजे किळस-वाण्या गोष्टींचे भडक वर्णन केले, अनुचित बीभत्साचा प्रकर्ष दाखवला, आणि ग्राम्य शब्दांचा आचरट पसारा मांडला.

'अहिल्याशिळा राघवें मुक्त केली'—आणि शिळेतून सुंदर स्त्री निर्माण झालेली पाहून डोंगरावरच्या साऱ्या शिळांमधून अशाच सुंदर स्त्रिया निर्माण होणार या गोड कल्पनेने त्या वनातील अनेक द्विज हुरळून गेले व आपल्या विद्रूप बायकांना टाकून नेऊन नव्या कोऱ्या सुंदर बायका मिळवण्याच्या नादाला लागले. या द्विजांनी आपल्या गदळ बायकांच्या विद्रूपपणाचे केलेले वर्णन थोडेसे देतो.

माझे घरीं बाइल पाहिली, ते, तें पायली अष्ट उभ्याच खाते ।
निर्लज्य मोठी, गळताति कक्षा; मला असे सुंदरिची अपेक्षा ॥ १३३

वाचाट ते चाट, महा अचाटी, ते बोरकांटी, तरटी, तिवाटी ।
गाटी, गदूटी, जग थोंट मोठी, करीन मी आणिक याचसाठी ॥ १३५

अनेक खोडी; बहुसाल रोडी; संभोगगोडी प्रियहोंट तोडी;
मुटी, कुढी, हे कुडि दंतदाढा; माझे कपाळीहुनि हीस काढा ॥ १३६

लंबस्तनी ते मजला न साजे, समा मुखे भेरि मृदंग वाजे ।
घरोघरी ते फिरते रिकामी विवाह कां मी न करीन कामी ॥ १४०

घोरे घरारा, वरपे फरारा, पादे परारा; मुतते झरारा ।
खाते करारा; वपुही खरारा; ते धांगडीचा बहु पै दरारा ॥ १४१

मांजरडोळी, नाकिहि लोळी; वक्षिंहि झोळी; अंतर पोळी । १४२

घालित डोळे; दावित गोळे; तोडित लोळे; पाडित खोळे । १४३

आंगीं खर्बडता, पदास पृथुता, वक्त्रीं वसे प्रेतता ।
कंठी घर्घरता, कटीस पृथुता, वक्षस्थळी शून्यता । १४६

शिवधनुष्य उचलण्याचा रावण प्रयत्न करीत असता त्याची जी फटफजिती आणि दुर्दशा झाली तिचे थोडे वर्णन दिले म्हणजे नागेशाच्या करणीची पूर्ण कल्पना येईल.

तो कर्करा वाजति दंतदाढा
कुंथोनिया तो उभवीत मेढा ॥ ३४२

उलथला पृथुमेरु जसा दिसे
उपरि तो परतोन उरीं बसे ।
अवनि राक्षस पाठिसि घासते
अधर भोंकर भोकहि वासते ॥ ३४३

गरगरा नयना फिरवीतसे
करकरा रदनासहि खातसे ।
भडभडा मुखिं रक्तहि वाहतें
विफळ ते फळते तरि लाहते ॥ ३४४

सुखर बहु तूंवा दंडिलें ब्रह्म अंडीं
वदसि बहुत तुंडीं बीरुदें लक्षखंडी ।
अवचित मुरकुंडी घातली भूमिखंडीं
पडसि उघडगंडी फट्ट नामर्द लंडी ॥ ३४५
कस्त करी बहु हस्तक चोळित मस्तक डोलित हें पडलेसे
रक्त मुखीं बहु वाहत पाहत कार्मुक तें हृदयीं जडलेंसे ।
पादत पादत कुंथत कुंथत कादितसे परि तेंचि निघेना
हस्ति जसा अति मस्त मदें तरि काय महाबलि कार्मुक घेना ॥ ३४७

' कवित्वास विस्तार व्हावा त्वरेसी ' असे हात जोडून नागेशाने सद्गुरूजवळ मागणे मागितले आहे. त्याचे मागणे ऐकून सद्गुरूंनी त्याच्याकडून जे कवित्व करवून घेतले त्याचा विस्तार यापेक्षा अधिक करण्याचे कारण नाही. सीतेला विवाहमंडपात आणून चौरंगावर बसविल्यावरनंतर लग्नविधि करणाऱ्या ब्राह्मणांचे जे भांडण नागेशाने वर्णिले आहे ते वाचल्यावर

वाग्देवते, मी श्रम दे तुला हे !

ही खुद्द नागेशाची उक्ति केवळ औपचारिक नसून अगदी यथार्थ आहे याची खात्री पटते.

*

' हरिवरदा ' हा प्रचंड ग्रंथ कृष्णदयार्णवांनी दीर्घ उपासना करून लिहिला. ' देशभाषा संस्कारवंत । तेव्हा त्याही म्हणाव्या संस्कृत ' ही प्रसिद्ध उक्ति कृष्णदयार्णवांचीच (२।२७६). त्यांनी आपली भाषा संस्कारवंत करण्यासाठी प्रयत्नांची शिकस्त केली आहे

हे खरे. तथापि मधून मधून 'तू यशोदे साबडी भोळी। कैसा न्यालीस हा वनमाळी।' (८।३१२), 'लंड कारटे गौळियांचे' यासारख्या तऱ्हा दिसतात. 'लंड कारटें गौळियाचें' हे गोपिका यशोदेप्रत बोलतात. 'रांड', 'रांडापोरें' इत्यादि शब्द हे त्यावेळी आक्षेपार्ह नसावेत असेच वाटते. कारण त्यांचा उपयोग अगदी सहज निःसंकोचपणे केला जातो. 'रांड' हा शब्द बायकोला उद्देशून वापरीत असत. 'घरची रांड व्यभिचारिणी। तरी भुजंगा कायशी वाणी।' (१४।५९६). 'स्त्री' या साध्या अर्थानेही या शब्दाचा नित्य उपयोग होत असे. 'येरां न उठे हागती रांड' असे कृष्णदयार्णव सहज बोलून जातात (३३।३६५). 'गांडीवाटे प्राण सोडी', 'गांडीवाटे सांडिता लेंडा' (३७।८५,८६) या सुभाषितात त्यांना काहीच विशेष वाटत नाही. पण 'आपुला गू म्हणूनि घेतां पदरीं। तो काय दुर्गंधी उणी करी?' (१४।६१३) हा दृष्टांत मात्र असह्य होतो. 'संस्कारवंत वाणी' म्हणतांत ती हीच का? वेगळे शब्द वापरून मनातला आशय व्यक्त करता आला नसता का? मराठी भाषा अजून खरी संस्कारवंत झाली नाही याचाच हा पुरावा आहे. प्रौढ तात्त्विक विवेचनात, आणि रसनिर्मितीचा हेतु मनात ठेवून निर्मिलेल्या काव्यात, एकही अनुचित, असभ्य, ग्राम्य शब्द अपरिहार्य कारणावाचून न येणे हीच भाषेच्या सुसंस्कृततेची खूण आहे.

जुन्या म्हणजे अठराव्या शतकाच्या अखेरीपर्यंतच्या मराठी कवींमध्ये भाषेच्या शुद्धतेकडे सर्वांत अधिक लक्ष देणारा कवि मोरोपंत हाच होय. १८५० नंतर लिहिल्या गेलेल्या प्रौढ मराठी गद्यावर मोरोपंतांच्या भाषासरणीचा फार मोठा परिणाम झालेला आहे असे स्पष्ट दिसते. मोरोपंतांनी संस्कृत साहित्यशास्त्राचे अध्ययन केले असल्यामुळे अश्लीलत्व, ग्राम्यत्व, आणि अनौचित्य या काव्यदोषांचा त्यांना परिचय होता. असे असूनही नागर सुसंस्कृत समाजात जे कधीही वापरले जात नाहीत असे अनेक ग्राम्य शब्द मोरोपंतांनी वापरले आहेत. या शब्दांमुळे त्यांच्या प्रौढ संस्कृतमय रचनेत वैगुण्य निर्माण होते हे कबूल केले पाहिजे. हे शब्द मोरोपंतांसारख्या शब्दप्रभु कवीला सहज टाळता आले असते, आणि त्यांच्या ऐवजी अन्य पर्यायशब्द वापरता आले असते.

म्हणजे वक्ता, श्रोता, विषय, आणि प्रसंग यांच्या दृष्टीने ते अपरिहार्य आहेत असे म्हणता यावयाचे नाही.

'थान' हा शब्द प्रौढ मराठी भाषेत असभ्य आणि ग्राम्य आहे. उरोज, कुच, स्तन इत्यादी संस्कृत पर्याय असता 'थान' शब्द मोरोपंत अनेक वेळा वापरतात.

मानी लाभ न हानी, ग्लानि नसे शांतिसुरभिच्या थानीं।
(कृष्णविजय, ८०।४)

या वचनात 'थान' शब्द चालेल असे म्हटले तरी

आलिंगी श्रीयशोदा दृढ निजहृदयीं आपलें तोक थानीं
(कृ० वि० ६५।४)

या वचनात मात्र चालणार नाही.

अहितकरत्व स्वमतें कल्पी अल्पायु बाल थानींच । (उद्योग०९।५)

भव भजतां हरी; माय त्रिजगीं जीची न; ते हरिमाय
दीनजना थानाते लाविल की, स्मरुनि या अनाथा नाते ?
(कृ० वि० ४९।१६)

तंतननाताथांनीं श्रांता हरिकरिसरोज तप्ता थानीं
ठेवुनि युवति निवे.....
(कृ० वि० ३३।१७)

तोष न कां माता मनिं ? जरि भेटति जुन्याचि तो कां माता
गळती थपथप थानें, प्रेमें धावोनि येति अपथपथानें.
(कृ० वि० १३।२३-२४)

लावी दयाळकथांनीं भजनीं मन, माय जेवि बालक थानीं.
(कृ० वि० ४७।१०५)

यन्मन बाळक थानीं लावियलें सदयविश्वपाळकथांनीं.
(कृ० वि० ४७।११०)

अशी आणखी किती तरी उदाहरणे देता येतील. (कृ० वि० ९।५, ६; ८।१४; कर्णपर्व ४२।६; उद्योग ९।५)

पुरुषाच्या छातीला उद्देशूनही मोरोपंत काही वेळा 'थान' शब्द वापरतात ते पाहून गंमत वाटते. (उदा. कृ० वि० ४७।१२४; ३७।७;). 'थान' शब्दाप्रमाणेच 'आमा' हा शब्दही मोरोपंत मधून मधून वापरतात.

पसरुनिया आ, म्यांचि स्वांबेच्या सेविली सुधा आम्याची.
(कृ० वि० १७४।९)

'स्तन' किंवा 'कुच' हे शब्द मोरोपंतांनी काही ठिकाणी वापरले आहेत. उदा० 'घेऊनिया उत्संगीं स्तनपानीं सावरुनिया हृत्संगीं।' (कृ० वि० ८।१५), 'पी सादर मूल कुच' (कृ० वि० ७।३८). 'थान' हा शब्द काही वेळा यमकाच्या सोयीसाठी

वापरणे भाग पडले असले तरी सर्वत्र तसे झाले नाही. शिवाय, यमक जुळविण्यासाठी असभ्य शब्द वापरणे हे मोरोपंतासारख्या प्रौढ सुसंस्कृत कवीला शोभत नाही.

पण हे काहीच नाही. शरीरधर्मांचे वाचक ग्राम्य शब्दही मोरोपंतांनी वापरले आहेत.

शब्दें भय दे; हगत खल्प खणित भूसि, दावि बळ देहगत.
ककुदाश्रितजीमूत स्तब्धाक्ष, पदोपदीं विसर्जी मूत.

(कृ० वि० ३६।४)

हे बैलाचे रूप घेतलेल्या असुराच्या वाक्यातीत म्हटले असल्यामुळे क्षम्य आहे असे क्षणभर मानले तरी,

ते त्यापुढे न तगले हगले तत्काळ गर्जतां मुतले ॥

(द्रोण० १६।६९)

ठेवी नाम सुवर्णष्ठीवी असें तो हगे मुते कनक ॥

(द्रोण० ४।५८)

सोनें हगे मुते जो स्वजना दे शोक काय तो काचा ॥

(द्रोण० ५।११)

ज्याची आणी बहुतां भुजरणनिपुणांसि काळजी मूत ॥

(विराट० १।३४)

या उदाहरणांतील देहधर्मवाचक शब्द ग्राम्य आहेत हे मान्य केलेच पाहिजे. 'सोडी हा लेंड गळन्मूत्र' असे मोरोपंत केशी दानवाचे वर्णन करताना म्हणतात. (कृ० वि० ३७।१६). आणि मद्रदेशातील स्त्रियांचे वर्णन करताना मोरोपंतांचा कर्ण शल्याला म्हणतो—

निर्लज्जा अपवित्रा मदिरारस सेविती स्त्रिया असती ।
असती तशा न कोठें हगती मुतती उभ्या, न त्या बसती ॥

(कर्ण० २७।४३)

'यास्तिष्ठन्त्यः प्रमेहन्ति यथैवोष्ट्रदशेरकाः ।'

(कर्णपर्व, ४०।३७)

असा महाभारतामध्ये मोरोपंतांना आधार मिळाला आहे हे खरे आहे. पण 'तिष्ठन्त्यः प्रमेहन्ति' हे संस्कृतातील शब्द असभ्य किंवा ग्राम्य वाटत नाहीत. 'हगती मुतती उभ्या' हे मराठी शब्द मात्र निःसंशय असभ्य आणि ग्राम्य आहेत. प्रतिष्ठितांच्या समाजामध्ये ज्यांचा उच्चार करावयास कसलाही संकोच वाटणार नाही ते शब्द सभ्य, अशी 'सभ्य'

शब्दाची साधी व्याख्या आहे. सुसंस्कृत स्त्रीपुरुषांच्या मिश्र समाजामध्ये ज्यांचा तच्चार प्रतिष्ठित मनुष्य कधीही करू शकणार नाही त्यांच्या असभ्यत्वाची श्रेणी अधिक वरची हे उघडच आहे.

विरूप संधीमुळेही मोरोपंतांच्या कवितेत अनेक ठिकाणी आक्षेपार्ह रचना आढळते. उदाहरणार्थ,

'मेल्या रांड तुझी हो' ऐसें शापी हळूच कु त्यातें ॥

(वन० १२।५८)

'कु' म्हणजे पृथ्वी. 'कु त्याते शापी' म्हणजे पृथ्वीने त्याला शाप दिला. पण 'कु' आणि 'त्याते' हे दोन शब्द एकदम वाचले जाताच 'कुत्याते' (म्हणजे कुत्र्याला) असा अर्थ मनात येणे स्वाभाविक आहे.

शिरतां बुडेल मद्बळजलधींत समग्र यदुचमू कुतरी ॥

(द्रोण० १७।२९)

येथे 'कुतरी' हा शब्द भग्न नौका या अर्थाने (कु + तरी) मोरोपंतांनी वापरला आहे. पण कुतरी म्हणजे शुनी हा अर्थ उद्भवतो.

बहुभर्तृका कुशीला तूं, तुज म्हणतात कु तरीच ।

(स्त्रीपर्व, ५।१४)

येथे 'कु' हे सुटे पद 'वाईट शीलाची' या अर्थाने कवीने वापरले आहे. पण नुसत्या 'कु' या पदाचा असा उपयोग कधीच करीत नाहीत. 'कु' आणि 'तरीच' या दोन शब्दांचा विरूप संधि होऊन 'कुतरीच' असे नको असलेले पद तयार होते.

संस्कृत शब्दाचा मुळात जो अर्थ असतो त्या अर्थाने कवी त्याचा उपयोग करतो. पण मराठीत त्याचा अगदीच वेगळा अर्थ असल्यामुळे कसा घोटाळा होतो याचीही काही उदाहरणे आढळतात.

इतुक्या दिवसांत तुझें दिसलें नाहीच तिळहि आग मला ।

(अनु० ७।७१)

येथे 'आग' (संस्कृत आगस्) शब्द 'पाप' या अर्थाने कवीने वापरला आहे. पण तो शब्द मराठीतील ग्राम्य अर्थाने घेताच 'नाहीच तिळहि आग मला' या वचनातील ग्राम्यता सुस्पष्ट होते. याच प्रकारचे एक उदाहरण वामनी कवितेतही आढळते.

आहे अनर्थकर कीचकओर्कि जाणें ।

(विराटपर्व, ३।४४)

कीचकओक म्हणजे कीचकाचे सदन, घर. पण 'ओक' या शब्दाचा वांती हा मराठीतील अर्थ समासामुळे मनात येणे अपरिहार्य आहे.

मोरोपंतांच्या कवितेतून याच प्रकारचे आणखी एक उदाहरण देतो.

मग कंठनाल चरचर तो सत्य करावया बिरुद कापी।
देउनि मिटक्या मटमट घटघट त्या स्वाहितासृगुदका पी ॥
(कर्ण० ४५।१४)

दुसऱ्या चरणातील 'स्वाहितासृगुदका' या शब्दाची फोड स्व–अहित–असृक्–उदका अशी करावयाची आहे. अहित–शत्रु, असृक्–रक्त. शत्रूचे रक्त हेच उदक. स्वाहितासृगुदका पी म्हणजे आपल्या शत्रूचे रक्तरूपी उदक प्राशन करतो. हा अर्थ सर्वथा आक्षेपरहित आहे. पण 'गुद–कापी' अशी पदे तोडल्याबरोबर भलताच चमत्कारिक अर्थ मनात येतो. प्रत्येक शब्द वापरण्याच्या बाबतीत विशेष काळजी घेणे जरूर आहे असा आग्रह संस्कृत साहित्यशास्त्रकारांनी का धरला याचा उलगडा व्हावा म्हणून मराठी कवितेतील—विशेषतः मोरोपंतांच्या कवितेतील—ही उदाहरणे मुद्दाम दिली आहेत. बहुश्रुत वाचकाला अशीच आणखीही उदाहरणे सापडतील.

*

ज्ञानेश्वरांनी आदिकाळीच मराठी भाषेला 'संस्कारवंत' केले, आणि तिला संस्कृतभाषेच्या अर्धासनावर बसविले, इतकेच नाही तर संस्कृत व प्राकृत यांच्यामधील भेद नष्ट करून टाकला या कर्तृत्वाचा गौरव मागे केलाच आहे. (पृष्ठ ९२ पाहावे.) श्रीधराने देखील एकंदरीत नागर पदबंधांची गुफण केली, ग्राम्यता व औचित्यहानि हे दोष टाळण्याची पराकाष्ठा केली, आणि 'संस्कारवंत' मराठी भाषेचे मोठे सोज्वळ रूप दाखविले. ज्या ठिकाणी मागचे कवि चकले, त्या ठिकाणी श्रीधर जागरूक राहिला. याची अनेक उदाहरणे मागे दिली आहेत. गर्भवासाची निंदा, मानवी देहाची निंदा, स्त्रीची निंदा आणि विशेषतः स्त्रीदेहाची निंदा हे बहुतेक जुन्या कवींचे आवडीचे विषय आहेत. या विषयांचे विवेचन आले की त्यांच्या प्रतिभेला स्फुरण चढते, आणि संस्कृत साहित्यशास्त्रात ज्याला 'जुगुप्साश्लील' म्हणतात त्याची ते मनसोक्त खैरात करतात. पण मानवी शरीराच्या विनाशित्वाचे वर्णन 'संस्कारवंत' भाषेत किती आकर्षक व परिणामकारक करता येते हे ज्ञानेश्वरांनी दाखवून दिले आहे. (ज्ञानेश्वरी, ८।१४०–१५०) अनुचित ग्राम्य शब्दांचा चुकूनही वापर न करता परिणामकारक रीतीने स्त्रीनिंदा करता येते हे श्रीधरानेही सिद्ध केले आहे. (रामविजय, ३।१३९–१५४; पांडवप्रताप, ४।२९–४०) असाच विवेक आपल्या सर्वच कवींनी धरला असता तर,

महाराष्ट्रवचनें निश्चित । परि अत्यंत रसभरित ।
मधुमक्षिकांचे मुखीं स्रवत । मधु सुरस जैसा का ॥

(रामविजय, १।१९६)

हा श्रीधराने केलेला मराठी भाषेचा गौरव पूर्णपणे यथार्थ ठरला असता. पण ते होणे नव्हते. ' जेणें भल्यार्चें हृदय उले ' असे शब्द वेदान्ताच्या विवेचनातही वापरून आपल्या कवींनी मराठीचे रूप डागळले. कथाकाव्यांतही संयम पाळून औचित्यहानि कटाक्षाने टाळण्याचा त्यांनी प्रयत्न केला असता तर ते निःसंशय हृद्य झाले असते. एकनाथांसारख्या थोरांच्या हातूनसुद्धा जेथे याबाबतीत तन्हेवाईक प्रमाद घडले तेथे नागेशासारख्या ' भांड ' कवीचे कौतुक काय वर्णावे ?

श्रीधराच्या दाक्षिण्याचे कौतुक केले हे यथायोग्यच झाले. पण मुक्तेश्वरासारख्या कवींच्या संगतीत राहिल्यामुळे श्रीधरावरही थोडासा परिणाम झाला याला पुरावा आहे. ' शुकरंभासंवाद ' या प्रकरणात मुक्तेश्वराने वेश्यानिंदा करताना वाणीला स्वैर संचार करावयाची मोकळीक दिली आहे. हेच ' भंडपुराण ' डोळ्यांसमोर ठेवून श्रीधराने ' पांडवप्रतापा 'त आपल्या लेखणीला अशीच स्वैर सोडली आहे. (पांडवप्रताप, ४।१००–१०२) चांगले चांगले कवि देखील या बाबतीत घसरतात; म्हणूनच फार सावधपणा बाळगणे जरूर आहे असा रुद्रटाने जो इशारा देऊन ठेवला होता तो किती समर्पक आहे हे यावरून स्पष्ट होईल.

एतद्विज्ञाय बुधैः परिहर्तव्यं महीयसो यत्नात् ।
न हि सम्यग्विज्ञातुं शक्यमुदाहरणमात्रेण ॥

(काव्यालंकार, ११।११)

" महाकवयो यत्र मुह्यन्तीत्यतो ' महीयसो यत्नात् ' इति उक्तम् " असा यावर नमिसाधूने शेरा मारला आहे.

भाग तिसरा

शाहीरांच्या लावण्या

शाहीरांच्या लावण्या

ग्राम्य शब्दांचा वापर करण्याचा प्रसंग येताच जुन्या मराठी कवींपैकी बहुतेकांना थोडा-फार संकोच वाटत असे. नाइलाज झाल्यामुळे असे शब्द वापरावे लागले अशीही कबुली काहींनी दिली आहे. बीभत्स वाणीच्या उच्चारामुळे लज्जा निर्माण होते असे श्रीधर म्हणतो. (जैमिनी अश्वमेध, २२।१०६)

पण लावणीकार शाहीरांच्या कोशात 'संकोच', 'लज्जा' इत्यादी शब्दच नाहीत. जाणूनबूजून ग्राम्य शब्दांची खैरात करण्यात त्यांना मौज वाटते, धन्यताही वाटते. बोलून-चालून ग्राम्यगीते लिहिणारे कवी हे ! 'ग्रामणीं बोलिजे तें ग्राम्यगीत' हे एकनाथी भागवतातील वचन मागे उद्धृत केले होते. (पृ. ९६ पाहावे.) ग्राम्यगीत म्हणजे खेड्यातील रासवट लोकांचे गाणे. त्यात ग्राम्य, रासवट शब्दांचा भरणा असणे ही गोष्ट अपेक्षितच आहे.

खुद्द शाहीर कवी 'निसंग फंदी' (होनाजी), 'झुरे बावरे फंदी' (प्रभाकर), 'फंदी फाकडे गडी' (परशराम) असे स्वतःचे वर्णन नित्य करतात. काही शाहीर रावबाजीच्या पुणे शहरात मुक्काम करून असत. 'अहोरात्र अहोदिवस होती इष्काची कुस्ती' असे सगनभाऊने पुण्याचे वर्णन केले आहे. इष्कबाज लावणीकारांनी इष्काच्या राजधानीत 'छंद सवाई आकडबाज' (परशराम) रचले, आणि त्यांमध्ये इष्कबाज

स्त्रीपुरुषांच्या स्वैर जीवनाचे उत्तान व भडक वर्णन केले तर ते क्रमप्राप्तच आहे. 'आंगीं भर मदनाची मस्ती' (सगनभाऊ) भरलेल्या, इष्कामध्ये पोहणाऱ्या, 'इष्काचा डोम' (रामा गोंधळी) ज्यांच्या चित्तात उफाळलेला आहे अशा, 'निसंग होऊनी शहरामध्ये' फिरणाऱ्या, 'घरधन्यास घरीं राखण ठेवुन परद्वारें' करणाऱ्या, आणि कसबिर्णीपेक्षाही चळलेल्या (परशराम), 'इष्काच्या दर्दी' (परशराम) बायकांच्या आणि याच जातीच्या बेताल पुरुषांच्या कामातुर बेताल जीवनातील निर्लज्ज रतिक्रीडांचे यथातथ्य वर्णन करण्यासाठीच रचलेल्या लावण्यांमध्ये ग्राम्य व अश्लील शब्दांची पखरण असणारच !

मग उघड उघड ग्राम्य असलेल्या या कवनांतील सारी ग्राम्यता चवाट्यावर मांडाच कशाला ? असा प्रश्न उपस्थित होणे शक्य आहे. याचा विस्तार केला तरी अडचण, आणि साराच विषय मोघम व अस्पष्ट ठेवला तरीही अडचण. 'न सांगतां श्रोते रागासि येती । सांगतां तरि तत्काळ क्षोभती । ऐसी दोहींकडून संकटोत्पत्ति । आरंभली असे कीं ॥' अशी 'स्वानुभवदिनकरा'त दिनकर गोसाव्याने वर्णिल्याप्रमाणे मनाची स्थिती होणे अपरिहार्य आहे. पण विषयप्रतिपादनाच्या ओघात जे निरूपण आवश्यक आहे ते केलेच पाहिजे, असा विचार करून 'चिळसलेनि चित्तें' पुढील निरूपण केवळ मासला समजावा म्हणूनच करीत आहे.

शृंगाराच्या वर्णनात एकही शब्द अनुचित किंवा ग्राम्य असता कामा नये हा संस्कृत साहित्यशास्त्राचा नियम खरे म्हणजे रसोत्कटतेची जपणूक करण्यासाठीच आहे. अनुचित किंवा ग्राम्य शब्दामुळे रसभंग होतो. पण आमच्या शाहीरांच्या हे गावीही नाही. 'तुझें मुख प्रीतीनें चाटूं', किंवा 'आवळुन मजला भेटा । मुख माझें चाटा' असे होनाजी बोलून जातो. मुख 'चाटणे' म्हणजे प्रेमभराने चुंबन घेणे, हा अर्थ शाहीराला अभिप्रेत आहे. शाहीरांच्या कवनांतील स्त्रिया अगदी ग्राम्य शब्द सहज उच्चारून जातात. 'मजवाणी कोणी दुःख भोगिलें सुख भोगिलें वाघा रांडा सोधा' (सगनभाऊ) असे स्त्री मोकळ्या मनाने बोलते. 'वाघा' हा शब्द या स्त्रीने आपल्या प्रियकराला उद्देशून वापरला आहे. 'पुतळी आपला गुण टाकिना काय बोलुं वाघा' (सगनभाऊ). गमजोशीच्या कवनांतील स्त्रिया बालपणी बोलावयास शिकल्या तेव्हा 'रांड' हाच शब्द त्यांनी प्रथम शिकला असावा असे वाटते. आपल्या मुलीशी कृष्णाने चावटपणा केला म्हणून गोकुळची एक नारी त्याला म्हणते —

'रांडा काय गोकुळीं उण्या ?...
जी रांड दांडगी तिच्या उरावर
धर जाउनि गोळे रे।'

श्रीकृष्णासारख्या जगद्‌गुरूला उद्देशून जर ही भाषा, तर 'येर सामान्य' जनांच्या बाबतीत कसली मुक्ताफळे उधळली जात असतील याची कल्पना करणे फारसे बिकट नाही. एक साजणी आपल्या सजणाला म्हणते—

'मला वाटे रांड कोणी गाव्या तुला प्यारी झाली।'

(रामजोशी, २६)

दुसरी एक स्त्री म्हणते—

'कुठ रांड होती पोटजळी।...
अशि कां याणें बाळगली मिशी।
कोण धांगड रांड घरघुशी।
जिची मळकट बाकळ उशी।'

(रामजोशी, ३५)

दुसऱ्या बाईच्या नादाला लागलेल्या नवऱ्याला उद्देशून एक स्त्री आपल्या मैत्रिणी-जवळ म्हणते—

'नांवाची मी साळू नव्हे ठकिची मी राधी।
भोंदाव्याच्या रांडा घेउं नको राना।'

(रामजोशी, ४४)

कुब्जेवर फिदा झालेल्या कृष्णाच्या अविचाराचे एक गोपीने केलेले हे वर्णन पाहा—

रांड मिळाली कुब्जा त्याला कशि वाटलि फाकडी।...
कोठें होती रांड कळेना कोण सवत घरघुशी।...
रांडेच्या नादास गुंतला पुनरपि येतो न हा।

(रामजोशी, ५१)

याच्याही वर ताण आहे. कुब्जेच्या नादी लागल्यामुळे रागावलेली चंद्रावळ कृष्णाला म्हणते—

'भोगाया मिळाली रांड तुला ती दांड चेटकी दासी।...
घेउनिया हातीं फणी घालिसी वेणी रांडे पाठी।'

रामजोशाच्या कवनांतीला स्त्रिया अष्टौप्रहर 'रांड' हा शब्द मोठ्या चवीने चघळत असतात. 'कुठं होती रांड केरसुणी?' (रांड केरसुणी म्हणजे दीडदमडीची क्षुद्र बाई). 'आठा ठायीं रांड वाकडी' (रामजोशी, ३५), 'रांडेच्याला काय शिकविल्या खोडी?',

'मातला दांडगा रांड कशाला व्याली ?' 'रांडेच्या आम्ही काय बटकी ?' (रामजोशी, ३३), 'कोणा रांडेच्या भरीं भरूनी' (रामजोशी, ३०), 'रांड पोटजाळिचे पायीं। हा घात जाहला बाई।' (रामजोशी, २३), 'कशि घरघाली रांड बैसली आम्हांला गिळून' (रामजोशी, २०), 'किती रांडांशीं खेळे फुगडी। फेडितसे लुगडी।' (रामजोशी, १९).

जी तऱ्हा रामजोशाची तीच त्याच्या दोस्तांची. बाहेरख्याली करणाऱ्या पतीची निर्भर्त्सना करणारी स्त्री त्याला म्हणते—'घरघेण्या बेटंग्या रांडा कलीच्या बेचाली' (परशराम, ३।२४). 'बेटंग्या रांडा' या शब्दांनी समाधान न होऊन सदर स्त्री पुढे म्हणते

'भरेल एखादी गर्मी राजसा नको पडूं या ख्यालीं।...
तेव्हां झोंबेल गर्मि राजसा यमाचे फांसीं।'

पठ्ठे बापूरावाच्या कवनांतील एक स्त्री म्हणते—

सांगा सांगा सखया कोण रांड पडली गळा॥
बाहिर जाता—परद्वार करता माहित मजला कळा।
भवल गरमिची रांड एखादी पडेल कुशिला खिळा॥

रामजोशाची काही कवने बरीचशी निर्मळ आहेत. पण मध्येच कोठे तरी येणाऱ्या एखाद्या इरसाल ग्राम्य शब्दामुळे अशा कवनांची नासाडी झालेली आहे. (उदा. ४४, ६९). 'अशि कशि रे तुझि होरी' ही रामजोशाची ३४ क्रमांकाची सारीच लावणी रासवट आणि ग्राम्य आहे. कृष्णाला उद्देशून गोपी हे सारे बोलत आहेत हे ध्यानात ठेवावयास हवे. एक विवाहित गोपी कृष्णाला म्हणते—"अरे चांडाळा, सोड मला रे आग झाली उरा। चोळशिल काय गव्हारा गुरा?" असाच सारा मामला आहे. आणि शेवटी 'या होरीची कोणी तऱ्हा बांधिल कविजन खरी तरी। न ये या कविरायाची सरी' अशी स्वतःची तारीफ रामजोशाने करून घेतली आहे.

याच्यावरही कडी करणारी एक लावणी प्रभाकराने लिहिली आहे. ही सारीच लावणी (क्र. ३।११८) अत्यंत बीभत्स आणि ग्राम्य शब्दांनी ओतप्रोत भरलेली आहे. १९२० साली चित्रशाळा प्रेसने प्रभाकराच्या लावण्यांचे जे पुस्तक छापले, त्यात सदर लावणी मुळाबरहुकूम छापण्याचा प्रकाशकांचा धीर झाला नाही. चार ठिकाणी त्यांना फुल्या टाकाव्या लागल्या. एका मुर्दाड कसबिणीच्या तोंडी प्रभाकराने ही लावणी घातली आहे. एका दरिद्री भुक्कड गिऱ्हाइकाची ही कसबीण हेटाळणी करीत आहे अशी या लावणीची कल्पना आहे. सदर लावणी जुगुप्साश्लीलाचे उत्कृष्ट उदाहरण आहे. मधून मधून ग्राम्य शब्दांची पेरणी आहेच.

'लस गळते ठाईं ठाईं...बिलबिल झालें शरीर सडकें।...
डोळे चिपडे पिचपिच करती लाळ गळे खाली सारी।
फुकट देइना निजूं अशाला म्हणुन निंदा आमची करी।...
असे पुण्यामध्यें फार पाहिले उपाशि फिरती घरोघरीं।
हातापायांच्या झाल्या काड्या पोट थोर डुकरावाणी।...
जीभ लावून नाकाला बोलसी नित तंतरसी भिकारणी।...
नको हांतरुण पुरे कांबळा मुळीं अमंगळ वडारणी।...

प्रभाकराच्या या लावणीत एक कसबीण गिऱ्हाइकाची हेटाळणी करीत आहे, तर होनाजी बाळाच्या एका लावणीत (होनाजी, अंला, ९) एक पुरुष एका सुरकुतलेल्या वेश्येची हेटाळणी करीत आहे. प्रभाकराची लावणी जितकी बीभत्स आहे, तितकीच, किंबहुना जास्त बीभत्स, होनाजीची लावणी आहे. ग्राम्य शब्द इतस्ततः विखुरले आहेत. जुगुप्साश्लील हा काय प्रकार असतो ते कळावे एवढ्यासाठी होनाजीच्या सदर लावणीतून काही मासलेवाईक ओळी देतो.

चल दुर हो पलिकडे सुकाळे जन (××) कीं तू देहा दिसा।
गेला भर नवतीचा, यापुढें काय आतां राहिल्या पिसा॥
उतार जाहलें वय, माघारें न ये फिरून जें जें घडलें।
वाइट झालें तोंड, अतां गडे गालाला पोचे पडले।
पोटऱ्यांची नळकांडी जहाली, मांड्यांचे गोळे झडले।
भोगावी यापुढें अमंगळ असें तरि कोणाचें अडलें?...
थाट करूनि शिंदळीचा फिरसी लोकांचे दारोदारीं।
कंबर काळी सुकट, पुसेना फुकट कोणी पैश्यावेरी।
तेलकटीच्या मळ्या अंगावर, उवालिखा माशा वारी।...
सांधोसांधीं डाग चकदळीं, मुख दुर्गंधीची मोरी।
खवट खोबरें, कच्ची चिकटी डोईला घाशी बेरी।...

अशी ही 'धिपट दांडगी औदसा' पाहून कवीने तिला पुढीलप्रमाणे व्यावहारिक उपदेश केला आहे.

रोज हिंडशी गल्लोगल्ली रस्त्यानें यावा जावा।
सवंग मेवा गुळ दमडीचा भलत्याने ध्यावा खावा।...
कां ग द्रव्य मागसी धनलोभे, अजुन तुला नाहीं ठावें?

शहाणपणाची गोष्ट ऐक तूं... .
माल नासका सवंग विकावा, बरें सांगितलें ऐकावें ।

जिला सर्व दृष्टींनी हिणकस नवरा मिळालेला आहे अशा स्त्रीला चातुर्याने भुलवल्यावर ती वश होते असा विषय असलेली एक लावणी होनाजीने लिहिली आहे (होनाजी, अंला, ६२). या लावणीचे भरतवाक्य असे आहे—

बळ पुरुषाचें पाहून पडली मग त्याच्यापुढें उताणी ।
मन धालें, उभयतां मिळाली तीं जैशी साखरलोणी ।

दुसऱ्या ओळीतील उपमा मोठी हृद्य आणि परिणामकारक आहे हे खरे आहे. तथापि तिच्यामुळे पहिल्या ओळीतील ग्राम्य शब्दाची ग्राम्यता कशी नाहीशी होणार ?

शाहीरांच्या मानसकन्या कसलाही आडपडदा न लावता अगदी स्पष्टपणे वाच्यार्थाने कोणताही ग्राम्य शब्द वापरण्यास कधीही कचरत नाहीत हा त्यांच्या असामान्यत्वाचा चोख पुरावा आहे. ' एकजात बाई टोपीवाला । मी नाहीं दमलें पंचविसाला । ' (अनंतफंदी) असे ज्याला त्याला सांगत फिरणारी शिंदळ येथे आढळते. तसेच ' जिव जाई तों मला मोगिलें ', ' पुरें करा हो सख्या आतां मी जहालें विटाळसी ' (होनाजी, अंला, ८७), अशासारखे उद्‌गार काढणाऱ्या स्पष्टवक्त्या बायकाही वाटेल तेवढ्या आढळतात.

पण कृष्णाने केलेल्या खोड्यांबद्दल यशोदामाईजवळ तक्रार करणाऱ्या गोकुळच्या गोपींच्या तोंडी रामजोशाने जे शब्द घातले आहेत, ते पाहून आजच्या ' प्रोग्रेसिव्ह ', नवमतवादी, क्रांतिवादी, मानवतावादी, अस्तित्ववादी, आणि वास्तववादी महाकवींना आणि त्यांच्या धीरोदात्त पाठीराख्यांना हर्षाच्या उकळ्या फुटल्याविना राहणार नाहीत. नमुन्यासाठी रामजोशाची ३३ क्रमांकाची लावणी वाचावी. या लावणीच्या तिसऱ्या ओळीत गोपीच्या तोंडात जो शब्द रामजोशाने घातला आहे तो तिने यशोदेसमोर उच्चारला आहे हे विसरू नये. या गोपीचा हा अलौकिक प्रांजलपणा पाहिल्यावर काही दिवसांपूर्वी एका क्रांतिपूजक नवमतवादी मासिकातील एका कथेमध्ये ' वैश्विक जाणिवां 'चे मर्ममेदी दर्शन ज्याला झाले आहे अशा एका युगनिर्माणक महाकवीने वापरलेला पुरुषलिंगाचा वाचक ग्राम्य शब्द मला आठवला. हा अजब शब्द ज्याने वापरला तो कवी धन्य, आणि ज्या संपादकाने तो छापला तो संपादक त्याहून धन्य ! आणि मौज ही की, एका पोक्त वयाच्या ' विचारवंत ' टीकाकाराने त्या शब्दाचे माझ्याजवळ बिनदिक्कत समर्थन केले. या टीकाकाराची सर्वांहून धन्य ! कवि, संपादक, आणि टीकाकार या त्रिकुटाचे असे मनोज्ञ मीलन पाहिल्यावर रामजोशाने स्वर्गात आणखी एक इरसाल लावणी रचून ती बयाबाईला म्हणावयास लाविली असेल !

रामजोशाच्या ३३ क्रमांकाच्या लावणीत काय नाही ? सारे काही अर्वाच्य आहे. रामजोशाने वर्णिलेला कृष्ण 'गरतिला गलित गाटुनी' तिला आपले गुह्येंद्रिय दाखवतो, (येथे मुळात अर्वाच्य शब्द आहे.) पोरसवदा गोपीला चुचकारून तिचे लुगडे फेडतो, दुसऱ्या एका गोपीची 'कुचचूचुकें' धरतो, नुकत्याच न्हालेल्या साळूला झोंबतो, 'गडबडगुंडा' करतो, 'पोरिला लांच देउनी चिकन्या खांडा' वेणीचा गोंडा धरतो, पोरींचा मुका घेऊन तिला रडवतो, तिचे लुगडे फेडून वर उडवतो. असा 'धिंगाणा' करणारा 'कान्हा' हा आमच्या लावणीकार शाहीरांचा आदर्श पुरुष !

कृष्णाने गोपींना झोंबावे, त्यांची लुगडी फेडावी, आणि उलट गोपींनी कृष्णाला मृदु शब्दांनी विनवावे, हा प्रकार बहुतेक साऱ्या शाहीरांनी अगदी चवीने वर्णिला आहे. होनाजीची गोपी कृष्णाला म्हणते—

तुझी मुखकांती सुंदर कोमलांगरे ।
येऊन झोंबसी कोंबसी गोपिकांगरे ।
वदन चुंबून भोगसी यथासांगरे ।.....

(होनाजी, २५)

परशरामाची गोपी कृष्णाच्या चहाटळपणाचे पुढीलप्रमाणे वर्णन करते—

मार्गावर बैसुनिया नित मुरली वाजवितो ।
धरी कुचाग्र दाबुनिया आडवून गळा पडतो ।.....
आम्ही जातों मथुरेशीं हा आडऊनि दान घेई ।.....

(परशराम, १।२३)

'दान घेई' हे शब्द साधेभोळे नसून त्यांत खोल अर्थ सामावलेला आहे हे मार्मिकाच्या लक्षात येईलच.

कृष्णाने गवळणीशी चहाटळपणा केल्यावर त्या यशोदेकडे तक्रार नेतात. या गवळणी काय बोलतात ते पाहण्यासारखे आहे.

तिसरी गौळण म्हणे ते वेळीं ।
कृष्ण सावळा हरी वनमाळी ।
धरी कवटाळुन करी घुमाळी ।.....
यमुनाजळीं जातां श्रीरंग ।
चुंबितो वदना ।
कैसा लाविंत झटला नंग ।

पतिव्रतेपणा ।
करू नये तो करितो बेढंग ।.....

(होनाजी, ९)

आणखी एक गौळण म्हणते—

नानापरि चेष्टा करितो गे । मार्गी बसुनी ।
जाउनी पदरासी धरितो गे । आडवा होउनी ।
हस्त टाकी हृदयावरि तो गे । धरी कुचाग्र दोन्ही ।.....

(होनाजी, ९)

'आडवून मथुरेमधें झोंबुन फेडी नीरीया' अशी तक्रार एक गोपी यशोदेजवळ करते. (होनाजी, १०४)

केवळ रांगण्याचे ज्याचे वय, असा 'बालकृष्ण' क्षणात प्रौढ होऊन राधेची कामशांती करतो हा विषयही लावणीकार शाहीरांनी घोळून घोळून रंगविला आहे. परशरामाची पुढील लावणी (१।२) नमुन्यासाठी पाहावी.

बसा पालखा तुम्हां हलविते हळूंच देते झोका ॥
राधा मदनानें जार । जरी असता मोठा मनोहर ॥
तरी पार नसता सुखा । राधिकेचा मानस जाणुन उपवर झाला सखा ॥
लावी दार घाली कडी खिटी । रूप सुंदर अति गोमटी ॥
राधेला धरी मनगटीं । धरी स्तन गळां घाली मिठी ॥... ..
केली देहाची मोट । उरीं भरली उरपोट ।
केली चळवळ झाली घाबरी ॥
पुरे हरी हा पलंग मोडला । नवार सुटली सारी ॥.....
दावी राधिकेला सुख । करी जुलूम धरी आवळुन ।.....

चंद्रावळीच्या आख्यानात हे कवी असेच रंगतात. अनंतफंदीने हे आख्यान खूप विस्ताराने आणि तन्मय होऊन वर्णिले आहे. निद्रिस्त चंद्रावळीशी चहाटळपणा केल्यावर, आणि तिच्या तपाचा (म्हणजे पतिव्रताव्रताचा) भंग केल्यावर अनंतफंदी म्हणतो– 'श्रीहरीने चंद्रावळ नेली मोक्षपदाशीं ।'. हेच आख्यान पठ्ठे बापूरावानेही रंगविले आहे.

साऱ्या गोकुळामधें सर एक सती चंद्रावळी
तिला फसविली कशी कृष्णानें ऐका मंडळी !

अशी बापूरावाच्या लावणीची नांदी आहे. चंद्रावळीची बहीण म्हाई हिचे रूप कृष्णाने

घेतले, आणि न्हाईबाई चंद्रावळीच्या घरी गेली. 'चंद्रावळ भोळी, कपटी भगवंत.' 'मंचकी निजल्या दोघीजणी.' शेवटी कृष्णाने आपल्याला भोगले हे तिच्या ध्यानात आले. पण कृष्णाने आपल्या अवटित सामर्थ्याने तिला साऱ्या विश्वातून सर्वत्र हिंडवून आणले, आणि तो चमत्कार पाहताच चंद्रावळ त्याला म्हणते—

नटनाटकी देव श्रीहरी । कळा तुझी आनंत ब्रह्मांडाचा सूत्रधारी ।
झाले देवा तुला लंपट खरी । चला की मंदिरी, शेजमंचकीं विलास करूं चारी ।
झाली चंद्रावळ राजी कृष्णाला त्या शेषाजवळी ।
गेली सारी कल्पना मनांतली लटपटली बाळी ।.....
चंदु गौळ्याची गौळण ठकविली भोळी चंद्रावळी ।.....

इतके झाल्यावरही हा देवाने भक्तांबरोबर खेळलेला खेळ आहे, असे म्हणावयास बापूराव विसरला नाही.

देव कानडा भक्तासंगें खेळे चवचाळी।

शाहीर कवींनी कृष्णाचे जे चित्र रंगविले आहे ते अशा प्रकारचे आहे. विवाहित राधा कृष्णाशी व्यभिचार करते ही कल्पना त्यांच्या फार आवडीची आहे. होनाजीच्या लावणी-तील राधा रात्रभर कृष्ण आला नाही म्हणून त्याची पुढीलप्रमाणे कानउघाडणी करीत आहे.

नुतन वधु देखण्या गोकुळामध्यें गोवळबाळी ।
नित्य तुम्हांला हरी नविन एक हृदयीं कवटाळी ।.....
आला नेत्र पुशीत उठून येवढे प्रातःकाळीं ।
सुरस गंध केशरी टिळक वर कस्तुरी भाळीं ।
धर्माने पुसिला भोगिली कोणी तरी वेल्हाळी ।.....
प्रवर्तला कांही म्हणा तुम्ही रात्रीं स्त्रीच्या प्रसंगा ।..... (होनाजी, ११)
नवतीचे दिवस हे चार, म्हणुन व्यभिचार, करुन साचार ।
त्यजुन आचारभाव आपले ।..... (होनाजी, १७)
लहान परी नववधु नव्या । नूतन ह्या नव्या । मनीं माना्या ।
करून ओणव्या । तुम्ही ठकविल्या । (होनाजी, १७)

पाणी नेण्यासाठी दोन प्रहरी यमुनेच्या काठी एकटी गेलेली गोपी पाहून कृष्णाने तिचा पदर धरला असे वर्णन होनाजीने एका लावणीत केले आहे. पण मौज आहे ती ही की कृष्णाच्या या चहाटळपणाचा त्या गोपीला मुळीच राग येत नाही. उलट हा सारा प्रकार ती खेळकरपणाने घेते आणि कृष्णाचे कौतुकच करते.

आधींच तुझी सावळी मूर्त गोजिरी ।
सदनीं तृषाहरणी नेत पूर्ण घट शिरीं ।
कंदुक दे म्हणवुन त्वां धरियेली निरी ।

(होनाजी, १८)

कृष्ण आणि गोपी, कृष्ण आणि राधा, यांचा आधार घेऊन वामनपंडिताने आपल्या साऱ्या विपर्यस्त मनोवृत्तींना कसा स्वैर अवसर दिला याचे वर्णन मागे पृष्ठ ११० वर केले आहे. वामनपंडिताची जी वृत्ति तीच वृत्ति या शाहीर कवींची आहे. रामजोशीच्या कवनांतून प्रकट झालेला कृष्ण म्हणजे एक इरसाल गावगुंडच वाटतो. 'काय वदों कुच मर्दुनि माझी तोडुनि नेली गाठी । हाच मेला मूळ नाशितसे कुळ कंचुकिच्या सोडी गाठी' हे वर्णन गावगुंडाचे नाही असे कोण म्हणेल ? ज्या गावचा कृष्ण, त्याच गावच्या गोपी ! रासवट गांवढळ कंजारणींच्याच तोंडात शोभून दिसतील असले हलकट ग्राम्य उद्गार रामजोशीने गोपींच्या तोंडात घातले आहेत.

मातला दांडगा रांड कशाला व्याली ?
का घालिना आइबहिण आपुल्याखाली ?

हा उद्‌गार गोपीने यशोदेसमोर काढलेला आहे हे ध्यानात येताच रामजोशीच्या प्रतिष्ठितपणाचे कौतुक वाटते !

*

शाहीर कवींनी ज्या स्त्रियांची चरित्रे तन्मय होऊन गायिली आहेत, त्यांच्यापैकी बहुतेक स्त्रिया नित्य कामवासनेने बेभान झालेल्या दिसतात. पण एवढ्याने भागले नाही. आपली ही अनावर कामवासना त्या अगदी स्पष्ट शब्दात बोलून दाखवितात हे त्यांचे खरे कर्तृत्व आहे. 'विषय' (म्हणजे भोगलालसा) हा त्या सर्वांचाच 'ऋणकरी' आहे (होनाजी, अंला, ३२,), त्यांचा 'काम' सदैव 'तापला' आहे (होनाजी, अंला, ३२), त्यांना 'इष्कउबाळा' छळतो (सगनभाऊ, अंला, १०१), त्या कामज्वराने जळत असतात (होनाजी, अंला, २५). 'मदनकेफाची लहर' त्यांची कशी विलक्षण अवस्था करतो याची असंख्य वर्णने शाहीरांच्या कवनांतून आढळतात. त्यांच्या शारीरिक अवस्थेची ही वर्णने कवीने केलेली नसून त्या स्वतःच आपला 'भावाविष्कार' करतात, हे ध्यानात ठेवणे जरूर आहे. विषयाच्या बेफाम ज्वराने ज्यांची शरीरे एकसारखी पोळत आहेत अशा या भोगातुर स्त्रियांनी स्वतःची जी वर्णने अगदी मोकळेपणाने स्पष्ट शब्दांत करून ठेवली आहेत त्यांचा ओझरता परिचय येथे करून देतो.

कठीण समय मदनाचा घुटका
मरणप्राय ती संकटघटका । (होनाजी, अंला, ३१)
दिसगत याच घोरांत, मदन शरिरांत लागला चढा । (होनाजी, अंला, ३२),
भगभगा उष्णता अंगा, आम्ही तर बघा बायका पिशा । बेबहार दाटली निशा ।
जळे आंग जसा बचनाग ।...(होनाजी, अंला, ३२),
होतसे डाहा, पहा उर माझा धडकावला । (होनाजी, अंला, ३२),
कोणी सोमल अंगीं लावला । (होनाजी, अंला, ३२)
व्यापला काम तापला । (होनाजी, अंला, ३२)
मदन थरारि जेव्हां तेव्हां ती मरणांतिक होते अवस्था ।
(होनाजी, अंला, ३३)

होनाजीच्या नायिकांच्या शरीराचा दाह किती तीव्र आहे ते पाहिले. आता परशरामाच्या नायिकांनी आपल्या अवस्थेचे केलेले वर्ण देतो.

पलंगावर शेज केली । मदन कैफाची ।
कैफाची लहर मशि आली । (परशराम, ३।३)
नूतन नवी नवतीचा बहार । आंगीं मदन करितो कहर ।
येते सुखशयनाची लहर । कैसें करूं मी ॥ (परशराम, ४।३)
तारुण्यवय मदें भरलें । कुच आम्रफळें तरतरलें ।
समयांत अशा अंतरलें ॥ (परशराम, ४।५)
लावण्यामधिं केवळ विजवा । अग्न लागलें कोणी तरी विझवा ।
घेऊन या तो कसाही विझवा । (परशराम, ४।६)

' कामचेतना झाली शरीरीं ' अशी मोकळ्या मनाने कबुली देणाऱ्या या स्त्रिया ' सदा कैफांत धुंद ' राहणाऱ्या आहेत.

अनावर कामचेतनेच्या दाहाचे असेच स्पष्ट वर्णन सगनभाऊच्या नायिकाही करतात. एका नायिकेने आपल्या कामवासनेचे मैत्रिणीसमोर केलेले पुढील वर्णन पाहावे.

काय आक्स्ता झाली माझें शरीर हें खवखवतें ।.....
कवळी ग माझी ज्वानी रुताला करकरा लवते ॥
हें लवणी स्थीर करिल कोण बाई सांगा वचनीं गोविते ।
जसे दंत सळसळते गुदगुद्या करते जोबन दोन्ही ॥

कामचेतना जाहली शरीरीं विशेष आश होती ।
कंबरेंत्त प्रिया निऱ्या भिजल्या चोळी भिजली छाती ।

(सगनभाऊ, ५१)

सगनभाऊची आणखी एक नायिका आपल्या शरीराचा दाह पुढीलप्रमाणे स्पष्ट करीत आहे.

नाहीं देहभान, होई भणभण ।
कळ वर्तीत, लाही भट्टींत जशी, जातो प्राण ।

(सगन, अंला, १००)

स्पष्टवक्तेपणात प्रभाकराच्या नायिकाही काही कमी नाहीत. ' करी मदन पाहून आकांत' (३।६२), ' मदन पारदापरी सदा देहांत डळमळतो ' (३।६६), ' अरे सख्या रे, हा मदन मज अनिवार ' (३।३), ' रुतु मदनाची घडी युगवत जाती ' (३।२३), ' विंचू फणाणुन झोंबती ' (३।३४), ' डसला मज हा कांत विंचू लहरी ' (३।३९), ' भरलें रतिसागरीं विषय उधान ' (३।३९), ' हौसेच्या नगा, कंदर्प अश भंजना ' (३।५४), 'अतां न धरवे धीर' (३।९) यासारखी मदनदाहाचा प्रभाव स्पष्ट करणारी जरा सौम्य सुभाषिते प्रभाकराच्या लावण्यांमधून वाटेल तेवढी विखुरलेली आहेत. पण याहीपेक्षा अधिक स्पष्ट आणि वाच्यार्थाने आशय व्यक्त करणारे उद्‌गार प्रभाकराने आपल्या नायिकांच्या तोंडी घातले आहेत. काही मासले दाखवतो.

विषयकल्हालिनें अति पोळतें ।
जेव्हा लहर मनीं येते तेव्हां कुच अपुले चोळते ॥ (३।१०)
मदनविंचु झोंबला मला, त्यांत दिवस पांचवा,
चला सुखशयनीं प्राण वांचवा ॥ (३।९)
मदन मस्त शरिरांत सख्या जणु शिरला कीं हो करी,
बसुन आसनांत आकळा करी हो ॥ (३।९)
आपाप सुटली गांठ नजर कर कुचाग्र तडतडती ।
सुकुमार तुझे हस्त केव्हां या वक्षस्थळीं भिडती ॥ (३।५)

होनाजीच्या अनेक (किंवा बहुतेक) नायिका सदरप्रमाणेच कामज्वराने अखंड जळत आहेत. त्यांचे हे जळणे निसर्गक्रमाला धरून असले तरी जळण्याच्या या प्रक्रियेचे अगदी स्पष्ट शब्दात वाच्यार्थाने मैत्रिणींसमोर किंवा मित्रासमोर केलेले प्रकटीकरण मात्र ग्राम्य आहे. ' कसा मदन कहरचा ' (होनाजी, अंला, १), ' जळते कामज्वरीं ' (होनाजी,

अंला, १), ' मी तों जाहलें अधीर ' (होनाजी, अंला, २), ' अंगविषय महावाघ लागला पाठीं ' (होनाजी, अंला, १), ' डगमगलें विषयानळीं । सर्वांगीं मदन जळजळी।' (होनाजी, अंला, १४), ' विषय हा फारच उतावळा ' (होनाजी, अंला, ३०) असे उत्स्फूर्त त्रुटित उद्‌गार होनाजीच्या कवनांमधून किती म्हणून द्यावे ? आता थोडे सर्वांगपूर्ण वेचे देतो.

ऋतुबहर चालला प्रहर, जसा विष जहर, डोम शरिराचा ।
करुं कसा धीर करुं ? कसा शीण हरुं ? कसा मदन कहराचा ।.....
अपगत्र जाली तळमळ करते उठबशा
कामांत आतुर हा जीव घाली धापशा ।.....
मी पुढें आडवी पडे, त्रिरहसांकडे कांहिं उमजावें ।.....
(होनाजी, अंला, २५)

सदर ' भावगीत ' एका प्रेयसीने आपल्या प्रियकरास उद्देशून म्हटले आहे.

धीर धरवेना, सुटले मदनाची कुलाली । (होनाजी, अंला, २०)
विषयानळें संतप्त, जसें नवनीत कढे कडकडा । (होनाजी, अंला २२)
दिवस पांचवा मला चेतला विषयानळ अंतरीं ।
काय करूं सखा नाहीं घरीं ॥.....
दावेदार हा मदन शरीरामध्यें करीतो जाचणी.....
डोम हृदयीं पेटला । विषयतक्षकें डंशिलें मला ।
शरीर विषयकर्वतीं कापतें काळीज गे चरचरा । (होनाजी, ९९)

*

एका स्त्रीची प्रेमयाचना करीत असता, ' कन्ये, कामयमानं मां न त्वं कामयसे कथम् ? ' असे पुरुषाचे बोलणे ग्राम्य असल्यामुळे वैरस्याला कारण होते असे दण्डीचे मत मागे (पृष्ठ १२ पाहावे.) स्पष्ट केले होते. लावणीकार शाहीरांच्या कवनांमधील पुरुष कोणत्या रीतीने स्त्रीची प्रेमयाचना करतात हे आता स्पष्ट करणार आहे. खरे बोलावयाचे झाले तर ' प्रेमयाचना ' हा शब्द सर्वस्वी अस्थानी असून ' भोगयाचना ' हाच शब्द शाहीरांच्या बाबतीत समर्पक ठरेल. हे पुरुष किती सडेतोडपणे, स्पष्ट शब्दांत, स्त्रीजवळ मैथुनसुखाची याचना करतात ते पाहण्यासारखे आहे. या याचनेमध्ये विविध ग्राम्य शब्दांची मनसोक्त पखरण शाहीरांनी केली आहे. स्त्रीपुरुषांच्या मीलनाच्या कल्पनेला त्यांनी खेडेगावच्या आठवड्याच्या बाजारात नागड्या उघड्या स्वरूपात उभी केली आहे, किंबहुना तिला पशुत्वाच्या पायरीवर नेऊन सोडली आहे.

सहज हाताशीं आले त्यांच्यापैकी काही नमुने वानगीदाखल येथे देतो.

सगनभाऊचा एक नायक म्हणतो—

फार दिस झाले न्हाण तुज आलें करूं दे गडे आज इष्क पुरा ।
(सगन, ११)

आणखी काही नायकांचे उद्‌गार पाहा—

लुटूं दे नगद माल, चढूं दे झेंडा, लाव भडकाया ।
आरक्त लोचन लाल, भरली छाती आली तडकाया ॥ (सगन, २९)
रंग पाहुन दंग झालों संग करूं चांगला ।
शरीर गोल वजन तोल पाहूं तुझा मासला ।
उर छाती छबकदार नको पाहूं चहूंकडे ॥ (सगन, ३४)

'अग नारी, विषय चेतला', (सगन, अंला, १०५), 'अग नारी, भोगावी तुला' (सगन, अंला, १०५), 'तुझा बोल लाजिरवाणा (म्हणजे लाडीक)। अग नारी। भोगावी तुला' (सगन, अंला, १०५) यासारखी आक्रमक सुभाषिते सुकाळाची आहेत. 'अग नारी, भोगावी तुला', 'भोगुं दे तुला फाकडे' हे तर पालुपदच आहे.

प्रभाकराच्या एका नायकाने स्त्रीसमोर केलेल्या भोगयाचनेचा पुढील मासला पाहा.

करी गे शरीर आम्हांसी दान।...कितिक विकसी वजनीं ॥
इच्छा मनची पुरवी। शरीर कामी तप्त होतसे शांत करुन या जिरवी ॥
.....म्हणे प्रभाकर उरक ॥
गळ्यामधें हात घालुन मुरक। नसेल जर मानस, परती सरक ॥
(प्रभाकर, ३।८६)

स्वतःच्या नवऱ्याच्या डोळ्यांत धूळ टाकून जाराशी एकान्त करणाऱ्या एका स्त्रीला तो जार म्हणतो—

धडा आज करुनी पर कामीं शरीर भागूं दे।
निजुन शेजारीं वरकांतीं बसुन जागूं दे ॥
कमर कमरेसी एकांतीं निवळ लागूं दे।
वस्त्र वर टाकुन सुख शयनीं भोगूं दे ॥ (प्रभाकर, ३।५७)

होनाजीचा नायक असाच मनमोकळा आहे.

सांपडसी कधीं तूं सखे ग येकांती राजमंदिरीं।
हेंच इच्छितों तुला निजावें घेऊन पलंगावरीं ॥...

भोगितां तुला साजणी । जाम्ही नसों तृप्त या मनीं ।...
पलंगावर एकांतीं कधीं संग घडेल तुझा आपला ।
आतां न धरवे धीर बहुत अंतरीं छंद लागला ।...
होईल तें होवो गडे । मोगुं दे तुला फाकडे ।... (होनाजी, ६७)

' स्तन धरितों झोपेंत, न कळतां तुझी सोडितो निरी, ' ' येक वेळ चुकतांच विषय थेमान करी अंतरीं, ' ' भोगितां तुझ्या लुगड्याची न ढळे निरी ', अशांसारखी मुक्ताफळे होनाजीच्या लावण्यांमध्ये इतस्ततः उधळलेली आहेत. साऱ्याच शाहीरांच्या बाबतीत असेच घडले आहे. ' तुशीं लपटावें वाटते हौस ' (परशराम, ४।३०), ' तारुणपण हा उघडा मेवा ।...अशामधिं कांहीं विप्क करावा, ' (परशराम, ४।३०), ' मला वाटतें तुशीं करावा फंद ', (परशराम, ४।३०), ' घडो संग तुज फंद पडो हा हेत मनाचा मुरल कधी ? ' (परशराम, ४।३१), ' तुझा आपला संग घडल गडे कर ऐसी यामधीं ' (परशराम, ४।३३) अशी असंख्य वचने परशरामाच्या कवनांत आढळतील.

*

पुरुषांच्या बोलण्याच्या तऱ्हा, आणि बायकांच्या बोलण्याच्या तऱ्हा, यांच्यामध्ये मुळातच मोठा फरक असतो. स्त्रीच्या बोलण्याला स्वभावतःच अधिक काटेकोर मर्यादा असतात. दररोजच्या व्यवहारात बोलण्याच्या या वेगळ्या तऱ्हांचा प्रत्येकाला परिचय असतो. अगदीच रासवट, गांवढळ, रांगड्या लोकांची टोळी सोडून दिली तर जरा बऱ्या प्रतिष्ठित समाजातील स्त्रियांचे बोलणे सामान्यतः मर्यादेचेच असते. प्रतिष्ठितपणाचे प्रमाण जसजसे वाढत जाते तसतशी ही मर्यादा अधिकच काटेकोर बनत जाते. आपल्या मनातील भावना कोणत्या शब्दांनी व्यक्त कराव्यात, स्पष्टपणा किती ठेवावा, आणि मोघम कोठे बोलावे, याचे प्रतिष्ठित स्त्रियांना उपजतच ज्ञान असते.

पण अगदी स्पष्ट शब्दांनी, कसलाही मोघमपणा किंवा आडपडदा न ठेवता, व्यंजनेचा थोडासुद्धा आधार न घेता, कामातुर अवस्थेचे पुरुषासमोर उघड वर्णन करणे हा तर शाहीरांच्या नायिकांचा बाणा आहे. या बाबतीत त्यांना बाज्यात दुसरी जोड मिळणे कठीण आहे.

उघडें करून सांगतां नाहीं मन जगीं लाजिरवाणें ।

ही परशरामाची उक्ती (३।१९) शाहीरांच्या सर्व स्त्रियांच्या बाबतीत खरी आहे. मनात आलेले सर्व प्रकारचे विचार जसेच्या तसे व्यक्त करताना या बायकांच्या चित्ताला थोडीदेखील शरम वाटत नाही. यापुढे या स्त्रियांचे जे उद्गार मी देणार आहे त्यांची जात सर्वस्वी वेगळी आहे. स्त्रियांच्या नैसर्गिक स्वभावाविषयी ज्या कल्पना रूढ आहेत त्यांना

धक्का बसेल असेच हे उद्गार आहेत. एक लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट अशी आहे की, लावण्यांमधील पुरुषांच्या तोंडी जी भाषा आहे तिच्यापेक्षा स्त्रियांच्या तोंडी असलेली भाषा कितीतरी अधिक अमर्यादेची आणि भडक आहे. मुख्य म्हणजे स्त्रियांच्या तोंडी असलेल्या कवनांची संख्या फार मोठी असून त्या मानाने पुरुषांच्या तोंडी असलेल्या कवनांची संख्या फार थोडी आहे. चारास एक असे सामान्यतः प्रमाण पडेलसे वाटते. यामुळे लावण्यांमधून व्यक्त झालेल्या विविध भावना या बहुतांशी स्त्रियांच्याच भावना आहेत. स्त्रीच्या 'भावविश्वा'चे इतके अवतार लावण्यांमधून दिसतात की त्यांची गणना करणे ही गोष्ट फार दुर्घट आहे. यांच्यापैकी ठसठशीत अवतार दाखविणे एवढेच येथे शक्य आहे.

'मला भोगा', 'भोगुं द्या' यांसारखे शब्द या स्त्रियांच्या पाचवीलाच पुजलेले दिसतात. 'इष्क चेतला' यासारख्या शब्दांची भरपूर पेरणी त्यांनी केली आहे. 'रुताचा बहार' हे शब्द त्यांच्या जिभेवर नित्य घोळत असतात. स्तनांचे अगदी उत्तान, कामुक वर्णन करण्याचा त्यांना विलक्षण छंद आहे. आणि या साऱ्यावर कडी म्हणजे प्रत्यक्ष संभोगाचे अगदी साक्षेपाने तपशीलवार वर्णन करीत असतां त्यांच्या प्रतिभेला काही न्यारेच तेज चढत असते. ऐकणारा कितीही इरसाल असला तरी तोही मान खाली घालील, पण त्यांना कसलीही शरम वाटणार नाही.

रामा गोंधळी नावाच्या विख्यात शाहीराच्या कवनांतील काही नमुने पाहा.

नाना परि दाविन मौजा, मला भोगा हो। (अंला, १४८)
आज चला मंदिरीं, बसका दाखविते न्यारा। (अंला, १५६)

या वचनातील 'बसका' या शब्दाचा संभोगासन असा अर्थ आहे.

मारिते गळ्यास मिठी, मला भोगावें। (अंला, १५६)
अशा तरुणपणांत। भोग द्या, लाजूं नका मनांत।
गेंद गुलाल पहाल। सख्या तुम्ही लुटवा नव्या नवतीचा माल।
(अंला, १६१)

शरीराची मोट कर मी चाफ्याची कळी। (अंला, १७०)
कुर्स्तित कवळुन धरा बांधुन स्वारी। (अंला, १७०)
नेत्र चढले, तुमच्याविण मी अडले, भोगावें पुरतें। (अंला, १७३)

संभोगासनांचा स्पष्ट उल्लेख करताना या बायांना कसलाही संकोच वाटत नाही. परशरामाच्या कवनातील पुढील उदाहरणे उल्लेखनीय आहेत.

वाटतें मला आज चल एकांतीं निजू ।
सामानसिद्ध सेजेवर होते मी रुजू ॥ (परशराम, ४।१६)

'सामानसिद्ध सेज' म्हणजे सर्व प्रकारच्या विलासी पदार्थांनी सजविलेली शय्या.

आल्या त्या लिंबोळ्या पाडा जशा ।
चिरा उखळा माझा राव नशा ।
घेऊन तुम्ही पलंगावर बसा ।
चौऱ्याऐंशी आसनें कसा ॥ (परशराम, ४।२२)

सगनभाऊच्या कवनांतील स्त्रिया स्पष्ट बोलण्याच्या बाबतीत याहीपेक्षा अधिक तयार आहेत.

चेतली अग या विषयाची ।.....
ही घडी वरुषाची जाती ।
भोगावा सखा मंदिरातीं । (सगन, २८)

नेहमी बाहेरख्याली करणाऱ्या नवऱ्याची कानउघाडणी करताना सगनभाऊच्या कवनातील स्त्री म्हणते—

बारा द्वार फिरून आला की येकीवर फेरा ।.....
नवीच होती का जुनीच होती तुमची कूबारी ।.....
काळ्यासावळ्या गोऱ्या भुरक्या लहानखुऱ्या ढुंगण्या ।.....
भरपुर भरल्या भरून उरल्या दाण्याच्या कणग्या ।
ह्या रांडा घरघाल्या जैशा बणग्या ।
लोणकडे शुद्ध नाही, कहूपणाची मवारी ॥ (सगन, ४८)

रतिक्रीडेविषयीही या स्त्रिया अगदी वाच्यार्थाला धरून स्पष्टपणे बोलतात.

भर नवती छातीवर गोळा । मद कांडे चरकीं गाळा ।
खेळीमेळी गंजिफा चाळा ।...
रणामधें समशेर चमके चपळा ।...(सगन, ४४)

आणखी एक अवीच्य उदाहरण देतो.

उद्या मी न्हाइन न्हाइन चवथे दिवशीं ।
डाग पडला आंगवस्त्राशीं ।
गोळा करूं द्या करूं द्या बिच्छोना ।
न्हाउन मी आलें पातळ नेसुन ।...

हळुहळु म्हणते सांभाळुन ।
दुखवाल कंबर सरसरून ।...(सगन, २७)

वाङ्मयात कोणताही शब्द ग्राम्य नाही, कोणताही अर्थ ग्राम्य नाही, कोणताही शब्द अश्लील नाही, कोणतीही कल्पना अश्लील नाही, असा वेळी अवेळी घोष करणाऱ्या उदार मनाच्या 'पुरोगामी' महानुभावांना जेणेकरून हर्षाची उकळी फुटेल आणि कलात्मक स्वातंत्र्याचा जयजयकार करावयास सापडेल असा एक इरसाल मासला सगनभाऊच्या कवनामधून आता देतो. प्रत्येक गोष्टीचा संदर्भ काय आहे असे पुसणाऱ्या ह्या क्रांतिवाद्यांसाठी संदर्भ स्पष्ट करतो. प्रियकर आणि प्रेयसी यांच्या मीलनाचे वर्णन या कवनात आहे. प्रियकर आणि प्रेयसी यांच्या आत्यंतिक मानसिक तादात्म्याची काही सुंदर भावगीते इंग्रजी वाङ्मयात आणि मराठी वाङ्मयात बहुश्रुतांनी वाचलेली असतील. तसेच शारीर मीलनाच्या प्रसंगी होणाऱ्या भावनेच्या उत्कटतेचे परिणामकारक चित्रण करणारी भावगीतेही त्यांनी वाचली असतील. आता त्यांनी सगनभाऊच्या नायिकेने शारीर मीलनाचे केलेले पुढील वर्णन पाहावे.

मनांत हासलें ग बाई हसलें । जाणूनबुजून फसलें ॥
लुगडें निरींत फिटलें । भ्याले तोंडाला पाणी सुटले ।
मलखांबासी झटले । मिठी उभयतांचें खटलें ।
सोनें आगींत आटलें ।
दोही मांडिच्या मध्यें डसले ॥ (सगन, ४४)

स्त्रीपुरुषांच्या शारीरिक मीलनाचे इतके वाच्यार्थाने, स्पष्टपणाने, उत्तान व तपशीलवार वर्णन करण्याची काय जरूर आहे ? एखाद्या रमणीय सूचनेने हे कार्य कवीला सहज करता येते, आणि रसिक वाचकालाही ती सूचना तात्काळतोब समजते. मागे पृष्ठ ५४ वर विज्जिका नामक कवयित्रीचे 'धन्याऽसि या कथयसि प्रियसंगमेऽपि' इत्यादि मोहक पद्य उद्धृत केले आहे ते या संदर्भात रसिकांनी मुद्दाम पाहावे.

सगनभाऊच्या लावणीमधील जो वेचा वर उद्धृत केला आहे, त्याच धाटणीची अनेक वचने होनाजीनेही बायकांच्या तोंडी घातली आहेत. उतारे द्यावेत तरी किती ? असा संभ्रम पडावा इतका अशा उक्तींचा सुकाळ आहे. 'अंधारातील लावण्या' या पुस्तकातील ४५ क्रमांकाची होनाजीची लावणी पाहावी. या एकाच लावणीत वाचकाला किती तरी 'सुभाषिते' आढळतील. 'तुम्ही करून घ्या मज उलथीपालथी,' 'मला निजवा आपल्या-खालती,' 'विषयाचा डेरा मथूं' इत्यादी उक्ती पुष्कळच सौम्य वाटाव्या अशा आणखी

काही अर्थांच्य उक्ति या लावणीत आहेत. त्या उद्धृत करण्याची ताकद लेखणीत नाही याचे वाईट वाटते. हाच प्रकार उपर्युक्त पुस्तकातील ४६ क्रमांकाच्या लावणीच्या बाबतीतही आहे. चित्रशाळेने प्रसिद्ध केलेल्या होनाजीच्या लावण्यांच्या संग्रहातील १२३ क्रमांकाच्या लावणीतील व्यंजना मोठी अजब आहे. 'अंधारांतील लावण्या,' ४४ क्रमांकाची सारीच लावणी कमालीची चहाटळ आहे. सुरताचे फारच स्पष्ट आणि वाच्यार्थाने केलेले वर्णन स्त्रीच्या तोंडी कवीने घातले आहे. 'विषयपाठक,' 'सुरतशास्त्र,' 'मोट बांधणे' यासारख्या शब्दांची स्वैर पखरण करून 'अंधारातील लावण्यां'पैकी २४ क्रमांकाची लावणी कवीने रतिक्रीडेचा एक वस्तुपाठच करून सोडली आहे. 'दडदडपुन वरते भिडा', 'चुकलें आसन तर रुसा', 'रोज भोगा घटका तासा। कसोटी देह माझा घासा', 'राया मी तुमची जुनी। वहिवाटास घ्यावी', 'आसन आरशांत करून दावा', 'सख्या मी तुज-खालीं झाकलें', 'निजते एकांतामध्ये नागटी' अशासारखी वचने खरोखरच फार सौम्य होत. या उदाहरणांच्या तोंडात मारतील अशी कैक अर्कट व अर्वाच्य वचने होनाजीच्या लावण्यांमध्ये जागोजाग आढळतील. अशा प्रकारच्या ग्राम्यतेवर भाष्य करण्याचेही कारण नाही. 'म्हणोनि खुंटलें लेखन। लेखनी सर्वथा न चाले जाण। वर्णाक्षर उच्चारण। निश्चयें पूर्ण नाठवे॥' हे एकनाथ महाराजांचे शब्द (भा० रा०, युद्ध० ८९। ३२) आठवून स्वस्थ बसण्याखेरीज दुसरा इलाज नाही!

एक उल्लेखनीय बाब अशी की, या शाहीरांच्या कवनांतील पुरुषांनी रतिक्रीडेचे जे वर्णन केले आहे ते स्त्रियांनी केलेल्या वर्णनापेक्षा कितीतरी सौम्य आणि संयत आहे. 'घडोघडीं हृदयीं तुला धरतो। शांतवन कवटाळून धरतो।', 'भोगितां न पुरे मनतृष्णा', 'लावण्याची सहज आम्हांला संदुक सापडली' हे प्रभाकराच्या नायकाच्या तोंडचे उल्लेख आहेत (प्रभाकर, ३।२२). पण प्रभाकराच्या कवनांमधील स्त्रिया भारीच उच्छृंखल आणि बेताल आहेत. त्यांना कसलीही भीडमुर्वत नाही, थोडी देखील शरम नाही. 'भोग ध्यानी कवळी', 'घास घाला हो जोबन धरून' (जोबन म्हणजे स्तन), 'येतां जातां हसुन एकांतीं कुच कवळून दोन्ही धरावे', 'घडोघडी देहामध्यें विषयबाण करी कहाली', 'ऊर आलें चढून गडे, रसाळ लिंबापरी', 'येतां जातां कोण अतां कवटाळुन घेईल मुका ग', 'बिलगुन निजावें वाटतें मला शेजेसी', 'लिंबापरि तारुण्य विसाबविसांत मुसमुसलें ... झडी पडुन भोगावें वाटतें शरीर कसकसलें', ही प्रभाकराच्या कवनांतील सुभाषिते फारच सोवळी आणि मिळमिळीत म्हणावी लागतील अशी मासलेवाईक मुक्ताफळे त्याच्या नायिका अगदी सहज व बेदरकारपणे उधळताना आढळतात.

एक स्त्री आपल्या प्रियकराला म्हणते—

नाडबंदावर आज तूं व्रतस्थ राहिलास।
नाहीं दुसरीचा उर उघडा करून पाहिलास।

(प्रभाकर, ३।८९)

ही केवळ प्रस्तावना आहे. ग्रंथ सारा पुढेच आहे. 'अष्टांगीं रगा दाटती' अशी शरीराची अवस्था वर्णन करून 'कोण रस भोगील प्रियकरा तुजवाचुन माझा येथे?' असा मर्ममेदी प्रश्न प्रियकराला विचारणाऱ्या या मनमोकळ्या, धीट, आणि पुरोगामी नायिका आहेत. त्यांचा त्यांच्या देहावरच ताबा नाही—मग वाणीवर ताबा कोठून असणार? त्या मदनसंतप्त आहेत, आणि त्यांची जीभ सैल सुटलेली आहे. विषयवासनेच्या अपार धुंदीत, आपण काय बोलत आहोत, आणि काय बोलावयास पाहिजे, याची त्यांना जाणीव नसली तर ते अपरिहार्यच म्हणावे लागेल. पण कवि तर शुद्धीवर होता ना? वैवाहिक जीवनातील विशिष्ट गोष्टी नुसत्या सूचित करताना देखील कुलवतींची कोण विलक्षण तारांबळ उडते—आज देखील तारांबळ उडते. आपल्या मनातील आशय बळणावळणाने, पर्यायोक्ताचा आधार घेऊन, व्यक्त करतानाही त्यांना कोण सायास होतात! त्यांच्या मनाची ठेवणच अशी असते. आणि म्हणूनच यासाठी भाषेत अनेक सोयीचे पर्याय रूढ झालेले असतात. लैंगिक जीवनातील अनेक शब्द आणि अनेक कल्पना समाजात पूर्णपणे अवाच्य असल्यामुळे त्या प्रकट करण्याचा प्रसंग आलाच तर अशा पर्याय शब्दांचा वापर सुसंस्कृत व्यक्तींकडून अपेक्षित असतो. सुसंस्कृत पुरुषांकडून या बाबतीत ज्या अपेक्षा असतात त्यांच्यापेक्षा किती तरी अधिक अपेक्षा सुसंस्कृत स्त्रियांकडून असतात. प्रत्येक प्रतिष्ठित भाषेने अशी उत्कृष्ट तरतूद करून ठेवलेली असते. सामाजिक शिष्टाचारांच्या जपणुकीच्या विचारापोटीच भाषा अशी तरतूद करीत असते. अगदी एकान्तात वाचण्यासाठी लिहिलेल्या वाङ्मयात चहाटळ अर्वाच्यपणा काही मर्यादेपर्यंत खपून जाऊ शकतो. पण या वाङ्मयाचा समाजात सामूहिक दृष्टीने वापर होण्याचा प्रसंग येताच वेगळा प्रकार घडतो. उदहरणार्थ, नाटकामधील पात्र एखादी आक्षेपार्ह त्याज्य कल्पना साभिनय व्यक्त करू लागताच तिचा परिणाम कितीतरी पटीनी वाढतो हा तर प्रत्यक्ष अनुभव आहे. लावण्या तर बोलून चालून फडांमध्ये गर्दीसमोर गाण्यासाठीच निर्माण झाल्या. ही गर्दी देखील विशिष्ट एकजिनसी वर्गापुरती मर्यादित नसून अनेक वृत्तींचे, बुद्धीच्या आणि संस्कृतीच्या विविध पातळ्यांवर वावरणारे तऱ्हेतऱ्हेचे लोक तमाशाच्या गर्दीत एकत्र येणे अपरिहार्य असे. प्रतिष्ठितांपेक्षा निकृष्टांचाच भरणा ज्या गर्दीत जास्त असतो त्या गर्दीपुढे अशा प्रकारच्या लावण्या विशिष्ट मार्मिक शब्दांवर जाणूनबुजून आघात देऊन साभिनय म्हणण्यात आल्या तर नुसत्या लिखित लावणीच्या वाचनाने वाचकाच्या मनावर होणारा परिणाम, आणि ती लावणी कानांनी ऐकणाऱ्या व समोरचे दृश्य डोळ्यांनी पाहणाऱ्या

माणसाच्या मनावर होणारा परिणाम यांच्यामध्ये फार मोठे अंतर पडणारच हे उघड आहे. अशा या संमिश्र गर्दीपुढे म्हणण्यासाठीच रचल्या गेलेल्या लावण्यांमधून शाहीरांनी स्त्रीची कोणती प्रतिमा निर्माण केली ते पाहण्यासारखे आहे. एकांतातच घडणाऱ्या स्त्रीपुरुषांच्या कामुक व्यापारांना त्यांनी भरबाजाराच्या चव्हाट्यावर उभे केले. आणि याहीपेक्षा घृणास्पद गोष्ट म्हणजे हा सारा प्रकार त्यांनी स्त्रीची मदत घेऊन केला—आपल्या लैंगिक जीवनाचे निर्लज्जपणे जाहीर प्रदर्शन करणारी अजब स्त्री त्यांनी गर्दीसमोर उभी केली, आणि स्त्रीजाती-विषयीच्या साऱ्या कल्पनांचे वस्त्रहरण करून टाकले. अगदी सामान्य प्रकारची वेश्या देखील एकान्ताच्या एकान्तात जे शब्द उच्चारताना थोडी तरी लाजेल असे सारे शब्द शाहीरांनी आपल्या लावण्यांतील स्त्रियांना उच्चारावयास लावले आहेत. लावणी या वाङ्मयीन प्रकाराविषयी प्रतिष्ठित समाजाला विलक्षण घृणा का वाटत असे, आणि अत्यंत उत्तान व भडक लावण्यांचे साभिनय गायन ज्या तमाशात होत असे त्या तमाशावर प्रतिष्ठित नागर समाजाचा बहिष्कार का होता, याची उपपत्ति सांगणे फारच सोपे आहे. अण्णासाहेब किर्लोस्करांनी 'शाकुंतल' नाटकाच्या काही पदांना लावणीच्या नुसत्या चाली लावल्या तर 'हे नाटक म्हणजे शुद्ध तमाशा आहे' अशासारखे आक्षेप तत्कालीन वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाले. या घटनेतील मर्म असे की, लावणीविषयी एकंदर प्रतिष्ठित समाजाला तिरस्कारच वाटत होता. बहुतेक लावण्यांमध्ये स्त्रीच्या तोंडी ग्राम्य शब्द आणि ग्राम्य कल्पना, किंबहुना उन्मत्त रतिक्रीडेची अगदी तपशीलवार भडक वर्णने, यांची जी स्वैर खैरात झालेली आहे तीच या तिरस्काराच्या मुळाशी होती. मागच्या काळात काही प्रतिष्ठित माणसे तमाशा पाहत असतील, किंबहुना वेश्याकडेही उघडपणे जात असतील. पण काही व्यक्ती म्हणजे समाज नव्हे! सामान्य कसबिणीच्या पायरीवर स्त्रीला उभी करणाऱ्या लावणीविषयी समाजाला वाटत असलेली घृणा नुसती आकलनीयच नाही, तर समर्थनीय देखील आहे. स्त्रीच्या अनावर कामवासनेचे असले उत्तान आणि भडक चित्रण असल्या प्रकारच्या शब्दांच्या आणि प्रतिमानांच्या साहाय्याने मागे कधीही, कोणीही, इतक्या सातत्याने केले नव्हते. (पुढे काय होईल ते कोणी सांगावे!) आणि खुद्द स्त्रीनेच हे चित्रण केले आहे यामुळे या चित्रणाची घृणास्पदता अधिकच तीव्र झालेली आहे. बहुतेक सर्व लावणीकार शाहीरांना सर्वांत जर कोणता विषय प्रिय असेल तर तो म्हणजे स्त्रीच्या तोंडून साक्षात् मैथुनक्रियेचे स्पष्ट वर्णन करणे. मुग्ध शृंगार, विप्रलंभ शृंगार, विरहिणीच्या आर्त भावना, इत्यादी कोमल गोष्टींना लावणीवाङ्मयात थारा नाही. कामज्वराने ज्यांच्या शरीराचा भडका उडालेला आहे अशा बेभान स्त्रियांनी आपल्या निर्दय रतिक्रीडेच्या स्पष्ट शब्दांनी केलेल्या ग्राम्य वर्णनांनीच शाहिरी लावण्यांचे बहुतेक सारे दालन भरून गेलेले आहे.

वाङ्मयीन अभिरुचीविषयीच्या आपल्या आजच्या कल्पना शाहीर कवींवर लादून त्यांना

दूषण देणे बरे नव्हे असें मत कोणी कोणी मांडतात. त्यांना उत्तर असे की कोणत्याही काळातील सुसंपन्न, प्रतिष्ठित, नागर, सुसंस्कृत अभिरुचीची कसोटी लावली तरी स्त्रियांच्या तोंडी भडक शृंगाराचे व रतिक्रीडेचे जे स्पष्ट उल्लेख शाहीरांनी मुक्तपणे घातले आहेत ते सर्वथा त्याज्यच ठरतील. अगदी आधुनिकतम, अस्तित्ववादी, पुरोगामित्वाचा मतलबी मुखवटा चढवलेले, निस्संग, 'निसुग', आणि स्वतःच्या मागे 'नव' हे मोहक विशेषण जोडणारे जे कवी, कथाकार, कादंबरीकार, किंवा नाटककार आज अनिरुद्ध संचार करीत आहेत त्यांची अभिरुची हा निकष मानला तर मात्र शाहीरांच्या सदर कवनांत (अथवा अन्य कोणत्याच वाङ्मयात) काहीच आक्षेपार्ह ठरणे शक्य नाही—किंबहुना, सारे काही ग्राह्यच ठरेल हे कबूल करणे भाग जाहे. पण वाङ्मयातील या 'नंग' हिप्पी मंडळींचा विचार करण्याचे कारण नाही. या हिप्पींची टोळी भरबाजारात वाटेल ते वेडेचार करीत फिरत असली तरी तिकडे लक्ष न देता प्रतिष्ठितांनी जावयाचे असते.

आणखी एका मताचे खंडन करण्याच्या निमित्ताने थोडे स्पष्टीकरण करणे जरूर आहे. शाहीरांनी काही चांगले पोवाडे लिहिले आहेत, देवादिकांची स्तोत्रे लिहिली आहेत, आध्यात्मिक विषयाचे निरूपण करणारी काही कवने लिहिली आहेत, दंभस्फोट करणारी काही परिणामकारक कवने लिहिली आहेत, तत्कालीन परिस्थितीचे प्रभावी चित्रण करणारी काही कवने लिहिली आहेत, आणि शृंगाराच्या मनोज्ञ छटा देखील मधून मधून व्यक्त केल्या आहेत. या साऱ्या गोष्टी एकदम मान्य. पण त्यांच्या एकूण कवनांपैकी शेकडा साठ कवने तरी वर वर्णिलेल्या उत्तान, भडक, कामुक, किंबहुना रासवट पाशवी शृंगाराचे व रतिक्रीडेचे स्पष्ट वर्णन घोळून घोळून करण्यासाठीच रचलेली आहेत हे तत्क्षणी सिद्ध करता येईल. आणि आणखी एक महत्त्वाची गोष्ट अशी, की या कवनांपैकी बहुतेक कवने स्त्रियांच्या तोंडी घालून शाहीरांनी सुसंस्कृत अभिरुचीचा आणि औचित्याचा सत्यानाश करून टाकला आहे.

'शाहीरांनी स्त्रियांच्या तोंडी घातलेल्या लावण्यांमधून अशी काय विलक्षण ग्राम्यता दिसते ते कळत नाही,' असे अगदी भोळेपणाचा नसता आव आणून काही चावट लोक विचारीत असतात. आतापर्यंत उद्धृत केलेल्या सुभाषितांनी आपले समाधान झाले नाही असे जर त्यांचे म्हणणे असेल तर सुसंस्कृत नागर अभिरुचीची प्रांजळपणे क्षमा मागून या असल्या लोकांचा मुखभंग करण्यासाठी निरुपायाने आणखी काही उतारे घेणे भाग पडत आहे. हे सारे उतारे प्रभाकराच्या लावण्यांमधील आहेत, आणि ते चढत्यावाढत्या प्रभावाचे आहेत, आणि विशेष म्हणजे स्त्रियांच्याच तोंडचे आहेत.

कर राजहंस पाखरा छातीचा कोट, जी जी।

इष्काची काळजामधें लागली चोट ।
नये मनांत आणुं कांहीं लुटावी लाली । (३।८५)

आता थोडी वरची पायरी दाखवतो.

मिठि मारा सळसळती साऱ्या रगा ।...
मऊ मांड्या कंबर सिंहासारखी ।
तुम्ही त्यांत अत्यंत विषयपारखी ।
भरज्वानी हा विस्तव जणुं रखरखी ।... (३।२९)
फुलाप्रमाणें संगसमयीं तव काया तोलतें ।
हसुन आसनांत मधुर बोलतें ।... (३।६५)
लटपटित कासोटा सैल झाली पहा निरी ।...
कसुन भोगावी पलंगावर सौख्य सराई हो । (३।५३)

परंतु हे सारे सौम्य आणि मिळमिळीतच. जरा चुरचुरीत मासला पाहा.

पहिल्या हो नहाणाची ।
हळु हळु तरि करा विषय, मी नव्हे नार गहाणाची ।
अशी निजाची (= निजण्याची) चाल पुण्यामधें नसेल कोणाची । (३।८२)
माझे देहाचा करून बिछोना चारी प्रहर निज वर । (३।८२)
ज्या दिवशीं नागा त्या दिवशीं तळमळते रे ।
स्वप्नअवस्थेमधीं तिंदा गळते रे ।...
चोळी तडकली उरांत मिंगाची रे ।...
विषय अधीं मग स्वकर्म नंतर तें रे ।...
जलदी आतां कर पदरच हंतरते रे ।...
सैल सोड.....धरूं दे रे...

शेवटच्या ओळीत मुळातले काही शब्द मुद्दाम गाळले आहेत. अत्याधुनिक 'पुरोगामी' लेखकांच्या आणि टीकाकारांच्या धृष्टपणाची (अथवा निर्लज्जपणाची) सवय करण्यात अपयश आले आहे हे कबूल करणे भाग आहे.

एक वेळ भोगुनी फिरुन काय मजा ती संगाची ॥
पदर तरी घेउं द्या नका करूं घडी सर्वांगाची ॥...
जिवट पाहुन आसनें स्त्रियेला भ्रतार दाखवती ॥...
सैल सोडिते देह पलंगीं नाहीं मारित मुरका ॥

जिवाकडे पहा जरा विनंती हीच माझी तरका ॥...
उठुन बसवा करीं झाली झोळी पलंगाची ॥ (३।८)

विपरीत रताचे किंवा 'पुरुषायिता'चे एका पुरुषाने केलेले वर्णन 'चौरपंचाशिका' या संस्कृत काव्यातून मागे पृष्ठ ३५ वर उद्धृत केले होते. आता प्रभाकराच्या एका नायिकेने केलेल्या विपरीत रताच्या वर्णनाचा येथे केवळ उल्लेख करतो. ते उद्धृत करण्याचा घोर होत नाही. सदर वर्णन ३।८२ या लावणीत आले आहे. या लावणीच्या जोडीला ३।८३ ही लावणी देखील वाचण्यासारखी आहे. याही लावणीतील उतारा घेणे अशक्य आहे. पुरुषाने 'अंगसंग' करावा म्हणून स्त्रिया किती निलाजरी लाचारी करतात याची उदाहरणे ३।९४, आणि ३।१०३ या लावण्यांत मिळतील. 'करा अंगसंग। निसंग। दंग जीव झाला' अशी ३।१०३ या लावणीची सुरवात असून 'उठ अंगसंग कर निसंग जातो प्रसंग म्हणूं काय तुला?' अशी ३।९४ ची सुरवात आहे. सुरवातीच्या या दोन्ही ओळींमध्ये अगदी स्पष्ट 'आह्वान' आहे. पण या आह्वानातील जोष लवकरच मावळून गेला आहे. आणि 'द्या भोगदान प्रियपात्रा। विनवित्यें मी वारंवार।' व 'शरण आलें आज। लाज राखा पलंगावर चला' अशी दीनवाण्या लाचारीची भाषा सुरू झाली आहे. पहिले आह्वान काय, किंवा नंतरची लाचारी काय, दोन्ही प्रकार सारखेच घृणास्पद होत.

'विषयाची आग' हा काय प्रकार असतो हे जाणून घ्यावयाचे असेल तर प्रभाकराची ३।८० ही लावणी वाचावी. हा पाहा नायिकेचा प्रांजलपणा आणि मोकळेपणा—

मी अति चंचल बायको नको रे घडोघडी विषय खवळूं ॥
नव्हे दुधाची उकळी, सरल्या आला रे उत, पळि घालुन दवळूं ॥...
पहा रे पहा उभी कंचुकी फाटली ॥.....
थंड नव्हे कुणी, विस्तव वाटली ॥
नरम न पाहाली ॥.....
विषयाची रे मोठी आग, जसा कुणि नाग, चढे झररर ॥
पडे पदर, सुटे तळीं निरी, खरिखुरी येई गिरकी गररर ॥

आधीच उफाड्याची स्त्री, त्यात कामातुर झालेली—विषयाची 'अगन पेटली'—आणि 'मन्दरस' (दुबळा) पुरुष, असा चमत्कार झाला असता स्त्रीची जी केविलवाणी अवस्था होते तिचे मोठे 'सुरस' वर्णन प्रभाकराच्या ३।१० या लावणीत आढळेल. पण तिच्यातील बराचसा भाग उद्धृत करण्यासारखा नाही. मूळ अस्सल संहिता वाचण्याची शिफारस करणे एवढेच शक्य आहे. या लावणीतील शब्दांची योजना देखील इरसाल आहे.

'नंबरी' शब्द वापरले आहेत. खरे म्हणजे सदर लावणीची परिणामकारकता या शब्दांनच सामावलेली आहे. अशाच प्रकारची एक 'सिचुएशन' ३।५८ या लावणीतही आहे. आणि तेथेही अशीच शब्दयोजना आहे.

रतिक्रीडेचे अगदी स्पष्टपणे वाच्यार्थाने वेलेले वर्णन सर्वत्र स्त्रीच्या मुखानेच केलेले असले तरी खास इरसाल पुरुषी शब्द या लावण्यांतून इतस्ततः विखुरले आहेत. आणि या शब्दांमुळेच सदर लावण्यांची रंगत वाढलेली आहे असेही कोणी 'ज्ञातास्वाद' मार्मिक म्हणण्याची शक्यता आहे, 'कारण ज्यासाठीं तेंच तुम्हांला समग्र सापडलें' अशी सुरवात असलेले एक 'संभोगगीत' प्रभाकराच्या ३।१०७ या लावणीत आढळेल. या गीतातील कोणतीही एक ओळ समग्र उद्धृत करता येणार नाही. प्रत्येक ओळीत काही ना काही इरसाल वाह्यातपणा आहेच.

*

प्रत्यक्ष संभोगाचे स्त्रीनेच केलेले स्पष्ट आणि भडक वर्णन हा काय प्रकार असतो याचे थोडे मासले लावणीकार शाहीरांच्या कवनांतून आतापर्यंत दाखविले. अशा प्रकारची एखादी लावणी चुकून आली असती तर या हीन प्रकाराची चर्चा न करता तिच्याकडे दुर्लक्ष करता आले असते. परंतु अशा अर्वाच्य उत्तान लावण्यांची संख्या फारच मोठी आहे. किंबहुना एकंदर लावणी वाङ्मयात हाच प्रधान विषय आहे असेही म्हणता येईल. वस्तुतः अशा प्रकारची एखादीच लावणी असती आणि बाकीच्या साऱ्या सोज्वळ असत्या तरीही ते दूषणास्पद झाले असते असे सदभिरुचीची जोपासना करण्यात दक्ष असलेल्या संस्कृत साहित्यशास्त्रकारांनी म्हटले असते. एखाद्या चांगल्या पद्यात एकही आक्षेपार्ह शब्द त्यांना चालत नसे. आणि लावण्यांमध्ये तर अशा शब्दांचा अक्षरशः सडा पडलेला आहे. असल्या प्रकारचा ग्राम्य आशय रांगड्या व वेचक भाषेत व्यक्त झाला असता तर या लावण्या कोणीही वाचल्या नसत्या. पण झाले आहे ते असे की या लावणीकार शाहीरांच्या घरी उत्कृष्ट, परिणामकारक, शब्दांचा अक्षरशः खजिना भरलेला आहे. त्यांची शब्दसंपदा डोळे दिपविणारी तर आहेच, पण तिच्यातील विविधता देखील मोठी विलक्षण आहे. या वेचक शब्दांचा वापर मोठ्या कुशलतेने करण्याची किमया त्यांना साधलेली आहे. लावणीकारांचे हे बलस्थान आहे. लावणी वाचीत असता तिच्यातील विषय (अथवा आशय) कितीही घृणास्पद आणि आक्षेपार्ह असला तरी शब्दांच्या योजनेतील विलक्षण चातुर्य पाहून मान डोलावण्याचा मोह झाल्याखेरीज राहत नाही. आणि या त्यांच्या चातुर्यामुळेच लावण्यांमधील 'संभोगगीते' अधिक आक्षेपार्ह झालेली आहेत हे त्यातील खरे मर्म आहे. शब्दांची ही अलौकिक संपदा अभिरुचिसंपन्न अभिव्यक्तीत खर्च झाली असती तर या कृतींना खरोखरच तोड सापडली नसती. हे सारे वारांगनेच्या सौंदर्यासारखे झाले आहे. दुर्गुणी

वेश्या कुरूप असली तर तिच्याकडे कोणीही ढुंकून पाहत नाही. पण तीच दुर्गुणी वेश्या स्वरूपसुंदर असली तर तिच्याकडे टक लावून पाहण्याचा मोह आवरता येत नाही. पण असा मोह झाला तरी त्यायोगे तिचे अवगुण काही झाकले जात नाहीत. किंबहुना ते उफाळून बाहेर येतात. एकनाथांनी म्हटल्याप्रमाणे—

मुकुट कुंडलें कंकण । मूर्खाअंगीं बाणलीं पूर्ण ।
ते शोभा लोपोनि मूर्खपण । बाहेर संपूर्ण प्रकाशे ॥

(ए. भा., २।२०१)

सुंदर, वेचक, शब्द ही लावणीकारांची कटककुंडले होत. पण या शोभेमुळे त्यांच्या वृत्तीतील अर्वाच्य हीन अभिरुचि काही झाकली जात नाही—उलट ती अधिकच आक्षेपार्ह बनली आहे.

लावणीकार शाहीरांच्या कवनांमधील स्त्रिया एकान्तांतच घडणाऱ्या अनेकविध गोपनीय गोष्टी अगदी स्पष्टपणे उघड करून सांगतात, आणि त्या सुद्धा चवीने घोळून घोळून सांगतात, याच गोष्टीवर खरा आक्षेप आहे. 'अशा गोष्टी जर दररोज घडत असतात तर त्यांचे वर्णन करणे मात्र आक्षेपार्ह आहे असे म्हणणे हा शुद्ध दांभीपणा आहे' असे 'वैश्विक जाणिवां'चे डबोले ज्यांना अचानक सापडले आहे असे काही पुरोगामी लोक म्हणतात. बंदिस्त शय्यागृहाच्या एकान्तात स्त्रीपुरुषांनी काय वाटेल ते बोलावे—आणि हे त्यांना कोणी सांगावे लागत नाही, ते बोलतातच. पण हे बोलणे शय्यागृहातच राहावयाचे असते, दिवाणखान्यात यावयाचे नसते, हा साधासुधा व्यवहार आहे. "सुरतारम्भ-गोष्टीमध्ये दुहेरी अर्थ असलेल्या शब्दांचा उपयोग करून 'रहस्यवस्तु' चातुर्याने प्रकट करावी" अशी सूचना वात्स्यायनाने 'कामसूत्रा'त देऊन ठेवलेली आहे. पण 'रहस्यवस्तु' प्रकट करावयाची असते एकान्तात—समाजात नव्हे! एकान्तातील गुह्य गोष्टी इतरांसमोर बोलण्यास काही हरकत नाही असे तोंड भरून बोलणाऱ्यांनी न्हाणीघरात स्नानाच्या वेळी विवस्त्र व्हावे लागते म्हणून त्याच दिगंबर अवस्थेत दिवाणखान्यात चार माणसांच्या समोर येण्यात संकोच बाळगण्याचे कारण नाही. एवढे करतील का ते? असा प्रयत्न त्यांनी प्रामाणिकपणे करून पाहावा. रहस्य हे रहस्यच राहिले पाहिजे असा सामाजिक संकेत असल्यामुळेच 'न गुह्यं विवृणुयात्' असे 'चरकसंहिते'ने सांगितले आहे (सूत्रस्थान, ८।२५). 'नागरकवृत्ता'मध्ये त्याज्य गोष्टींचे परिगणन करीत असता वात्स्यायनाने 'या गोष्टी लोकविद्विष्टा या च स्वैरविसर्पिणी।...न तामवतरेद् बुधः॥' असे म्हटले आहे. (कामसूत्र, १।४।३८). चांगल्या कुळाच्या अब्रूवर नेहमी पांघरूण घालावयाचे असते, आणि देहावर वस्त्रप्रावरण घालावयाचे असते, अशा आशयाचे क्षेमेन्द्राचे एक वचन आहे. 'संवृतान्येव शोभन्ते शरीराणि कुलानि च।' कामशास्त्राचे अध्ययन करावयास वात्स्यायनाने

स्त्रीला देखील परवानगी दिलेली आहे. पण हे अध्ययन करावयाचे ते एकान्तात (रहसि). 'तस्माद्वैश्वासिकाज्जनाद्रहसि प्रयोगाञ्छास्त्रमेकदेशं वा स्त्री गृह्णीयात् ।' (कामसूत्र, १।३।१२). कन्येने देखील अशा गोष्टींचे ज्ञान करून घेण्यास वात्स्यायनाची हरकत नाही. पण हे ज्ञान तिने एकटीने, एकान्तातच करून घेतले पाहिजे असे वात्स्यायन म्हणतो. 'अभ्यासप्रयोज्यांश्च चातुःषष्टिकान् योगान् कन्या रहस्येकाकिन्यभ्यसेत् ।' (कामसूत्र, १।३।१३) या सूत्रावर भाष्य करताना यशोधर आपल्या 'जयमङ्गला' या टीकेत म्हणतो—"रहसीति लज्जावृनिवृत्यर्थम् । एकाकिन्याचार्यनिरपेक्षा ।"

कामसूत्राच्या दुसऱ्या अधिकरणाच्या पाचव्या प्रकरणात निरनिराळ्या देशांतील स्त्रियांच्या (रतिविषयक) स्वभावाचे विवेचन वात्स्यायनाने केले आहे. 'देशोपचार प्रकरण' हे या प्रकरणाचे शीर्षक आहे. या प्रकरणाच्या २९ व्या सूत्रात महाराष्ट्रीय स्त्रियांच्या वृत्तीचे पुढीलप्रमाणे वर्णन आले आहे.

> सकलचतुःषष्टिप्रयोगरागिण्योऽश्लीलपरुषवाक्यप्रियाः, शयने च रभसोपक्रमा महाराष्ट्रिकाः ॥

या सूत्राचे विवरण करताना यशोधर म्हणतो—महाराष्ट्रिकाः इति । नर्मदाकर्णाट-विषयोर्मध्ये महाराष्ट्रविषयः । तत्र भवाः । सकलायाश्चतुःषष्टेः पाञ्चालिक्या गीताद्यायाश्च प्रयोगेण रागस्तासां भवतीति तत्प्रयोगरागिण्यः । अश्लीलं ग्राम्यं परुषं निष्ठुरं वाक्यं वदन्ति सहन्ते चेति तत्प्रियाः । शयने चेति संप्रयोगे । रभसोपक्रमा इति धृष्टत्वोद्भटत्वरभसेन पुरुषमभियुञ्जते इत्यर्थः ।

याचा आशय—महाराष्ट्रातील स्त्रियांना गीत इत्यादी ललित कलांची आसक्ती असते, आणि या कलांच्या प्रयोगाने त्यांचा अनुराग वृद्धिंगत होतो. तसेच त्या अश्लील, ग्राम्य, आणि निष्ठुर वाक्ये बोलतात; आणि इतरांनी उच्चारलेली अशा प्रकारची वाक्ये त्यांना सहन होतात. (कारण त्यांना ती आवडतात). संभोगक्रियेमध्ये त्या आक्रमक वृत्तीच्या असून तिच्यात त्यांची धृष्टता दिसते, आवेग दिसतो.

शाहीरांच्या लावण्यांमध्ये रतिक्रीडेच्या वर्णनाच्या बाबतीत स्त्रिया स्पष्टता दाखवितात, आणि त्यांच्या रतिक्रीडेमध्ये आवेश दिसून येतो, व धृष्टता दिसून येते—या साऱ्या वैशिष्ट्यांचे स्पष्टीकरण कामसूत्रातील वरील विवेचनात सापडेल. महाराष्ट्रीय स्त्रिया 'चण्डवेग' म्हणजे आत्यन्तिक विषयासक्त असतात असा अभिप्राय पद्मश्री नामक कवीच्या एका पद्यात प्रकट झाला आहे.

'नागरिक' स्त्रिया म्हणजे पाटलिपुत्रातील स्त्रिया ग्राम्य आणि निष्ठुर वाक्ये बोलतात—पण ती एकान्तात बोलतात (लोकांपुढे नव्हे !) असे वात्स्यायन म्हणतो. 'तथाविधा

एव रहसि प्रकाशन्ते नागरिकाः ॥' (कामसूत्र, २।५।३०) याचे विवरण करताना यशोधर म्हणतो—"नागरिका इति पाटलिपुत्रिकाः।...तेनैव प्रकारेण सकलचतुःषष्टि-प्रयोगतयाऽश्लीलपरुषवाक्यप्रियतया च रहसि विजने प्रकाशन्ते। सत्रपत्वात्। महाराष्ट्रिकास्तु प्रसह्य रहसि चेति विशेषः।" या विवरणात यशोधराने महाराष्ट्रीय स्त्रिया आणि पाटलि-पुत्रातील स्त्रिया यांच्यामधील भेद स्पष्ट केला आहे. पाटलिपुत्रातील स्त्रिया लज्जावती असल्यामुळे अश्लील व ग्राम्य वाक्ये फक्त एकान्तामध्ये (रहसि = विजने = एकान्तामध्ये) बोलतात; महाराष्ट्रीय स्त्रिया अशी वाक्ये एकान्तात तर उच्चारतातच, पण इतरांसमोरही उच्चारताना कचरत नाहीत.

कामसूत्रातील हे विवेचन केवळ गमतीने दिले आहे. शाहीरांनी इतके विलक्षण अर्वाच्य बोलणाऱ्या असंख्य स्त्रियांची चित्रे का निर्माण केली? या प्रश्नाचे उत्तर शोधण्याच्या प्रयत्नात असता कामसूत्रातील वरील विवेचनाची सहज आठवण झाली इतकेच. कोणा काकदृष्टी आणि काकवृत्ती माणसाला याचे व्यर्थ भांडवल करण्याचा मोह होऊ नये यासाठी हे स्पष्टीकरण केले आहे. सुज्ञांस अधिक सांगणे नलगे.

भाग चौथा

उपसंहार

उपसंहार

सुसंस्कृत शिष्टांच्या व संभावितांच्या समाजात जे शब्द उच्चारताना बोलणाराला अवघडल्यासारखे होईल असे परुष, असभ्य अथवा ग्राम्य शब्द, किंवा अशा असभ्यार्थ उक्ति जेणेकरून सौम्य होतील अशा युक्त्या सभ्य माणसे नित्य वापरीत असतात. बोलणाराला किंवा ऐकणाराला तापदायक वाटणार नाहीत असे पर्यायशब्द वापरणे किंवा मूळ शब्दाच्या रूपात थोडाफार बदल करणे, यासारख्या युक्त्या उपयोगी पडतात. इंग्रजीत या प्रकाराला 'यूफिमिझम्' (euphemism) म्हणतात. गुस्ताफ् स्टर्न याने यूफिमिझम्ची पुढीलप्रमाणे व्याख्या केली आहे—'a tendency to tone down or veil, dangerous, indecent, or otherwise unpleasant things...' (*Meaning and Change of Meaning*, 1965, p. 330). ऐकणारा कोण आहे याचा विचार मनात येताच काही शब्द वापरताना आपण कचरतो. तसेच, काही शब्दांच्या वापरावर परंपरेने अथवा शिष्टाचाराच्या अनुरोधाने, कडक बंधन पडलेले असते. इंग्रजीत ज्याला taboo म्हणतात त्यासारखाच हा प्रकार होय. स्त्रीपुरुषांच्या गुह्येन्द्रियांचे उल्लेख आणि विशिष्ट शरीरधर्मांचे उल्लेख यांच्या बाबतींत परंपरेने कडक निर्बंध चालत आलेले आहेत. एखाद्या कालखंडात यांच्यापैकी काही शब्दांचा वापर वाङ्मयात दिसून आला तरी अशा शिथिलपणावर पुन्हा नियंत्रण पडते. पण सामान्यतः अशा शब्दांवर बहिष्कार हीच उच्च अभिरुचीची प्रकृति असून हे शब्द वापरण्याची आसक्ती ही विकृती

होय. विशिष्ट कालखंडात प्रतिष्ठित समाजासाठी लिहिलेल्या वाङ्मयात असे शब्द आलेले दिसले तर ते आक्षेपार्हच होय. याच दृष्टीने जुन्या मराठी कवितेतील असंख्य उदाहरणे मागे दिली होती. स्वभाषेतील असे शब्द वाच्यार्थाने वापरणे अवघड जाते याचे कारण अशा शब्दांशी अनेक आक्षेपार्ह कल्पना निगडित झालेल्या असतात. स्वभाषेतील हे शब्द न वापरता मनातील आशय प्रकट करण्याचे एक उत्कृष्ट साधन उपलब्ध असते. परभाषेतील शब्दांचा, किंवा स्वभाषेशी संबद्ध असलेल्या अन्य एखाद्या भाषेतील शब्दांचा वापर करणे हे ते साधन होय. परभाषेतील समानार्थक शब्दांच्या वाच्यार्थाभोवती वर उल्लेखिलेल्या अनेक आक्षेपार्ह कल्पना निगडित झालेल्या नसतात—या दृष्टीने ते बहुतांशी निराकारच असतात. म्हणून जो विशिष्ट आशय स्वभाषेतील शब्दांचा वापर करून शिष्ट समाजात व्यक्त करणे सुसंस्कृत माणसाला अवघड जाते तोच आशय परभाषेतील अथवा आप्तसंबंधातील अन्य भाषेतील शब्दांनी व्यक्त करण्यास संकोच वाटत नाही. मराठीपुरतेच बोलावयाचे तर जे शब्द स्त्रीपुरुषांच्या संमिश्र समाजात वापरताना कोणताही सुसंस्कृत मनुष्य अडखळेल त्या शब्दांनी व्यक्त होणारा आशय इंग्रजी शब्दांच्या आधाराने स्पष्ट करताना त्याला संकोच वाटत नाही, हा प्रत्यक्ष अनुभव आहे. मैथुनक्रियेसाठी अथवा संभोगासाठी 'इंटरकोर्स,' मूत्रासाठी 'यूरीन', विष्ठेसाठी 'स्टूल्स', गर्भपातासाठी 'ॲबॉर्शन्', बाळंतपणासाठी 'डिलिव्हरी', वियाळशीपणासाठी 'पीरियड' किंवा 'मंथली पीरियड', इत्यादी अनेक शब्द पक्वया सभ्य स्त्रियांसमोर अथवा स्त्रीपुरुषांच्या संमिश्र समाजासमोर वापरताना अडखळल्यासारखे होत नाही. मुलीला 'नहाण' आले असे इतरांसमोर म्हणताना जीभ थोडीशी कचरतेच. पण ती 'मॅचुअर' झाली, तिला 'मॅचुरिटी' आली असे म्हणताना कसलाच संकोच वाटत नाही. अतिरिक्त कामवासनेसाठी 'हीट' हा इंग्रजी शब्द वापरणे सोयीचे होते. याहीपेक्षा साधे उदाहरण घेतो. 'माझा नवरा आला' असे सभ्य बाई चारचौघात बोलत नाही. 'माझे मिस्टर आले' असे ती म्हणते. यातील मर्म स्पष्ट आहे.

याच न्यायाने अस्सल मराठी शब्दांऐवजी संस्कृत शब्द वापरणे फार सोयीचे असते. सभ्य व नागर वाङ्मयात, आणि प्रतिष्ठितांच्या समाजात, असे संस्कृत शब्द वापरताना थोडेसुद्धा अडखळल्यासारखे होत नाही, हा अनुभव आहे. मैथुनक्रियेसाठी व्यावहारिक मराठीत जो शब्द वापरतात, आणि शिवी देताना ज्या शब्दाचा तोंडीलावण्यासारखा उपयोग केला जातो, तो शब्द कोणीही सभ्य मनुष्य वाङ्मयात वापरणार नाही, आणि समाजात उच्चारणार नाही. पण 'संभोग' हा शब्द तत्काळ खपून जाईल. पुरुषाच्या गुह्येन्द्रियासाठी मराठीत अनेक शब्द आहेत. पण यांच्यापैकी प्रत्येक शब्द आपल्याला ग्राम्य वाटतो, व आपण समाजात त्याचा उच्चार करीत नाही. (एखादा बेशरम व लतकोडगा आधुनिक नवकवी असाही शब्द वापरण्याचा अलौकिक पराक्रम करून दाखवतो, व तसलाच एखादा ओंगळ टीकाकार त्याचे निर्लज्जपणे समर्थन करतो ही गोष्ट वेगळी!)

पण आपल्या मनातील आशय 'गुह्येन्द्रिय' या शब्दाने यथास्थित प्रकट होतो. 'विष्ठा' व 'मूत्र' या संस्कृत शब्दांऐवजी आपण अनुक्रमे 'स्टूल्स' व 'यूरिन' हे शब्द डॉक्टरांसमोर निःसंकोचपणे उच्चारतो. पण या इंग्रजी शब्दांसाठी असलेले अस्सल मराठी शब्द न वापरता आपण त्यातल्या त्यात सोय म्हणून संस्कृत शब्द वापरतो. एकवेळ संस्कृत शब्द वापरले तरी चालेल, पण मराठी शब्द उघडपणे चारचौघात उच्चारणे अवघड होईल. वाङ्मयात किंवा सभेत वापरणे तर अगदीच अशक्य आहे. आज 'विष्ठा' आणि 'मूत्र' यांसाठी ग्रामीण व अगदी घरगुती व्यवहारातच रूढ असलेले मराठी शब्द एखाद्या कवितेत, निबंधात, नाटकात, वापरले गेले तर कसे काय वाटेल हे कोणाही बऱ्यापैकी सुसंस्कृत असलेल्या माणसाने आपल्या मनाला विचारून पाहावे. या शब्दांचा वापर वाङ्मयात झाला तर ते किती असह्य होते हे ध्यानात यावे म्हणून मुद्दामच कृष्णदयार्णवांसारख्या विरक्त प्रतिष्ठित ग्रंथकाराच्या लेखनातून (अशा शब्दांचा वापर का त्याज्य आहे हे स्पष्ट करण्यासाठीच) एक उदाहरण देतो, "आपला गू म्हणूनि घेतां पदरीं। तो काय दुर्गंधि उणी करी। तैशी आत्मबुद्धि जों शरीरीं। दुःखसागरीं तों बुडणें॥" (हरिवरदा, (१४।६१३) या ओवीच्या पहिल्या दोन चरणातील दाखला मुळातच अभद्र आहे, आणि त्यातही पहिल्या चरणातील 'विष्ठा' या अर्थाचा मराठी शब्द तर किळसवाणा आहे. आणखी एक उदाहरण देतो—कृष्णाने गोवर्धन पर्वत उचलला या अलौकिक पराक्रमाचा महिमा वर्णीत असता कवी म्हणतो—"कृष्ण प्रतापमार्तंड। येरां न उठे हागती रांड। त्या कृष्णाचा पडिपाड। कराया तोंड कोणाचे॥" (हरिवरदा, ३३।३६५) या ओवीच्या दुसऱ्या चरणातील शब्दांची जात प्रतिष्ठित वाचकांनी पाहावी. याच दृष्टीने 'गांडीवाटे प्राण सोंडी', आणि 'गांडीवाटे सांडिता लेंडा। सरिसा निघाला प्राणलोंटा।' हे कृष्णदयार्णवांनी केलेले केशी नामक दैत्याच्या मृत्यूचे वर्णन (हरिवरदा, ३७।८५-८६) पाहावे. हे शब्द उच्चारणीय आहेत काय? लेखनीय आहेत काय? श्रवणीय आहेत काय? प्रतिष्ठित वाङ्मयात येण्यासारखे आहेत काय? प्रतिष्ठित सुसंस्कृतांच्या समाजात उच्चारण्यासारखे आहेत काय? इत्यादी प्रश्नांची उत्तरे सभ्य आणि सुसंस्कृत वाचकांनी आपल्या मनालाच विचारावी. वर उल्लेखिलेले शब्द उच्चारण्यावाचून गत्यन्तर नव्हते असेही म्हणता यावयाचे नाही. कारण खुद्द कृष्णदयार्णवांनीच 'विष्ठामूत्रश्लेष्मागार' (हरिवरदा, १३।७१) 'मलमूत्र' (हरिवरदा, १४।६०९), 'पायु' (अपान या अर्थाने; हरिवरदा, ३७।८४) अशासारखे वापरले आहेतच की. मला गंमत वाटते ती ही की, 'रुधिर' किंवा 'रक्त' असे अगदी साधे शब्द न वापरता हे जुने कवी 'अशुद्ध' हा शब्द वापरतात. एकनाथांच्या भावार्थरामायणात याची असंख्य उदाहरणे सापडतील. (युद्धकाण्ड, १५।१३३; १६।२३; १६।१७४; २०।४८; २६।१८४; ३२।५४; ३३।२४; ५९।११ इत्यादी). पण 'फळफळा मुतणे' (भा. रा., उत्तरकांड, १५।२८), 'गांड'

'लंड' अशासारखे शब्द वापरताना एकनाथांना काय, किंवा कृष्णदयार्णवांना काय, मुळीच संकोच वाटत नाही. या शब्दांचा वापर अगदी अपरिहार्य होता असे नाही. कारण 'पायु' 'बृहती' (ए. भा., ३।३८९) अशासारखे शब्द ते वापरतात. 'उपर्युक्त ग्राम्य मराठी शब्द एकनाथ आणि कृष्णदयार्णव यांच्यासारखे प्रतिष्ठित वेदान्ती कवी जर मोकळ्या मनाने वापरतात, तर मग आज आम्ही असे शब्द वापरण्यास कोणतीं हरकत आहे?' अशासारखा प्रश्न एखादा 'उदार' मनाचा 'पुरोगामी' सद्गृहस्थ विचारण्याची शक्यता आहे. हरकत नाही ना? ठीक आहे. अशा सद्गृहस्थाने पुढील प्रश्नांची प्रामाणिक उत्तरे द्यावीत. समाजासमोर, प्रतिष्ठितांच्या सभेत, स्त्रीपुरुषांच्या मिश्र समाजात, असे शब्द तुम्ही उच्चाराल का? आपल्या मुलांमुलींसमोर किंवा नातेवाईक स्त्रियांसमोर असे शब्द उच्चाराल का? रंगभूमीवरील नाटकातील पात्राने असे शब्द उच्चारले तर कसे होईल? विद्यार्थ्यांच्या पाठ्यपुस्तकात असे शब्द चालतील काय? एखाद्या सभ्य स्त्रीने हे शब्द उच्चारले तर काय हरकत आहे? आणि खुद्द तुमच्याशी बोलताना एखाद्या कठोर वाक्यात असा शब्द वापरून तुम्हाला गालिप्रदान केले तर कसे काय वाटेल? किंवा तुमच्या भार्येला उद्देशून बोलताना त्यांचा प्रयोग केला तर काय होईल? या किंवा अशासारख्या प्रश्नांची उत्तरे देण्याचा प्रयत्न तरी करून पाहावा! या प्रश्नांची उत्तरे नकारात्मक आली तर हे आणि याच जातीचे शब्द ग्राम्य आहेत असेच सिद्ध झाले म्हणावयाचे. लावणीकार शाहीरांनी असे असंख्य ग्राम्य शब्द अगदी बेदरकारपणाने केव्हाही, कुठेही, आणि कोणाच्याही तोंडात घातले आहेत म्हणून त्यांच्यावर टीका करणे जरूर नाही काय? 'रांड' हा शब्द कोणी कोणासमोर उच्चारावा याला लावण्यांमध्ये काही धरबंदच नाही. (मागे पृष्ठ पाहा.) 'भवल गरमिची रांड' असे पठ्ठे बापूरावांच्या एका कवनातील बाई अगदी सहज बोलून जाते. 'गोडी सदा हिला फळण्याची,' 'दासीची झाली अवचित राणी गेली मुतायला तत्क्षणी,' असे बापूराव मोकळ्या मनाने बोलतो. त्याच्या कवनातील एक सासुरवाशीण आपल्याला सासरी होणाऱ्या जाचाचे वर्णन करताना म्हणते—'त्याच्या हुकमाने मुतायला जावा, आसी सासरची तऱ्हा.' 'तडकफडक कडक शाहिरी'चा हा अस्सा प्रकार आहे! बायका देखील वाट्टेल ते शब्द हसतखेळत उच्चारतात, हे तर शाहिरीचे वैशिष्ट्य आहे. याच्यावर टीका करायची नाही? चांगला आहे प्रकार! 'तुझ्या पोटीं असा पुत्र कसा आला?' अशा अभिप्रायाने 'तू यशोदा...कैसा ब्यालीस हा वनमाळी?' असा प्रश्न कृष्णदयार्णवांची एक गोपिका यशोदामाईला विचारते. (हरिवरदा, ८।३१२) एखाद्या थोर ऐतिहासिक, राजकारणी, किंवा सामाजिक दृष्ट्या प्रतिष्ठित गृहस्थांच्या मातेविषयी असे कोणी म्हटले तर आज आपल्याला ते खपेल काय? 'राणीसाहेब परवा ब्याल्या आणि त्यांना मुलगा झाला' असे म्हटले तर त्यात काय बिघडले? शब्दांची ग्राम्यता कशी सिद्ध होते हे यावरून स्पष्ट होईल. 'श्रवणिं सखिच्या कादंब

कुसुम पाहे। स्तनावरि तें जलबिंदु ढाळताहे।' या देवलांच्या 'मृच्छकटिका'तील चारुदत्ताच्या तोंडी असलेल्या पदात 'स्तनावरि' या शब्दाऐवजी 'थानावरि' हा शब्द चालेल काय? पण जुन्या कवींनी हा शब्द असंख्य वेळा वापरला आहे. पण त्यांनी तो वापरला असला तरी देखील आज प्रतिष्ठित माणसे तो मुळीच वापरणार नाहीत.

थोडक्यात सांगावयाचे झाले तर आपल्या अभिरुचीचा प्रवास ग्राम्यतेतून अग्राम्यतेकडे होत चालला आहे. गेल्या शतकाच्या सुरवातीला इंग्रजांची राजवट इकडे सुरू झाली, आणि त्यांच्या विविध वाङ्मयातील प्रतिष्ठित खानदानीपणाचा आपल्याकडील सुशिक्षितांना निकटचा परिचय झाला, इंग्रजांच्या बोलण्यातील शिष्टाचार त्यांना अवगत झाले, हे एक महत्त्वाचे कारण याच्या मुळाशी होते यात शंकाच नाही. संस्कृत काव्यनाटकादि ललित वाङ्मयाचा अभ्यास, तसेच संस्कृत साहित्यशास्त्राचा परिचय, हीही आणखी कारणे निश्चितपणे आहेत. 'भडवे', 'भडवेपणा', असे शब्द 'लोकहितवादी' रा. ब. देशमुख ('शतपत्रें', पत्र क्र. ३१) वापरतात. पण यापुढच्या काळातील भारदस्त निबंधांमध्ये असे शब्द आढळणार नाहीत. हे कशाचे द्योतक आहे? इंग्रजी वाङ्मयाच्या व इंग्रजी शिष्टाचारांच्या दृढ परिचयामुळेच हे घडले. पण हे नवे हृद्य संस्कार मराठी भाषेवर होत असले तरी चावट, अर्वाच्य, आणि ग्राम्य शब्दांचा वापर करण्याची जी वाईट खोड 'कडकडीत शाहिरी'ने लोकांना लावलेली होती ती सुखासुखी कशी जाणार! १८७० पासून १९०० पर्यंत तीस वर्षांच्या काळात लिहिल्या गेलेल्या बहुतेक साऱ्या वास्तववादी प्रहसनांमध्ये आणि काही सामाजिक नाटकांमध्ये भरपूर ग्राम्यता आढळेल. 'स्वैरसकेशा' नाटकातील कापालिक प्रौढ स्त्रीशी संबंध ठेवणाऱ्या माणसाचे वर्णन 'वाळून सुरकुत्या पडलेला आंबा चोखीत बसणारा' या शब्दांनी करतो. 'रांड', 'रांडवा', 'रांडावलेली' ('रांडावलेली गोरटेली बाई') यासारखे शब्द इतस्ततः पेरलेले आहेत. 'निपटारी बायको', 'रंडकी' असेही शब्द आहेत या नाटकात. 'टारगट पोर' नावाच्या प्रहसनातील नायक 'रांड ठेवीन' अशी पुन्हा पुन्हा घोषणा करतो, प्रत्यक्ष बायकोचा 'रांडे!' असा उद्धार करतो; तिला 'भुरी म्हैस' म्हणतो, 'घूस' म्हणतो, 'घोरपड' म्हणतो; बापाला 'थेरडा' म्हणतो, आईला 'थेरडी' म्हणतो, तिला 'बुद्धु' अशी हाक मारतो. 'कृपण सावकाराचा फार्स' नामक प्रहसनातील विसाजीपंत सावकार स्वतःच्या बायकोला 'मादरचोद' म्हणतो, आपल्या मुनीमाला 'गयाळचोट' म्हणतो, बायकोचा 'रांडे!' असा उद्धार करतो.

'फरडा मुत्सद्दी' या ना. ह. भागवतांच्या प्रहसनातील मुत्सद्दी आपल्या बापाला 'दगडोबा' म्हणतो, आणि बाप उलट त्याला 'रांडलेक' म्हणतो. 'मोर एल्एल्. बी.' या भागवतांच्याच प्रहसनात 'रंडकी', 'रांडबोडकी' अशासारखे शब्द बायकाही सहज

वापरतात. 'तरुणीशिक्षणनाटिका' या ना. बा. कानिटकरांच्या नाटकातील पार्वतीबाई 'माझा विटाळ जाण्याची वेळ येऊन ठेपली' असे आपल्या सवतीजवळ म्हणते. 'लवंडीच्यावर लागलीच फौजदारी करीन' असे म्हातारा शास्त्री म्हणतो, 'कफाचा बेडका' भिंतीवर थुंकतो, आणि 'कफानं सदा मडकं डबडबलेलं आहे जसं!' असा त्याची बायको त्याच्या तोंडावर उद्धार करते. 'काय मेली बोडक्याला कानटोपी घातली आहे!' असेही म्हणते.

हे झाले शब्दांविषयी. हाच प्रकार अर्थाच्या बाबतीतही दिसून येतो. 'तोंड सोडणें' हा प्रकार या प्रहसनांतील बायकांच्या अंगवळणीच पडला आहे. 'तरुणीशिक्षणनाटिके'ची नायिका आपल्या शिक्षकासमोर म्हणते—"ह्या किड्यांच्या मळापासून निघालेल्या सतरा ठिगळांच्या आणखी दहा ठिकाणी शेंबूड लागलेल्या फाटक्या मुकट्याचं रकटं नेसलेली, चुलीजवळ भाकऱ्या भाजीत बसलेली, आणखी त्या नाकांतल्या शेंबडाच्या आलेल्या लोळ्या भाकरीच्या परातींत पडतच आहेत, एकीकडे तो शेंबूड मनगटानं पुसतेच आहे, अशी एखादी कोकणची, खेंबडी लेंबडी, नाकांत कोकणं बोलणारी, अवदसाच बायको तुम्हांला हवी होती." याच नाटिकेतला परशरामपंत दारू पितो. ते पाहून विष्णुपंत म्हणतो—"घ्या शिंचाहो घोड्याचें मूत!" स्त्रियांची एक सभा भरली आहे. या समेत भाषण करताना सदर नाटिकेची नायिका म्हणते—"...आपल्या मागं ह्या पोरबाळांच्या लेंढाराची मोठी भीति आहे...अशा काही खप्पी बायका असतात की, त्यांना आपलं दर वर्षास एक कार्ट तयार! कधी एखादं इअर चुकलंच तर दुसऱ्या खेपेला आपली जुळ्याची तयारी! या देशात प्रजावृद्धीचा रेलचेल उडाल्यामुळे देशाची धुळधाणी होत आहे. पावसाळ्यांत एखादा दगड उचलला, कीं जशीं आपलीं शेकडों गांडुळं त्याच्याखाली दृष्टीस पडतात, त्याप्रमाणें प्रत्येक हिंदूच्या कुटुंबाची हल्लीची स्थिति आहे." 'मोर एल्एल्. बी.' या प्रहसनातील मोऱ्या एकान्तात आपल्या नवपरिणीत वधूला स्तनाविषयी पुढीलप्रमाणे ज्ञान देत आहे. "...स्तन म्हणजे स्त्रियांच्या शरीराच्या उरपृष्ठभागावर दोन गोळे अति सूक्ष्म अशा पातळ पाकळ्यांचे एकावर एक अनेक थर बनून झालेले असतात! ईश्वरानें हा काय विलक्षण देखावा आणि अकल्पित योजना केलेली आहे ही!"

मोरूच्या या स्तननिरूपणात खरे म्हणजे ज्याला ग्राम्य म्हणता येईल असा एकही शब्द नाही. पण त्यातील आशय मात्र निश्चितपणे ग्राम्य आहे. शब्द ग्राम्य नसतानाही आशय ग्राम्य असू शकतो हे ध्यानात ठेवावयास पाहिजे. आणि नाटकासारख्या दृश्य आणि श्राव्य काव्यात एकही ग्राम्य शब्द नसता, आणि आशयही ग्राम्य नसता, एखादे वाक्य किंवा एखादे पद शब्दांवरील आघातामुळे आणि विशिष्ट अंगविक्षेपामुळे आक्षेपार्ह बनते, असा अनुभव आहे. माधवराव जोशी यांच्या 'म्युनिसिपालिटी' या नाटकात 'म्युनिसिपल

दवाखान्यातील एक प्रसंग आहे. एक रोगी म्हणतो—" अरे मला अतिशय भूक लागली आहे रे! अजून मला घोटभर देखील दूध मिळालं नाही रे! कोणी दूध द्यारे!" याबर अंबू धोंडोपंताला म्हणते—" धोंडोपंत, दूध मागतोय पगा!" धोंडोपंत म्हणतो—" होय ना? मग पाज त्याला!" प्रत्यक्ष रंगभूमीवरील प्रयोगात या शेवटच्या वाक्याने अक्षरशः हलक्कल्लोळ होत असे, हे मी स्वतः पाहिले आहे. याच नाटकात (अंक ३, प्र. ४) म्युनिसिपालिटीच्या इलेक्शनच्या मांडवात मतदानाचा गोंधळ सुरू असताना गंगू म्हणते—" आतां बया, ह्यो यवडंसं मत समद्यासनी तरी कसं द्यायचं! आतां येईल त्याच्या येईल वाट्याला झालं!" यांतलें पहिले वाक्य उच्चारताना नाटकातले पात्र असा काही सूचक अंगविक्षेप करीत असे की पुन्हा हशाने थेटर कोसळण्याच्या बेतात येत असे. रघुनाथशास्त्री अभ्यंकरांच्या 'स्वैरसकेशा' या नाटकात (१८७१) असेच एक व्यंग्यार्थाने उच्चारलेले वाक्य आहे. सावित्री नात्राच्या तरुण रूपवती विधवेला फूस लावण्याच्या प्रयत्नात एक सधन चंगीभंगी माणूस आहे. तिच्या आईचा हात ओला केला तर हे काम जमेल असे त्याचा नोकर सांगतो. तो लगेच शंभराची नोट देऊन नोकराला सावित्रीच्या आईकडे पाठवतो. नोकर भाड्याने जागा आहे का याची चौकशी करण्याच्या मिषाने सावित्रीच्या घरात शिरतो. सावित्रीची आई बनेल आहे. ती सारा प्रकार ताडते आणि मिस्कीलपणे म्हणते—" एक जागा आहे, पण भाडं फार पडेल बुवा! पण जागा कशी! पहातांच मान डोलवावी! उगीच नाहीं ओंगळसोंगळ!"

वाटेल तेव्हा व वाटेल तेथे इरसाल ग्राम्य शब्द बिनदिक्कत वापरणारे शाहीर एकही ग्राम्य शब्द न वापरता ग्राम्य अर्थ सूचित करण्याच्या कलेतही तितकेच तरबेज आहेत. काही उदाहरणे मासला म्हणून देतो. संदर्भावरून त्यांच्यातील अंतर्गत मर्म ताबडतोब समजते.

घरगुती मिठाई पहा नव्हे वित्ताची। (होनाजी)

बाजारबसवीचे स्वार्थी बेगडी प्रेम, आणि लग्नाच्या बायकोचे एकनिष्ठ प्रेम यांमधील फरक मोठ्या कुशलतेने या वचनात व्यक्त झाला आहे. येथे ग्राम्यार्थ सूचित झालेला नाही. पण व्यंजनेतील शाहीरांचे कौशल्य स्पष्ट व्हावे म्हणून हे उदाहरण दिले आहे. असेच आणखी एक उदाहरण 'हुरमोजी बिनडाग' या शब्दांत आढळेल. अनुपभुक्त रूपवती स्त्री हा अर्थ येथे सूचित आहे. आता काही वाक्यात् व्यंजना देतो.

'दोर हा वावडिचा आखडा।' (होनाजी)
'हा कवळा हरबरा दोन्ही नखाने सोल।' (सगनभाऊ)
'थोरांचें हेंच करणें उघड्याला झाकावे।' (होनाजी)

शेवटच्या उदाहरणातील वाच्यार्थ अगदी सोज्वळ असून 'वर्णी बरेच गुण झाकुनिया

कुकर्मे ' अशा वृत्तीच्या सज्जनाचे हे वर्णन आहे असे सकृद्दर्शनी वाटते. पण ' उघड्याला झाकावे ' या शब्दांत चावट व्यंजना भरलेली आहे. ' झाकणे ' या क्रियापदाला लावणीकारांच्या कोशात चहाटळ अर्थ आहे. काळजीपूर्वक वाचणाराच्या हे ध्यानात येईल. ' विंचू फणाणुन झोंबती ' असे प्रभाकर म्हणतो. व्यंजना स्पष्ट आहे. ' कमानिला तीर कसावा । घट्ट जवा बसावा । ' (होनाजी) हे रतिक्रीडेचे सूचक वर्णन आहे. ' चाल दावा एक एक नवी ' (पठ्ठे बापूराव), ' चौऱ्याशी तऱ्हेच्या चवी ' (पठ्ठे बापूराव), ही वचने साधीभोळी नाहीत. त्यांच्यांत संभोगासनांची व्यंजना आहे. आता होनाजीच्या लावणीतील एक इरसाल व्यंजना देतो.

" प्रथम शाळेमधें गेले मेहेते पंतोजी पुढें जाव ।
वरवर लेखण फिरवुन ओनामा केला ठाव ।
कसें जोड अक्षरें लिहिला पहिला ताव ।
शाई न फुटतां खेळ चौऱ्यायसी मी शिकले डाव ।
ती चटक लावुन आवल्या गेला टाकून नांव । "

वाच्यार्थाचा संबंध शाळेत गिरविलेल्या पहिल्या धड्याशी आहे. व्यंग्य अर्थ मार्मिकांनी शोधून काढावा. ' वरवर लेखण फिरवुन ' ' जोड अक्षरें ', ' चौऱ्यायसी डाव ' आणि ' चटक ' या शब्दांत व्यंजना सामावलेली आहे.

शाहीरांच्या या धाटणीचा गेल्या शतकातील मराठी नाटकांवर झालेल्या परिणामाचा आणखी एक नमुना दाखवतो. १८७१ साली म. बा. चितळे यांचे ' मनोरमा ' हे नाटक प्रसिद्ध झाले. लग्नाच्या पहिल्या रात्रीनंतर सकाळी ' डोळे पुशीत ' मनोरमा उठून येताच वेणू आणि गंगू तिला अडवतात आणि मग पुढीलप्रमाणे संवाद होतो.

गंगू—पहिल्या दिवशींच इतका उठायला उशीर; मग पुढे काय, बारा दिखील वाजायचे !...मनोरमे, अग चालळीस का यवढी घावऱ्या घावऱ्या ?...इकडे ये तर खरी. आज यवढी उशीरा का उठलीस ?...

मनोरमा—काय बोलूं ? लागली झोप, त्याला मी काय करूं ?...

गंगू—बरं, केस कशानी पिंजारले आहेत यवढे ? वेणी काय सुटली आहे ! त्यांतलीं फुलं गळतातच आहेत ? वाराबिरा फार लागला कीं काय ?

मनोरमा—अहा ! निजून उठलं म्हणजे वेणी उसकटत नाहीं का ? वारा कशाला हवा ?

गंगू—हो, हो, तें खरंच ! पण कपाळचं कुंकु ग कशानं पुसटलं यवढं, आणि भलतीचकडे कशानी लागलं तें ?

मनोरमा—आपला हात नाहीं का झोपेंत लागत क्यन्हां कपाळाला ? त्याला लागून पुसटलं असेल, आणखी लागलं असेल दुसरीकडे कुठे. त्यांत तें काय यवढं खोदून विचारतेस ?

गंगू—बरं, तें असो मेलं; पण डोळ्यांतलं काजळ मुद्दाम कुणी लावल्याशिवाय गालाला ग कसं लागलं ?

मनोरमा—कुंकवासारसाखंच हाताबिताला लागून लागलं असेल.

गंगू—छे, हातांनीं लावल्याखेरीज कांहीं लागलं नाहीं ! आणखी यवढी थकल्यासारखी कां दिसतेस ? नाक डोळे लाल झाले आहेत.....इतकं काय झालं दमायला ?

मनोरमा—कामाबिमामुळें होतं असं. त्यांत कांहीं नवल नाहीं मोठं.

गंगू—तें बरोबर आहे. कामामुळेंच असे श्रम होतात !

मनोरमा—अहा ! अर्थ बरा फिरवितां येतो ! मी कांहीं त्या भावानी नाहीं बोललें.

गंगू—बरं तें असो ! लुगड्याचा चोळामोळा दिखिल कदाचित झोपेनें होईल, पण ओठावर आणखी गालावर दांत लागलेले दिसतात, आणखी मानेखालीं नखं रुतलेलीं दिसतात तीं ग कुठलीं ?

मनोरमा—हो, कुठे आहेत ग दाताचे आणखी नखाचे वण ? आपलं कांहीं तरी बोलावं झालं !

गंगू—बरं आतां हा आरसा घे आणखी पहा.....

मनोरमा—मला बाई दात खायाची सवय आहे. कुठे ओठबीठ सापडला असेल दाताखालीं तशींच नखं दिखील लागतात एखाद वेळीं.....

'मनोरमा' नाटकातील वर दिलेल्या संवादाची कथानकाच्या, स्वभावलेखनाच्या, अथवा अन्य कोणत्याही नाट्यात्मक परिणामाच्या दृष्टीने कसलीही जरूर नाही. केवळ चहाटळपणा, एवढीच त्याची भूमिका आहे हे स्पष्ट आहे. या संवादाचे मूळ १८६० च्या सुमारास रंगभूमीवर 'रासक्रीडा' नावाची जी 'कंट्री' नाटके करून दाखवीत असत, त्यांच्यात सापडेल. अशाच एका नाटकातील एक संवाद येथे उतरून घेतो.

चिमणी—(राधेस पाहून) अग, दूर हो, शिवशील आम्हांला, दूर उभी रहा.

राधा—वा ! मला काय झालें !

सगुणी—आणखी आम्हांला विचारतेस ? कुठे ग गेली होतीस कृष्णाला घेऊन ?

राधा—अग, फुगडी खेळतां खेळतां मूर्च्छा येऊन पडलें ती आतां सावध होऊन आलें.

लाडकी—बरें, केश कशानें पिंजारले आहेत एवढे ? वेणी काय सुटली आहे, त्यांतील फुलें गळतच आहेत. वाराबिरा लागला कीं काय ?

राधा—अहो ! निजून उठलें म्हणजे वेणी विसकटत नाही का ? वाराच कशाला हवा ?

चिमणी—हो, हो, तें खरेंच ! पण कपाळाचें कुंकू कशानें ग पुसटलें एवढें आणि भलतीकडेच कशानें लागलें ?

राधा—आपला हात नाहीं का लागत झोपेंत केव्हां कपाळाला ? त्याला लागून पुसटलें असेल आणि लागलें असेल दुसरीकडे कुठे त्यांत काय एवढें खोदून विचारतेस ?

सगुणी—बरें, तें असो मेलें. पण डोळ्यांतलें काजळ मुद्दाम कोणी लावल्याशिवाय गालाला कसं ग लागलं ?

राधा—अँः, कुंकवासारखें हाताबिताला लागून लागलं असेल.

लाडकी—छेः, हातानं लावल्याखेरीज कांहीं लागलें नाहीं. आणखी एवढी थकल्यासारखी का दिसतेस ? नाक, डोळे लाल झाले आहेत. तोंडावर घाम आलेला दिसत आहे. झोपेचे वेग येतच आहेत. इतकें काय झालें दमायला ?

राधा—कामाबिमामुळें होतं असं—त्यांत कांहीं नवल नाहीं.

चिमणी—कामामुळेंच असे श्रम होतात.

राधा—आहा, अर्थ बरा फिरवितां येतो. मी कांहीं त्या भावानं नाहीं बोलल्यें.

सगुणी—बरं तें सर्व असो. लुगड्याच्या चोळाबोळा देखील कदाचित् झोपेंत होईल. पण ओठावर आणखी गालांवर दांत लागलेले दिसतात, आणखी मानेखालीं नखें रुतलेलीं दिसतात, तीं ग कुठलीं ?

(हा उतारा श्री. कृष्णाजी आबाजी गुरुजी यांच्या ' नाटकांचीं स्थित्यंतरें ' या निबंधातून घेतलेला आहे.)

' रासक्रीडे 'तील सदर संवादाचेही मूळ मला सापडले आहे. ते आहे होनाजीच्या दोन लावण्यांमध्ये. (क्रमांक ११ आणि १७)

रात्रभर घराबाहेर राहून पहाटे ' नेत्र पुशीत ' घरी परतलेल्या श्रीहरीला राधा म्हणते—

चार प्रहर कर्मिली निशी कोणे घरीं वनमाळी ?
आला नेत्र पुशीत उठुन येवढे प्रातःकाळीं ?
सुरस गंध केशरी टिळक वर कस्तुरी भाळीं ।

घर्मानें पुसिला, भोगिली कोणी तरी वेल्हाळी।
दिसती नेत्र आरक्त मुखावर तेज क्वचित् नाही ॥

यावर कृष्णाने बतावणी करून राधेची समजूत काढण्याचा प्रयत्न केला.

वनामार्जी पोवळी गाय माझी पळून गेली।
तिला आणायासाठी राधिके रात्र बहुत झाली।
ते श्रम झाले आम्हांसी रात्रीं असी जागृती घडली।
त्यायोगें आरक्त नेत्र मुखीं पीत दशा आली।...

पण या बतावणीने राधेचे समाधान होणे शक्य नव्हते. ती पुन्हा विचारते—

कां हो रुळला दिसे चिरा मस्तकिंचा श्रीरंगा।
पेच असे मोकळा मनीं विचारा भवभयभंगा।
सुगंध वस्त्रें सारीं, येतो परिमळ तुमच्या आंगा।...
ओठ कांहो सुकले गोपीमानसराजीवभृंगा।
प्रवर्तला कांहीं म्हणा तुम्ही रात्रीं स्त्रीच्या प्रसंगा।
गालाला अंजन लागायाचें कारण काई ?

यावर कृष्ण धूर्तपणाने म्हणतो—

आणावया पुष्पें माध्यान्हीं मीं मळ्यामधीं गेलों।
आकाशीं घन वर्षतांच मग मी जाईतळीं बैसलों।
पडतां वर पुष्पाचे बिंदू मी तळीं अवघा भिजलों।
सुगंध ह्याचा असे, परस्थळीं नाहीं कोठें रमलों।
ओठ सखे सुकले धुंडितां गाई वनीं श्रमलों।
तरुस गुंतला चिरा ठाउका नसे भ्रांतींत भ्रमलों।
म्हणून पेच मोकळा, टिळ्याची गालीं काळिमा ही ॥

होनाजीच्या १७ क्रमांकाच्या लावणीतही असाच प्रकार पण अधिक चांगल्या शैलीत वर्णिला आहे.

'मनोरमा' आणि 'स्वैरसकेशा' या दोन नाटकांवर रा. ब. का. बा. मराठे यांनी १८७२ साली जी कडक टीका केली ('मराठी नाट्यसमीक्षा' या माझ्या ग्रंथाची १२–१४ पृष्ठे पाहावी.) ती प्राधान्याने त्यांच्यामधील अनीतिकारक वातावरणावर आधारलेली असून ग्राम्य व अर्वाच्य शब्दांचा निषेध आनुषंगाने आला आहे. 'अभिनव-

तरुणीविद्याप्रहसन ' आणि ' तरुणीशिक्षणनाटिका ' या दोन प्रहसनांवर सन १८८६ मध्ये ' केसरी 'मधून आलेली कडक टीका ही देखील मुख्यत्वेंकरून सामाजिक नीतीच्या दृष्टीनेच केलेली आहे. ग्राम्यतेवर आणि अश्लीलतेवरही हल्ला आहेच. ('मराठी नाट्यसमीक्षा,' पृष्ठे ७६–८० पाहावी.) ' विविधज्ञानविस्तारा 'ने ' हलकटपणा ', ' घुळवड ', ' शिमग्याची मेट ' या शब्दांनी ' तरुणीशिक्षणनाटिके 'ची संभावना केली असली तरी या टीकेचा रोखही विशेषतः अनीतीवरच आहे. श्री. कृ. कोल्हटकरांनी ' विक्रमशशिकला ' नाटकातील ' शृंगारविषयक चारगट पद्यां 'वर भर दिला आहे. ' हं मदंगा लावुं नका कर ' या ' झगड्या 'वर त्यांचा खरा राग आहे. हे पद म्हणताना पात्रे जे अचकट विचकट हावभाव करीत असत त्यांच्यामुळेच सदर नाटक म्हणजे ' शुद्ध तमाशा ' आहे असे कोल्हटकरांना वाटले. ' परि भोगिन कधीं श्याम मनोहर तनु ते शेजेवरी ' हे ' चंद्रसेना ' नाटकांतील चंद्रसेनेचे वचन कोल्हटकरांना फारच आक्षेपार्ह वाटले. हे वचन जर इतके आक्षेपार्ह, तर मग मागे उद्धृत केलेल्या लावण्यांमधील संभोगाच्या स्पष्ट आह्वानांना (मागे पृष्ठ १३८ पाहावे.) कसे तोंड द्यावयाचे हा प्रश्नच आहे !

*

संस्कृत साहित्यशास्त्रकारांनी अश्लीलतेच्या आणि ग्राम्यतेच्या प्रश्नाचे विस्तृत विवेचन केले ते केवळ काव्याचे सौंदर्य नितळ राहावे याच हेतूने. उच्च अभिरुची आणि औचित्य यांचीच जोपासना करण्याची त्यांची उत्कट इच्छा होती. जे जे असुन्दर ते ते अश्लील (अश्लीलमश्रीकरम्) अशी त्यांची स्वच्छ भूमिका होती. म्हणूनच ग्राम्य शारीर धर्मांचे वाच्यार्थाने केलेले वर्णन, आणि 'लज्जासंपादक' उक्ती, यांवर त्यांनी काव्यनाटकादिकांमध्ये कडक बहिष्कार टाकला होता. प्राचीन कवींवर खऱ्या अर्थाने एकच बंधन होते. औचित्य हे ते बंधन होय. औचित्यहानि हे कलेच्या दृष्टीने घोर पातक होय असे शास्त्रकारांनी पुन्हा पुन्हा आग्रहाने सांगितले आहे.

अनौचित्यादृते नान्यद्रसभङ्गस्य कारणम् ।
प्रसिद्धौचित्यबन्धस्तु रसस्योपनिषत्परा ॥

हे आनन्दवर्धनाचे वचन या बाबतीत मार्गदर्शक तत्त्व आहे. औचित्यामुळे कलात्मकता अबाधित राहते, रसहानि होत नाही. तेथे सामाजिक नीतीचा कसलाही संबंध संस्कृत साहित्यशास्त्रकारांनी कधीही आणला नाही हे आवर्जून स्पष्ट करणे जरूर आहे. पण कलेच्या सौन्दर्याची जपणूक करू इच्छिणाऱ्या प्रत्येक विवेकी प्रज्ञावंत टीकाकाराने जेथे औचित्यहानी झाली असेल तेथे ती उघडकीस आणून तिच्यावर टीका केलीच पाहिजे. ते त्याचे कर्तव्यच आहे. संस्कृत साहित्यशास्त्राची दृष्टी अशा प्रकारे निकोप असल्यामुळे कालिदासासारख्या लोकोत्तर महाकवीच्या काव्यात जेथे जेथे औचित्यहानि दिसून आली तेथे तेथे शास्त्रकारांनी

त्याला धारेवर धरण्यास कसलाही संकोच केला नाही. विशिष्ट शब्द किंवा विशिष्ट वचन कोणाविषयी आहे, कोणी उच्चारले आहे, कोणासमोर उच्चारले आहे, केव्हा उच्चारले आहे, आणि कोणत्या स्थळी उच्चारले आहे, हे या बाबतीतील निकष होत. हे निकष व्यवहारात जर सर्वांना पाळावेच लागतात, तर ते साहित्यांतही पाळणे आवश्यक आहे, हे ओघानेच आले. 'जुगुप्सितगोपनेच्छा लज्जा' अशी चक्रपाणिदत्ताने चरकसंहितेवरील 'आयुर्वेद-दीपिका' नावाच्या टीकेत (चरक०, सूत्रस्थान, ७।२६) 'लज्जा' या शब्दाची व्याख्या केली आहे. ज्याच्या उच्चारामुळे बोलणाराला लज्जा वाटेल, आणि ज्याच्या श्रवणामुळे ऐकणाराला लज्जा वाटेल ते लज्जाकर होय. आणि 'लज्जाकर' अशी प्रत्येक गोष्ट कवीने टाळली पाहिजे ('तथा लज्जाकरं तु यत्' असे भरतमुनींचे वचन आहे.) असा इषारा संस्कृत साहित्यशास्त्रकारांनी देऊन ठेवला आहे.

प्रतिष्ठितांनी प्रतिष्ठितांच्या समाजासाठी लिहिलेल्या काव्याच्या संदर्भात लज्जाकरत्वाची व्याप्ती फारच मोठी असते—म्हणजे लज्जाकर गोष्टींची यादीच मोठी असते; पण ग्रामीण कवींनी ग्रामीण किंवा अप्रतिष्ठित श्रोत्यांसाठी लिहिलेल्या लावण्यांच्या बाबतीत हा न्याय लावणे उचित होणार नाही, असा मुद्दा कोणी उपस्थित करतील. पण तो बरोबर नाही. ग्राम्य वृत्तीच्या श्रोत्यांसमोर तमाशाच्या फडातच जोपर्यंत लावण्या म्हटल्या जात असत तोपर्यंत ठीक होते. पण लावण्यांची पुस्तके छापून त्यांचा सार्वत्रिक प्रसार झाल्यावर, आणि कोणालाही त्या सहज उपलब्ध झाल्यावर, साराच मामला बदलणार नाही का? आता निवडक लावण्यांचे संग्रह तयार झाले आहेत, आणि ते विद्यापीठाच्या परीक्षांना पाठ्यपुस्तक म्हणून लावले जात आहेत. आता त्यांच्यामधील ग्राम्यता स्पष्ट करून दाखविणे हे टीका-काराचे कर्तव्यच आहे. ग्रामीणांनी ग्रामीणांसाठी लिहिलेल्या कवनांत आक्षेपार्ह भाग कोणता आहे हे पाहण्याचा आपल्याला अधिकारच नाही असे कोणी म्हटले तर साराच ग्रंथ आटोपला म्हणावयाचा! काही वर्षांपूर्वी महाराष्ट्रात 'शिमगा' या नावाचा एक महान सण सार्वजनिक रीतीने साजरा केला जात असे. त्या सणात विलक्षण बीभत्स आणि अर्वाच्य प्रकार होत असत. या प्रकारांचा उबग आल्यामुळेच समाजाने हे प्रकार बंद केले ना? हे प्रकार बीभत्स व अर्वाच्य असत असे म्हणण्याचा आज आपल्याला अधिकार नाही काय? शेकडो वर्षे सदर सण चाललेला आहे, म्हणून त्याच्यावर टीका करणे योग्य नाही असे म्हणणे बरोबर होईल काय? प्रतिष्ठित माणसे गणेशोत्सवाप्रमाणे आपल्या आळीत शिमगा आज साजरा करतील काय? 'अशुभ हा खेळ भावें जे खेळती। तया विजयप्राप्ति होय सत्य।' असे एका जुन्या सांप्रदायिक पदात म्हटले आहे. या वचनावर भरवसा ठेवून होलिकोत्सव आजही परंपरेप्रमाणे साजरा करण्यास कोणती हरकत आहे? रामदासी संप्र-दायातील आत्मारामस्वामी म्हणतात—

यात्रेचे जे नेमिले दिवस । त्यांतचि पातला फाल्गुनमास ।
विनोद टवाळी करूं हास्य । न धरिती लेश मर्यादा ॥
बाष्कळ खेळाचा हव्यास भारी । कथा हि कथिती पुराणाधारीं ।
होऊनि शाहाणे हि म्हणती संसारीं । होऊं दरिद्री न खेळतां ॥

(दासविश्रामधाम, ५२।९६-९७)

' भांडाचे तोंडी ' असलेल्या ' भंडपुराणा 'ची शिमग्याच्या सणात जी अभिव्यक्ती होते तिचे वर्णन ' वाग्विटंबन ' या शब्दात एकनाथ महाराजांनी केले आहे. (ए. भा. ८।८२) ' ग्रामणी बोलिजे तें ग्राम्यगीत ' असे ग्राम्यगीताचे स्वरूप (ए. भा. ८।१६९) सांगणाऱ्या एकनाथांना शिमग्यांतील कवित्वाचे ' वाग्विटंबन ' या शब्दाने वर्णन करण्याचा अधिकार नाही असे आपण म्हणू शकू काय ? याच न्यायाने ग्रामीणांसाठी लिहिल्या गेलेल्या लावण्यातील आक्षेपार्ह भागावर टीका करण्याचा कोणालाही अधिकार आहे. आणि ' या लावण्यांत कोठेही आक्षेपार्ह भाग आम्हांला दिसला नाही ' असा जर कोणी उदारमतवादी ' पुरोगामी ' बकवा करू लागले तर मागे ज्या लावण्यांचा मी उल्लेख केला आहे त्या आणि इतर इरसाल लावण्या त्यांची मुले व मुली घरात मोठ्याने म्हणत आहेत अशी त्यांनी क्षणभर कल्पना करण्याची तसदी घ्यावी. खरोखरच असे झाले तर ' विंचू गुदांत चाविल्यापरी ' त्यांची अवस्था झाल्याशिवाय राहणार नाही.

पण एक वेळ हे लावणीकार शाहीर परवडले. अमुक एका पद्धतीने आणि अमुक एका मर्यादेपर्यंत लिहावयाचे असा पूर्वसंकल्प करून काही त्यांनी लावण्या लिहिल्या नाहीत. त्यांनी त्या उत्स्फूर्त अवस्थेत लिहिल्या—ओघाबरोबर वाहत जाऊन लिहिल्या. आपल्या लावण्या कधीकाळी छापल्या जातील, आणि तमाम दुनियेच्या हातात त्या जातील हे त्यांना मुळीच माहीत नव्हते. गेल्या शतकाच्या मध्याच्या सुमारास शिळाप्रेसवर त्या छापल्या गेल्या तोपर्यंत अखिल समाजाला त्या उपलब्ध नव्हत्या. या शाहीरांनी जे काही लिहिले ते कोणाला जाणून बुजून धक्का देण्याच्या उद्देशाने लिहिले नाही. शिवाय, असंख्य लावण्या केवळ काव्यसौंदर्याच्या दृष्टीनेच पाहिल्यास खरोखरच अप्रतिम आहेत. पण विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात ' हिंगजिऱ्यावर घालून पसारा घरोघर जाले कवी ', किंवा ' तीन तुकड्यांचे एक मुंडासें तिनदां बांधी कसून ' हे परशरामाने केलेले वर्णन ज्यांना बरोबर लागू पडेल असे ' कवि ' समाजाला धक्के देण्याच्या उद्देशानेच ज्याचे सर्जन अहोरात्र करीत आहेत त्यात काव्यसौंदर्य औषधालाही नसल्यामुळे त्याचा ओंगळ बीभत्सपणा कमालीचा घृणास्पद बनलेला आहे.

आता नरकवीचे पसरट तोंड । भलतेचि निर्मिती पुराणभंड ।

या आत्मारामस्वामींच्या वचनातील 'नरकवीचे' या शब्दात 'नर' या शब्दापुढे एक 'क' आणखी घातला म्हणजे झाले.

आणि 'उघडें करून सांगतां नाहीं मन जगीं लाजिरवाणें' या परशरामाच्या उक्तीत वर्णिल्याप्रमाणे जगात दिसणारे प्रत्येक दृश्य अगदी यथातथ्यपणे, बारीकसारीक तपशिलासह, शब्दांचा कसलाही मुलाहिजा न बाळगता, वाङ्मयात अवतीर्ण करण्याचा चंग बांधून मुलूखगिरीला निघालेले लोकोत्तर 'करतुकीचे कांदे' जो 'नवनवा चमत्कार' सध्या करून दाखवीत आहेत तो पाहिल्यावर 'जा निर्लज्जा, पाजिपणाचें लक्षण मेल्या तुझें कसलें!' या पट्ठे बाबूरावाच्या शब्दांत आपल्या मनाचा क्षोभ व्यक्त करावा, नाहीतर 'असो या क्षुद्रांची गती' असे एकनाथ महाराजांप्रमाणे म्हणून स्वस्थ बसावे झाले!

*

आजच्या विशिष्ट वाङ्मयातील बहकलेल्या ग्राम्यतेचे आणि अश्लीलतेचे समर्थन करणाऱ्या काही टीकाकारांच्या वृत्तीचा विचार करणे जरूर आहे. 'महाभारताच्या आदिपर्वात भरपूर अश्लीलता नाही का?', 'मुक्तेश्वरी भारतात अश्लीलता नाही का?' असे उल्लेख करून 'मग आम्हांलाच तेवढी नावे का ठेवता?' असा सवाल ते करीत असतात. प्राचीन पूर्वजांच्या प्रत्येक परंपरा ती केवळ प्राचीन आहे म्हणूनच ठोकरून लावावयाची, आणि 'प्राचीन काळी अश्लील वाङ्मय लिहीत असत, मग आजच्या वाङ्मयातील अश्लीलतेवर आक्षेप का घ्यावयाचे?' असा मतलबी प्रश्न विचारावयाचा हा शुद्ध चावटपणा आहे. परंपरा उद्ध्वस्त करण्याचे 'बिरिद' ज्यांच्या डफावर लोंबत असते त्यांनीच या एका बाबतीत मात्र परंपरेचा दाखला द्यावा याचा विस्मय वाटतो. प्रागैतिहासिक काळातील कोणत्या तरी प्राचीन युगात स्त्रीपुरुष विवस्त्र हिंडत असत म्हणून आज देखील 'दिगंबर' अवस्थेत रस्त्यातून हिंडण्यास काय हरकत आहे? असे विचारण्यासारखाच सदर प्रकार आहे. पशुजातीप्रमाणे स्वतःच्या बहिणीशी संभोग करण्याचा प्रकार अतिप्राचीन काळी केव्हा तरी होता, मग आज मात्र या प्रकाराला विरोध कशासाठी? असा प्रश्न विचारणाऱ्या प्राचीन परंपरेच्या दोंगी पूजकाने स्वतःच हा दिव्य प्रकार अमलात आणावा, असे म्हटले तर काय होईल? प्राचीन परंपरा पाळावयाचीच तर ती आदर्शपूजनाच्या बाबतीत पाळावी! प्राचीनांनी केलेल्या फक्त आक्षेपार्ह आणि निंद्य गोष्टींचे पालन करण्याचा आग्रह धरणे व त्याचे बेदरकारपणे समर्थन करणे हा शुद्ध कोडगेपणा आहे. ऋग्वेदाच्या दहाव्या मण्डलात आलेल्या यम आणि यमी या भावाबहिणींच्या संवादाचा उल्लेख मागे पृष्ठ ५ वर येऊन गेला आहे. या ठिकाणी त्याची पुन्हा आठवण करून देणे आवश्यक आहे. भावाने आपल्याशी संभोग करावा अशी बहिणीची तीव्र इच्छा आहे. मागच्या काळात भावाने बहिणीशी संभोग केल्याचे दाखले आहेत असे म्हणून यमी

यमाला क्षुब्ध करण्याचा सारखा प्रयत्न करू लागली. यावर यम तिला म्हणतो— "भावाने बहिणीशी संभोग केल्याची उदाहरणे मागच्या काळात घडली असली तरी आज तसे करणे योग्य नाही." यमाने आपल्या बहिणीला जे उत्तर दिले त्याचे मनन करून आजच्या अश्लीलतेचे समर्थक काही शिकतील अशी आशा बाळगावी काय? पण ते काहीही शिकणार नाहीत याचीच शक्यता जास्त आहे. 'पुण्याचे गुंड लई चेंगट' असे एका शाहीराने म्हटल्याप्रमाणे अश्लीलतेचे व ग्राम्यतेचे हे समर्थक 'लई चेंगट!' व्यभिचाराला पूर्वीपासून दाखले आहेत, मग आपण व्यभिचार करावयास कोणती हरकत आहे? असे सगनभाऊच्या एका लावणीत एक विवाहित स्त्री आपल्या जाराला विचारीत आहे. "विभीच्यार कर्मास आसे दृष्टांत, पापपुण्य कोणीकडे?" (सगनभाऊ, ४५). आणि गोकुळातील विवाहित 'अबरूच्या गरतीं'शी व्यभिचार करणाऱ्या कृष्णाचा दाखला आहेच की! 'मायारूपी भगवान इष्कबाजी करून ते जात' असे म्हणून, आणि 'थोराघरचा दाखला', देऊन सगनभाऊची आणखी एक 'पुरोगामी' नायिका 'सिद्धसाधक'पणा करीत आहे. (सगनभाऊ, अंला, ८९). 'मायारूपी भगवाना'चा एवढा समर्थ दाखला देऊन आजही एखादी स्त्री 'ये दिवसा नवऱ्याबाणी' असे जाराला आह्वान देऊ शकेल. महाभारतात अश्लीलता भरपूर आहे, म्हणून ती आजही समर्थनीय आहे असे म्हणणाऱ्या चेंगट टीकाकारांना वरील व्यभिचारिणीच्या सदरात टाकावयास काय हरकत आहे? शुक्लयजुर्वेदाच्या तेविसाव्या अध्यायातील काही मंत्रांमध्ये अश्लील उक्ती आलेल्या आहेत. अश्वाच्या धार्मिक संस्कारासाठी असे अश्लील भाषण करणे भाग पडले असे कारण उवटाचार्य आणि महीधर या भाष्यकारांनी दिले असले तरी 'हे अश्लील भाषण आहे' अशी स्पष्ट कबुली दोघांनीही दिलेली आहे, इतकेच नव्हे तर या अश्लील भाषणाने 'दुर्गंधि' व अपवित्र झालेली मुखे 'दधिक्राव्णो' इत्यादी मंत्रांच्या (शु० यु० २३।३२) पठनाने पुन्हा पवित्र होवोत अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे. (मागे पृष्ठे ३–४ पाहावी.) म्हणजे जे खरोखरच अश्लील आहे त्याला त्यांनी अश्लील म्हटले, त्याच्यामागचे कारण त्यांनी दिले तरी त्याचे समर्थन केले नाही, किंबहुना एका प्रकारे दिलगिरीच व्यक्त केली आहे. अश्लील भाषण 'पापहेतु' असल्यामुळे मुख 'दुर्गन्धि' होते असे उवटाचार्यांनी स्पष्टपणे म्हटले आहे. 'अश्लीलभाषणेन हि दुर्गन्धीनि मुखानि भवन्ति पापहेतुत्वात्।' (अधिक स्पष्टीकरण मागे पृष्ठ ४ वर पाहावे.) अश्लीलाकडून श्लीलाकडे, आणि असभ्यत्वाकडून सभ्यत्वाकडे जाणे हाच सांकृतिक विकासाचा क्रम आहे. मागची माणसे अश्लील बोलत होती, म्हणून आज आम्ही अश्लील बोलणार, हे म्हणणे निर्भेळ टारगटपणाचे आहे. अगदी प्राचीन काळातील माणसे नग्नावस्थेत, किंवा फार तर कंबरेखाली झाडाची पाने लावून हिंडत असत, पण हा शुद्ध दोंगीपणा आहे याची जाणीव झाल्यामुळे आम्ही बंड करणार असून कंबरेचे डोक्याला बांधून हिंडणार आहोत, अशा प्रकारचे उद्गार 'हिप्पी' संप्रदायातील अतिपुरोगामी लोक काढीत आहेत.

या 'हिप्पी' संप्रदायातील एखादा 'कृतिशील' हुप्पा रस्त्यावर दिसण्याचे भाग्य लाभेल अशी आशा वाटण्यासारखी परिस्थिती आता निर्माण होऊ लागली आहे. महाभारतात अश्लील उद्‌गार आहेत म्हणून आजही तसे उद्‌गार समर्थनीय आहेत असा बकवा करणारे टारगट टीकाकार या हिप्पींच्या संप्रदायात सुखाने विहार करोत एवढेच म्हणणे सामान्य माणसाला शक्य आहे.

खजुराओ येथील मंदिरावर चक्र संभोगासनांची मोठी कलात्मक दृश्ये पाहावयास मिळतात हे खरे आहे. पण ही 'संभोगशिल्पे' खजुराओ येथेच ठेवावयाची असतात— बाजाराच्या चवाठ्यावर, सार्वजनिक उद्यानांमध्ये, प्रार्थनामंदिरांमध्ये, शाळाकॉलेजांमध्ये, किंवा विद्यापीठाच्या इमारतींवर त्यांची प्रतिष्ठापना करावयाची नसते. आणि अशी प्रतिष्ठापना करण्यास काही एक हरकत नाही, किंबहुना असे न करणे हे ढोंगीपणाचे आहे, असे ज्या क्रांतिवादी पुरोगामी महात्म्याला प्रामाणिकपणे वाटत असेल त्याने अशा शिल्प-कृतींपैकी एखाद्या इरसाल शिल्पाची प्रतिकृती वयात आलेल्या आपल्या उपवर कन्येच्या अभ्यासिकेतील टेबलावर ठेवून द्यावी! 'चॅरिटी बिगिन्स ॲट होम' अशी एक म्हण इंग्रजीत आहे ना?

ग्राम्यत्व आणि अनौचित्य यांचा निर्णय करीत असता संदर्भ पाहणे आवश्यक असते असेच संस्कृत साहित्यशास्त्राने अगदी कंठरवाने पुन्हा पुन्हा सांगितले आहे. या पुस्तकाच्या पहिल्या भागातील विवेचन यासाठी पुन्हा वाचावे. 'न स्वाभाविकं पुरुषस्य इव शब्दस्य ग्राम्यत्वम्, अपि तु विषयभेदेन' असे रुद्रटाचा टीकाकार नमिसाधु म्हणतो (मागे पृष्ठ १७ पाहावे.) यातील मर्म लक्षात घेतले तरी काही शब्द देखील सामाजिक संकेतांच्या अनुरोधाने ग्राम्य ठरतात हे विसरता यावयाचे नाही. 'यूफिमिझम्' (euphemism) हा प्रकार यामुळेच अस्तित्वात आला. आणि यामुळेच

> ग्राम्यत्वमनौचित्यं व्यवहाराकारवेषवचनानाम् ।
> देशकुलजातिविद्यावित्तवयःस्थानपात्रेषु ॥

असा तपशील देणे रुद्रटाला भाग पडले. (मागे पृष्ठ २१ पाहावे.)

रुद्रटाने सांगितलेल्या या कलमांचा विचार करून जे जे ग्राम्य आणि अनुचित ठरेल ते ग्राम्य आणि अनुचित आहे असे असंदिग्धपणे सांगणे हेच प्रत्येक प्रज्ञावंत टीकाकाराचे कर्तव्य होय. मग ही ग्राम्यता महाभारतातील असो, कालिदासाच्या कृतीतील असो, एकनाथमहाराजांच्या लेखनातील असो, किंवा मुक्तेश्वराच्या लेखनातील असो!

*

या बाबतीत नित्य घडणाऱ्या 'वदतोव्याघाता'चा (contradiction in terms) उल्लेख करून हे विवेचन संपवितो. ग्राम्य शब्द आणि ग्राम्य अर्थ स्वैरपणे उधळणारे ते क्रांतिवादी आणि पुरोगामी, असा चालू युगाचा संकेत दिसतो. पण हे ग्राम्य शब्द नेमके कोणते हे स्पष्ट केल्यावाचून त्यांच्यावरील आक्षेपाला प्रमाणशुद्धता येत नसल्यामुळे ते उद्धृत करणे अपरिहार्य ठरते. 'अवगुण आइकिलियावाचून । सहसा न कळती किंलक्षण ।' या दिनकर गोसाव्याच्या वचनाचा मागे उल्लेख केला होता. पण ग्राम्य शब्द उद्धृत केल्याबरोबर सदर क्रांतिवादी पुरोगामी 'तुरेवाल्यांचीं पोरें' (हे शब्द पठ्ठे बापूरावाचे आहेत.) एवढम भडकतात. माधवराव जोशी यांच्या 'म्युनिसिपालिटी' नाटकातील पांडोबाच्या शेवटच्या भाषणातील एका वाक्याचा उपयोग करून या लोकांना उलट सवाल करिता येईल. "हा बिलोरी आरसा तुमच्यापुढे धरला होता. कुणावर रागावता? आपणच आपल्यावर रागावता?" पण खरे म्हणजे, त्यांची अचाट 'करतुक' दुसऱ्याने त्यांच्या कानांवर घालताच त्यांना राग येणे स्वाभाविकच आहे असे म्हणावे लागेल. एकनाथ-महाराजांनी म्हटल्याप्रमाणे (भा. रा. सुंदर. ३५।१३६)—

कुष्ठियासी कुष्ठ सांगतां । कोप येतसे तत्वता ।
कां रांडवेसी रांड म्हणतां । अति क्षोभतां संतापे ।।
तेवीं मज सत्य बोलता । कोप येतसे तत्वता ।...

सत्य हे नित्य अप्रिय असते हेच खरे!

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वतंत्र
अनुक्रम..... दिः .....
क्रमांक ..... दिः .....

संक्षेपांचे स्पष्टीकरण

आग्नि. — अग्निपुराण
अनु. — महाभारत, अनुशासन पर्व
ए. भा. — एकनाथी भागवत
कृ. वि. — मोरोपंत, कृष्णविजय
ना. शा. — भरतनाट्यशास्त्र
भा. रा. — भावार्थ रामायण
म. भा. — महाभारत
वि. ध. पु. — विष्णुधर्मोत्तरपुराण
वेणी. — वेणीसंहार
शु. य. — शुक्लयजुर्वेद
ज्ञा. — ज्ञानेश्वरी

संदर्भ-ग्रंथ

(वर्गीकृत यादी)

वेद

ऋग्वेद

शुक्लयजुर्वेद

महाकाव्ये, पुराणे

अग्निपुराण

भागवतपुराण

महाभारत

रामायण

विष्णुधर्मोत्तरपुराण

नाट्यशास्त्र, साहित्यशास्त्र

आनन्दवर्धन — ध्वन्यालोक

कुन्तक — वक्रोक्तिजीवित

केशवमिश्र — अलंकारशेखर

क्षेमेन्द्र — औचित्यविचारचर्चा

गोविन्द ठक्कुर — काव्यप्रदीप

दण्डी — काव्यादर्श

भरतमुनि — नाट्यशास्त्र (Gaekwad Series)

भामह — भामहालङ्कार

भोज — सरस्वतीकण्ठाभरण

मम्मट — काव्यप्रकाश
राजशेखर — काव्यमीमांसा
रुद्रट — काव्यालङ्कार
वाग्भट — वाग्भटालङ्कार
वामन — काव्यालङ्कारसूत्र
विद्यानाथ — प्रतापरुद्रीय
विश्वनाथ — साहित्यदर्पण
हेमचन्द्र — काव्यानुशासन

वैद्यकशास्त्र, कामशास्त्र

चरक — चरकसंहिता
वात्स्यायन — कामसूत्र (यशोधराच्या ' जयमङ्गला ' टीकेसह)

काव्य, नाटक

अमरुक — अमरुशतक
कालिदास — अभिज्ञानशाकुन्तल
कालिदास — कुमारसम्भव
कालिदास — मेघदूत
कालिदास — रघुवंश
कालिदास — विक्रमोर्वशीय
क्षेमेन्द्र — भारतमञ्जरी
भट्टनारायण — वेणीसंहार
भर्तृहरि — वैराग्यशतक
मङ्ख — श्रीकण्ठचरित
वल्लभदेव — सुभाषितावलि
हाल — गाथासप्तशती

सुभाषितसंग्रह

सदुक्तिकर्णामृत
सुभाषितरत्नभाण्डागार



REFBK-0017760

जुनी मराठी कविता

आत्मारामस्वामी — दासविश्रामधाम
एकनाथ — एकनाथी भागवत
एकनाथ — भावार्थ रामायण
कृष्णदयार्णव — हरिवरदा
दासोपंत — गीतार्णव
दासोपंत — दासोपंतांची पदे
दिनकर गोसावी — स्वानुभवदिनकर
मुक्तेश्वर — मुक्तेश्वरी भारत
मुक्तेश्वर — शुकरंभासंवाद
मोरोपंत — आर्याभारत
मोरोपंत — कृष्णविजय
वामनपंडित — कात्यायनीव्रत
वामनपंडित — जलक्रीडा
वामनपंडित — बालक्रीडा
वामनपंडित — राधाभुजंग
वामनपंडित — राधाविलास
श्रीधर — जैमिनी अश्वमेध
श्रीधर — पांडवप्रताप
श्रीधर — रामविजय
ज्ञानेश्वर — ज्ञानेश्वरी

शाहिरांच्या लावण्यांचे संग्रह

अनंतफंदी
पठ्ठे बापूराव
परशराम
प्रभाकर
रामजोशी
सगनभाऊ
होनाजी
अंधारातील लावण्या (संपादक—य. न. केळकर)

सूची

(ग्रंथांची आणि काव्यांची नावे एकेरी अवतरण चिह्नांत दिली आहेत.)

'अग्निपुराण' ४४
अनंतफंदी १३०
'अंधारातील लावण्या' १२९, १३०, १३४, १३५, १३७, १४०
अभिनवगुप्त १०
'अभिज्ञानशाकुन्तल' ९, ३१, ३८, ५०, ५२, ७६, ७७
अमरुशतक ३६–३७, ३९
अमंगलाश्लील १६, २५
अर्जुनवर्मदेव ३७–३८
अर्थदुष्ट ११
अर्थान्तरवाचि अश्लील ३५
'अलंकारशेखर' ४३
अशस्त अर्थ ३१
अशस्तस्मृतिहेतु अमंगल २६
अशस्तार्थ अमंगल २५
अशस्तार्थान्तर अमंगल २५
असभ्यस्मृतिहेतु २३, २५
असभ्यार्थ २३
असभ्यार्थान्तर २३, २४
आत्मारामस्वामी १६७, १६८, १६९
आनन्दवर्धन ४७, ४८, ५४, १६६
'आर्याभारत' ७१, ७२, ७३, ७४, ७५, ७८, ८०, ११९, १२०, १२१
उवटाचार्य ३, ४, १७०
ऋग्वेद ३, ५
एकनाथ ६०, ६२, ६३, ६४, ६५, ६६, ६७, ८३, ८४, ८५, ८७, ८८, ८९, ९०, ९१, ९२, ९३, ९५, ९७, १०३, १०६, १०७, १०८, १४३, १५०, १५७, १५८, १६८, १७१, १७२
'एकनाथी भागवत' ६१–६२, ६३, ६६, ६७, ८३, ८४, ८८, ८९,

९०, ९१, ९५, ९६, १२५, १५८, १६८
'ऐतरेय ब्राह्मण' ५, ६
'औचित्यविचारचर्चा' ४९
कर्णोत्पल ५०
'कात्यायनी व्रत' १११–१२
कानीटकर, ना. बा. १६०
'कामसूत्र' ४१, ५५, १५०, १५१, १५२
कालिदास ९, ३८, ४९, ७६, १७१
'काव्यप्रकाश' १०,
'काव्यप्रदीप' ३७, ३९, ४३
'काव्यादर्श' ३२, ३३, ३८
'काव्यानुशासन' ४३, ४८
'काव्यालंकार' १६–२२, १२२
किर्लोस्कर, अण्णासाहेब १४५
कुन्तक ४७, ५०, ८३
'कुमारसम्भव' २२, २९, ३०, ४९, ११४
'कृपण सावकाराचा फार्स' १५९
कृष्णदयार्णव ६४, ९५, ११६, ११७, १५८
'कृष्णविजय' ११७, ११८, ११९
केशवमिश्र ४३, ४४
कोल्हटकर, श्री. कृ. १६६
'गाथासप्तशती' ३९
गुप्त १४
गुप्त अश्लील ३०
गुरुजी, कृ. आ. १६४
गोविन्द ठक्कुर ३७, ४०
'गीतार्णव' ६०, ६५, ९४
ग्रीन, टी. एम्. ५३
घृणावत्स्मृतिहेतु २६, २७, ३३,
घृणावदर्थ २६
घृणावदर्थान्तर २६, २७
'चंद्रसेना' १६६
'चरकसंहिता' ५२, १५०, १६७
चितळे, म. बा. १६२
'चौरपंचाशिका' ३५
'जयमङ्गला' ४१
'जलक्रीडा' ११०–१११
जुगुप्साश्लील १५
'जैमिनि अश्वमेध' १२५
झळकीकर, वामनाचार्य १०, ३५, ४३
'टारगट पोर' १५९
डब्यूई, जॉन ५३
'तरुणीशिक्षणनाटिका' १६०, १६६
दण्डी ११–१३, ३२, ३७, ८४, १३७
'दासविश्रामधाम' १६८
दासोपंत ६०, ६५, ९४
दासोपंतांची पदे ६५
दिनकर गोसावी ६२, ८३, १२६, १७२
देवल, गो. ब. १५९
नमिसाधु १६, १७, १८, २०, २२, ८३, १७१
नागेश ९३, ११५–११६
'नाट्यशास्त्र' ७–९, ४७
पठ्ठे बापूराव १३२, १३३, १५८, १६२, १६९, १७२
परशराम १२५, १२६, १२८, १३१, १३२, १३५, १३९, १४०, १४१

'पांडवप्रताप' ७१, ७२, ७३, ७४, ७९, ८०, ८१, १२१, १२२
प्रजापति ६
'प्रतापरुद्रीय' ४३
प्रभाकर १२५, १२८, १२९, १३६, १३८, १४३, १४४, १४६, १४७, १४८
प्रहेलिका ४४, ४६
बाजीराव (दुसरा) १२५
'फरडा मुत्सद्दी' १५९
भरतमुनि ७, ८, ९
'भागवत पुराण' ६४, ९०
भागवत, ना. ह. १५९
भामह १०–११
'भामहालंकार' ३४
'भारतमञ्जरी' ७७–७८, ८१
'भावार्थ रामायण' ६३, ६४, ८३, ८४, ८५, ८६, ९३, ९८, ९९, १००, १०१, १०२, १०३, १०४, १०५, १०६, १०७, १०८, १०९, १५७, १७२
भोज २२–३५, ४४, ४५
मङ्ख ५०
'मनोरमा' १६२, १६३, १६५
'मंत्रब्राह्मण' ४
मम्मट १०, ३५–४३
मराठे, का. बा. १६५
'महाभारत' ६, ७०, ७१, ७२, ७३, ७५, ७७, ८१, ८८, १६९, १७०, १७१
'महावीरचरित' ३४
महीधर ३, ४, १७०
'मालतीमाधव' ३४
मुक्तेश्वर ६७, ६८, ६९, ७०, ७१, ७२, ७३, ७४, ७५, ७७, ७८, ७९, ८१, ८२, ९३, ९४, १०८ १०९, १८०, १२२, १७१
'मुक्तेश्वरी भारत' ७०, ७१, ७२, ७३, ७४, ७५, ७८, ७९, ८०, ८२, ९४, १६९
'मुद्राराक्षस' ३६
'मृच्छकटिक' १५९
'मेघदूत' ३८, ३९
मॅकडोनल्ड, के. एस्. ४
'मोर एल्एल्. बी.' १५९, १६०
मोरोपंत ७१, ७२, ७३, ७४, ७५, ७८, ७९, ८०, ८१, १०९, ११७–१२१
'म्युनिसिपालिटी' १६०, १६१, १७२
यम–यमी संवाद ५, १७०
यशोधर ४१, १५१, १५२
यूफिमिझम् १५५, १५७, १७१
'रघुवंश' ३८
रङ्गनाथ ४०
राघवभट्ट ५२–५३
राजवाडे, कृष्णशास्त्री ३४
राजशेखर ४६
'राधाभुजंग' ११३
'राधाविलास' ११३
रामजोशी १२६, १२७, १२८, १३०, १३१, १३४
'रामविजय' ८५, ८७, ९८, १००, १०१, १०२, १०३, १०८, १२१, १२२, १७१
रामा गोंधळी १२६, १४०

'रासक्रीडा' १६३, १६४
रुद्रट १६–२२, ४४, ५०, ८२, १२२, १७१
लक्षित अश्लील १४
लक्षित अश्लील ३१
लँगर, सुसन ८३
लोकहितवादी १५९
लोकसंवीत १५
'वक्रोक्तिजीवित' ४७
वाग्भट ४३, ४४
'वाग्भटालंकार' ४३
वात्स्यायन ५५
वामन ३५, ११, १३–१६
वामन पंडित ९३, ११०, १११, ११२, ११३, ११४
'वाल्मीकिरामायण' ८४, ८५, ८७, १०५, १०६
'विक्रम शशिकला' १६६
'विक्रमोर्वशीय' ३८, ३९–४०
विद्यानाथ ४३, ४४
'विविधज्ञानविस्तार' १६६
विश्वनाथ ४३
'विष्णुधर्मोत्तरपुराण' ४४, ४५
'वेणीसंहार' ३२, ४२–४३
व्यास ७५
व्रीडाश्लील १५
'शाकुंतल १४५
'शार्ङ्गधरपद्धति' ५४
'शुकरंभासंवाद' ६७, ६८, ६९, १०९, ११०, १२२
शुक्लयजुर्वेद ३, १७०
'श्रीकण्ठचरित' ५०
श्रीधर ७१, ७२, ७४, ७५, ७६, ७९, ८०, ८१, ८५, ८७, ९८, ९९, १०१, १०२, १०८, १२१, १२२, १२५
संवीत १५, २९
संवीत अश्लील २९
संवृत १४, १५, २९
सगनभाऊ १२५, १२६, १३४, १३५, १३६, १३८, १४१, १४२, १६१, १७०
'सदुक्तिकर्णामृत' ५०–५१
'सरस्वतीकण्ठाभरण' २२, २३, २४, २५, २६, २७, २८, २९, ३०, ३१, ३२, ३३, ३४, ३५
सायणाचार्य ५, ६
'साहित्यदर्पण' ४३
'सीतास्वयंवर' ११५–११६
'सेतुबन्ध' ३८
स्टर्न, गुस्ताफ १५५
'स्वानुभवदिनकर' ६२, १७२
'स्वैरसकेशा' १५९, १६१, १६५
'हरिवरदा' ६४, ९५, ११६, ११७, १५८
हरिश्चन्द्र-रोहित कथा ५
हेमचन्द्र ४३, ४८, ४९
होनाजी १२५, १२६, १२९, १३०, १३१, १३२, १३३, १३४, १३५, १३६, १३७, १३९, १४२, १४३, १६१, १६२, १६४, १६५
क्षेमेन्द्र ४९, ७७, ७८, ८१, ८२, ११४, ११५, १५०
ज्ञानेश्वर ५९, ८८, ८९, ९६, ९७, ११४, १२१
ज्ञानेश्वरी ६०, ६१, ८८, ९६. १२१

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वागत
क्रमांक 104362 दि: 12.11.91

वे वे च क ग्रं थ

आधुनिक मराठी कविता ◻ प्रा. भ. श्री. पंडित ◻ आठ रुपये ■
चरित्र-आत्मचरित्र ◻ अ. म. जोशी ◻ सात रुपये ■ मराठी निबंध ◻
म. मा. अळतेकर ◻ सात रुपये ■ वाङ्मयीन व्यक्ती ◻ डॉ. मा. गो.
देशमुख ◻ सहा रुपये ■ नाट्याचार्य देवल ◻ श्री. ना. बनहट्टी ◻
आठ रुपये ■ मराठी नाट्यतंत्र ◻ संपादक : मो. द. ब्रह्मे ◻ दहा
रुपये ■ समाज प्रबोधन ◻ प्र. बा. गजेन्द्रगडकर ◻ वीस रुपये ■

सु वि चा र प्र का श न मं ड ळ